# महाराष्ट्रातील माहिती अधिकार चळवळ आणि सजग नागरीक मंच:
# एक चिकित्सक अभ्यास

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

**सामाजिक शास्त्रे विद्याशाखेंतर्गत राज्यशास्त्र विषयातील**

**एम.फिल् पदवी करीता सादर केलेला लघुशोधप्रबंध**


**✻ संशोधक ✻**

**विशाल उर्फ महादेव भिवाजी गवळी**

**PRN NO – ०२२१६४०८३६०**

**✻ मार्गदर्शक ✻**

**प्रा. डॉ. माणिक सोनवणे**

राज्यशास्त्र विभाग

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे


**एप्रिल २०१९**

# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, **श्री. विशाल उर्फ महादेव भिवाजी गवळी** यांनी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्र शाखेअंतर्गत राज्यशास्त्र विषयातील एम.फिल् पदवीसाठी सादर केलेल्या **महाराष्ट्रातील माहिती अधिकार चळवळ आणि सजग नागरिक मंच : एक चिकित्सक अभ्यास** या विषयावरील लघुशोध प्रबंधातील माहिती मुळ संदर्भातून संकलित केली असून योग्य त्या ठिकाणी उल्लेख केलेला आहे. हे संशोधन स्वतंत्र व नवे असून यापूर्वी ते कोणत्याही पदवीसाठी सादर करण्यात आलेले नाही.

सदर लघुशोध टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यानिष्णांत (एम.फिल्) राज्यशास्त्र पदवीसाठी सादर करण्यास माझी अनुमती आहे.

दिनांक : 15.04.2019

स्थळ : पुणे

मार्गदर्शक

प्रा. डॉ. माणिक सोनवणे

राज्यशास्त्र विभाग प्रमुख

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

## प्रतिज्ञापत्र

मी **श्री. विशाल उर्फ महादेव भिवाजी गवळी** प्रतिज्ञापूर्वक असे नमुद करतो की, **''महाराष्ट्रातील माहिती अधिकार चळवळ आणि सजग नागरिक मंच : एक चिकित्सक अभ्यास''** या विषयावरील लघुशोध प्रबंध मी स्वत: लिहिलेला असून टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्रे विद्याशात्रे अंतर्गत राज्यशास्त्र विषयामध्ये एम.फिल् पदवीकरिता सादर केला आहे.

सदर लघुशोध प्रबंध मी अन्य कोणत्याही विद्यापीठात इतर कोणत्याही पदवीसाठी सादर केलेला नाही.

दिनांक : 15.04.2019

स्थळ : पुणे

संशोधक

विशाल उर्फ महादेव भिवाजी गवळी

राज्यशास्त्र विभाग

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

## ✻ ऋणनिर्देश ✻

महाराष्ट्रातील माहिती अधिकार चळवळ या चळवळीत योगदान देणारे असंख्य कार्यकर्ते आहेत. त्यासर्वांचे कार्य या संशोधनासाठी प्रेरणादायी ठरले आहे. अण्णा हजारे याच्या कार्यातून अनेकांनी प्रेरणा घेतली. त्यातून असंख्य चळवळी महाराष्ट्रात निर्माण झाल्या.

या चळवळींबद्दल एक संशोधक म्हणून मला जिज्ञासा होतीच त्यातून मी सजग नागरिक मंचने केलेल्या कार्यावर संशोधन करावे असे माझ्या मनात विचार आला त्यातून मी हा विषय निवडला. माझ्या अभ्यास विषयाला मार्गदर्शन केल्याबद्दल डॉ माणिक सोनवणे सरांचे मी आभार व्यक्त करतो.

माझा विषय निवडून मी रजिस्ट्रेशन केल्यानंतर मी विवेक वेलणकर सरांची भेट घेतली. त्यांनी संशोधनासाठी मोकळेपणाने माहिती दिली याबद्दल त्यांचे मी आभार व्यक्त करतो.

विजय कुंभार, अभिजीत राठोड, धनंजय भिसे, मानव कांबळे, संजय शिरोडकर, प्रल्हाद कचरे, जुगल राठी, यागुरूतुल्य सर्वांनी संशोधनासाठी मोलाचे मार्गदर्शन केले त्यांचेही मी आभार मानतो.

**स्थळ : पुणे**

**दि. १५/०४/२०१९**

**संशोधक**

**विशाल उर्फ महादेव भिवाजी गवळी**

**राज्यशास्त्र विभाग**

**टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे**

## अनुक्रमणिका


| अ.क्र क्रमांक | प्रकरण | प्रकरणांचे नाव | पान नंबर |
|---|---|---|---|
| १ | प्रकरण १ | प्रस्तावना | ०२ ते ३२ |
| २ | प्रकरण २ | संदर्भ साहित्याचा आढावा | ३३ ते ४६ |
| ३ | प्रकरण ३ | संशोधन पद्धती | ४७ ते ६४ |
| ४ | प्रकरण ४- अ | **भाग-अ**<br>माहिती अधिकार कायद्याच्या प्रसार प्रचारासाठी सजग नागरीक मंचाच्या कार्याचा आढावा<br>**भाग-ब**<br>माहितीचे सादरीकरण व विश्लेषण | ६५ ते १२२ व १२३ ते १५१ |
| ५ | प्रकरण ५ | उपसंहार, निष्कर्ष आणि उपाययोजना | १५२ ते १६८ |
| ६) | परिशिष्ठ -१ | प्रश्नावली | १६९ ते १७१ |
| | परिशिष्ठ -२ | सजग नागरिक मंच भेट पत्र<br>सर्टिफिकेट- ब्यूरो ऑफ आउटरीच एंड कम्युनिकेशन<br>महाराष्ट्र शासन परिपत्रक दि. २६ नाव्हें. २०१८ | १७२ ते १७६ |

## प्रकरण पहिले – प्रास्ताविक

१. स्वराज्याची वर्धिष्णुता अन् माहितीचा अधिकार

२. जनताच सार्वभौम सत्ता

३. माहिती अधिकाराची पार्श्वभूमी

३.१) राष्ट्रीय संदर्भ

३.२) आतंरराष्ट्रीय संदर्भ

४. महाराष्ट्रातील माहिती अधिकार चळवळ

४.१) जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे

४.२) अण्णांच्या माहिती अधिकार आंदोलनाचा घटनाक्रम

४.३) सुराज्य संघर्ष समितीचे अध्यक्ष विजय कुंभार

४.४) चाणक्य मंडलचे अविनाश धर्माधिकारी

४.५) संजय शिरोडकर

४.६) 'मनिलाईफ फाउंडेशन आरटीआय केंद्र'

४.७) पुणे महानगरपालीकेमधील पब्लिक कन्सर्न फॉर गव्हर्नन्स ट्रस्ट

४.८) वयम् चळवळ आणि वन हक्क कायदा

४.९) माहिती अधिकार सत्याग्रहातून आदिवासी नागरिकांना जमिनीवरचा पूर्ण हक्क प्राप्त झाला.

४.१०) माहिती अधिकार मंच – भास्कर प्रभु

४.११) अनिल गलगली

५. 'सजग नागरिक मंच या संस्थेची स्थापना

६. लोकशाहीची गरज : सजग  नागरिक मंच

७. सामान्य पुणेकरांना भेडसावणारे प्रश्न

## प्रकरणः एक

## प्रास्ताविक

भारतासारख्या खंडप्राय देशावर मुठभर ब्रिटीश राज्य करत होते. इतक्या मोठ्या देशावर केवळ शस्त्रबळाचा किवा सैन्य बळाचा वापर करून नियंत्रण ठेवता येणे शक्य नव्हते. त्यासाठी कायद्याची यंत्रणा ब्रिटीशांनी तयार केली होती. १८३३ च्या चार्टर प्रमाणे इंग्रज सरकारने लॉ कमिशन ची स्थापना केली. लॉ कमिशनच्या प्रमुखपदी लॉर्ड मेकॉले यांची नियुक्ती केली गेली. त्यातूनच पुढे भारतीय दंडविधान संहितेची निर्मिती झाली. दरम्यान याच काळात सिव्हिल प्रोसिजर कोड, क्रिमिनल प्रोसिजर कोड ची निर्मिती करण्यात आली. ब्रिटीश काळातच आधुनिक कायदे संहिता भारतीयांना मिळालीअसली तरीही इंग्रजांचे कायदे हे भारतीयांसाठी पक्षपाती स्वरूपाचे होते. व्हर्नाक्युलर प्रेस एक्ट (१८७८) हा वृत्तपत्रांवरील अभिव्यक्तीस्वातंत्र्याला हारताळ फासणारा कायदा होता. १९२३ चा ऑफिशिअल सिक्रेट एक्ट हा कायदा प्रशासकीय कामकाजाबाबात गोपनीयता बाळगणारा कायदा होता. जनतेला गोपनीयतेच्या नावाखाली प्रशासकीय कामकाजाबाबात अनभिज्ञ ठेवणे असे या कायद्याचे स्वरूप होते. त्याचा प्रतिकुल प्रभाव स्वातंत्र्योत्तर भारतात माहितीचा अधिकार कायदा २००५ अस्तित्वात येई पर्यंत पाहावयास मिळतो.

ब्रिटीशकाळातकायद्यासमोर सर्व समान असे तत्व सांगणारी कायदे व्यवस्था आणि त्यातील प्रत्यक्षातील काळा-गोरा असा भेद होता. भारतीयांप्रती पक्षपाती कायदा अन् तो कायदा राबवण्यासाठी, तसेच ब्रिटीश यंत्रणेचे रक्षण करण्यासाठी नोकरशाही अस्तित्वात आली. सरकारी अधिका-यांची साखळी असे नोकरशाहीचे स्वरूप होते. नोकरशाही ही देशाचा कारभार करण्याचे व अमलबजावणीचे कार्य करत होती. सुरूवातीस ब्रिटीश प्रशासना मध्ये केवळ इंग्रजांना स्थान होते. नंतरच्या काळात भारतीयांनाही प्रशासनात ब्रिटिशांनी सामावून घेतले. नोकरशाहीच्या निवडीसाठी स्पर्धा परिक्षा ब्रिटीशकाळापासून भारतात सुरू झाल्या होत्या. ब्रिटिशांनी भारतात स्वार्थापोटी शासन यंत्रणा राबविली.परिणामी प्रखर राष्ट्रवादाचा उदय झाला. एक प्रदिर्घ स्वातंत्र्य लढ्याची पार्श्वभुमी भारताला लाभली. या स्वातंत्र्य लढ्यात सर्वाधिक चर्चा झाली ती स्वराज्य संकल्पनेची..!!८)

स्वराज्याची वर्धिष्णुता अन् माहितीचा अधिकार ‘स्वराज्य माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि ते मी मिळविणारच !’ लोकमान्य टिळकांची ही सिंहगर्जना सर्वश्रृत आहे. टिळकांनी स्वराज्य आणि सुराज्य यांचे विश्लेषण केले होते. स्वराज्य म्हणजे आपले शासन. परकीय राज्य कितीही शिस्तबद्ध असले तरी त्याला स्वराज्य म्हणता येणार नाही. स्वराज्य म्हणजे प्रजेचा अधिकार हे सांगुन लोकमान्यांनी त्याकाळी लोकशाही प्रजासत्ताक या विचारांचे बीजारोपण चतु:सुत्रीमध्ये स्वराज्याचा मंत्र देवून केलेले आहे.

स्वराज्य ही संकल्पना विषद करण्यासाठी महात्मा गांधींनी १९०८ मध्ये हिंदस्वराज्य नावाचे पुस्तक लिहले होते. सत्ता लोकांच्या हातात असते व असावी. तात्पुरती सोय म्हणून जनता प्रतिनिधी निवडते. त्या प्रतिनिधींनी सत्ता बळकावणे गांधींना मान्य नव्हते लोकशक्ती सार्वभौम असते. लोकशक्ती समोर दंडशक्ती, शासनशक्ती यांचा काही उपयोग नाही. सरकार लोकांवर सक्ती करू शकत नाही. माहिती अधिकार कायद्याच्या संदर्भात गांधींजीच्या विश्वस्त संकल्पनेनुसार शासनकर्ते, सार्वजनिक संस्थांमधील माहितीचे मालक नसून केवळ विश्वस्त आहेत.

गांधीजीच्या मते सत्तेच्या दुरुपयोगाला विरोध करण्याचे सामर्थ्य जनतेठायी असावे..! ‘काही अल्पलोकांच्या हाती सत्ता देवून स्वराज्य साकार होणार नाही; तर जेव्हा सत्तेच्या दुरुपयोगाला विरोध करण्याचे सामर्थ्य जनतेमध्ये येईल, तेव्हाच खरे स्वराज्य साकार होईल’’ गांधीजीच्या मते शासकीय कार्याचा गाभा म्हणजे नागरिक..! आपल्याकडे येणारे नागरिक हे फार मोलाचे आहेत. नागरिक हे कोणी परके नसून आपण त्यांच्या साठी आहोत. नागरिक हे आपल्या कामामध्ये व्यत्यय नसून ते आपल्या कामाचा गाभा आहेत. नागरिक कोणी परके नसून ते ख–या अर्थाने आपले आधार स्तंभ आहेत. त्यांना माहिती व कल्याणकारी सेवा पुरवून आपण उपकार करत नाही; तर सेवा करण्याची संधी देवून तेच आपणा सर्वांना उपकृत करत आहेत. १)

**✻ विनोबांचे स्वराज्यशास्त्र :-**

‘पहिला तत्वनिष्ठ सत्याग्रही’म्हणून महात्मा गांधींजीनी १९४० साली वर्णन केलेले विनोबा भावे आपल्या पवनारच्या आश्रमात विधायक कार्याचे प्रयोग आणि साधना करीत असत. त्यांच्या स्वराज्यशास्त्रावरील प्रवचनांचे पुस्तक स्वराज्यशास्त्र नावाने प्रसिद्ध आहे. त्यात त्यांनी स्वातंत्र्यापुर्वीच स्वराज्य कसे असावे या संबंधीच्या दहा कसोट्या मांडल्या आहेत. त्यालाच ते दशगुणी स्वराज्य म्हणतात. विनोबांच्या मते ‘स्वराज्यशास्त्र हे नित्य वर्धिष्णू आहे.’ ‘यते महि स्वराज्ये’ स्वराज्यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत. स्वराज्यशास्त्राची देश कालानुसार पद्धत बदलत राहील पण त्याची मुलतत्वे शाश्वत आहेत. असे विनोबा म्हणतात

**✻ दशगुणी स्वराज्य :-**

हे दशगुणी स्वराज्य आणण्यासाठी सर्वांनी झटले पाहिजे. या दहा कसोट्यांना उतरेल ते खरे स्वराज्य होय. सेवाभाव, स्वावलंबन, अहिंसा आणि समान मुजरी या चार खांबावर स्वराज्य मंदीर उभे राहील.९) विनोबांच्या दशगुणी स्वराज्य संकल्पनेत कसोट्याची मांडणी करताना विनोबांना गुंतागुंतीची आणि अनाकलनीय राज्य व्यवस्था नाकारतात. कररुपाने मिळालेला पैसा जनकल्याणासाठी वापरला जावा असे त्यांना अपेक्षित आहे. सार्वत्रिक अव्याहत ज्ञानप्रसा व्हावा, हे तत्व माहितीच्या अधिकार कायद्यातील कलम ४ शी साधर्म्य साधणारी ज्ञानपूर्वक सहकार्याची संकल्पना विनोबा मांडतात. स्वराज्य म्हणजे जनतेचे राज्य आणि लोकशाहीजनताच सार्वभौम ह्या संकल्पना माहिती अधिकाराचा गाभा आहेत. भारतीय जनतेला मतदानातून आपल्या सार्वभौम शक्तीचा प्रयत्यय येतो. पण प्रशासकीय कार्यालयामध्ये प्रशासन आपल्या प्रति उत्तरदायी आहे असे वाटत नाही. ही वस्तुस्थिती आहे. अशी वस्तुस्थिती बदलणारा माहिती अधिकार कायदा स्वराज्याची वर्धिष्णुता आहे. कारण त्या द्वारे स्वातंत्र्य भारताच्या जनतेला शासकीय कामकाज जाणून घेण्याचा अधिकार अधोरेखीत होणार आहे.

| | |
|---|---|
| १) | देशातील सर्व लोकामध्ये परस्परांविषयी बंधुभाव असावा |
| २) | राष्ट्रातील सर्व लोकांचे ज्ञानपूर्वक यथाशक्ती परंतु सहजस्फुर्त हार्दिक सहकार्य सतत व सर्वत्र दिसावे |
| ३) | समर्थ अल्पसंख्या व सर्वमान्य बहुसंख्या यांचे हितैक्य असावे |
| ४) | सर्वांच्या सर्वांगीण व समान विकासाची दृष्टी असावी |
| ५) | राज्य सत्ता विकेंद्रित असावी |
| ६) | समाजात कमीत कमी बंधने असावीत. |
| ७) | राज्यव्यवस्था गुंतागुंतीची व सर्व लोकांना अनाकलनीय असू नये. राज्यरचना सोपी असावी. |
| ८) | कारभार खर्चिक उधळपट्टीचा नसावा, कररुपाने मिळालेला पैसा वेतनापायीच खर्च न होता. जनहिताच्या योजनेत खर्च व्हावा. |
| ९) | रक्षणाची आवश्यकता कमीत कमी असावी |
| १०) | सार्वत्रिक अव्याहत व मुक्त ज्ञानप्रसार व्हावा. |

**❋ जनताच सार्वभौम सत्ता :-**

ब्रिटिश साम्राज्यवादाच्या अंतानंतर भारतीय जनतेने मोठ्या अपेक्षेने लोकशाही राज्यव्यवस्थेचा स्विकार केला. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. भारतासारख्या खंडप्राय देशामध्ये अगणित जाती, उपजाती, जमाती आणि भाषिक, वांशिक, धार्मिक प्रवाहांना एकत्रीत करून नवे राष्ट्र उभारले जात होते. त्यासाठी कायद्याचे राज्य यावेम्हणून घटना निर्मिती करण्यात आली.घटना समितीने सार्वभौम गणराज्य स्थापन करण्याचा निर्णय घेतला. भारतीय घटनेचा सरनामा म्हणजे घटनेची उद्देशपत्रिका होय. कोणत्याही घटनात्मक कायद्याच्या सरनाम्यामधून तो कायदा निर्माण करणा-याचे घटनाकाराचे उद्दीष्ट स्पष्ट होत असते. कायद्याचा हेतू काय हे समजत असते.

प्रख्यात राजकिय विचारवंत अन्सर्ट बार्कर यांनी आपल्या ' प्रिन्सिपल्स ऑफ सोशल अँड पॉलिटिकल थेअरी ' या ग्रंथाच्या अनुक्रमणिकेनंतर भारताच्या घटनेचा सरनामा छापला आहे. या घटनेच्या सरनाम्याचा गौरव करताना ते म्हणतात. – भारताच्या  घटनेचा सरनामा वाचल्यानंतर माझ्या लक्षात आले. की या सरनाम्यात माझ्या ग्रंथातील विचारांचे थोडक्यात अचुक दर्शन घडते. भारताच्या जनतेने आपल्या स्वतंत्र राजकीय जीवनाची सुरूवात करताना ज्या तत्वांचा आधार घेतला ती तत्वे त्या राजकिय पंरपरा ही आता केवळ पाश्चात्यांची मिरासदारी राहिलेली नाही. भारतीय घटनाकारांनी पाश्चात्य घटनांचा अभ्यास करून घटना निर्मिती केली असली तरीही त्यात अंधानुकरण नव्हते. त्यांचा द्रष्टेपणा होता.२

**घटनेचा सरनामा –**

आम्ही, भारतीय जनता, भारताचे एक सार्वभौम
समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस :
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य;
दर्जा आणि संधीची समानता; निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये
व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता याचे आश्वासन देणारी बंधुता
प्रवर्धित करण्याचा संकल्पपुर्वक निर्धार करून आमच्या संविधान सभेत आज दिनांक
२६ नोव्हेंबर, १९४९ रोजी याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून
स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.

भारतीय घटना ही भारतीय जनतेने स्वत: प्रत अर्पण करून स्वीकृत केली आहे. म्हणजे भारतीय लोकशाहीमध्ये जनताच सार्वभौम आहे. या सार्वभौमत्वाचा एक अर्थ म्हणजे लोकप्रतिनिधी आणि प्रशासकिय अधिकारी हे जनतेला जबाबदार आहेत. लोकप्रतिनिधी आणि प्रशासकिय अधिकारी यांचे उत्तरदायित्व जनतेप्रती आहे. भारतीय जनतेला प्रशासकिय व्यवस्थेच्या

कामकाजाची माहिती जाणून घेण्याचा पुर्ण अधिकार आहे. निकोप  लोकशाहीसाठी शासकीय यंत्रणेची पुर्ण माहिती जनतेला वेळोवेळी मिळावयाला हवी असते.

*** माहिती अधिकाराची पार्श्वभूमी :-**

भारतासारख्या खंडप्राय देशात जिथे विवधतेत एकतेचा पुरस्कार केला जातो.  लोकशाही मुल्यांची जोपासना केली जाते. जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून ज्या लोकशाहीचा लौकीक आहे. त्या लोकशाहीचा वारसा हा एका संघर्षातून भारतास लाभला आहे. ब्रिटिशांनी आपल्या प्रदिर्घ वास्तव्याच्या कालखंडात भारतात राबवलेली शासन पद्धती लोकशाही स्वरूपाची वाटत असली तरी त्यात केवळ इंग्रजांचा स्वार्थ दडला होता. त्या स्वार्थापोटी शासन यंत्रणा त्यांनी राबविली.असे असले तरीही ब्रिटिशांनी भारतात राबवलेली शासन पद्धती, त्यातून उभ्या राहिलेल्या सामाजिक राजकिय चळवळी यांच्या एकत्रित परिणामातून लोकांचा सक्रिय राजकिय सहभाग, नागरिकांचे हक्क, आणि जबाबदार शासन पध्दती तिला प्रतिकूल असणा-या वातावरणात अस्तित्वात आली. स्वातंत्र्योत्तर सत्तर वर्षांच्या वाटचालीत लोकशाहीला प्रतिकूल असणा-या मुल्यांचे उच्चाटन करून त्या जागी संविधानातील तरतुदींना अनुसरून अनुकुल मुल्यांचे बिजारोपण करण्यासाठी या देशात विभिन्न स्तरावर ज्या विभिन्न सामाजिक आणि राजकिय चळवळी उभ्या राहिल्या त्यातील एक महत्त्वाची चळवळ म्हणजे माहिती अधिकार चळवळ होय. या चळवळीत सक्रिय असलेल्या व्यक्ती, संस्था आणि संघटना यांच्या कार्याचा फारसा सुक्ष्म अभ्यास झालेला आढळत नाही. म्हणून तो होणे महत्त्वाचे ठरते. राष्ट्रीय संदर्भ ब्रिटिशांनी स्वातंत्र्य पुर्व काळात टप्याटप्याने जबाबदार शासन पद्धती राबविण्याचे स्विकारलेले धोरण लोकशाही मुल्यांच्या बिजारोपणासाठी अनुकुल असले तरी त्यांनी आपल्या हितसंबंधांच्या जपवणुकीसाठी १९२३ साली केलेला प्रशासकीय कामकाजाच्या गोपनियतेचा कायदा लोकशाही रूजविण्याच्या मार्गात अनेक अडथळे निर्माण करणारा ठरला. या कायद्याचे अस्तित्व लिखित संविधानाआधारे लोकशाहीचा अंगीकार करणा-या भारतात स्वातंत्र्योत्तर कालखंडातही कायम राहिल्याने तो  सुदृढ व निकोप लोकशाहीच्या वाढीसाठी घातक ठरतो. नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी कार्यरत झालेल्या प्रशासनाला हा कायदा नागरिकांना त्यांच्या लोकशाही हक्कांपासून वंचित

ठेवण्यास व त्यांची पिळवणूक करण्यास संधी देणारा होता. या कायद्याने शासन व सामान्य जनता यांच्यात गोपनियतेची एक अजोड भिंत उभी केली. या देशातील नागरिकांना प्रशासकिय कार्यालयातील अडवणूक, आरेरावी, लाचखोरी व दप्तरदिरंगाईला सामोरे जावे लागते.

संविधानातील मुलभूत हक्कान्वये प्रत्येक भारतीय नागरिकाला सर्व शासकिय व प्रशासकिय कार्याची व कार्यपद्धतीची माहिती मिळविण्याचा शासकीय संस्था वा प्रशासनातील अधिकारी यांना प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे. व तो त्यांना मिळाला पाहिजे यासाठी मजदूर किसान शक्ती संघर्ष या संघटनेच्या माध्यमातून अरूणा रॉय, भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलनाच्या माध्यमातून अण्णा हजारे आणि अनेक अन्य सामाजिक संघटना आणि त्यांचे कार्यकर्त्यांनी प्रदिर्घ असा संघर्ष केला, व्यापक चळवळ उभारली. त्यामुळे राज्य तसेच केंद्र तसेच राज्य शासनास माहितीचा अधिकार कायदा पारित करावा लागला. हा अभ्यासासाठी महत्त्वाचा संदर्भ आहे. २००५ मध्ये अस्तित्वात आलेल्या या कायद्याची निर्मिती शासन-प्रशासनाच्या व्यवहारात पारदर्शकता यावी लाच खोरीचे समुळ उच्चाटन व्हावे. सामान्य जनतेला प्रशासकीय कार्यपद्धतीची व नियमांची माहिती सहज उपलब्ध व्हावी, शासकिय कामकाजात गैर व्यवहाराला स्थान राहू नये शासकिय कार्यपद्धती बद्दल जनतेला साशंकता वाटू नये, आणि त्यांची कामे सहजगत्या बिनाविलंब व्हावीत इत्यादी उद्देशाने करण्यात आली. परंतु कायद्याची परिणामकारक व प्रभावी अमलबजावणी होऊ शकली नाही. यास शासन प्रशासनाच्या माहिती दडवून ठेवण्याच्या मानसिकते बरोबर सामान्य जनतेत विशेषत: सुक्षिशितांमधील उदासीनता आणि या कायद्याच्या बद्दल असलेली निरक्षरता कारणीभूत आहे. याचाही अभ्यास होणे आवश्यक आहे.

माहिती अधिकार कायद्याच्या निर्मितीसाठी सामाजिक कार्यकर्त्यांना विभिन्न संस्था संघटनांच्या माध्यमातून जसा प्रदिर्घ संघर्ष करावा लागला. तशाच प्रकारचा संघर्ष या कायद्याच्या अमलबजावणीसाठी करावा लागत आहे. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे प्रारंभीपासून शासन-प्रशासनातील राजकीय व प्रशासकीय नेतृत्वाची मानसिकता या कायद्याच्या अमलबजावणी बाबत प्रतिकूल राहिली आहे. नागरिकांनी मागितलेली माहिती बिनाविलंब मिळवून देण्या ऐवजी तिच्या

मार्गात अडथळे निर्माण करण्याची भूमिका प्रशासकिय नेतृत्वाकडून घेतली जाते. असा सार्वत्रिक अनुभव आहे. त्यामुळे या कायद्याच्या प्रभावी व परिणामकारक अमलबजावणीसाठी अनेक संस्था संघटनांच्या माध्यमातून सामाजिक कार्यकर्त्यांना क्रियाशिल व्हावे लागते. हा कायदा सामाजिक चळवळीच्या कार्यकर्त्यांना उभे राहण्यासाठी सामर्थ्य देणारा आहे. तसे तो प्रसार माध्यमांमध्ये काम करणा-या पत्रकारांना सत्यशोधनासाठी प्रभावी अस्त्र उपलब्ध करून देणारा आहे. त्याद्वारे तो सजग व जागृत जनमानस घडविण्यासाठी उपयुक्त ठरणारा आहे. माहिती अधिकार चळवळीमध्ये कार्यरत असलेल्या कार्यकर्त्यांमध्ये या कायद्याच्या प्रभावी व परिणामकारक अमलबजावणी प्रामाणिकपणे झटणारे आणि त्या कायद्या आधारे मिळालेल्या माहितीच्या आधारे आपला स्वार्थ साध्य करण्यासाठी शासन व प्रशासनातील लाच खोरीला अनुकूल भूमिका घेणारे अश्या दोन प्रकारच्या कार्यकर्त्यांचा उदय झालेला दिसून येतो. हा देखील अभ्यासाचा महत्त्वाचा संदर्भ आहे.

माहिती अधिकार कायद्याची निर्मिती होवून दशक भरचा कालखंड लोटला असला तरी या कायद्याचा उपयोग कसा व कोणत्या पद्धतीने करावा हे देशातील उच्च शिक्षित नागरिकांतील दहा टक्के लोकांना समजले नाही. त्यामुळे ह्या कायद्याची प्रभावी अमलबजावणी व व्यापक जनजागृतीसाठी महाराष्ट्रात ' भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलनाच्या ' अण्णा हजारे यांच्या सह ज्या संस्था संघटना व कार्यकर्ते क्रियाशिल आहेत, त्यात पुणे शहर आणि परिसरात विवेक वेलणकर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेली ' सजग नागरिक मंच ' ही संस्था अग्रभागी आढळते. जुगल राठी आणि विवेक वेलणकर यांच्या पुढाकाराने २००६ मध्ये पुणे शहरात स्थापन झालेली ही संस्था समाजात माहिती अधिकार कायद्या बाबात व्यापक जनजागृती मोहीम राबविण्या बरोबरच नागरिकांच्या इतरही अनेक समस्या सोडविण्यासाठी तत्पर असलेली दिसते. माहिती अधिकार कायदा, सेवा हमी कायदा आणि ग्राहक संरक्षण कायदा अश्या विविध कायद्याची माहिती नागरिकांना उपलब्ध करून त्यांना सजग नागरिक बनविण्याचे कार्य प्रभावीपणे करताना आढळते. सजग नागरिक मंच आणि माहिती अधिकार चळवळीत कार्यरत असलेल्या अन्य संस्था संघटना यांच्यातील महत्त्वाचा पहिला फरक म्हणजे ही संस्था शासन प्रशासनासह अन्य कोणाच्याही दबावाला बळी पडताना दिसत नाही. दुसरा फरक असा की ती सर्व सामान्य नागरिकांना दैनंदिन

जीवनात मुलभूत गरजांच्या अनुषंगाने भेडसावणा-या प्रश्नांच्या मुळा पर्यंत जाण्यासाठी माहिती अधिकार कायद्याचा कल्पकपणे वापर करते. त्यातून मिळालेल्या माहिती आधारे त्या प्रश्नांची सोडवणू करण्यासाठी प्रसंगी न्यायालयात दाद मागताना दिसत आहे. पुणे महानगर पालिका, महा वितरण, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ इत्यादींच्या प्रशासनात चालु असणा-या गैरव्यवहार व अनियमितता माहिती अधिकाराद्वारे उजेडात आणून या संस्थेने माहिती अधिकाराच्या सुयोग्य वापराद्वारे जनतेचा प्रशासनावर सुयोग्य अंकुश निर्माण करता येवू शकतो. हे प्रभावी पणे दाखवून दिले आहे. पुणे शहर परिसरात प्रभावीपणे कार्य करणा-या या संस्थेचे सर्वात मोठे वैगुण्य म्हणजे ती आपले कार्यक्षेत्र संपुर्ण महाराष्ट्रात विस्तारू शकली नाही. किंवा आपला विस्तार वाढवताना दिसत नाही. याचा ही अभ्यास होणे गरजेचे आहे.४)

## ✻ आतंरराष्ट्रीय संदर्भ :-

माहिती अधिकार कायद्याच्या निर्मितीला आतंरराष्ट्रीय संदर्भ आहे. माहिती अधिकार चळवळीला बळ मिळाले ते त्यामुळेच सन १९९० दरम्यान जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यासारख्या जागतिक वित्तसंस्थांनी धोरणात्मक पाऊल म्हणून वित्तपुरवठा करताना शासकीय क्षेत्र भ्रष्टाचार मुक्त करण्यासाठी कारभार अधिक पारदर्शी करण्याची अट विकसनशील राष्ट्रांसमोर ठेवली. संयुक्त राष्ट्र संघाच्या पहिल्या अधिवेशनातील आमसभेत डिक्लेरेशन ऑफ ह्युमन राईट्सची घोषणा १९४८ मध्ये करण्यात आली. संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेत मानवी हक्कांचा जाहिरनामा १९४८ मध्ये संमत केला गेला. त्यानूसार त्यातील अनुच्छेद १९ मध्ये प्रत्येकाला स्वत:चे मत बनविण्याचा आणि ते व्यक्त करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. या स्वातंत्र्यामध्ये कोणत्याही दबावाशिवाय, कोणत्याही माध्यमातून कोणत्याही सीमांशिवाय किंवा हस्तक्षेपाशिवाय मत बनविणे, माहिती मागणे, माहिती मिळविणे, माहिती घेणे, व माहिती देणे तसेच माहिती आणि कल्पनांचे आदान प्रदान करणे अभिप्रेत आहे. १७६६ मध्ये फ्रिडम ऑफ प्रेस एक्ट असा कायदा संमत करून स्विडन या देशाने सर्वप्रथम माहिती अधिकार मान्य केला. संयुक्त राष्ट्रसंघाने या कायद्याच्या संदर्भात आतंरराष्ट्रीय स्तरावर धोरणात्मक भूमिका बजावली आहे. स्विडननंतर डेन्मार्क, नॉर्वे,

फिनलँड या देशात माहितीचे अधिकार देणारे कायदे संमत करण्यात आले. या १९७१ मध्ये राष्ट्रकुल मंडळाने प्रशासनातील लोकसहभाग वाढावा यासाठी माहिती अधिकाराचा पुरस्कार केला. सन १९८२ मध्ये राष्ट्रकुलातील कॅनडा, फ्रान्स, ऑस्ट्रेलिया यासारख्या राष्ट्रकुलातील देशांनीही या कायद्याचा स्विकार केला. दक्षिण अफ्रिकेतील डर्बन १९९९ मध्ये झालेल्या परिषदेत माहितीच्या अधिकाराला स्वतंत्र न्यायिक स्वरूपात लागू करण्याची सूचना करण्यात आली. तसेच अभिलेख व्यवस्थापनासाठी पाऊले उचलण्यात आली. राष्ट्रकुल सचिवालयांने एक मॉडेल बिलही तयार केले होते. जेणे करून माहितीच्या अधिकारासंबंधातील कायदे करता यावेत. चीन सारख्या साम्यवादी देशाने २८ डिसेंबर २००५ मध्ये कायदा करून दि फ्रिडम ऑफ इन्फरमेशन लॉ असा माहिती अधिकारासंबंधीचा कायदा लागू केला. १९९० पर्यंत १३ देशांनी हा कायदा राष्ट्रीय स्तरावर लागू त्यानंतर आशिया खंडात जपान, दक्षिण कोरियासह अनेक राष्ट्रांनी हा कायदा अमलात आणला. त्याचे फलस्वरूप आज ९० पेक्षा अधिक राष्ट्रांनी ह्या कायद्याचा स्वीकार केला. त्यामुळे नव्वदच्या दशकास माहितीच्या अधिकार कायद्याच्या चळवळीच्या दृष्टीने महत्त्व आहे. १

लोकशाहीचा पुरस्कार करणा–या राष्ट्रांमध्ये माहितीचा अधिकार ९० च्या दशकाआधीच लागू व्हायला हवा होता. प्रशासनात लोकसहभाग, पारदर्शकता, उत्तरदायीत्वाची जाणीव असून केवळ भागणार नव्हते, तर माहिती अधिकारासम कायदा नागरिकांच्या हाती असणे आवश्यक होते, निकोप लोकशाहीची ती गरज होती. शासन आणि सर्व शासकिय संस्थांकडे असलेली माहिती ही सार्वजनिक स्वरूपाची असते. म्हणजेच अशी माहिती नागरिकांसाठी खुली असावयास हवी. वस्तुत: शासन यंत्रणांचा कल ती लपवण्याकडे असायचा. माहिती अधिकार कायद्याने शासन यंत्रणांचा कल पारदर्शी कारभाराकडे परावर्तित होणे अपेक्षित आहे. १९२३ चा गोपनियतेचा कायदा ब्रिटिशांनी समंत केला. त्यास ब्रिटिशकालीन शासकिय गुपीतांचा कायदा असे म्हणत. शासकिय गुपीतांचा कायदा हा देशाच्या संरक्षणांसाठी महत्त्वाचा आहे. संरक्षण यंत्रणेतील महत्त्वाची स्थळे आणि देशाच्या सुरक्षिततेसाठी निगडीत असणारी माहिती देण्यावर निर्बंध घालणारा आहे. पण हा कायदा म्हणजे शासकिय व्यवहारात गुप्तता राखण्यासाठीच आहे असा भारतात समज सर्वत्र रूढ झाला होता. अमेरिकेने व्यक्तीस्वातंत्र्याचा पुरस्कार केलेला असला तरीही अमेरिकेला

माहितीचा अधिकार संमत करण्यास १९६६ पर्यंतचा वेळ लागला. १९९० नंतर मात्र हा कायदा वैश्विक पटलावर मोठ्या चर्चेस स्वरूपात आला. माहितीच्या अधिकाराला केवळ , माहिती मिळविण्याचा अधिकार, सुधारणांचा अधिकार न मानता ह्या कायद्याला मुलभूत अधिकार म्हणून मान्यता मिळाली आहे. नागरिकांसाठी शासनाची माहिती खुली असावयाला हवी म्हणजेच माहिती ही सार्वजनिक स्वरूपाची असते हे आता मान्य झाले आहे. भक्कम लोकशाही, नागरिकांचा शासकीय कामकाजातील सहभाग, पारदर्शक कारभार, शिक्षणाचे उच्च प्रमाण या सर्वांचा माहितीच्या अधिकाराशी थेट संबंध आहे. हे लक्षात येते.

## * सामाजिक चळवळ, हितसंबंधी गट :-

दबावगट : प्रत्यक्ष निवडणुका न लढणा-या संघटना शासन धोरणावर प्रभाव पाडत असतात. आपल्या हितसंबंधाची जोपासना करण्या साठी लोक संघटितरित्या प्रयत्न करत असतात. इतर देशांच्या तुलनेत भारतीय समाजातील दबावगट वेगळे ठरतात. त्यात जात, धर्म, पंथ, आर्थिक आधारावर स्थापन झालेले दबावगट पाहावयास मिळतात. त्यामुळे सजग नागरिक मंचच्या भूमिका आणि कार्याचे स्थान एक दबावगट म्हणून अभ्यासणे गरजेचे आहे. नागरिक आणि ग्राहक म्हणून सजग नागरिक मंचाची भूमिका आणि कार्य इतर दबावगटापेक्षा वेगळे ठरतात.

### * महाराष्ट्रातील माहिती अधिकार चळवळ :-

महाराष्ट्रातील माहिती अधिकार चळवळ राबविणारे कार्यकर्ते व संघटना

महाराष्ट्रामध्ये अनेक संघटना व संस्था माहिती अधिकार चळवळी मध्ये काम करताना दिसतात. त्या अनुषंगाने संदर्भ साहित्याचा आढावा घेतेवेळी समोर आलेल्या काही संघटनांच्या बद्दल माहिती विषद करत आहे. महाराष्ट्रात माहिती अधिकार चळवळ राबविताना हुतात्मा झालेल्या सतिश शेट्टी यांचे मारेकरी आजही सापडले नाही. तरी सुद्धा त्यांचे बंधु संदिप शेट्टी माहिती अधिकार चळवळीवर जोमाने काम करत आहेत.

**※ जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे :-**

सन १९२३ च्या ऑफिशियल सिक्रेट अॅ क्टमुळे भारतीय नोकरशाहीच्या अंगवळणी पडलेल्या गोपनीयतेच्या कायद्याचेअस्तित्व देशात कायम होते. सन १९४७ मध्ये देश स्वतंत्र झाला त्यानंतर या गोपनियतेच्या तत्वाला रद्द करणे गरजेचे होते. माहितीच्या अधिकाराने गोपनियतेच्या तत्वाला तिलांजली मिळणार होती. मात्र, त्यासाठी मोठा संघर्ष करावा लागणार होता ही वस्तुस्थिती आहे. या वस्तुस्थिती चे गांभिर्य हे इथवरच मर्यादित नव्हते. तर प्रजासत्ताक भारतातील जनतेच्या सार्वभौमत्वाची जाणीव बहुसंख्य जनतेलाच नव्हती ही गंभीर बाब होती. जाणिव केवळ मतदानाच्या अधिकारापुरती मर्यादित होती.

अण्णा हजारे यांनी असंख्य आंदोलने केली. केंद्र त्यानतर राज्य सरकार यांच्याशी लढा दिला. १२ ऑक्टोबर २००५ ला देशभर हा कायदा लागू झाला. दुसरे स्वातंत्र्य म्हणून माहिती अधिराचा उल्लेख केला जातो. मात्र तरी हा संघर्ष अपूर्ण आहे. कायद्याचा दुरूपयोग, अमलबजावणीतील त्रुटी दुर कराव्या लागतील. राळेगणसिद्धी या गावी अण्णा हजारे यांनी ग्रामविकासाचे कार्य १९८० च्या दशकात हाती घेतले होते. लोकसहभागातून ग्रामविकासाचे कार्यकरणा-या अण्णा हजारे यांना ग्रामविकासाचे कार्य करताना प्रशासनात भ्रष्टाचाराचा अनुभव येत होता. भ्रष्टाचार निर्मूलना शिवाय विकास शक्य नसल्याचा निष्कर्ष अण्णा हजारे यांनी काढला.

१९९६ ते २००५ या कालखंडात अण्णा हजारे यांनी प्रदिर्घ संघर्ष केला. हा संघर्ष राज्य आणि केंद्र दोन्ही पातळीवर होता. अण्णांच्या आंदोलनाने देशव्यापी रूप धारण केले होते. अण्णांच्या आंदोलनाचा प्रवास हा अण्णांना एका ग्रामविकास कार्यकर्त्याचा जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीच्या संरक्षकाच्या भुमिकेप्रत येवून पोहचवतो. राळेगणसिद्धी या गावी ग्रामविकास कार्य हाती घेतलेल्या अण्णांना ग्रामविकास करते वेळी भ्रष्टाचाराचा, दफ्तरदिरंगाईचा, प्रशासकिय अधिका-याच्यां अंहमन्यतेचा, अनुभव आला नसता, तर एका संवेदनशील समाजसेवकास ग्रामविकासात रमण्यास वाव मिळाला असता. रचनात्मक कार्य पाहण्यासाठी अनेक जण आजही राळेगणसिद्धी गावाचा अभ्यास करतात. अण्णांनी केलेली उपोषण, आंदोलन हे खुद्द

जनतेच्या उपहासाचे केंद्र ठरलेले दिसतात. मात्र अण्णांनी आपले जाणतेपणाची भुमिका कधीही सोडलेली आपणास पहावयास मिळत नाही.

नगर जिल्ह्य़ातील सामाजिक वनीकरण खात्यातील भ्रष्टाचाराच्या प्रकरणाला प्रतिकुल परिस्थितीत घसास लावण्याचे धैर्य अण्णांनी दाखवले. भ्रष्टाचाराच्या या प्रकरणाची व्याप्ती राज्यभर असल्याचे अण्णांना जाणवले. राज्यात त्या वेळी भाजप-शिवसेना युतीचे सरकार होते. तत्कालीक समाजकल्याणमंत्री बबनराव घोलप यांचा कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार उघड झाला होता. तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी यांना यावर पहिले पत्र  अण्णांनी पाठवले होते . सरकारी तिजोरीतील पैशांचा विनियोग कसा झाला, याचा हिशोब मागण्याचा जनतेला पूर्ण अधिकार आहे आणि सरकारने हा हिशोब दिलाच पाहिजे. त्यासाठीच माहितीच्या अधिकाराच्या कायद्याची अत्यंत गरज आहे, अशा भावना मुख्यमंत्र्यांना कळवल्या. तीन महिने सरकारने अण्णांना कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अण्णांनी ६ एप्रिल १९९८ ला मुंबईत आझाद मैदानावर पहिले आंदोलन केले. १९९९ मध्ये अण्णांनी आळंदी येथे दहा दिवसांचे उपोषण केले. त्यालाही सरकारने फारसा प्रतिसाद दिला नाही. त्यानंतर त्याच वर्षी झालेल्या निवडणुकांमध्ये युती सरकार पायउतार झाले. त्या जागी काँग्रेस- राष्ट्रवादीचे आघाडी सरकार राज्यात सत्तेवर आले.  राज्यात काँग्रेस आघाडीचे सरकार आल्यानंतर अण्णांनी  नव्या सरकारला माहिती अधिकार कायद्याबाबात पुरेशी मुदत दिली. मात्र कार्यवाही काही होईना ही गोष्ट लक्षात आल्यावर २ मे २००० ला राज्यातील सहाही महसूल विभागात मोर्चे काढून घंटानाद आंदोलन करण्यात आले.  त्याची दखल घेवून मुख्यमंत्री विलासरावांनी वर्षा बंगल्यावर बैठक बोलावून यावर सविस्तर चर्चा केली. ही माहिती अधिकाराच्या कायद्यासाठी सरकारकडून झालेली  पहिली दिलासादायक कृती होती, असे अण्णांना वाटते. त्यानंतर ही अण्णांना अंदोलने करावेच लागले. २१ सप्टेंबर २००२ ला राळेगणसिद्धीतच अण्णांनी  मौन सुरू केले. तत्कालीन मंत्री आर. आर. पाटील व शिवाजीराव मोघे यांनी येथे येऊन लेखी आश्वासन दिले. त्यामुळे अण्णांनी  मौन सोडले. पुढे फेब्रुवारी २००३ नंतर मध्ये राज्यात मुख्यमंत्री म्हणून सुशीलकुमार शिंदे यांची वर्णी लागली त्यांच्या काळात ते विधेयक मंजूर झाल्यानंतर लगेचच ते अंतिम मंजुरीसाठी केंद्र सरकारकडे पाठवून दिले. त्यावेळी

केंद्रात एनडीएचे सरकार होते. महाराष्ट्रात पूर्वलक्ष्यी प्रभावाने कायदा मंजूर होऊनही अंमलबजावणी होत नव्हती. त्यामुळे अण्णांनी तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री लालकृष्ण अडवाणी यांची भेट घेऊन त्यांच्याकडे या कायद्याचा आग्रह धरला. कायदा होवूनही कायद्याच्या अमंलबजावणीसाठी अण्णांना अंदोलन करावे लागत होते.  केंद्रीय गृहमंत्रालयाने पाठवलेल्या माहिती अधिकाराच्या विधेयकावर त्यांनी १० ऑगस्ट २००३ ला स्वाक्षरी करून मंजुरी दिली. अखेर 'माहितीचा अधिकार २००२' हे विधेयक मंजूर झाले, महाराष्ट्रात तर ते तेव्हापासूनच पूर्वलक्ष्यी प्रभावाने २३ सप्टेंबर २००३ पासून लागू करण्यात आले. २००३ मध्ये राज्यात हा कायदा लागू झाल्यानंतर त्याच्या अंमलबजावणीसाठी राज्यात काही माहिती आयुक्त, सरकारी कार्यालयनिहाय माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी नेमून ही यंत्रणा उभी करणे, त्याद्वारे कायद्याची अंमलबजावणी सुरू करणे गरजेचे होते.  हे लक्षात घेवून कायद्याच्या अमलबजावणीसाठी पुन्हा अमलबजावणीसाठी अंदोलनास अण्णा सज्ज झाले.

दरम्यान या विधेयकाचा राज्याने तयार केलेला हा मसुदाही आदर्श ठरला. पुढे दोन वर्षांनी महाराष्ट्राचाच माहिती अधिकाराचा मसुदाकेंद्रातीलमनमोहनसिंग यांच्या नेतृत्वाखालील यूपीए सरकार मागवून घेतला, त्यात काही दुरुस्ती केली आणि १२ ऑक्टोबर २००५ ला केंद्र सरकारनेही हा कायदा लागू केला. 'माहितीचा अधिकार अधिनियम २००५' या नावाने अस्तित्वात आलेला हा कायदा जम्मू-काश्मीर वगळता संपूर्ण देशात लागू करण्यात आला. पुढे हा कायदा काही नोकरशाहा आणि काही राजकीय पुढारी यांना अडचण ठरू लागला. त्यामुळे त्यात बदल करण्यासाठी दुरुस्ती करण्याचा प्रयत्न सरकार करू लागले.

कायदा निष्प्रभ होवून केवळ कागदोपत्री अस्तित्वात असावा अशा आशयाचा सरकारी फायली व कागदपत्रांवरील कार्यालयीन टिप्पणी टिप्पणी न जाहीर करण्याचा बदल कायद्यात करण्याचा घाट सरकार घालू पाहत होते. २ जुलै २००६ ला पंतप्रधान मनमोहनसिंग, यूपीए तथा काँग्रेसच्या अध्यक्षा सोनिया गांधी यांची भेट घेऊन या कायद्यात वरील दुरुस्ती करू नये, अशी मागणी अण्णांनी केली. सरकार अण्णांना जुमानत नव्हते त्यामुळे पुन्हा अण्णांना अंदोलनाचे अस्त्र

उगारावे लागले. प्रंसगी या कायद्यात हा बदल केला, तर 'पद्मभूषण' सन्मान परत करण्याचा इशारा अण्णांनी केंद्राला दिला, राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनाही तसे कळवले. त्यांनी यात केंद्र सरकारशी मध्यस्थी करून हा सन्मान अण्णांनी परत करू नये अशी विनंतीही केली. सरकारची पाउले मात्र विरूद्ध दिशेने जात होती. या एकाच विषयासाठी हे अण्णांचे तब्बल पंधरावे आंदोलन होते. केंद्राने या कायद्यात दुरुस्ती करू नये, यासाठी क्रांतिदिनी ९ ऑगस्ट २००६ ला आळंदी येथे उपोषण सुरू केले. ते १० दिवस चालले. केंद्र सरकारच्या विरोधात या काळात महाराष्ट्रासह देशात मोठा जनक्षोभ उसळला. जनतेचा आंदोलनाला उस्फूर्त पाठिंबा लाभला. अखेर १९ ऑगस्ट २००६ ला म्हणजे अण्णांच्या अंदोलनाच्या दहाव्या दिवशी 'माहिती अधिकार कायद्यात बदल करणार नाही, तो आहे तसाच ठेवू' असे पंतप्रधान मनमोहनसिंग यांचे लेखी पत्र घेऊन पृथ्वीराज चव्हाण आळंदीला आले, त्यानंतर अण्णांनी हे अंदोलन मागे घेतले. अण्णांनी निर्धाराने लढाई लढल्याचा असा हा इतिहास आहे. केंद्रीय माहिती अधिकार कायद्यावर महाराष्ट्राच्या माहिती अधिकार विधेयक २००३ चा प्रभाव आहे.

महाराष्ट्रीय आणि राष्ट्रीय पातळीवरील माहिती अधिकार कायदा पारीत व्हावा यासाठी अण्णांनी केलेले प्रयत्नांचा सिंहाचा वाटा आहे ही गोष्ट निर्विवाद आहे. विकसनशील राष्ट्रांवर जागतिक स्तरावर अर्थ पुरवठा करणा-या संस्थांनी पारदर्शकतेचे निर्बंध लावले. त्यामुळे माहिती अधिकार कायदा पारीत करणे विकसनशील राष्ट्रांना क्रमप्राप्त ठरले. माहिती अधिकाराचे श्रेय या संस्थांना जातेच पण त्याच बरोबर माहिती अधिकाराचा कायदा व्हावा यासाठी प्रयत्न करणा-या कार्यकर्त्यांच्या कार्याचे महत्त्व तसूभरही कमी होत नाही.

कायद्याच्या मार्गाने, घटनेच्या चौकटीत राहून, नागरिकत्वाचा आपला हक्क बजावताना, देशाच्या भल्यासाठी राज्य सरकारशी आणि नंतर केंद्र सरकारशी संघर्ष करण्याची भूमिका ह्या कार्यकर्त्यांनी घेतली होती. या कायद्याच्या निर्मिती साठी प्रयत्न करणा-यामध्ये अण्णा हजारे, अरूणा रॉय यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल.

**अण्णांच्या माहिती अधिकार आंदोलनाचा घटनाक्रम**

| | |
|---|---|
| २ ऑक्टोबर १९९७ | : राज्य सरकारला पहिले पत्र |
| ६ एप्रिल १९९८ | : धरणे आंदोलन, आझाद मैदान, मुंबई |
| ९ ऑगस्ट १९९९ | : दहा दिवसांचे उपोषण, आळंदी, पुणे |
| २ मे २००० | : राज्यातील सहा महसुल विभागात मोर्चे, घंटानाद |
| २७ एप्रिल २००१ | : मुख्यमंत्र्यांशी पहिली चर्चा, मुंबई |
| ९ ऑगस्ट २००१ | : सहा दिवसांचे मौन, राळेगणसिद्धी |
| २१ सप्टेंबर २००२ | : पुन्हा सहा दिवसांचे मौन, राळेगणसिद्धी |
| २७ जुन २००३ | : उपपंतप्रधान लालकृष्ण आडवाणी यांची भेट, दिल्ली |
| १ ऑगस्ट २००३ | : सात दिवसांचे मौन, राळेगणसिद्धी |
| ९ ऑगस्ट २००३ | : करेंगे या मरेंगे, आंदोलनउपोषण, आझाद मैदान, मुंबई |
| १०ऑगस्ट २००३ | : महाराष्ट्राच्या विधेयकावर राष्ट्रपतींची सही |
| ११ऑगस्ट २००३ | : महाराष्ट्रात माहिती अधिकार लागू |
| २६ जानेवारी २००४ | : अंमलबजावणीसाठी मौन, राळेगणसिद्धी |
| ९ फेब्रुवारी २००४ | : माहिती आयुक्त नेमण्यासाठी उपोषण, राळेगणसिद्धी |
| १२ ऑक्टोबर २००५ | : देशात माहिती अधिकार लागू |
| २५ सप्टेंबर २००५ | : प्रभावी अंमलबजावणीसाठी उपोषण, राळेगणसिद्धी |
| २ ऑगस्ट २००६ | : प्रधानमंत्री मनमोहनसिंग यांच्याशी चर्चा, दिल्ली |
| ९ ऑगस्ट २००६ | : केंद्राच्या कायद्यात बदल करू नये यासाठी उपोषण, आळंदी, पुणे |
| १९ ऑगस्ट २००६ | : प्रधानमंत्रीमनमोहनसिंग यांचे माहिती अधिकार कायद्यात बदल न करण्याचे लेखी आश्वासन , उपोषण मागे |

*** सुराज्य संघर्ष समितीचे अध्यक्ष विजय कुंभार :-**

सुराज्य संघर्ष समितीचे अध्यक्ष विजय कुंभार सर हे सुद्धा माहिती अधिकार चळवळ राबवितात. विशेष म्हणजे लोकांना मार्गदर्शन करण्यासाठी दररविवारी चित्तरंजन वाटीका मॉर्डन कॉलनी या ठिकाणी महाराष्ट्रातील प्रथम माहिती अधिकार कट्ट्याचे आयोजन करत आहे. माहिती अधिकार कट्टा हा  देशातील पहिलाच असा उपक्रम आहे. सहजता आणि मोकळेपणा असा या कट्ट्याची ओळख आहे. एखाद्या कायद्याविषयी मार्गदर्शन करण्यासाठी आजवर अनेक ठिकाणी कार्यालये असतात. मात्र माहिती अधिकार कट्टा हा असा कट्टा आहे, जेथे कुणीही नागरिक आपली समस्या घेवून जावू शकतो. त्याला माहितगार व्यक्ती मार्गदर्शन करत असतात. महाराष्ट्रातील ग्रामीण जीवनात जशी चावडी असते. जेथे लोक चर्चा मुक्त पणे करतात. तशा स्वरूपाचा कट्टा असल्यामुळे माहिती अधिकार कसा वापरायाचा याचा नागरिकांमध्ये असलेला भिडस्तपणा जातो. अन् सहज सुलभ ज्ञान नागरिकांना मिळु शकते.  अशा प्रकारे हजारो लोकांना मार्गदर्शन होवून त्यांच्या समस्या सोडवणूक ते करत असतात. १४ ऑक्टोबर २०१८ रोजी त्यांच्या माहिती अधिकार कट्टयाने २५० वा टप्पा पुर्ण केला. त्या निमित्ताने पुण्याच्या  ढोले पाटील मार्गावरील सभागृहात समारंभाचे आयोजन केले होते. त्या मार्गदर्शक म्हणून माजी आयुक्त महेश झगडे आले होते.

**❋ चाणक्य मंडलचे अविनाश धर्माधिकारी :-**

चाणक्य मंडलचे अविनाश धर्माधिकारी सर यांचे लेखन व मार्गदर्शन माहिती अधिकार चळवळीला सुरूवातीच्या काळापासून राहिले आहे. ‘स्वतंत्र नागरिक’ हा त्यांचा ग्रंथ त्या संदर्भात माहिती अधिकार चळवळ चालवणा-या कार्यकर्त्यांसाठी प्रेरक ठरतो. ‘स्वतंत्र नागरिक’हे साप्ताहिक देखील अविनाश धर्माधिकारी सरांकडून चालवले जाते. चाणक्य मंडल कडून चालवल्या जाणा-या व्याख्यान मालेमध्ये

धर्माधिकारी सरांकडून माहिती अधिकाराबाबत,  नागरिकाच्या अधिकारांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले जाते.कार्यकर्ता अधिकारी ही प्रशासकीय नेतृत्वाची व्याख्या अविनाश धर्माधिकरी सर  सातत्याने करत असतात. सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांनी पदाचा राजीनामा देऊन व्यवस्था बदलण्यासाठी राजकारणात उडी घेतलीहोती. पुणे येथुन १९९८ची लोकसभा ते

लढले होते. निवडणुकांतील काळ्या पैशाचा वापर, जातीपातीचे राजकारण त्यांना माहिती होते व ते बदलण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. प्रतिज्ञापत्राद्वारे संपत्ती जाहीर केली पाहिजे, ही मागणी केली. पुढे तसा कायद्यात बदल झाला. निवडणूक खर्चाची मर्यादा १५ लाख रुपये असताना लोकांकडून पैसे जमा करून निवडणूक लढविली. साडेतेरा लाख रुपये जमा झाले. त्याचा हिशेब दिला. सरळमार्गाने पारदर्शी राजकारण करता येते, हे त्यांनी दाखवून दिले.

सर्व राजकारण आणि सगळेच पक्ष वाईट, हे बोलणे खूप सोपे आहे. मी अशी भूमिका कधी घेत नाही. मी सर्वांचा, सर्व माझे, ही माझी भूमिका आहे. पक्षासाठी, निवडणुकीसाठी पैसा लागणारच. निवडणूक प्रक्रियेत खर्च होणाऱ्या दोन नंबरच्या पैशाचा प्रभाव कमी करण्यासाठी सर्व पक्षांनी गांभीर्याने एकत्र विचार केला पाहिजे. कायदेशीर मार्गाने तो उभा करण्याची व्यवस्था पाहिजे,'' असे मत धर्माधिकारी यांनी व्यक्त केले आहे. लोकप्रतिनिधी कोणत्याही पक्षाचा असावा, पण तो अभ्यासू हवा. लोकप्रतिनिधी भ्रष्टाचारी नसावा, अशी अपेक्षा त्यांनी वेळोवेळी व्यक्त केली आहे. लोकशाही मध्ये आंदोलनाने आंदोलकनाच्याच भुमिकेत राहावे. त्यांनी राजकीय पक्ष होवू नये असे अविनाश धर्माधिकार सरांना वाटते. माहिती अधिकार चळवळी मध्ये त्यांचे योगदान आहे. त्यांनी वेळोवेळी अण्ण हजारे यांच्या अंदोलनामध्ये सहभाग घेतला आहे. प्रशासकिय अधिकारी घडवणारी संस्था असा लौकीक असलेली चाणक्य मंडल संस्था अविनाश धर्माधिकारी चालवतात. त्यांनी आपल्या संस्थे मध्ये प्रशासकिय अधिकारी घडवले आहेत.

*** माहिती अधिकार कार्यकर्ते-संजय शिरोडकर :-**

स्वत: एक यशस्वी उद्योजक असूनही देशाचे आपण काहीतरी देणे लागतो या हेतुने झटणारेशिरोडकर सरांचे 'टोलचा झोल' हेपुस्तक प्रसिद्ध आहे. संजय शिरोडकर यांना सजग नागरिक माहिती अधिकार पुरस्कार २०१७ मा. केंद्रीय माहिती आयुक्त व ज्येष्ठ कार्यकर्ते श्री शैलेश गांधी (मुंबई), प्रदान हस्ते प्रदान करण्यात आला होता. संजय शिरोडकर माहिती अधिकार कायदा २००५ ह्या विषयावर २००७ पासून आता पर्यंत कार्यरत आहेत. ५००० पेक्षा जास्त स्वत: माहिती अधिकार कायदा वापरला. त्यांचा टोल कंत्राट मुंबई विमानतळ खाजगीकरण, उद्योग-पर्यटन, सार्वजनिक बांधकाम, कामगार विभाग, अर्थ मंत्रालय, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, आणि

गड किल्ले, महाराष्ट्रातील सर्व महामंडळे बँकीग क्षेत्र, स्थानिक स्वराज्य संस्था तसेच केंद्र सरकारची विविध मंत्रालय आणि थेट प्रधानमंत्री कार्यालय यांचा सामावेश आहे. माहिती अधिकारात उघड होणा-या टोलचा झोल या पुस्तकात वाचलाच पण कॅग ऑडीट, अतंर्गत ऑडीट, आम आदमी विमा योजना, परप्रांतीयांचा मुद्दा, आमदार खासदार, पत्रे रेकॉर्ड, दरवर्षी गोळा होणारे मेजर आणि मायनर हेडचेकर तसेच लेबर, किसान,  पेट्रोल, डिसेल, स्वच्छ भारत, सेज, या विषयाचाही अंतर्भाव आहे. काही धक्कादायक माहिती उदाहरणादाखल सांस्कृतिक विभाग, महाराष्ट्र शासन यांनी टुरिझम पॉलीसी अंतर्गत ७० खाजगी रिसॉर्ट व हॉटेल यांना पाच लाखांपासून पाच कोटी पर्यंत स्टँप ड्युटी, केली आहे. ही अधिकृत यादी आहे. यातील सत्तर टक्के रिसॉर्ट हॉटेल सुरूच झालेली नाहीत. मुंबईवर आदळणारे परप्रांतियांचे लोंढे याबाबत उपाय योजना करण्याची जबाबादारी सर्वस्वी राज्य सरकारची आहे. हा मुद्दा नागरिकांच्या सनद यात होता; परंतु या युती सरकारने तो गाळून टाकला ही बाब अतिशय गंभिर आहे. हे श्री संजय शिरोडकर यांनी उघडकीस आणले.

**※ 'मनिलाईफ फाउंडेशन आरटीआय केंद्र' :-**

'मनिलाईफ फाउंडेशन आरटीआय केंद्र ' द्वारा आयोजित आपल्या दैनंदिन जीवनात माहितीचा अधिकार कसा वापरावा या विषयावर कार्यशाळा घेण्यात येते. 'मनिलाईफ फाउंडेशन आरटीआय केंद्रा' च्या वतीने पुणे येथे 'दैनंदिन जीवनात माहितीचा अधिकाराचा वापर' या विषयावर कार्यशाळा आयोजित केलीजाते. या कार्यशाळेत माहिती अधिकार कार्यकर्ते विजय कुंभार (सुराज्य संघर्ष समितीचे संस्थापक), कनीज सुखराणी (सदस्य, व्यवस्थापकीय समिती, एमसी सदस्य, नागरिक चेतना मंच), तन्मय कानिटकर (अध्यक्ष, परिवर्तन) आणि विनिता देशमुख (लेखक आणि सल्लागार मनी लाइफ) मार्गदर्शन करत असतात. ही कार्यशाळा विनामूल्य असते. मात्र सहभागी होउ इच्छिणा-यांनी अगोदर नोंदणी करणे आवश्यक असते.

**※ पुणे महानगरपालीकेमधील पब्लिक कन्सर्न फॉर गव्हर्नन्स ट्रस्ट :-**

पुणे महानगरपालीकेमध्ये माहिती अधिकार कक्ष स्थापन करण्यात यावा यासाठी  सजग नागरिक मंच पुण्यातील अन्य काही संघटना मिळून प्रयत्नशील होत्या. तश्या स्वरूपाचा माहिती

अधिकार कक्ष पुणे महानगरपालीकेमध्ये स्थापन झाला. हा कक्ष महाराष्ट्रातील महानगरपालीकेमध्ये असणारा प्रथम माहिती अधिकार कक्ष ठरला आहे. त्या माहिती अधिकार कक्षाचे काम पब्लिक कन्सर्न फॉर गव्हर्नन्स ट्रस्ट पाहत आहे. दर शुक्रवारी संबंधिताना विशेष मार्गदर्शन या ठिकाणी केले जाते. ह्या माहिती अधिकार कक्षाला नाव सजग नागरिक मंच स्थापन करण्यास ज्यांची प्रेरणा मिळाली. त्या कै. प्रकाश कर्दळे यांचे नाव देण्यात आलेले आहे.

*** वयम् चळवळ आणि वन हक्क कायदा :-**

वयम्'ची नेतृत्व शिबिरांमध्ये माहिती अधिकार कायदा, ग्राम पंचायत कायदा, पेसा कायदा, आणि रोजगार हमी कायद्याबद्दल माहिती दिली जाते. या कायद्यामुळे एक नागरिक म्हणून आपण कसे सशक्त आहोत. आपल्याला हक्क देणारे कायदे वापराबाबत या शिबीरात प्रशिक्षण दिले जाते. विविध गावात झालेल्या शिबिरात तरूण सहभागी होतात. जव्हार तालुक्यातल्या वयम् संस्थेने भरिव कार्य केले आहे. जैवविविधता नोंद, संयुक्त वन व्यवस्थापन, रोजगार हमी कायदा, माहिती अधिकार, आणि युवक संघटन अशा विविध आघाड्यांवर कार्य करणारे कार्यकर्ते घडविणारी संस्था म्हणजे वयम् होय. ग्रामीण पातळीवर भरीव कार्य केल्यानंतर आता शहरातील तरूणाई देखील या संस्थेच्या कामात सहभागी होवू लागली आहे. चिपळूण तालुक्यातल्या (जि.रत्नागिरी) खेरशेत गावातल्या तरुणांच्या 'गाव विकास आघाडी'ने वयम्कडून दूरस्थय शिक्षण घ्यायला सुरूवात केली आहे. त्यांच्या गावची ग्रामसभा सशक्त आणि ग्राम पंचायत पारदर्शक करण्यासाठी त्यांना वयम्'चे मंत्र उपयोगी पडताहेत. भर मुंबईत चारकोपमधल्या 'नागरिक मंचा'नेही वयम् मंत्र उचलून महानगरपालिकेच्या स्थानिक व्यवस्थापन समितीत आपला सहभाग वाढवला आहे.

शासनाशी संघर्ष करणे हे जसे चळवळीचे एक साधन आहे, तसेच शासनाशी मैत्री हेही आहे. सुशासन हे साध्य आहे. प्रशासनाशी मैत्री आणि सुसंवाद यातून या वर्षी अनेक गोष्टी वयम्'च्या स्थानिक कार्यकर्त्यांनी घडवल्या आहेत. गावांमधून होणारे स्थलांतर थांबवण्यासाठी, शेतीसाठी लागणा-या गरजांची उपलब्धता करणे, असे कार्य ग्रामीण पातळीवर होताना दिसते. लोकसहभागातून रोजगार हमी योजना आराखडा बनवण्याचे काम गेली ३ वर्षे वयम् करत आहे

नुकतीच ही प्रक्रिया शासनाने अंगिकारली आहे. उपजिल्हाधिकार्यांनी जव्हार आणि मोखाड्यात शासकीय कर्मचार्यांना 'सहभागीय नियोजन प्रक्रिये'चे प्रशिक्षण द्यायला वयम्'ची मदत घेतली होती.एकीकडे प्रशासनाचे काम सोपे करताना लोकजागर करण्याचेही काम चालूच आहे. ७ गावांमधल्या २,०६३ जणांनी रोहयो कामासाठी अर्ज दाखल केले. या सर्व गावांमध्ये तीनताशी जागरण शिबीरेही झाली. माहिती अधिकार सत्याग्रहातून आदिवासी नागरिकांना जमिनीवरचा पूर्ण हक्क प्राप्त झाला. वन हक्क कायद्याने दिलेले अधिकार अनुसूचित जमातीच्या व वननिवासी नागरिकांना मिळावेत यासाठी वयम् चळवळीने सातत्याने प्रयत्न केले आहेत.२०१३ साली १२७२ नागरिकांनी केलेल्या माहिती अधिकार सत्याग्रहानंतर वनहक्काबाबतची माहिती उघड झाली व वेबसाईटवर आली. पण लोकांना जितक्या क्षेत्रावर कसण्याचा हक्क मिळणे अपेक्षित होते, तेवढा मात्र मिळाला नाही. म्हणून ७८ गावांमधले २,०५१ वनहक्कधारक एकत्र आले आणि एक प्रचंड रांग लावून आपली अपिले दाखल केली. या रांगेच्या सत्याग्रहानंतर एक महिन्याच्या आत प्रत्यक्ष जागेवरची पडताळणी शासनाने सुरू केली. चळवळीच्या कार्यकर्त्यांनी मेहनत करून सर्व दावेदारांची कागदपत्रे तपासून पूर्ण करून घेतली होती, तसेच शासनाच्या उपविभागीय समितीला या अपिलांची वर्गवारी व मोजणीचे वेळापत्रक आखण्यातही मदत केली. सहा. जिल्हाधिकारी पवनीत कौर व वनविभागाच्या अधिकाऱ्यांच्या सहकार्याने ९०० प्रकरणांची पडताळणी पावसाळ्याआधी पूर्ण झाली. येत्या एक-दोन महिन्यात उरलेली पडताळणी होणार आहे. लोकशाही संवादातून न्याय मिळवण्याचा आणखी एक गड यानिमित्ताने चळवळीने सर केला. माहिती अधिकार सत्याग्रहातून मिळालेल्या माहितीचा फायदा घेत ५०० नागरिकांनी वनहक्क अपिले दाखल केली. लोकसंघर्ष मोर्चा या नंदुरबारमधल्या संघटनेने वयम्'चे माहिती अधिकार तंत्र वापरले आणि ९०० आदिवासी नागरिकांना जमिनीवरचा पूर्ण हक्क प्राप्त झाला.

पेसा (अनुसूचित क्षेत्रात पंचायत विस्तार) कायदा शिकून चळवळीतल्या अनेक गावांनी ग्रामसभा ठराव केले. उपविभागीय अधिकार्यांनी (प्रांत) या गावांना भेट देऊन या ठरावांची प्रशस्ती केली. 'पेसा' गाव घोषित झाल्यावर या गावांना नैसर्गिक संसाधनांवर शासनाचे हक्क मिळणार आहेत. रेती, माती, दगड, पाणी, आणि जंगलातले टिंबर वगळता सर्व काही यावर ग्रामसभेची

मालकी आणि नियम चालणार आहेत. यातून ग्रामसभांना उत्तम उत्पन्ना मिळेल. 'सामुहिक संसाधन वन हक्कां'चे दावे शासनाच्या उपविभागस्तारीय समित्यांनी मंजूर केले आहेत. यापैकी डोयापाडा गावाचा दावा 'आदर्श दावा' म्हणून त्याच्या छायाप्रती काढून शासनाने वाडा उपविभागातील इतर सर्व गावांना पाठवला आहे. हे हक्क प्राप्त झाल्यानंतर ही गावे आपल्या जंगलाची मालक-व्यवस्थापक-संवर्धक होणार आहेत. १८६४ पासून हे हक्क हिरावले गेले होते, ते सहा पिढ्यांनंतर परत मिळाले आहेत. नोकरशाही संपून लोकशाही जंगलात परत आहे.

*** माहिती अधिकार मंच आणि भास्कर प्रभु :-**

भास्कर अनंत प्रभु हे मुंबई स्थित माहिती अधिकार कार्यकर्ते आहेत. मुंबई महानगर पालीकेच्या कामकाजावर ते बारकाईने लक्ष ठेवत असतात. अनेक माहिती अधिकार कार्यकर्ते त्यांनी आजवर घडवले आहेत. त्यांनी १ जानेवरी २००६ मध्ये मुंबई येथे माहिती अधिकार मंच ची स्थापना केली. माहिती अधिकार कायद्यावर आधारित कार्यशाळा, जनजागृती केली जाते . शासन तसेच स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या कार्याची सोशल ऑडीट व्हावी यासाठी ते क्रियाशील असतात. मुंबई महापालीका क्षेत्रामध्ये माहिती अधिकार कायद्याबाबत जनजागृतीचे कार्य माहिती अधिकार मंचच्या माध्यमातून केले जाते. तसेच माहिती अधिकार मंचच्या माध्यमातून आरटीआय क्लिनीक चालवले जातात. त्यामध्ये माहिती अधिकार कसा वापरावा याचे प्रशिक्षण गरजुना मोफत दिले जाते. साधारणपणे आजवर सात लाख लोकांना संस्थेने माहिती अधिकार कायद्याविषयी जागृत केले आहे.

*** अनिल गलगली :-**

मुंबईतील अग्नीशिला साप्ताहिकाचे संपादक अनिल गलगली ह्यांनी भ्रष्टाचाराच्या अनेक प्रकरणांना उघडकीस आणले आहे. अनिल गलगली यांनी मुंबई विद्यापीठाच्या अधिसभेसाठी ७.४४ लाख खर्च झाला असल्याचे माहिती अधिकाराद्वारे जनतेच्या निदर्शनास आणून दिले. अनिल अंबानी यांनी महाराष्ट्र शासनाचे २६४० कोटी थकविले होते. हि बाब अनिल गलगली

यांनी उघडकीस आणल्यानंतर अनिल अंबानी २६४० कोटी रूपये महाराष्ट्र शासनाच्या तिजोरीत जमा केले. महाराष्ट्रातील देवेंद्र सरकार मधील मंत्र्यांनी त्यांची संपत्ती जाहिर केली नव्हती. ती सामान्य प्रशासन विभागाद्वारे माहिती मिळवून अनिल गलगली यांनी जनतेसमोर मांडली. त्यांनीच ही माहिती समोर आणली होती की मोदी सरकारने ४६ महिन्यामध्ये ४,३४३ कोटी रूपये जाहिरातींवर खर्च केले आहेत. परिशिष्टांमध्ये सदरच्या माहिती अधिकराला आलेली उत्तर स्वरूपातील माहिती जोडलेली आहे. तसेच अभिनेत्री हेमामालिनी यांनी अंधेरी येथे त्यांच्या नाट्य विहार संस्थेसाठी दोन हजार चौरस मीटरची जमीन केवळ सत्तर हजारांमध्ये घेतली असल्याचे अनिल गलगली यांनी माहिती अधिकारात उघड केले. त्यानंतर हेमा मालिनी यांनी सदरचा भुखंड महाराष्ट्र शासनास परत केला. माहिती अधिकारात अनेक भ्रष्टाचार उघडकीस आणल्याबद्दल सजग नागरिक मंच पुणे यांच्या कडून २०१५ चा माहिती अधिकार कार्यकर्ता म्हणून त्यांचा सत्कार करण्यात आला होता. तसेच माहिती अधिकार चळवळीतील अन्य संघटना मध्ये नागरिक चेतना मंचाचे सुधीर जठार, पतीतपावन संघटनेचे निरंजन फडके, विंग्ज इंडीया संघटनेचे विहार दुर्वे, पिंपरी चिंचवड येथे राहणारे मानव कांबळे, मारूती भापकर, राजु खेंदळे, मुंबई येथील संजय शिरोडकर यांचे योगदान माहिती अधिकार चळवळीत राहिले आहे.

*** 'सजग नागरिक मंचफ या संस्थेची स्थापना :-**

शासनाच्या कारभारत जबाबदारी आणि उत्तरदायित्व येण्यासाठी माहिती अधिकार कायदा २००५ मध्ये अस्तित्वात आला. जास्तित जास्त नागरिकांपर्यंत हा कायदा पोहचावा, या उद्देशाने श्री. विवेक वेलणकर यांनी त्यांचे मित्र श्री जुगल राठी यांच्या समवेत २००६ मध्ये 'सजग नागरिक मंच या संस्थेची स्थापना पुण्यात केली. या संस्थेच्या माध्यमातून नागरिकांच्या विविध समस्या हाताळताना त्यांना असे लक्षात आले की, शासकीय नियमांची माहिती उच्च शिक्षित नागरिकांनासुद्धा नसते. त्यामुळे या यंत्रणांकडून अन्याय मनस्ताप सहन करण्यापेक्षा एजंटकडे जाण्याचा किंवा प्रसंगी लाच देवून काम करून घेण्याचा मार्ग अवलंबिला जातो. मात्र महानगरपालिका, महावितरण, टेलिफोन, गॅस, रेशनिंग, बँक, विमा तसेच अन्य शासकिय कार्यालयाना लागू असणारे नियम जाणून घेतले. तर सर्वसामान्य नागरिक राजासारखा वागू शकतो.

हे नागरिकांपर्यंत पोहचवण्याचे काम 'सजग नागरिक मंच' सातत्याने करत असतो. माहिती अधिकार कायदा, सेवा हमी कायदा, ग्राहक संरक्षण कायदा असे विविध कायदे नागरिकांना माहिती करून देवून गेली काही वर्षे व्याख्यानामधून जनजागृती केली जाते.

माहिती अधिकार कायदा ज्या उत्तरदायित्व आणि पारदर्शकता यासाठी अस्तित्वात आला. त्यागोष्टी लक्षात घेवून त्या कायद्याचा सुयोग्य वापर केला तर अनेक महत्त्वाचे विषय मार्गी लागू शकतात. भ्रष्टाचारावर नियंत्रण आणता येते. देशभरात असंख्य विषय अनेकांनी मार्गी लावले आहेत. पुण्यातील सजग नागरिक मंच, क्रिएटीव्ह फाउंडेशन, सुराज्य संघर्ष समिती, नागरिक चेतना मंच, विंग्ज टाइम इंडिया या संस्था माहिती अधिकार कायद्याच्या अमंलबजावणीसाठी सातत्याने प्रयत्नशील आहेत.

*** माहिली अधिकार कायद्याच्या अंमलबजावणीतील अडथळे :-**

कोणताही कायदा कितीही प्रभावी असला तरी अंमलबजावणी ढिसाळ की त्या कायद्याची धार बोथट होते. संबंधित दोषी व्यक्तींना त्या कायद्याचा धाक वाटेनासा होतो. त्यात माहिती आयोगाची भूमिका महत्त्वपुर्ण आहे. मात्र या आयोगावर माहिती आयुक्त नेमण्याची प्रक्रिया पारदर्शी नाही. माहिती आयुक्तपदावर निवृत्त सरकारी अधिकारी नेमू नयेत यासाठी झगडणाऱ्या स्वयंसेवी संस्था व कार्यकर्ते यांना न जुमानता शासनाकडून निवृत्त सरकारी अधिकारी यांना माहिती आयुक्त म्हणून नेमण्याचा प्रघात पडला. समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत हा कायदा पोचावा याकरिता या कायद्याच्या कलम २६ मध्ये नेमून दिलेल्या जबाबदाऱ्याही शासनाने पार पडाल्या नाहीत, त्यामुळे दरवर्षी लाखोंच्या संख्येत माहिती अधिकार सर्व राज्यात दाखल होत असले तरी अर्जदारांची संख्या काही हजारांतच आहे.त्यामुळे ह्या कायद्याचा प्रसार मर्यादित स्वरूपात झाला आहे. या कायद्याच्या कलम ४ प्रमाणे सर्वच सार्वजनिक प्राधिकरणांनी फार मोठ्या प्रमाणावर माहिती स्वत:हून घोषित करून जनतेसाठी खुली करून ठेवणे बंधनकारक आहे. परंतु आजही बहुसंख्य सार्वजनिक प्राधिकरणांनी ही माहिती अशाप्रकारे उपलब्ध केलेली नाही. असे असूनही वर्षांनुवर्षे अडलेल्या वैयक्तिक तक्रारी सुटण्यापासून ते सार्वजनिक कामे मार्गी लागण्यापर्यंत अनेक विषय माहिती अधिकाराच्या माध्यमातून पूर्ण झाले आहेत. लोकप्रतिनिधींना आपण आपल्या

सेवेसाठी तात्पुरते नेमुन दिले आहे. ही भावना जनतेत रूजविणे महत्त्वाचे आहे. असे न्यायमुर्ती पी.बी सावंत यांनी एका कार्यक्रमात व्यक्त केले आहे. ‘लोकप्रतिनिधि स्वत: ला सत्ताधिष समजतात‘. आपण जे कायदे करू ते लोकांनी मान्य केले पाहीजे असे लोकप्रतिनिधिंना वाटते. लोकशाहीत कारभार लोकांच्या मर्जीवर असतो ही नेमकी बाब लपवली जात आहे. लोकप्रतिनिधींनी लोकांच्या मागे धावण्याएवजी लोकचलोक प्रतिनिधींच्या मागे धावत आहेत. ही स्थिती बदलली पाहीजे असे मत न्यायमुर्ती पी.बी सावंत यांनी व्यक्त केले आहे. लोकप्रतिनिधी राजे आहेत आपण त्यांचे गुलाम आहोत. अशी जनतेमध्ये निर्माण झालेली मानसीकता बदलण्याची गरज आहे.  लोकांना कायद्याची माहिति नसेल तर तो कायदा कागदावरच राहतो. अशी लोकशाही परिणामकारक होत नाही. लोकशाहीमध्ये नागरिकांना जे हक्क दिले आहेत. त्या सर्व अधिकारांचा पाया माहिती अधिकार कायदा आहे. प्रत्येकाला नागरिकांना लोकशाहीमध्ये सहभागी होण्याचा हक्क असल्याने प्रत्येकाने माहिती अधिकार कायद्याचा योग्य उपयोग केला पाहिजे. नागरिकांना त्यांच्याच हक्काप्रति जागृत करणारी संस्था म्हणून सजग नागरिक मंचच्या कार्याचे भारतीय लोकशाहीसाठी योगदान बहुमुल्य आहे.

*** माहिती अधिकार कायद्याच्या संदर्भात नागरिकांचे मार्गदर्शन होणे गरजेचे आहे. :-**

सुराज्य संघर्ष समिती आणि माहिती अधिकार कट्टा यासारख्या संस्थामधून कार्य करणारे माहिती अधिकार कार्यकर्ते विजय कुंभार यांच्या मते ममाहिती अधिकार कायद्याचा ज्या अधिकारी वर्गाला त्रास झाला त्यांनी माहिती अधिकार कायद्याचे खच्चीकरण करण्यास सुरूवात केलीफ या कायद्याचे खरे मारेकरी माहिती आयुक्तच आहेत. काही माहिती आयुक्तांनी  सामान्य नागरीक आणि स्वत: मध्ये एक दरी निर्माण केली आहे. राज्यातील अनेक माहिती आयुक्त एकमेकांना सहकार्य करत नाहीत हा कायदा पिछाडीवर कसा जाईल याचे प्रयत्न चालू आहेत. पण सामान्य नागरिकांनी खचून न जाता कायद्याचा उपयोग योग्यपणे करत राहीले पाहीजे. असेही मत विजय कुंभार यांनी व्यक्त केले आहे. न्यायमुर्ती पी बी सावंत आणि माहिती अधिकार कार्यकर्ते विजय कुंभार यांनी व्यक्त केलेली खंत विचारात घेता माहिती अधिकार कायद्याच्या संदर्भात नागरिकांचे मार्गदर्शन होणे गरजेचे आहे.

अ) माहीतगार नागरिक तयार व्हावेत.

आ) प्रशासनात पारदर्शकता यावी

इ) भ्रष्टाचारावर नियंत्रण यावे

ई) प्रजासत्ताक लोकशाहीत प्रजेला सत्ताधारी असल्याची जाणिक करून देण्यासाठी

उ) माहिती अधिकार कायद्याची जरब प्रशासनात निर्माण होण्यासाठी

ऊ) समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत हा कायदा पोहचविण्यासाठी

ऋ) सार्वजनिक प्राधिकरणांनी ही माहिती स्वत:हून घोषित करून जनतेसाठी खुली करून ठेवणे बंधनकारक आहे.

लृ) लोकप्रतिनिधींना आपण आपल्या सेवेसाठी तातपुरते नेमुन दिले आहे. ही भावना जनतेत रूजविणे महत्त्वाचे आहे

**✻ समकालीनता ✻**

राज्यशास्त्राच्या अभ्यासाच्या ऐतिहासिक आणि आधुनिक विचारप्रणाली मध्ये आदर्श शासन व्यवस्था निर्माण करण्यासाठी चर्चांचा उहापोह प्राचीन काळापासून करण्यात आला आहे. मात्र आजच्या आधूनिकी करणाच्या काळात शासन व्यवहारामध्ये पारदर्शकता असावी, आणि शासन निर्णय लोकाभिमुख होण्यासाठी माहितीच्या अधिकाराचा वापर नागरिकांना करता येतो.

माहितीचा अधिकार कायदा म्हणून त्याची आवश्यकता उपयुक्तता निर्विवाद आहे. पण माहिती अधिकाराचा वापर कसा करावा हे सर्व लोकांपर्यंत पोहचले नाही. त्यातही गरजू व्यक्तींच्या आयुष्याचा माहिती अधिकार कायदा अमुलाग्र बदल घडवू शकतो. हे सजग नागरिक मंचने दाखवून दिले आहे. त्यामुळे हा विषय समकालीन आणि सांयुक्तीक ठरतो.

**✻ ग्राहक आणि नागरिक ✻**

प्रत्येक व्यक्ती प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे ग्राहकाच्या भूमिकेत वावरत असतो. गुणवत्तापूर्ण वस्तू आणि सेवा मिळविण्याचा अधिकार ग्राहक म्हणून सा-यांनाच असतो. मात्र ब-याचदा आपल्याला आपल्या अधिकाराची माहिती नसते. दैनंदिन जीवनातील कितीतरी गरजांबद्दलच्या

अश्या आपल्या या अधिकाराची जाणिव नसते. त्याच सोबत सजग नागरिक मंचने एक सकारात्मक दबावगट समाजात परिवर्तन कसे आणू शकतो, हे दाखवून दिले आहे. या दबावगटाचा सामाजिक आणि राजकिय सामाजिकरणातील एक घटक म्हणून अभ्यास होणे आवश्यक आहे

**✻ सजग नागरीक मंच – एक अभ्यास ः–**

या विषयाची निवड करण्यात अनेक प्रेरक घटक आहेत. त्यातील प्रमुख आणि महत्त्वाचे कारण ; नागरीकांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देण्याचा प्रयत्न सदर मंचाच्यावतीने झाला. सामान्य माणसांचा आवाज आणि त्यांचा दबाव यंत्रणेला सकारात्मक पाऊल उचलायला भाग पाडतो हे या निमित्ताने पुढे आलं. सामान्य माणुस देशाचा नागरिक म्हणून विचार करतो त्यावेळी घटणाऱ्या सामाजीक क्रांतीचे प्रतिक आहे. त्यातही क्रांती वैचारीक आणि यंत्रणेच्या परिवर्तनांची नांदी घडवत असताना. त्यात अतिरंजीतपणा नाही. जात, धर्म, पंथ, आर्थिक परिस्थीती अश्या कोणत्याही विषमतेला बळी न पडता. केवळ एक नागरिकांचा म्हणून दबाव गट स्थापन होउन त्यातून सामान्य माणुस बदल घडवू शकतो. असा लोकसहभाग लोकशाहीचा आधारस्तंभ असणाऱ्या शोध–पत्रकारीतेसाठी महत्त्वपुर्ण भूमीका निभावू शकतो.

माहितीच्या अधिकारामुळे प्रशासनात पारदर्शकता यायला हवी होती; पण तसं घडू लागल्याचा अनुभव येत नव्हता. नागरिकांचे प्रश्न बिकट होत चालले होते.
आपण जो कर देतो त्याचं नेमकं काय होतं याबाबत सामान्य माणसं अनभिज्ञ असल्याचाही प्रत्यय येत होता. हतबल, निष्क्रिय, उदासीन अशा सामान्य माणसाला वेळोवेळी उत्तेजन देण्याचं काम सजग नागरिक मंच करत आला आहे. आपण काय करू शकणार, असा विचार करून हातावर हात घेऊन गप्प राहणा–या माणसांना थोडं सक्रिय बनवण्यासाठी हा मंच धडपडतोय. आजमितीस हा मंच माहिती अधिकारासंबंधित ५०० व्याख्यानांमधून ४०,००० लोकांपर्यंत पोहोचला आहे. या व्याख्यानांमधून नागरिकांना प्रशिक्षणही दिलं जातं.

*** सामान्य पुणेकरांना भेडसावणारे प्रश्न ***

महावितरणाशी निगडित किंवा रिक्षांच्या अवास्तव भाड्याविषयी, पुण्यातल्या रस्त्यांविषयी किंवा पीएमपीएमएलच्या बससुविधेविषयी, आरटीओ, बीएसएनएल, पुणे महानगरपालिकेच्या दैनंदिन कामकाजाविषयी सजग राहून निर्णय प्रक्रियेला गतिमान करण्यासाठी सजग नागरिक मंच ने माहिती अधिकाराचा वापर केलेला आहे.

१) वीजमंडळ, रेशनकार्ड, गॅस

२) बँका, विमानसेवा, टेलिफोन, मोबाईल

३) हाउसिंग सोसायटी विषयक नियम

४) विविध शासकिय सेवा

या सारख्या सेवा मिळविताना अनेकवेळा सामान्य माणसाला अनेक प्रश्न भेडसावत असतात. प्रशासकीय पातळीवरचा ढिसाळपणा, दफ्तरदिरंगाई, भ्रष्टाचार , अधिका-यांची उदासीनता, लोकाभिमुखतेचा अभाव, धोरणांमधील विरोधाभास, संथ गतीने चालेली विकास कामे, कच-याच्या समस्येवरील अपयश, आपातकालीन यंत्रणांची अकार्यक्षमता यासारख्या प्रश्नांवर सजग नागिरक मंच  कार्य करतो.

थोडक्यात माहिती अधिकार कायद्याचे चळवळीत रूपांतर करण्यात आणि हा कायदा लोकांपर्यंत पोहचविण्यात सजग नागरिक मंचाने मोलाचे योगदान दिले आहे या पार्श्वभूमीवर ममहाराष्ट्रातील माहिती अधिकार चळवळ आणि सजग नागरीक मंच : एक चिकित्सक अभ्यासफ या शिर्षकांतर्गत समाज  शास्त्रीय संशोधन होणे आवश्यक आहे ही बाब अधोरेखीत झाली आहे. सामाजिक शास्त्रातील संशोधन पद्धती व निर्धारित टप्प्यांच्या माध्यमातून वरील विषयांवर सखोल विवेचन केले आहे.

**संदर्भ सुची –**


१. कचरे प्रल्हाद/गायकवाड शेखर, कायदा माहितीचा अन् अभव्यक्तिस्वातंत्र्याचा, यशदा प्रकाशन पुणे, २०१०, पृष्ठ क्र. ११ ते १७

२. बाचल.वि.मा, भारतीय राज्यघटना आणि राजकिय व्यवहार (अनुवादीत), के,सागर प्रकाशन पुणे, २०१०, पृष्ठ क्रं. ३४ ते ५४

३. सक्सेना.एस.एन, अराजकाच्या वाटेवर भारत, अनुवाद- दांडेकर कुसुदिनी, श्रीविद्या प्रकाशन, १९९५, पृष्ठ क्रं. १२

४. वेलणकर विवेक, ग्राहक राजा, सजग हो!, राजहंस प्रकाशन, १९९५, पृष्ठ क्रं. १ ते ३०

५. वराडकर.र.घ., राज्यशास्त्र, निराली प्रकाशन, १९९५, पृष्ठ क्रं. १७

६. चौधरी राजेश, केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५, चौधरी लॉ पब्लिशर्स, २०१३, पृष्ठ क्रं. ०५

७. नाईकवाडे फारूख, स्टील फ्रेम, राष्ट्रचेतना प्रकाशन, मुंबई, २०१३, पृष्ठ क्र. १५

८. पवार जयसिंगराव, हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, निराली प्रकाशन, पुणे, २००९, पृष्ठ क्र. ७० ते ९५

९. डोळे. ना.य., राजकिय विचारांचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९६९, पृष्ठ क्र. ८१५ ते ८६५

१०. भोळे भाष्कर लक्ष्मण, भारतीय गणराज्यांचे शासन आणि राजकारण, पिंपळपुरे एण्ड कं पब्लिशर्स, २००३, पृष्ठ क्र. ११५

११. साठे सत्यरंजन, भारतीय राज्यघटनेची पन्नास वर्षे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, २००२, पृष्ठ क्र. १२५

१२. जोशी ललिता, लोकाभिमुख कारभाराच्या दिशेने...., वॉटरशेड आर्गनायझेशन ट्रस्ट प्रकाशन, २००९, पृष्ठ क्र. १२०

१३. वेलणकर, लोकरंग लेख सजग, दैनिक लोकसत्ता, दि. १२/०८/२०१३

१४. हजारे अण्णा, लढाई अजुनही अपुर्ण, दैनिक लोकसत्ता, दि. ११/१०/२०१५

१५. वेलणकर विवेक, माहितीचा अधिकार धोक्यात, दैनिक लोकसत्ता, २८०/०७/२०१८

१६. वेलणकर विवेक, माहितीचा अधिकार कायदा शस्त्र नव्हे, साधन, दैनिक लोकसत्ता, ११/१०/२०१५

१७. बातमी, माहितीचा अधिकार कायद्यातील बदलाला अण्णा हजारे यांचा विरोध, दैनिक लोकसत्ता, २१/०४/२०१७

१८. बातमी, शहरबातः माहिती अधिकाराचा बागुलबुवा, दैनिक लोकसत्ता, पुरवणी- मुंबई, दि. ३०/०१/२०१८

१९. आसावा श्याम, कायदा केला जातोय बोथट, दैनिक महाराष्ट्र टाईम्स, १०/१०/२०१५

२०. झगडे महेश, माहिती अधिकार आता अधिक पारदर्शी, दैनिक लोकमत, दि. १५/१२/२०१८

२१. शिरोडकर संजय, माहिती अधिकार व चळवळीची तेरा वर्षे, दैनिक स्वतंत्र नागरिक,दि. २०/१०/२०१८

२२. थत्ते मिलिंद, १५० वर्षांची मिळालं जंगलावरचं स्वराज्य! दैनिक लोकमत-मंथन, दि. २७/०६/२०१५

23. http://mahitiadhikarmanch.ngo/
24. http://yashada.org
25. https://www.worldbank.org/
26. https://rtionline.org.in/
27. https://rti.gov.in/
28. http://foundation.moveylife.in/

* * *

## प्रकरण दुसरे

## संदर्भ साहित्याचा आढावा

२.१ प्रस्तावना

२.२ संदर्भ साहित्याच्या समालोचनाची उद्दिष्ट्ये

२.३ पुर्वी झालेल्या संशोधनाचा आढावा

२.३.१ पीएचडीचे शोधप्रबंध

२.३.२ एम फिलचे लघुशोधप्रबंध

२.३.३अहवाल

२.३.४ पुस्तके

२.३.५ वृत्तपत्रातील लेख

२.४ संदर्भ साहित्याचा आढावा

२.५ सारांश

## प्रकरण : दोन

## संदर्भ साहित्याचा आढावा

संशोधन प्रक्रियेमधील महत्त्वाचा टप्पा म्हणजे संदर्भ साहित्याचा आढावा होय. संदर्भ साहित्याचा आढावा  ही समस्या निश्चितीनंतरची संशोधनाची पायरी असल्यामुळे क्रमबद्ध स्वरूपात विषयाचे ज्ञान प्राप्त होते. अभ्यासाची दिशा  स्पष्ट होते. संशोधन अभ्यासाचे नियोजन करण्याकरता संदर्भ साहित्याचा आढावा  घेणे उपयुक्त ठरते. संशोधनात पुनरावृत्ती टाळण्यासाठी म्हणजेच पुर्वी एखाद्या विषयावर संशोधन झाले असेल तर त्याच स्वरूपाचे दुसरे संशोधन करून संशोधकाचे श्रम आणि वेळ वाया जातो. म्हणून संशोधनाची ही पायरी महत्त्वाची ठरते. माहिती अधिकार कायदा या विषयावर संशोधन भारतात आणि इतर राष्ट्रात वेगवेगळ्या स्तरावर विपुल प्रमाणात संशोधन झाले आहे. मात्र महाराष्ट्रातील माहिती अधिकार चळवळ ही भारतीय परिपेक्ष्यातून देखील महत्त्वाची आहे असे असून त्यावर म्हणावे असे, किंवा भरीव असे संशोधन झालेले नाही. त्यातून सजग नागरिक मंच या संस्थेवर त्यांनी माहिती अधिकार कायद्याप्रती निभावलेल्या कर्तव्यांवर संशोधन झालेले नाही. काही वृत्तपत्रातील लेख आणि काही प्रमाणात पुस्तकांतील संदर्भ वगळता सजग नागरिक मंच या संस्थेवर संशोधन झालेले नाही.

त्यामुळे संदर्भ साहित्याचा आढावा घेताना एका संदर्भातून संशोधनाच्या संदर्भातील दुसरा नवा संदर्भ सापडत असतो. ही एक प्रक्रिया असते. संशोधक ज्या विषयात संशोधन करत असेल त्याविषयाला निश्चित दिशा मिळण्यासाठी संदर्भ साहित्याचा आढावा महत्त्वाचा ठरतो.

संदर्भ साहित्या द्वारे संशोधनात्मक दृष्टीने अभ्यासलेले मुद्दे पुढील प्रमाणे

१) माहिती अधिकार कायद्याचा उगम

२) माहिती अधिकार कायद्याची ऐतिहासिक पार्श्वभुमी

३) माहिती अधिकार कायद्याचा भारतातील उगम

४) माहिती अधिकार कायद्याचे महाराष्ट्रातील संदर्भ

५) महाराष्ट्रातील माहिती अधिकार कार्यकर्ते

६) सजग नागरिक मंचाच्या कार्याचा आढावा

७) सजग नागरिक मंचच्या समाज जागृती आणि विकास कार्यनितीचा आढावा घेणे

८) सजग नागरिक मंचच्या सामाजिक आणि राजकिय विचारप्रणालीचा अभ्यास करणे

९) सजग नागरिक मंचाने हाताळलेल्या प्रश्नांचा अभ्यास करणे

१०) शासन आणि प्रशासनाच्या संगनमताने होणा–या भ्रष्टाचारावर सजग नागरिक मंचने उभारलेल्या लढ्याविषयी माहिती घेणे

*** २.२ संदर्भ साहित्याच्या समालोचनाची उद्दिष्ट्ये**

संशोधक ज्या संशोधन विषयाच्या क्षेत्रात संशोधन करत हे त्या विषयी पुर्वी झालेल्या संशोधनाचा आढावा घेणे ही संशोधनाची पहिली पायरी आहे. अशा प्रकारे उपलब्ध ज्ञानाचा आढावा घेतल्याने आणि या पुर्वी झालेल्या संदर्भांचा आढावा घेतल्याने संबंधित विषयाची बहुमुल्य माहिती संशोधकाकडे तयार असते. त्या द्वारे संशोधकाला नवीन दृष्टी प्राप्त होण्यास मदत होते. तसेच अनेक गोष्टींसाठी संशोधकाला त्याचा उपयोग होतो. एखाद्या गोष्टी बाबत अनेक कांगोरे समोर येतात. त्यामुळे संशोधकाला नवी दिशा मिळू शकते. संशोधनाचे साहित्य पुढील उद्दीष्टांच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते.

१) पुर्वीच्या संशोधकांनी केलेल्या संशोधनाची माहिती प्राप्त होते. आणि त्यांनी केलेल्या शिफारशीनुसार नवीनतम संशोधनाची दिशा काय असावी हे कळते. आपण या दृष्टीने माहिती अधिकारावर आधारीत दोन पीएचडी चे संशोधन अभ्यासले आहे. त्यामध्ये एका संशोधनात परभणी हा जिल्हा आधारभुत मानला आहे. तर दुस–या संशोधनामध्ये मराठवाडा महसुल विभाग आधारभुत मानला आहे. मात्र संघटीत नागरिक चळवळीचा आढावा घेण्यात आला आहे.

२) संशोधन विषय निवडीसाठी मार्गदर्शक म्हणून पुर्वी केलेल्या संशोधनास महत्त्व आहे.

३) पुर्वी केलेल्या संशोधनाद्वारे स्वत: ज्ञानाच्या कक्षा विस्तारता येतात

४) संशोधन समस्येची व्याप्ती आणि मर्यादा निश्चित करणे

५) संशोधन समस्या आणि गृहितकृत्यांची निर्मिती होते

६) संशोधन समस्येच्या उत्तराची वैधता तपासता येते.

ग्रंथालयातील साहित्याचा आढावा ही संशोधनाची पहिली पायरी आहे. ग्रंथालयात उपल्बध साहित्य सामुग्री हा माहितीचा प्रारंभिक स्त्रोत आहे, त्या आधारे संशोधकाला पुढील संशोधनासाठी आराखडा तयार करता येतो.

### * २.३.१ पीएचडीचे शोधप्रबंध

भागवत.डी.आर (२०१७), यांनी ''भारतीय लोकशाहीचे सुदृढीकरण आणि माहितीचा अधिकार : एक अभ्यास विशेष संदर्भ परभणी जिल्हा'' , या विषयावर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड यांना सादर केलेल्या पी.एच.डी च्या शोध प्रबंधात –

भारतीय लोकशाहीचे सुदृढीकरण आणि माहितीचा अधिकार या संशोधन करण्यात आले आहे. परभणी जिल्ह्याचा संदर्भ देण्यात आलेला आहे. प्रंचड लोकसंख्येचा भारत आणि जगातील सर्वात मोठी लोकशाही या दृष्टीने माहिती अधिकाराचे महत्त्व अधोरेखीत करण्यात आले आहे. विशेष म्हणजे या संशोधनात शासकिय अधिकार–यांचा माहिती अधिकाराच्या प्रसारासाठी प्रयत्न केले आहेत वा नाही हे परभणी जिल्ह्याच्या धर्तीवर जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. माहितीचा अधिकाराबाबत जनतेत जागृकता निर्माण व्हावी म्हणून शासकिय अधिकारी यांची कामगीरी सकारात्मक आहे असा निष्कर्ष काढण्यात आलेला आहे. दशकाचा कालावधी संपल्यानंतरमाहितीचा अधिकार कायद्याचे मुल्यमापन करण्याचा संशोधकाने प्रयत्न केलेला आहे. माहिती अधिकार कायद्याची ऐतिहासिक पार्शभुमी प्रकरण २ मध्ये संशोधकाने विषद केलेली आहे. मात्र परभणी जिल्ह्याच्या अनुषंगाने संशोधक वृषाली फुके यांनी आपल्या अभ्यासाची मांडणी केलेली आहे. त्यात महाराष्ट्रातील माहिती अधिकार चळवळीचा इतिहास आणि कार्यकर्त्यांबाबत माहिती विस्तृत स्वरूपात देण्यात आलेली नाही. त्यामुळे माहिती अधिकार कायद्याबाबत असणा–या चळवळींवर प्रकाशझोत टाकण्यासाठी अभ्यास होणे गरजेचे आहे. असे संशोधक या नात्याने मला वाटते.

**❊ २.३.१ पीएचडीचे शोधप्रबंध**

सोनकांबळे अशोक (२०१६), यांनी ''महाराष्ट्र प्रशासन व माहितीचा अधिकार - एक प्रशासकीय अभ्यास, विशेष संदर्भ मराठवाडा विभाग'' या विषयावर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विभाग नांदेड यांना सादर केलेल्या पी.एच.डी. च्या शोध प्रबंधात -

महाराष्ट्र लोकप्रशासन आणि माहितीचा अधिकार यांचा आतंर संबंध सदर अभ्यासात तपासला आहे, मराठवाडा विभागाला अभ्यासाचे कार्यक्षेत्र म्हणून निवडण्यात आले आहे. माहिती अधिकाराची ऐतिहासिक पार्श्वभूमी अभ्यासासाठी सदर संशोधन उपयुक्त ठरले आहे. महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाडा हा विकासात्मकदृष्ट्या पिछाडीवर आहे. पश्चिम महाराष्ट्रातील नागरिकांचे प्रश्न आणि मराठवाड्यातील नागरिकांचे प्रश्न वेगवेगळ्या स्वरूपाचे आहेत. ग्रामीण आणि शहरी भागातील माहिती अधिकाराची स्थिती जाणून तुलनात्मक अभ्यासासाठी हा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. प्रशासनाचा केलेला अभ्यासाची मांडणी आपणास समजु शकते.

**❊ २.३.२ एम फिलचे लघुशोधप्रबंध**

भागवत ज्ञानेश्वर दत्तात्रय (२५ जुन २००९), ''माहितीचा अधिकार अधिनियम २००५ बाबत लोकजागृतीचा चिकित्सक अभ्यास क्षेत्र - बिबडेवारी क्षेत्रिय कार्यालय'' या विषयावर टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे यांना सादर केलेल्या एम.फिल्च्या शोध निबंधात -

सदर लघुशोधप्रबंधामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ बाबत लोकजागृतीचा चिकित्सक अभ्यास करण्यात आला होता. त्यामध्ये संशोधक ज्ञानेश्वर दत्तात्रय भागवत यांनी लोकांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ बाबत फारशी माहिती नाही. आणि माहितीचा अधिकार अधिनियम २००५ वापराबाबत लोकामध्ये आत्मविश्वास कमी आहे. असा निष्कर्ष काढला होता. हा अभ्यास संशोधक यांनी प्राध्यापक डॉ. शरद घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली सन २००९ साली केला होता. म्हणजेच संशोधकाने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ ह्या कायद्याला ४ वर्षे पुर्ण केलेला होता. कायदा वापराबाबत लोकाचे ज्ञान कितपत आहे. माहिती

मागण्याबाबात लोकांमध्ये उत्सुकता किती आहे. त्यांच्या जीवनात माहितीचा अधिकार अधिनियमाने कोणते बदल झाले. अश्या स्वरूपाच्या दुरदृष्टीने सदर संशोधन केलेले आहे.

प्रस्तुत लघुशोधप्रबंधामध्ये संशोधक ज्ञानेश्वर दत्तात्रय भागवत यांनी बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालय हे क्षेत्र निवडून त्यांनी तेथिल लोक आणि प्रशासन यांचा अभ्यास माहिती अधिकार वापराबाबातच्या जनतेच्या ज्ञानाआधारे केलेला आहे. या शोधप्रबंधावरून आपणास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या कायद्याची पार्श्वभुमी कळण्यास मदत होते. या संशोधनामध्ये माहितीचा अधिकार चळवळींचा अभ्यास केलेला आहे. आज तेरा वर्षांनंतर संशोधनाचा अभ्यास मला पुढील संशोधनासाठी मार्गदर्शक ठरतो.

### * २.३.३ अहवाल

सुरी मंदाकिनी देवेश्वर आणि अय्यर यामिनी (भारतीय संदर्भ), 'राईट टु इन्फॉर्मेशन – केस स्टडीज् ऑन इम्लिमेंटेशन', वर्ल्ड बँक ग्रुप, http://www.worldbank.org/publicsector/gpa/transparency.

जागतिक बँकेच्या संकेत स्थळावरून घेतलेल्या या ग्रंथाचे संपादन – स्टिफनी इ ट्रापनेल यांनी केले आहे. ६४० पानांचा हा अहवाल आहे. त्यात अल्बानिया, भारत मेक्सिको, मोल्डोवा, पेरू, रोमानिया, युगांडा, युनायटेड किंग्डम, जॉर्डन, साउथ आफ्रिका, थायलंड, युनायटेड स्टेट या देशांमधील माहिती अधिकार चळवळी आणि त्या अनुषंगाने झालेल्या स्थित्यंतरांचा आढावा घेतला आहे. मंदाकिनी देवेश्वर सुरी आणि यामिनी अय्यर माहिती अधिकार कायद्याची निर्मिती झाल्यानंतर निर्मिती करण्यात आलेल्या केंद्रिय माहिती आयोगाची माहिती तसेच त्यावर झालेला खर्च नियुक्तया यांच्या बाबात स्विस्तर वृत्त देण्यात आलेले आहे.माहिती अधिकाराची व्याप्ती, मर्यादा, वापर, नियम यांची तसेच माहिती अधिकार अमलबजावणी करणा-या संस्था, त्याचे आर्थिक बजेट, नोकरदारवर्ग, अभिलेख व्यवस्थापन, पर्यवेक्षण इत्यादी संदर्भात माहिती दिली आहे. ५१ ते ८७ पृष्ठांवर भारतीय परिपेक्षामध्ये माहिती अधिकार कायद्याचा प्रवासासंबंधी वर्णन केलेले आहे. ८० ते ८६ पृष्ठांवर भारतात माहिती अधिकाराद्वारे माहिती देण्यात आलेली माहिती आणि नाकारलेली माहिती यांची माहिती दिली आहे. मनरेगा योजने अंतर्गत रोजगार हमी

कायद्याबाबत माहिती अधिकाराद्वारे साबर एकता मंचने २००५  कामगारांसदर्भात विचारेल्या प्रश्नांची माहिती दिली आहे. पारदर्शिता दिल्ली स्थित सेवाभावी बिगर सरकारी संस्थेने शिक्षण संस्थामध्ये २५ टक्के गरिब विद्यार्थ्यांसाठी राखीव असलेल्या स्थितीचे अवलोकन केले.जोश या संघटनेने माहिती अधिकार कायदा वापरून दिल्ली येथिल महाविद्यालयातील माहिती जाणून घेतली त्याद्वारे गुणाकंन करताना अनियमितपणा उजेडात आणला.

इंडिया टुडे चे पत्रकार शामलाल यादव यांनी १८०० वेळा माहिती अधिकारात अर्ज करून विविध माहिती उघड केली त्यातील गाजलेले प्रकरण म्हणजे त्यावेळच्या ७१ केंद्रीय मंत्र्यांनी ७८६ वेळा केलेल्या परदेश दौ-यासंदर्भात उघडकीला आणलेलली धक्कादायक माहिती. लोकशाहीचा आधार स्तंभ असणा-या पत्रकारीतेला बळ देण्यासाठी माहिती अधिकार कायद्याचे महत्त्व पटवून दिले आहे.

*** २.३.४ ग्रंथ**

**१) शिंत्रे.वि.पु., माहितीचा अधिकार कायदा, राजहंस प्रकाशन, २०१६**

माहितीचा अधिकार कायद्यानुसार - कोणकोणती माहिती मागु शकतो? अर्ज कसा करायाचा? तो कुणाकडे पाठवायचा? शासकिय कर्मचा-याबद्दल गोपनीय अहवाल माहिती च्या अधिकारात मागता येतो का? विद्यापीठाने तपासलेल्या उत्तरपत्रिकांची पुन्हा पाहणी करता येते का? एफ. आय. आर. ची नक्कल मागता येते का? शेतक-यांना कर्जमाफीची नेमकी माहिती कुठे मिळेल? अशा असंख्य प्रश्नांची उत्तरे समजावून सांगणारे हे पुस्तक आहे.

**२) वेलणकर विवेक, ग्राहक राजा, सजग हो!, राजहंस प्रकाशन, २०१६**

वीजमंडळ, रेशनकार्ड, गॅस, बँका, विमानसेवा, टेलिफोन, मोबाईल, हाउसिंग सोसायटी विषयक नियम, विविध शासकीय सेवा, माहितीचा अधिकार, ग्राहक संरक्षण कायदा, केंद्र अन् राज्य सरकारची तक्रार निवारण यंत्रणा, रोजच्या आयुष्यातील अशा कितीतरी बाबींमध्ये आपण

सारेजण ग्राहकाच्याच भुमिकेत वावरतो. गुणवत्तापुर्ण वस्तु अन् सेवा मिळण्याचा अधिकार ग्राहक म्हणून सा-यांनाच असतो. मात्र ब-याचदा आपल्याला आपल्या हक्कांची जाणीव नसते. ती जाणीव करून देणारी दृष्टी ह्या पुस्तकातुन वाचकास मिळते.

**३) कार्मिक जन तक्रार व निवृत्तीवेतन मंत्रालय, भारत सरकार/कार्मिक आणि प्रशिक्षण विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मार्गदर्शिका, माहिती अधिकार, यशदा, पुणे, २०१६**

नागरिकांना माहिती अधिकार कायद्याचा वापर कसा करावा हे समजत नाही, त्याच प्रमाणे कायद्याची अमलबजावणी करणा-या अधिका-यांनाही अनेक अडचणी येतात त्यामुळे नागरिक, सार्वजनिक प्राधिकरणे, प्रथम अपिलीय अधिकारी व केंद्रीय जन माहिती अधिकारी या सर्वांसाठी मार्गदर्शक तत्वे प्रसारित करण्यात आली आहे.

**४) कचरे प्रल्हाद/गायकवाड शेखर, कायदा माहितीचा अन् अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा, यशवंतराव चव्हाण विकास प्रकशासन प्रबोधिनी, पुणे., २०१०**

माहिती अधिकाराची ऐतिहासिक पार्श्वभुमी , माहितीचा अधिकार अधिनियम, महत्त्वाच्या संकल्पना, शासन आदेश, विविध निर्णयांचे व पत्रव्यवहाराचे नमुने अश्या स्वरूपात पुस्तकामध्ये माहिती देण्यात आलेली आहे. सदर पुस्तकातुन संशोधनास उपयुक्त अशी माहिती अधिकाराबाबात माहिती मिळविण्यात आलेली आहे. लेखक स्वत: जिल्हाधिकारी आहेत. त्यांना क्रमबद्ध पद्धतीने माहिती देण्यात आलेली आहे. सुराज्याचे कायदे व्यापक अर्थाने पाहण्याची दृष्टी देणारा सदर ग्रंथ आहे.

**५) पुरी दिपक, माहिती अधिकार, माहिती प्रवाह पब्लिकेशन, पाथर्डी., २०१८**

सहज सोप्या भाषेमध्ये माहिती अधिकार कायद्याबाबातचे गैर समज दुर करणारे पुस्तक आहे. सामान्य माणसांना पडणारे माहिती अधिकार कायद्या विषयीचे प्रश्नांची उत्तरे देण्यात आली आहेत.

**६) भोळे भास्कर, भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळपुरे प्रकाशन, नागपूर., २०११** यांच्या पुस्तकातून करण्यात आलेला आहे. भारतीय लोकशाही व्यवस्थेतील गणराज्याची रचना , वैशिष्ट्ये यांचा अभ्यास केल्या खेरीज संशोधन विषयास प्रारंभ करता येणार नाही. भारतातील दबावगट यांचा अभ्यास करण्यासाठी देखील सदर पुस्तक उपयुक्त आहे.

**७) धर्माधिकारी अविनाश, स्वतंत्र नागरिक, चाणक्य मंडल परिवार प्रकाशन**

भारतीय नागरिक कायदा आणि घटनेच्या चौकटीत राहून हिंसा, द्वेष, तोडफोड न करता, राजकारण आणि प्रशासनाबद्दल दुरावा किंवा द्वेष न करता आपले प्रश्न कसे सोडवू शकतो. राजकीय- प्रशासकिय व्यवस्थेवर अंकुश कसा ठेवू शकतो, हे सांगणार हा ग्रंथ आहे. नागरिक कृती चळवळीचा आराखडा कसा असावा तसेच भ्रष्टाचार निर्मुलनासाठी भारतीय नागरिकांचा मार्ग कोणता हवा याचे यथोचित वर्णन या ग्रंथात केलेले आहे.

**❊ २.३.५ वृत्तपत्रातील लेख**

**१) लढाई अजुनही अपुर्ण.., दैनिक लोकसत्ता,** लोकरंग पुरवणी, दि. ११/१०/२०१५, पृष्ठ क्रमांक १

कायद्याच्या अमलबजावणीतील त्रुटी निकालात काढण्यासाठी केलेले मुक्त चिंतन या लेखातून अण्णांनी केलेले आहे. या लेखातून अण्णा हजारे यांनी भ्रष्टाचार निर्मुलनासाठी केलेले आंदोलनाचा प्रवास राष्ट्रव्यापी कसा झाला. ग्रामीण पातळीवर ग्रामविकास कार्य करणा-या अण्णांना भ्रष्टाचाराच्या अनुभवामुळे व्यथित होवून अंदोलन करावे लागले. असे दिसून येते. युती

सरकारमधील भ्रष्टाचाराच्या प्रकरणामुळे अडचणीत आलेल्यासमाजकल्याण मंत्रीबबनराव घोलप यांच्या विरुद्ध संघर्ष करताना अण्णांना झालेली तीन महिन्यांची शिक्षा आणि त्या काळात अण्णांनी केलेले चिंतन यातून अण्णांना माहिती अधिकार कायद्याची गरज जाणवु लागली होती.

माहिती अधिकार आणि प्रशासकीय गैरव्यवहाराबाबात विविध शासनाच्या पातळीवर जाणवलेल्या उदासीनतेचा अनुभव अण्णांनी या लेखात विषद केलेला आहे. एका विधायक कार्यासाठी प्रेरित होवून ग्रामविकासाप्रति कटीबद्ध असणा–या कार्यकर्त्याला रचनात्मक कार्याला बाजुला ठेवून भ्रष्टाचार निर्मुलनासाठी अंदोलन करावे लागते. सदर आंदोलनाचे देशव्यापी स्वपरूप कसे प्राप्त झाले यांचा आलेख या लेखात देण्यात आलेला आहे.

**२) वेलणकर विवेक, 'माहितीचा अधिकार'धोक्यात, दैनिक लोकसत्ता,** लोकरंग पुरवणी, दि. २८/०७/२०१८, पृष्ठ क्रमांक १

माहिती अधिकार कायद्यासमोरची आव्हानांची चर्चा सदर लेखात करण्यात आलेली आहे. भ्रष्ट राजकिय व्यवस्था माहिती अधिकार कायदा निष्प्रभ होण्यासाठी कसा खटाटोप करते आहे. याचा उहापोह या लेखात करण्यात आलेला आहे.

**३) वेलणकर विवेक, 'माहितीचा अधिकार कायदा शस्त्र नव्हे, साधन!, दैनिक लोकसत्ता,** लोकरंग पुरवणी, दि. ११/१०/२०१५, पृष्ठ क्रमांक १

कायद्याची परिणामकारक अमलबजावणी आणि उपयोग यांचा लेखा जोखा आणि पुढील वाटचालीची उद्दीष्टे कथन करणारा लेख असे या लेखाचे स्वरूप आहे.

**४) 'माहितीचा अधिकार कायद्यातील बदलाला अण्णा हजारे यांचा विरोध, दैनिक लोकसत्ता,** दि. २१/०४/२०१७, मुखपृष्ठ १

जनलोकपाल अंदोलन उभारण्याचा अण्णा हजारे यांनी इशारा दिला होता. त्या संदर्भाची ही बातमी आहे. त्याला सरकारने व्हिसलब्लोअर विधेयक संसदेत मांडण्यात करण्यात येणा-या विलंबाची पार्श्वभुमी आहे.

**५) शहरबात : माहिती अधिकाराचा बागुलबुवा, दैनिक लोकसत्ता,** पुरवणी- मुंबई, दि. ३०/०१/२०१८, पृष्ठ क्रमांक- १

माहिती अधिकाराचा उपयोग करण्याचे तारतम्य न दाखवणा-या नागरिकांमुळे सरकारी यंत्रणेवरचा अनाठायी येणारा ताण या लेखात व्यक्त कण्यात आला आहे. सदर माहीती सार्वजनिक जीवनातील व्यक्तीच्या वैयक्तीक आयुष्याशी निगडीत असते. माहिती अधिकार वापराचे तारतम्य नसल्याने निर्माण होणारा घोळ मुबंई महापालीकेतील त्या संदर्भात येणा-या अडचणींचा पाढा या लेखात वाचण्यात आला आहे.

**६) आसावा श्याम, कायदा केला जातोय बोथट, दैनिक महाराष्ट्र टाईम्स,** संपादकिय, दि. १०/१०/२०१५

श्याम आसावा यांनी माहिती अधिकाराला दहा वर्षे पुर्ण होत असताना लिहलेला हा लेख आहे. माहिती अधिकार कायद्या पुढील आव्हानं, कायद्याची धार कमी करण्यासाठी करण्यात येणा-या प्रशासकीय पद्धतीवर सदर लेख लक्ष वेधतो.

**७) झगडे महेश, माहिती अधिकार आता अधिक पारदर्शी, दैनिक लोकसत्ता,** संपादकिय, दि. १५/१२/२०१८

पुणे महानगरपालीकेचे आयुक्त असताना महेश झगडे यांनी राबवलेल्या लोकाभिमुख योजनांची माहिती या लेखात दिलेली आहे. माहिती अधिकाराचा लोकाभिमुख पद्धतीने वापर केला

तर त्याची परिणामकारकता आणि पारदर्शीता यांचा संगम कसा साधता येतो हे या लेखात दर्शविले आहे.

**८) शिरोडकर संजय, माहिती अधिकार व चळवळीची तेरा वर्षे, दैनिक स्वतंत्र नागरिक,** संपादकीय विशेष लेख, दि. २०/१०/२०१८

माहिती अधिकार कायद्याची देशातील सध्यस्थिती चे समर्पक शब्दात वर्णन करून माहिती अधिकारापुढील आव्हानं, माहिती अधिकाराची धार बोथट का होत आहे. ह्या प्रश्नांची चर्चा केलेली आहे.

**संदर्भ साहित्याचा आढावा–** वरील प्रमाणे संदर्भसाहित्याचा आढावा घेतला. पूर्वाभ्यासात माहितीचा अधिकार कायदा, लोकशाहीतील त्याचे स्थान, मुलभुत हक्कांशी संबंध तपासले गेले. वृत्तपत्रिय साधनांद्वारे माहिती घेवून माहिती अधिकाराचा प्रवास जाणून घेतला. वृत्तपत्रिय संदर्भामधूनच माहिती अधिकार कायद्याची सद्यस्थितीचा आढावा घेण्यास मदत झाली. विविध कार्यकर्त्यांच्या मुलाखती घेण्यासाठी त्यांचे ज्ञान प्राप्त करण्यासाठी सदर माहितीचा आढावा घेणे आवश्यक होते.

विविध माहिती अधिकार कार्यकर्त्यांशी चर्चा करून माहिती अधिकाराचे विविध पैलु जाणून घेतले. संस्थात्मक पातळीवरील कार्य जाणुन घेण्यासाठी विविध माहिती अधिकार कार्यालये विविध संस्था यांना भेटी दिल्या. त्यातून बहुमुल्य माहिती मिळत गेली. सजग नागरिक मंच, माहिती अधिकार कट्टा, यशदा, चाणक्य मंडल, परिवर्तन अकादमी, यांचा त्यात समावेश आहे. संजय शिरोडकर, जुगल राठी, विवेक वेलणकर, अभिजित राठोड,विजय कुंभार, मानव कांबळे यांच्या मुलाखती घेतल्या गेल्या आहे. त्यांच्या कार्याचा आढावा देखील सदर संशोधनात संक्षिप्त स्वरूपात घेतला आहे. माहिती अधिकाराची महाराष्ट्रातील चळवळ आणि सजग नागरिक मंचच्या अध्ययनासाठी मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेतील उपलब्ध साधनाचा उपयोग केला गेला आहे. प्राथमिक माहिती मिळवली आहे. इंटरनेटचा वापरही केला आहे. सजग नागरिक मंचच्या कार्याचा

आढावा घेण्यासाठी सजग नागरिक मंचच्या वर्षभरातील सर्व बातम्यांचा संकलन केले गेले आहे. या संकलनातुन सजग नागरिक मंचाचे कार्य कसे चालते या प्रश्नांची उत्तरे मिळाली आहेत.

प्रगल्भता आणि  अभ्यास या दोन गोष्टींच्या जोरावर सजग नागरिक मंच या संस्थेने अनेक वेगवेगळ्या समस्या सोडविल्या आहेत त्यात त्यांचे यश सामावले आहे. केवळ एका वर्षांच्या कार्यकालाचा अभ्यास केल्यास असे दिसते की सजग महापालीका स्तरावर कार्यरत असेल पण राज्यघटनेच्या तत्वांशी प्रामाणीक बांधिलकी ठेवून अनेक प्रश्न संस्थेने मार्गी लावले आहेत. त्यांचा अभ्यास करण्यास सरदचे संदर्भ महत्त्वाचे ठरतात. माहिती अधिकार चळवळ ही महाराष्ट्रात खोलवर रूजलेली आहे. अनेक कार्यकर्ते त्यात भरीव कार्य करताना दिसतात. त्यांचे कार्य परस्परांना प्रेरणादायी ठरते आहे. माझ्या चिकित्सेचा तोही एक भाग सदर संशोधनात होता.

**सारांश –** नागरीक मंचाच्या कार्याचा समाजशास्त्र दृष्टीकोनातून अभ्यास केला आहे म्हणून माझा विषय अत्यंत वेगळा आणि नाविण्यपूर्ण आहे. त्याच बरोबर वरील विविध अभ्यासातून असे लक्षात येते की, माहिती अधिकार कायदा, त्याची अंमलबजावणी, माहिती अधिकाराचे यश-अपयश, भ्रष्टाचार निर्मूलनातील जबाबदारी इ. सारख्या विविध विषयावर लिखाण व अभ्यास झालेले आहेत. तथापी एखाद्या सामाजिक संघटनेने या कायद्याच्या वाढ-विकास, प्रचार व अंमलबजावणी विषयक केलेल्या कामाचा लेखाजोखा मांडलेला नाही.

प्रस्तुत ''महाराष्ट्रातील माहिती अधिकार चळवळ आणि सजग नागरिक मंच : एक चिकित्सक अभ्यास'' या अभ्यासातून संशोधन विषयाच्या अभ्यासाची व्याप्ती आणि विस्तार मोठा आहे. तसेच महाराष्ट्रतील माहिती अधिकार चळवळीचे दोन टप्पे अभ्यासाच्या दृष्टीने पाडावे लागतात. पहिला टप्पा- त्यात ऐतिहासीक संदर्भासह माहिती अधिकार कायद्याची चळवळ अभ्यासली आहे. दुसरा टप्पा माहिती अधिकार कायद्याची निर्मिती झाल्यानंतर म्हणजे २००५ नतंरचा कालखंड अभ्यासला आहे. पहिल्या टप्प्यात माहिती अधिकाराचा प्रवास त्याची

लोकशाहीतील उपयुक्तता यांचे विवेचन प्रस्तावनेत केल्या प्रमाणे आहे. माहिती अधिकार चळवळ ही समकालीन चळवळ आहे. गेल्या तेरा वर्षांचा इतिहास लाभलेला आहे.

चळवळ ते अधिनियम, आणि अधिनियम ते अमलबजावणी असा ऐतिहासीक प्रवास माहिती अधिकार चळवळ आणि माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी केलेला आहे. महाराष्ट्राची माहिती अधिकार चळवळ म्हणजे आपले हक्क मिळविण्यासाठी संघर्ष करणा-या नागरिकांची चळवळ आहे. त्यात एकजिनसीपणा नाही. प्रत्येक गावागावांमध्ये माहिती अधिकार कार्यकर्ते तयार होत आहेत. आपल्या समस्या वैयक्तीक पातळीवर आणि सार्वजनिक पातळीवर संघर्ष करून सोडविण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.

भ्रष्टाचार, मनमानी कराभार, अरेरावी, अनागोंदी यांचा अनुभव सामान्य नागरिकाला आल्या खेरीज नागरिकांना माहिती अधिकार नागरिकांना मिळालेला नाही. या अव्यवस्थेशी दोन हात करणारी माणसं अनेक गावागावात, अनेक जिल्ह्यात दिसतात. अमलबजावणीसाठी होणारा संघर्ष सुक्ष्मस्तरावर होत आहे. आपली लोकशाही लोककल्याणकारी राज्याच्या संकल्पनेतून मायबाप सरकार इथंवर येवून पोहचली होती. माहिती अधिकाराने त्या लोकशाहीस सुदृढ करण्याचे कार्य केले आहे. नागरिकांना आपल्या हक्काची जाणीव करून दिलेली आहे.

* * *

# प्रकरण तिसरे – संशोधन पद्धती

अनुक्रमणिका


प्रस्तावना

३.१ प्रस्तावना

३.२ संशोधनाचा विषय

३.३ संशोधनाची आवश्यकता

३.४ संशोधन समस्या

३.५ संशोधनाच्या पायऱ्या

३.६ संशोधन आराखडा

३.७ संशोधनाची उद्दीष्ट्ये

३.८ गृहितके

३.९ संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा

  ३.९.१ संशोधनाची व्याप्ती

३.१० विधान कार्यात्मक व्याख्या व स्पष्टीकरण

३.११ संशोधन पध्दती

३.१२ माहिती संकलनाची साधने व तंत्रे

३.१३ नमूना निवड

३.१४ तथ्यांचे विश्लेषण

३.१५ सारांश

३.१६ अध्ययनाच्या मर्यादा

## प्रकरण दोन

### * ३.१ प्रस्तावना :–

जग झपाट्याने बदलत आहे. भारताची लोकशाही जर बळकट राहिली तरच बदलत्या आधुनिक युगात प्रागतिक शासन व्यवस्था राबवणे भारतीय नागरिकांना शक्य होणार आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात सत्ताधारी, नोकरशहा आणि राजकीय नेतृत्वाने 'माहितीचा अधिकार'कायदा अस्तित्वात येवून नये यासाठी केलेला खटाटोप आणि त्याला भारतीय नागरिकांनी दिलेला लढा हा अनुभव भारतीय नागरिंकाच्या गाठीला आहे. त्यास भर म्हणून 'माहितीचा अधिकार'कायदा अस्तित्वात आल्या नंतर त्याची प्रत्यक्षातील धार कमी करण्याचा प्रयत्नही झाला होता. वास्तविक सरकारी खात्यांनी माहिती अधिकार कायद्यातील अर्जाना उत्तर देताना माहिती वेळेवर, पारदर्शकपणे व अडचणीविना द्यावी. असे अपेक्षित आहे.

या कायद्यामुळे शासन स्तरावरील टू जी स्पेक्ट्रम, कोळसा खाण वाटप, कॉमनवेल्थ, आदर्श, सिंचन असे कितीतरी मोठे गैरव्यवहार उघडीस आले. असे असुन स्थानिक स्वराज्य संस्थाच्या स्तरावर देखील होणारा भ्रष्टाचार हा नजरेआड करता येणार नाही. कारण एखाद्या ग्रामपंचायतीमध्ये होणारा पन्नास हजारांचा भ्रष्टाचार आणि राज्यस्तरावर यापुर्वी झालेले भ्रष्टाचार पाच कोटींचा भ्रष्टाचार हे दोन्हीही नागरिकांनी तितक्याच गांभिर्याने घ्यायला हवेत. आपण कररूपाने सरकारी तिजोरीत जमा केलेल्या पैशाचा विनियोग सरकारी किंवा स्थानिक यंत्रणा कशा पद्धतीने करते, हे जाणून घेण्याचा अधिकार जनतेला घटनेनेच दिलेला आहे. स्थानिक यंत्रणा जनतेचा पैसा खर्च करताना प्रश्नच उपस्थित होणार असे गृहीत धरता कामा नये यासाठी नागरिकांनी दक्ष राहणे गरजेचे आहे. भविष्याचा वेध घेतल्यास विकासात्मक आणि लोकाभिमुख प्रशासनासाठी नागरिकांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. अन्यथा पारदर्शकता व शासकीयअधिकाऱ्यांचे जनतेप्रति उत्तरदायित्व ही कायद्याची मूळ उद्दिष्टे जनतेलासमजणारच नाहीत आणि त्याचा फारसा वापरही होणार नाही. त्यासाठी सजग नागरिक मंच सारख्या संस्था कार्यरत आहेत. सजग नागरिक मंचने प्रशासनातील पारर्दशकता, प्रशासनातील लोकाभिमुखता, राखण्यासाठी प्रेरक कार्य केले आहे. पायाभूत सुविधांचा दर्जा, नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील समस्या, ग्राहक चळवळीच्या माध्यमातून माहिती अधिकार कायद्याचा वापर करून सोडविण्याचा

प्रयत्न केला आहे. पुणे शहरात हा प्रयत्न यशस्वी होताना पाहावयास मिळतो. त्यानिमित्ताने महाराष्ट्रातील माहिती अधिकार चळवळीचा अभ्यास होणे गरजेचे होते. महाराष्ट्रातील माहिती अधिकार चळवळीमध्ये ग्रामीण शहरी भेद आहेत. ग्रामीण पातळीवर माहिती अधिकाराच्या कायद्याविषयी नागरिकांमध्ये सजगता कमी प्रमाणात आहेत. शहरी पातळीवर पुणे आणि मुंबई वगळता माहिती अधिकार चळवळीचे देश किंवा राज्य पातळीवर भरीव कार्य आहे का याची पडताळणी होणे गरजेचे आहे. महाराष्ट्रातील माहिती अधिकार चळवळ नागरीकांच्या प्रश्नाशी येवून भिडलेली आहे.

स्वराज्य संघर्ष समिती, माहिती अधिकार मंच, वयम् चळवळ, नागरिक चेतना मंच, मनीलाईफ फाउंडेशन, सजग नागरिक मंच या सारख्या संस्थानी चालवलेला लढा हा या संशोधनाचा उद्देश आहे.

**✻ ३.२ संशोधनाचा विषय :-**

**संशोधन विषयाचे नाव-**

**महाराष्ट्रातील माहिती अधिकार चळवळ - सजग नागरिक मंच- एक चिकित्सक अभ्यास** या अभ्यास विषयावर संशोधन करण्यात आले आहे.

**✻ ३.३ संशोधनाची आवश्यकता :-**

माहिती अधिकारावर आणि त्या अनुषंगाने सजग नागरिक मंच संशोधनाची गरज -माहिती अधिकार कायदा आणि त्यासंदर्भातील लोक जागृती त्या संबंधीच्या काही समस्या शोध कर्त्यांना दिसून आल्या आहेत त्यामुळे ह्या कायद्या विषयी संशोधनाची आवश्यकता आहे. असे संशोधन कर्त्यास वाटते. सजग नागरिक मंचने सामाजिक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी माहिती अधिकाराचा केलेला वापर संशोधनाचा विषय आहे.

१) २००५ मध्ये माहिती अधिकार कायदा संपुर्ण देशात लागू करण्यात आला अपवाद जम्मु-काश्मिर. परंतु सर्वसामान्य नागरिक व अधिकारी यांना कायद्याबद्दल तपशीलवार माहिती कमी प्रमाणात आहे. त्यामुळे माहिती अधिकार कायद्याचा वापर म्हणावा तसा होताना दिसत नाही.

२) माहिती अधिकार कायदा सर्व सामान्यापर्यंत पोहचला आहे का ? सर्व सामान्य नागरिकांना तो नीट समजला आहे का ? समस्या जाणून घेण्यासाठी व शोधण्यासाठी माहितीच्या अधिकारावर संशोधन करणे गरजेचे आहे. असे संशोधन कर्त्यास वाटते.

३) सर्व सामान्य जनतेला माहितीच्या अधिकारासंदर्भात योग्य मार्गदर्शन झाले पाहिजे माहितीच्या अधिकाराबाबात जनजागृती व प्रशिक्षणे व कार्यशाळा होणे गरजेचे आहे. त्यासाठी माहिती अधिकाराचा प्रसार झाला पाहिजे तरच ख-या अर्थाने माहिती अधिकाराचा चांगला उपयोग नागरिकांना करून घेता येईल. म्हणुन माहिती अधिकारावर संशोधन करणे गरजेचे आहे.

४) माहिती अधिकाराचा कायदा अमलात येवून तेरा वर्षांचा कालावधी लोटला. परंतू त्याचा पाहिजे तसा प्रचार व प्रसार झालेला नाही त्यामुळे त्या अधिकारावर लोकजागृती किती प्रमाणात झाली आहे. त्यामागील सजग नागरिक मंचाचे योगदान तपासणे गरजेचे आहे. माहिती अधिकार संशोधन करणे गरजेचे आहे. माहिती अधिकार कायद्यासदर्भात प्रसार प्रचार करण्यासाठी सामाजिक संघटना संस्था व सामाजिक कार्यकर्ते यांनी पुढाकार घेतला आहे का? हे जाणून घेण्यासाठी माहिती अधिकारावर संशोधन करणे गरजे आहे.

५) जनतेच्या मनामध्ये माहितीच्या अधिकाराबाबत असणारी माहिती व आत्मविश्वास कमी आहे. तो वाढविण्याचा व ह्या अधिकाराबाबात जनतेला माहिती व्हावी यासाठी सदर विषयावर संशोधन होणे आवश्यक वाटते. जनतेच्या मनामध्ये माहिती अधिकाराच्या वापराबद्दल आत्मविश्वास कमी आहे,तो वाढविण्याचा सामाजिक स्तरावर प्रयत्न झाला आहे का? तो आत्मविश्वास वृद्धींगत करण्याचे कार्य करणा-या अश्या संस्था कोणत्या? त्यांची कार्यपद्धती काय ? याचाही अभ्यास होणे गरजेचे आहे.

६) या विषयांवरील संशोधनामुळे माहिती अधिकाराच्या वापराबाबतचे महत्त्व नागरिकांना समजेल तसेच संघटीत प्रयत्नाचे फलस्वरूप माहिती अधिकाराची यशस्विता ही निदर्शनास येईल. व या कायद्याची अमलबजावणी योग्य प्रकारे करण्यास नागरिक सुरूवात करू शकतील असा विश्वास वाटतो.

७)  माहितीच्या अधिकाराचा कायदा सामान्य माणसांच्या दृष्टीकोनातून अत्यंत क्रांतीकारी स्वरूपाचा वाटतो या कायद्यामुळे प्रशासनात खुप मोठी पारदर्शकता येणार आहे. तथापि हा कायदासामान्य माणसा पर्यंत पोहचावा हा मुख्य हेतू या संशोधना मागे आहे.

८)  माहिती अधिकार कायदा हा सर्व शासकिय कार्यालय व इतर सर्व सहकारी संस्था, शिक्षण संस्था, ग्रंथालय , निमशासकिय कार्यालयात वापरला जातो. या कायद्यामागील उद्देश खूप चांगला आहे. ही जाणीव सर्वत्र व्हावी म्हणून माहिती अधिकार कायदा संशोधन होणे गरजेचे आहे. असे वाटते.

९)  सनदी अधिकारी व कर्मचारी हे जनतेचे सेवक असतात. तरी सुद्धा नागरिकांना आपल्या कामकाजा संबंधी कार्यालयीन स्थितीची माहिती मिळविण्यासाठी कितीतरी अडचणींना सामोरे जावे लागते त्यामुळे माहिती अधिकार कायद्याच्या तरतुदींच्या आधारे अन्यायग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी सर्वच लोकांना आपल्या हक्कासाठी झगडण्याचे नैतिक धैर्य वाढविण्यास या अधिकाराची निश्चित मदत होईल असे जनतेस पटवून देणे

*** ३.४ संशोधन समस्या व संशोधनातील समस्या सुत्रण :-**

संशोधन विषयाचा संशोधन विषयाची निवड करताना संशोधन कर्त्याची जिज्ञासा, आवड कोणत्या क्षेत्रात आहे. हि बाब संशोधन करताना अतिशय महत्त्वाची ठरते. आपल्या आजुबाजूला विविध प्रकारच्या समस्या असतात. उदा. राजकिय सामाजिक आर्थिक शैक्षणिक, आरोग्य विषयक सार्वजनिक सोयीसुविधांविषयी इत्यादी विषयांच्या समस्या असतात. त्या समस्यांचे निराकरण करण्याच्या हेतून  संशोधन अध्ययन करण्याची आवश्यकता असते. सामाजिक नियंत्रण, नियोजन, आणि इतर अनेक व्यावहारिक गरजेच्या दृष्टीने संशोधन करणे गरजेचे असते. म्हणूनच एखाद्या क्षेत्रातील एखादी समस्या संशोधन कर्त्याला संशोधनाच्या दृष्टीने महत्त्वाची वाटते. त्या दृष्टीने संशोधन कर्त्याला संशोधनाच्या सर्व सामान्य  विषयांची किंवा समस्येची निवड संशोधकास करावी लागते. संशोधनाचा विषय निश्चित केल्याने संशोधनाची दिशा निश्चित होते.

संशोधन कर्त्यास भविष्यात संशोधन कार्यात कोणत्याअडचणी येतील, तथ्य संकलनाच्या कार्यात कोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागेल, त्यांचे निवारण कसे करता येईल इत्यादी गोष्टींचा

पूर्ण विचार करूनच संशोधन आराखडा तयार करावा लागतो. त्यामुळे संशोधनकार्य यशस्वी होण्याची शक्यता अधिक असते तसेच संशोधनाचे निष्कर्ष अचूकपणे काढण्यास मदत होते. पण त्यापुर्वीची पायरी म्हणजे संशोधनातील समस्या सुत्रण होय.

**※ ३.५ संशोधनाच्या पायऱ्या :-**

कोणतेही संशोधन करतांना त्या समस्यांचे विश्लेषण करणे गरजेचे असल्यामुळे या संशोधनात माहीतीचा अधिकार कायद्याची निर्मिती झाल्या पासून महाराष्ट्रातील जनतेला अगदी अल्पप्रमाणात या कायद्याची माहीती असल्यामुळे या संशोधन विषयाची निवड करण्यात आलेली आहे. **'महाराष्ट्रातील माहीती अधिकार चळवळ आणि सजग नागरिक मंचः एक चिकित्सक अभ्यास'** अशी संशोधन समस्या घेवून काम करण्याचा विचार केला आहे.

आणि त्याच बरोबर संपर्ण महाराष्ट्रात या माहिती अधिकाराच्या कायद्याविषयी आणि अमलबजावणीबाबत सजग नागरिक मंचाची कामगिरी ही खूप उल्लेखनीय आहे ती त्याची कामगिरी समाजापर्यंत पोहचावी या उद्देशाने या संशोधनाचे काम हाती घेतले आहे.

यामध्ये प्रकरणाची योजना खालीलप्रमाणे केलेली आहे.

१) प्रस्तावणा
२) संदर्भ साहित्याचा आढावा
३) संशोधन पद्धती
४) माहीती अधिकार कायद्याच्या प्रसार प्रचारासाठी सजग नागरिक मंचच्या कार्याचा अभ्यास
५) सारांश, निष्कर्ष आणि उपाययोजना

अशी संशोधनाचे नियोजन करून काम सुरू केलेले आहे.

**※ ३.६ संशोधन आराखडा :-**

संशोधन हे शास्त्रीय पद्धतीने झाले तरच त्या संशोधनातील निष्कर्ष हे शास्त्रिय राहतील. संशोधनाचे निश्चित उद्दीष्टांची प्राप्ती करण्यासाठी योजनाबद्ध रूपात संशोधन कार्य करणे आवश्यक असते. याचाच अर्थ संशोधन कश्या पद्धतीने केले जाते. यासाठी संशोधन आराखडा तयार केला

जातो. संशोधन आराखडा तयार करणे ही संशोधनाची तिसरी पायरी होय. प्रत्येक प्रकारच्या संशोधनासाठी संशोधन आराखड्याचे विषेश महत्त्व आहे. संशोधन आराखड्याशिवाय वस्तुनिष्ठ संशोधन करणे अश्यक्य आहे. संशोधन कसे करावे. संशोधनासाठी नमुना कोणता असेल. तथ्य कसे संकलित केले जातील. संशोधन करताना कोणत्या समस्या येतील. निराकरण कसे करायाचे. हा विचार संशोधन करणा-यास करावा लागतो.

संशोधन आराखड्याची उपयुक्तता स्पष्ट करताना अल्फ्रेड काना यांनी असे स्पष्ट केले आहे की, संशोधनाच्या प्रारंभिक स्थिती मध्ये संशोधनाच्या आराखड्याचे निर्मिती संशोधन प्रस्तावित अध्ययनाच्या उपयुक्तता स्पष्ट करते.

*** ३.७ संशोधनाची उद्दीष्ट्ये :-**

१. माहीती अधिकार आणि लोकशाही मुल्या यांच्यातील आंतरसंबंधाचा अभ्यास करणे.

२. माहीती अधिकार कायद्याची निर्मितीपासून त्या कायद्याची अंमलबजावणी महाराष्ट्रातील विविध संघटना व संस्था यांच्या माध्यमातून या विविध संघटनांचा कार्याचा आढावा घेणे.

३. माहीती अधिकार कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये शासनाच्या प्रशासनात असलेली उदासिनता आणि प्रतिकुलतेच्या कारणांचा शोध घेणे.

४. माहीती अधिकार कायद्याच्या अेमलबजावणी व कार्यामध्ये महाराष्ट्रातील विविध संघटनेच्या तुलनेत या पुण्यातील सजग नागरीक मंचाचे असलेले वेगळेपण जाणून घेणे.

५. महाराष्ट्रातील माहीतीचा अधिकार या कायद्यावर काम करणाऱ्या संघटनांच्या तुलनेत पुण्यातील सजग नागरीक मंचाच्या कार्याची ओळख सखोल समाजाला करून देणे.

संशोधन अध्ययनाचे महत्त्व संशोधन हे ज्ञान वृद्धी जुन्या ज्ञानाचे परिक्षण करणे या उद्दीष्टाने केले जाते. त्यामुळे संशोधन करताना सामाजिक घटना व सामाजिक व्यवस्था इत्यादी संबंधिचे आपले ज्ञान विकसित होते या सर्व ज्ञानाचा फायदा पुढील समाजाकरता होत असतो. म्हणून संशोधनाचे विशेष महत्त्व आणि उपयोगीता आहे. संशोधन कार्य हे केवळ स्वत: साठी म्हणजे संशोधन कर्त्यासाठी महत्त्वाचे नसून सामाजिक कल्याणासाठी, सामाजिक प्रगतीसाठी, सामाजिक नियोजनासाठी, देखिल महत्त्वपुर्ण ठरते. या दृष्टीने संशोधन कर्त्याने माहिती अधिकार कायद्यावर

संशोधन करताना या अध्ययन विषयाचे महत्त्व व आवश्यकता लक्षात घेतली आहे. हे पुढील प्रमाणे सांगता येईल.

१) माहिती अधिकार कायद्याबद्दल सर्वसामान्य नागरिकांना माहिती कमी प्रमाणात माहित आहे या संशोधनाद्वारे सामाजातील नागरिकांना या कायद्याविषयी तपशीलवार माहिती देण्यात आली आहे. या कायद्याच्या वापरामुळे सजग नागरिक मंचने कश्या प्रकारे समस्या निराकरण केल्या. हे देखिल तपासले आहे पुढील चळवळींसाठी ते मार्गदर्शक ठरेल.

२) सर्व सामान्य जनतेला माहितीच्या अधिकारा संबंधात जेथे योग्य मार्गदर्शन केले जाते, केवळ प्रशिक्षणे आयोजित करून पुस्तकी ज्ञानाएवजी जेथे कायद्याचा प्रत्यक्ष वापर कसा करावा हे समजावले जाते त्या सजग नागरिक मंचाचा अभ्यास केलेला आहे. अश्या स्वरूपाची लोक जागृती होणे गरजेचे आहे.

३) या संशोधनाच्या आधारे माहिती अधिकार कायद्याचा थोडाफार प्रसार व प्रचार होण्यास मदत होईल

या संशोधनाच्या माहिती अधिकार कायद्याचा वापर कसा करायाचा या बाबत माहिती देण्यात आली आहे.

४) सजग नागरिक मंच च्या माहिती अधिकार कायद्यावरील संशोधनामुळे या कायद्याचे महत्त्व नागरिकांना कसे समजले असेल. त्यामुळे या अधिकाराच्या वापराविषयी प्रत्यक्ष ज्ञान मिळेल, गैर समज दूर होतील. माहिती अधिकार कायद्याची अमलबजावणी योग्यप्रकारे नागरिक सुरूवात करू शकतील असा विश्वास वाटतो.

५) लोकशाही बळकट करण्यासाठी माहिती अधिकाराच्या चळवळीचे दबावगटाचे समाजाच्या संघटीत प्रयत्नाचे महत्त्व किती आहे. हे पटवून देणे हा उद्देश साध्य करण्यात आला आहे. सजग नागरिक मंचाने माहिती अधिकार कायदाच्या वापरासंबंधी केलेली लोक जागृती विवध प्रश्नांची केलेली सोडवणूक, इतर संस्थांना कशी बोधप्रद आहे. नागरिकांनी अश्या पद्धतीने एकत्र येवून आपले नागरिकत्वाचे कर्तव्य बजावणे गरजेचे आहे. मतदान करणे हा अधिकार आहे. त्यासोबत शासन निर्णयाची माहिती करून घेणे आणि त्या राबविण्यातील त्रुटी दुर करणे हे देखिल नागरिकांचे

नागरि कर्तव्य आहे. वरिल सहा मुद्दे विचारात घेतल्यास महाराष्ट्रातील माहिती अधिकार चळवळीचे योगदान अर्थात सजग नागरिक मंचाने केलेले विपुल कार्य संशोधित करण्यात आले आहे.

**❋ ३.८ गृहितके :-**

१. महाराष्ट्र माहीतीचा अधिकार कायद्याची अंमलबजावणी करण्यात सजग नागरीक मंच अग्रेसर आहे.

२. पुणे शहरातील आणि महाराष्ट्राच्या समस्यावर उपाय योजना आणि न्याय मिळवून देण्यात सजग नागरीक मंचाचा कार्यभार हा खुप व्यापक स्वरूपाचा आहे.

३. लोकशाहीची मजबूती वाढविण्यासाठी माहीती अधिकार खुप उपयोगी आहे.

४. माहीती अधिकार कायद्याच्या निर्मितीपासून त्याची अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्रातील अनेक संस्था आणि संघटना कार्यरत आहेत.

५. या माहीती अधिकार कायद्याची कार्य या सजग मंचाने किती योग्य पद्धतीने केलेले आहे त्या त्या कार्याला अन्वायार्थ लावणे.

**❋ ३.९ अध्ययनाची व्याप्ती कार्यक्षेत्र आणि मर्यादा :-**

महाराष्ट्रातील माहिती अधिकार चळवळ सजग नागरिक मंच एक चिकित्सक अभ्यास हा विषय निवडताना अभ्यासाची अध्ययन व्याप्ती स्पष्ट करणे गरजेचे आहे. सदर अभ्यासाच्या दृष्टीने अध्ययन व्याप्ती वैश्विव स्वरूपाची आहे, पण त्या वैश्विव व्याप्तीला भारतीय आणि त्यातून पुन्हा महाराष्ट्र आणि महाराष्ट्रतील माहिती अधिकार चळवळ म्हणून कार्य करणारी एक संस्था या नात्याने सजग नागरिक मंचाचा अभ्यास होणे आवश्यक आहे. त्यामुळे माहितीचा अधिकार कायदा महाराष्ट्रात प्रत्यक्ष राबवण्यासाठी जनतेद्वारे जे प्रयत्न केले जाणे गरजेचे होते. ते सजग नागरिक मंचाने केले आहे. एखाद्या कायद्याची मागणी करणे यासाठी चळवळ उभी राहत असते. पण एखाद्या कायद्याच्या अमलबजावणीसाठी अशी चळवळ चालते. तिचे मुलगामी परिणाम समाज जीवनावर होताता. राजकिय व्यवस्थेवर होतात. किंबहूना राजकिय परिस्थितीवर एक अंकुश ठेवणारा दबाबगट म्हणून सजग कडे पाहिले जाते.

गेल्या दशकात जागतिककरण तसेच तंत्रज्ञान विकासामुळे जग जवळ आले. माहितीचा प्रस्फोट झाला. माहिती अदानप्रदानाचा वेग वाढला. पण शासकिय व्यवस्थेचा पोलादी पडदा जसाचा तसा राहिला . शासकिय कामकाज लोकांसाठी चालले आहे. त्यामुळे त्यास लोकाभिमुख पणा असावा. एका समस्येतून सजग नागरिक मंचचा जन्म झाला. अनेक प्रश्नांची उकल करणे, शासन दरबारी स्वत:चा नागरिक म्हणून अधिकार सिद्ध करणारी यंत्रणा म्हणजे हा दबावगट आहे. दबावगट म्हणून असलेली सकारात्मकता हे संस्थेचे वेगळेपण आहे. दबाव गट म्हणून केवळ टिका न करता समस्येची सोडवणूक करण्यासाठी उपाय योजना सुचवणे हे देखील वैशिष्ट्यपुर्ण आहे. शासनाविषयी, राजकिय व्यवस्थेविषयी कोणताही पुर्वग्रह न ठेवणारी संस्थेचा अभ्यासाचा विषय आहे. त्या अनुषंगाने सजग नागरिक मंचाने केलेले कार्य अभ्यासणे ही अध्ययन विषयाची व्याप्ती आहे.

*** ३.९.१ संशोधनाची व्याप्ती :-**

माहिती अधिकार चळवळ ही नागरिकांची चळवळ आहे. जगातील सगळ्याच मोठ्या लोकशाहीमध्ये नागरिकांच्यामध्ये शासन व्यवहाराप्रती जागृती निर्माण व्हावी. शासन प्रशासनात निर्णय होत असताना त्यात चांगले काय ? वाईट काय ? त्यावर नियंत्रण कसे ठेवता येईल ? या विषयीचे ज्ञान नागरिकांना असणे आवश्यक असते. असे ज्ञान होण्यासाठी शासन प्रशासनातील माहिती जनते साठी खुली असावी. ती नसल्यास जनता त्याविषयी मत व्यक्त करू शकणार नाही. समाज हिताच्या कार्यात समाजासाठीच माहितीची गोपनीयता राखली जाणे भुषणावह नाही. शासन प्रशासनातील माहिती उघड व्हावी या करता माहिती अधिकार कायदा २००५ अस्तित्वात आला. या कायद्यान्वये प्रजासत्ताकाचे तत्व पाळण्यात आले. जनतेला शासकिय कामकाजाची माहिती प्राप्त करून घेण्याचा मार्ग मोकळा झाला. एकंदरीत भारतीय लोकशाहीच्या जडण घडणीत माहिती अधिकारा कायद्याची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

सामान्यासाठी माहितीचा स्त्रोत असलेल्या प्रसारमाध्यमांसाठी त्यांच्या शोध पत्रकारितेसाठी माहिती अधिकार महत्त्वपुर्ण आहे. माहिती अधिकाराचे भारतीय लोकशाहीवर मुलभुत परिणाम होत आहे. लोकशाहीत जागतिक स्तरावर तसेच भारतात आणि महाराष्ट्रातील गावागावात त्याचे परिणाम

व पडसाद दिसू शकतील. माहिती अधिकाराच्या या चळवळीला पाठबळ देणा-या प्रक्रियेचा समावेश या अध्ययनात होतो. एकंदरीत स्वरूप, ऐतिहासीक पार्श्वभूमी, माहिती अधिकार कायदा अस्तित्वात येतो. कायद्याचा महाराष्ट्राती प्रवास, माहिती अधिकार कायदा अस्तित्वात येण्यासाठी, प्रसारासाठी योगदान देणारे कार्यकर्ते, महाराष्ट्रातील चळवळ आणि अमलबजावणी द्वारे जनतेच्या प्रश्नाची केलेली सोडवणूक, सजग नागरिक मंचाच्या कार्याचा आढावा सदर अध्ययनातून घेण्यात येणार आहे.

*** ३.१० विधान कार्यात्मक व्याख्या व स्पष्टीकरण :-**

महाराष्ट्रातील माहिती अधिकार चळवळ - सजग नागरिक मंच- एक चिकित्सक अभ्यास या अभ्यास विषयावर संशोधन करण्यात आले आहे.

**माहिती अधिकार कायदा –** भारताच्या राज्यघटने द्वारे लोकशाही गणराज्याची स्थापना केलेली आहे. भारताच्या राज्यघटनेच्या सरनाम्याच्या अर्पण पत्रिकेत भारतीय घटनाकारांनी आम्ही भारतीय लोक स्वत:स घटना अर्पण करत आहोत. असे नमुद केलेले आहे. त्याचा अर्थ भारतीय जनता सार्वभौम आहे असा होतो. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी विविध देशांच्या राज्यघटनांचा तौलनिक अभ्यास केलेला होता. त्यांची विविध देशांच्या राज्यघटनेवरील अभ्यास दांडगा होता. त्याना ज्ञात होते, की इतर देशांच्या राज्यघटनांमध्ये अध्यक्ष, प्रधानमंत्री ,संसद किंवा लोकप्रतिनिधींकडे सार्वभौम सत्ता आहे. भारतात मात्र सत्तेचे सार्वभौमत्व जनतेकडे दिले गेले आहे. म्हणजे भारतीय लोकशाहीतील शासक जनता आहे. शासन कोणतेही असो ते जनते प्रति जबाबदार असायला हवे. ती जबाबदारी ओळखून राजकिय– प्रशासकिय नेतृत्वाने भारतीय सामान्य नागरिकाला केंद्र स्थानी ठेवून कारभार करावा असे अपेक्षित होते. मात्र तसे होताना दिसत नव्हते. शासकिय कामकाजाची माहिती गोपनिय म्हणून २००५ पुर्वी जनतेसाठीच लपवली जात होती. माहिती अधिकार कायद्याने ती खुली व्हावी यासाठी प्रशासकीय अधिका-यांकडे माहिती मागण्याचा हक्क भारतीय नागरिकांना मिळाला.

**माहिती अधिकार कायदा –कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणांकडे असलेली किंवा त्यांच्या नियंत्रणात असलेली व या अधिनियमान्वये मिळविता येण्यासारखी माहिती मिळविणे म्हणजे माहितीचा अधिकार होय.**

या अधिकारांमध्ये – एखादे काम, दस्तऐवज, अभिलेख यांची पाहणी करणे, दस्तऐवजांच्या किंवा अभिलेखाच्या टिप्पण्या, उतारे, किंवा प्रमाणित प्रति घेणे, डिस्केट फ्लॉप, टेप, व्हिडीओ कॅसेट या स्वरूपातील किंवा कोणत्याही अन्य इलेक्ट्रॉनिक प्रकारातील माहिती किंवा एखाद्या उपकरणात साठवण केलेल्या माहितीच्या प्रिंट आउट्स मिळविण्याचा सामावेश होतो.

**माहिती** – 'माहिती' माहिती म्हणजे कोणत्याही स्वरूपातील कोणतेही साहित्य असू शकते. त्यामध्ये अभिलेख, दस्ताएवज, ज्ञापने, इमेल, अभिप्राय, सुचना, प्रसिद्धीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने प्रतिमाने, कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील आधार सामुग्री आणि त्यावेळी अमलात आलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये, सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खासगी महामंडळाशी संबंधित माहितीचा समावेश होतो.

**दबावगट** – प्रत्येक देशाच्या राजकिय शासकिय व्यवस्थेवर प्रभाव पाडणारी शक्ती म्हणून दबाव गटाचा उल्लेख करता येईल.विशिष्ट हितसंबंध जोपासण्यासाठी एकत्र येवून जो क्रिया प्रक्रियांचा आकृतीबंध निर्माण होतो त्यास हितसंबंधी गट असे म्हणतात. भारतीय राज्यघटनेत धर्म, संस्कृती, भाषा, जात, व्यवसाय, इत्यादी घटकांवर आधारलेले हितसमुह आढळतात. उदा. कामगार संघटना, शिक्षक संघटना, विद्यार्थी संघटना, शेतकरी संघटना, उत्पादक वर्गाची संघटना, सहकारी संघटना, महिला संघटना अश्या प्रकाराचे हित संबंधिगट आपल्याला आढळतात. जेव्हा एखाद्या हितसंबंधि गटाकडून आपल्या मागण्यासाठी प्रयत्न होतो. तेव्हा त्या हितसंबंधीगटाचे रूपांतर दबाबगटात होत असते.

**डॉ. फायनर यांनी हितसंबंधी गटांना अज्ञात साम्राज्य असे नाव दिले आहे.**

**१) लिझरसन – दबावगट म्हणजे समाजातील अश्या लोकांची पक्षनिरपेक्ष संघटना की ज्यामध्ये लोक एकत्र येवून आपले अस्तित्व आणि आदर्श यांचे संरक्षण करतात. विशिष्ट उद्दीष्ट साध्य करण्याचा प्रयत्न करतात.**

**२) के – शासनाच्या सार्वजनिक धेय्यधोरणांवर आणि निर्णयांवर प्रभाव टाकणा–या खासगी स्वरूपाच्या संघटना म्हणजे दबावगट होय.**

**सजग नागरिक मंच हा नागरिकांचा दबाव गट आहे. –** सुशासनासाठी नागरिकांचा दबाबगट असे सजग नागरिक मंचाचे स्वरूप आहे. माहिती अधिकार कायदा जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचावा, या उद्देशाने अस्तित्वात आलेला दबाब गट म्हणजे सजग नागरिक मंच होय.

**संदर्भ–** जाधव तुकाराम/शिरापूरकर महेश, भारतीय संविधान आणि राजकारण, द युनिक अकॅडमी, पृष्ठ– २४ ते ३४

**※ १.११ संशोधन पध्दती :–**

**अन्वेक्षणात्मक किंवा परिचयात्मक संशोधन आराखडा**

**जेव्हा एखाद्या संशोधन कार्याचा उद्देश कोणत्या सामाजिक घटनेमध्ये अंतर्भुत असणा–या कारणांचा शोध घेणे हा असतो. तेव्हा अशा संशोधनासाठी तयार केल्या जाणा–या आराखड्याला अन्वेक्षणात्मक किंवा परिचयात्मक संशोधन आराखडा असे म्हणतात.**

सेल्टीज आणि जहोडा आणि इतरांनी लिहलेले आहे की  अधिक निश्चित अशा संशोधनाच्या हेतूने संबंधित गृहितकृत्यांच्या निर्मितीमध्ये साहाय्यक ठरतील अशा अनुभवांना प्राप्त करण्यासाठी अन्वेक्षणात्मक संशोधन आवश्यक आहे.

**※ ३.१२ माहिती संकलनाची साधने व तंत्रे**

**साहित्य सर्वेक्षण : (Surveyof literature)** : कोणत्याही संशोधन कार्याची सुरूवात करण्यापुर्वी त्याविषयाशी संबंधीत सर्व साहित्याचे वाचन केले पाहिजे. समजा, सदर नवीन असल्यास विषयाच्या अनुषंगाने बरीच माहिती पुस्तके, वृत्तपत्रे, मासिके आणि संशोधन पत्रिकांमधून प्राप्त होते म्हणून हे सर्व साहित्य संशोधन कर्त्याने बघितले पाहिजे.

**अनुभव सर्वेक्षण : (Experience Survey)** : समाज हाच समाजशास्त्राची प्रयोग शाळा आहे. म्हणून कोणत्याही विषयासंबंधीची माहिती हवी असल्यास त्या विषयात तज्ज्ञ असणा-या व्यक्तींशी संपर्कसाधून त्यांचाकडून माहिती गोळा करावी. अशा अनेक अनुभवी व्यक्ती असतात. की ज्यांचाकडे विषयाशी संबंधित भरपूर ज्ञान असते. परंतू ते आपले ज्ञान लिखित स्वरूपात लोकांसमोर मांडू शकत नाहीत. अशा अनुभव संपन्न व्यक्तींचे व्यवहारिक ज्ञान आपल्याकरिता मार्गदर्शकाचे काम करू शकते. म्हणून हे ज्ञान मिळविण्याचा संशोधक म्हणून माझा प्रयत्न आहे. अशाप्रकारे विशेष प्रकारच्या व्यक्तींकडे विषयाच्या संदर्भात इतर व्यक्तींपेक्षा अधिक ज्ञान असते. आणि असे ज्ञान गृहितकृत्याच्या निर्मितीकरता अधिक आवश्यक सुचना प्रदान करू शकतात. सेल्टिज , जहोडा आणि इतरांनी (Selltiz, Jahoda and Others) विशिष्ट व्यक्तींच्या प्रवर्गात खालील व्यक्तींचा समावेश केला आहे.

१) नवीन व्यक्ती

२) एका सांस्कृतिक समुहातून दुस-या सांस्कृतिक समुहात येत-जात असलेली व्यक्ती आणि दोन्ही सांस्कृतिक घटकांमध्ये संबंध टिकवून ठेवणारी सीमांत व्यक्ती.

३) अशी व्यक्ती जी विकासाच्या एका स्थितीतून दुस-या स्थितीकडे संक्रमणाच्या काळात आहे.

४) विचलनात्मक व्यक्ती, एकाकी व्यक्ती आणि समस्याग्रस्त व्यक्ती.

५) विशुद्ध, आदर्श किंवा विचलनात्मक व्यक्ती

६) अत्याधिक सामंजस्य आणि सामंजस्याच्या स्थितीत आढळणारी व्यक्ती

७) सामाजिक संरचनेच्या अंतर्गत विविध परिस्थितीचे प्रतिनिधित्व करणारी व्यक्ती

८) संशोधन करणा-या व्यक्तीच्या अनुभवाचे पुनरावलोकन आणि त्यांच्या खाजगी प्रक्रियांची परिक्षा.

अंतर्दृष्टीस प्रेरणा देणा-या घटनांचे विश्लेषण (Analysis of insight stimulating cases) अन्वेक्षणात्मक किंवा परिचयात्मक संशोधन आराखड्यासाठी परिणामकारक असलेली ही तिसरी पद्धती आहे. संशोधन विषयाशी संबंधित असे अनेक विषय असतात. की त्याचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष संबंध हा त्या विषयाशी असतो. अशा विषयाच्या अध्ययनातून संशोधन कर्त्याची दृष्टी विकसित होते. अध्ययन विषयाच्या संबंधात व्यवहारिक अंतर्दृष्टीचा विकास होवू शकतो. अशा प्रकारे अंतर्दृष्टीद्वारे गृहितकृत्याच्या निर्मितीमध्ये आणि वास्तविक संशोधन कार्यामध्ये अत्याधिक मदत प्राप्त होते. प्रत्येक समूहाच्या जीवनात काही आकर्षक काही अत्यंत साधी सरळ व स्पष्ट काही व्याधिकीय काही व्यक्तीगत विशिष्टगुण संबंधी घटना घडतात. या घटना अंतर्दृष्टीस प्रेरणा देणा-या ठरतात. व्यक्ती व समाज यांच्यातील परस्पर संबंधाबाबतच्या अनेक अंतर्दृष्टीचा संबंध अशा सखोल अध्ययनाची गरज आहे. सुप्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ सिगमंड फ्राईड यांना मानसिक रूग्णाच्या अध्ययनावरून अंतर्दृष्टी प्राप्त झाली होती. त्या अंतर्दृष्टीमुळे त्यांना अनेक सैद्धांतिक कल्पना सुचल्या होत्या.

१) सदर संशोधनासाठी पूर्वनिर्धारित गृहितकृत्याचे माहितीचा अधिकार आणि सजग नागरिक मंचचे सध्य परिस्थितिच्या संदर्भात परिक्षण करणे शक्य होणार आहे.

२) व्यापक संशोधन कार्य करता यावे या दृष्टीने अपरिचित क्षेत्रात गृहितकृत्याचा आधार प्राप्त करून देणे

३) महाराष्ट्रातील माहिती अधिकार चळवळीशी संबंधीत संशोधन कार्यास विश्वसनीय दृष्टीकोनातून सुरूवात करता यावी म्हणून सहाय्य करणे

४) पुणे जिल्हा प्रमाण मानून तालुक्यांच्या गावांची तथ्यांच्या संकलनाचा आराखडा निर्मिती करून संशोधनाचे क्षेत्र विकसित करणे.

५) अधिक महत्त्वपूर्ण विषयांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी संशोधन कर्त्यास प्रेरित करणे.

वरील कार्यावरून अन्वेक्षणात्मक संशोधन आराखड्याचे संशोधन कार्यात, संशोधनाच्या क्षेत्रात किती महत्त्व आहे. याची कल्पना येते. एका यशस्वी संशोधन कार्याकरता महत्त्वपूर्ण असणा-या आधारांना अन्वेक्षणात्मक किंवा परिचयात्मक संशोधन आराखडा आयोगाचा ठरतो

*** ३.१३ नमूना निवड :-**

पुणे हे विद्येचे माहेरघर म्हणून गणले जाते. पश्चिम महाराष्ट्रातील एक प्रगत आणि विकसीत भाग म्हणून पुणे शहर व जिल्ह्याचे वर्णन केले जाते. पुणे जिल्हा चौदा तालुक्यांचा मिळून बनलेला आहे. पुणे शहर, पुरंदर, आंबेगाव, इंदापूर, बारामती, भोर, हवेली, खेड, जुन्नर, शिरूर, दौंड, वेल्हे, मुळशी, मावळ या ठिकाणच्या नागरिकांचे सर्वेक्षण करण्यात आले त्यासाठी प्रश्नावली बनविण्यात आली ६३ प्रश्न तालुक्यांच्या गावी विचारण्यात आले. त्यानुसार प्रत्येक प्रश्नासाठी २५ अशी नमुना निवड करण्यात आली. इतर प्रश्नावलीच्या द्वारे लोकांना असलेले ज्ञान तपासले गेले. तज्ज्ञ व्यक्तींच्या मुलाखती घेतल्या गेल्या त्याचे तक्ता विश्लेषण प्रकरण क्रमांक ४ मध्ये सामाविष्ट केलेले आहे.

*** ३.१४ तथ्यांचे विश्लेषण :-**

संशोधनात तथ्यांचे संकलन केल्यानंतरत्यांचे विश्लेषण करणे आवश्यक आहे. निर्वाचन विश्लेषण करत नाही तो पर्यंत तथ्य अर्थहिन असतात. म्हणून तथ्यांचे विश्लेषण प्रकरण ४ मध्ये केले आहे. तक्ता सारणी बरोबरच टक्केवारी काढलेली आहे व मिळालेल्या माहितीचे विश्लेषण मांडले आहे.

*** ३.१५ सारांश -**

प्रस्तुत संशोधन विषय कसा सुचला? सदर संशोधनाच्या अध्ययनाची व्याप्ती मर्यादा स्पष्ट केली आहे. संशोधनातील समस्या नमुद केलेल्या आहेत. प्रस्तुत संघटनेच्या अभ्यासाची गरज, संघटनेच्या कार्याचा आढावा घेणे का गरजेचे आहे. याचे विवेचन केले आहे. संशोधनाच्या या निष्कर्षा पर्यंत पोहचण्यासाठी गृहीतके या उद्दीष्टांनतर मांडली गेली. त्यानंतर संशोधन पद्धतीवर सविस्तर विवेचन केलेले आहे. प्रस्तुत संशोधनासाठी अन्वेक्षणात्मक किंवा परिचयात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे. अन्वेक्षणात्मक किंवा परिचयात्मक संशोधन आराखड्यातील

सर्वेक्षण पद्धतीचा तर माहिती संकलनासाठी प्रश्नावली मुलाखत या संशोधन साधनांचा आधार घेतला आहे. संशोधनासाठी  वापरलेल्या अन्य पद्धती  व तंत्राची सविस्तर माहिती दिली आहे.

**३.१६ अध्ययानाच्या मर्यादा :-**

महाराष्ट्रातील माहिती अधिकार चळवळीच्या संघर्ष प्रदिर्घ आहे. जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या प्रयत्नाना त्यात विशेष स्थान आहे. पण माहिती अधिकार कायदा अस्तित्वात आल्या नंतर महाराष्ट्रात माहिती अधिकाराच्या वापराबाबत लोकजागृती करणा-या संस्थांची माहिती मिळविण्याची साधने मर्यादित आहेत. त्या संस्थांच्या कार्याचा लिखित स्वरूपाचा आढावा ग्रंथरूपाने अल्प स्वरूपात अस्तित्वात आहे. या संस्थांचे गेली तेरा वर्षे अव्याहतपणे सुरू आहे. त्यात वेळोवेळी कार्याची भर संस्था घालत असतात मात्र त्या माहितीचे जतन करणे, विश्लेषण करणे यासाठी वृत्तपत्रिय संदर्भावरच लक्ष केंद्रित करावे लागते. वृत्तपत्रिय संदर्भ मर्यादित व जुजबी स्वरूपाचे असू शकतात. संबंधित माहिती अधिकार कार्यकर्त्यांच्या मुलाखतीतून त्यांच्या कार्याची माहिती मिळते. पण मुलाखती द्वारे मिळणा-या माहितीत काही संदर्भ मुलाखत देणा-याकडून सुटण्याची राहून जाण्याची शक्यता असते. १९२३ ते २००५ या कालखंडात माहिती अधिकार कायद्याचा प्रवास भारतात झालेला आहे. १९२३ चा ब्रिटिशांचा गोपनियतेचा कायदा त्या नतंर स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय घटनाकारांनी राज्यघटना अस्तित्त्वात आणली. त्यातील अभिव्यक्ती स्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा न्यायालयांनी वेळोवेळी लावलेला अर्थ या सर्वांचा विचार करणे गरजेचे आहे. त्यानंतर माहिती अधिकार कायद्याचे अस्तित्व व त्यामुळे होणा-या स्थित्यंतराचा आढावा घेणे गरजेचे आहे. हा आढावा महाराष्ट्राच्या परिपेक्षात घेताना त्यावर संदर्भ मर्यादित स्वरूपाचे आहे. सामान्य जनतेचे कायद्याविषयीचे ज्ञान व जनजागृती यांचा आढावा घेण्यासाठी अध्ययनाचा कालावधी मर्यादित आहे. मर्यादित कालात तथ्य संकलन करून विश्लेषण करणे अशी अध्ययनाची मर्यादा आहे.

**✻ संदर्भ सुची :**

१) प्रदिप आगलावे, संशोधन पद्धतीशास्त्र आणि तंत्रे, पिंपळपुरे प्रकाशन, पृष्ठ क्रमांक– १५६–१५८

२) अलोणी/बोधनकर, सामाजिक संशोधन पद्धती, पृष्ठ क्रमांक– ५५ ते ६०

३) खैरनार दिलिप, प्रगत संशोधन पद्धती व सांख्यिकी, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००९, पृष्ठ क्रमांक– १२९ ते १३०

४) वरखेडे रमेश नारायण/वरखेडे मंगला रमेश, संशोधनाचे पद्धतिशास्त्र, पृष्ठ क्रमांक– ३२ ते ३७

५) वेलणकर विवेक, ग्राहक राजा सजग हो!, राजहंस प्रकाशन, पृष्ठ क्रमांक ५ ते ३१

६) वेलणकर, सजग, दैनिक लोकसत्ता, लोकरंग लेख, दिनांक १२/०८/२०१३

७) कचरे प्रल्हाद/गायकवाड शेखर, कायदा माहितीचा अन् अभिव्यक्तिस्वतंत्र्याचा, यशदा प्रकाशन, पृष्ठ क्रमांक – ११ ते १७

८) जाधव तुकाराम/शिरापूरकर महेश, भारतीय संविधान आणि राजकारण, द युनिक अकॅडमी, पृष्ठ क्रमांक– ३४

✻ ✻ ✻

## प्रकरण चौथे भाग – अ

## माहिती अधिकार कायद्याच्या प्रसार प्रचारासाठी सजग नागरिक मंचच्या कार्याचा अभ्यास

४.१) सजग नागरिक मंच या संस्थेच्या कार्याचाआढावा

४.२) सजग नागरिक मंच या संस्थेच्या कार्याची वैशिष्ट्ये

४.३) सामान्य जणांची प्रश्नावली

४.४) तक्ता विश्लेषण

४.५) तज्ज्ञ व्यक्तींची प्रश्नावली

४.६) तज्ज्ञ व्यक्तींच्या मुलाखती सारांश रूपात

४.६.१) विजय कुंभार

४.६.२) जुगल राठी

४.६.३) संजय शिरोडकर

४.६.४) मानव कांबळे

४.६.५) डॉ धनंजय भिसे

४.६.६) अभिजीत राठोड

४.६.७) डॉ प्रल्हाद कचरे

या संशोधनाच्या संकलीत केलेल्या महाराष्ट्रातील माहीती अधिकार कायद्याची निर्मिती झाल्यापासून अनेक संघटनांनी कार्य केलेले आहे परंतु त्या संघटनेमार्फत लोकशाहीला बळकटी येण्यासाठी माहीती अधिकाराची अमलबजावणी करतांना खुप मोलाचे योगदान लाभलेले आहेत. या मंचाविषयी आणि माहीतीच्या अधिकाराविषयी महाराष्ट्रातील सामान्य नागरिकांच्या काही सर्वेक्षणाद्वारे मुलाखती घेण्यात येवून त्यांच्यामताचे अवलोकन करून या संशोधनामध्ये भर टाकलेली आहे त्यांच्या मतांचा आढावा येथे थोडक्यात घेण्यात आलेला आहे.

पुण्यातील याच लोकांच्या मुलाखतीवरून म्हणजे शिक्षित असलेल्या समाजाकडून या सर्वेक्षणाद्वारे सकारात्मक प्रतिसाद मिळालेला आहे आणि लोकशाही बळकट करण्याचे हा योग्य मार्ग आहे असाही प्रतिसाद मिळालेला असून त्या माहीतीचा अधिकार जनमानसापर्यंत पोहचला पाहीले असे मतांतरे देखील यामध्ये आढळून आलेली आहेत आणि त्याच बरोबर महाराष्ट्रात अनेक संघटना या कायद्याविषयी काम करीत आहेत परंतु सजग नागरिक मंचाच्या कार्याचा व्याप हा अधिक मोठा व प्रभावी असल्याचे देखील या सर्वेक्षणातुन स्पष्ट झालेले आहे आणि योग्य तो न्याय आपल्या नागरिकाला अन्याय होणाऱ्यावर योग्य ती शिक्षा होण्यासाठी अशा महाराष्ट्रातील अनेक संघटनांनी खुप प्रभावी काम केले पाहीजे अशा ही प्रतिक्रिया यामधून मिळाल्या आहे.

त्याच बरोबर या कायद्याविषयी काही नकारात्मक मते देखील या संशोधनाच्या सर्वेक्षणातून मिळालेली दिसून येतात आणि महाराष्ट्रात या कायद्याविषयी काम करणाऱ्या संघटनांची देखील काही नागरिकांना माहीती नसल्याचे आढळून आलेले आहे आणि सजग नागरिक मंचाची देखील काही लोकांना माहीती नसल्याचे आढळून आलेले आहे अशा काही लोकांच्या प्रतिक्रियामुळे माहीतीचा अधिकार कायदा कधी निर्मिती झालेली आहे याचे देखील ज्ञान समाजातील जमानसांना झालेले दिसून येते नाही असे यावरून स्पष्ट होत म्हणून या संशोधनाच्या माध्यमातून सर्व सामान्य लोकांना या अधिकाराच्या कायद्याचे ज्ञान झाले पाहीजे आणि लोकशाही मजबूतीसाठी हे कार्य अतिशय महत्वाचे ठरत असल्यामुळे सजग नागरिक मंचाची कार्याचा व्यापक दर्जा माहीत व्हायला पाहीजे असा उद्देश या संशोधनाचा आहे असे प्रामाणिक प्रयत्न केला आहे.

भारतीय घटनाकारांनी अभिव्यक्ती स्वातंत्र्याची तरतूद भारतीय राज्यघटनेत घटना निर्मितीचे वेळीच केलेली होती. मात्र भारतात माहिती अधिकार कायद्याला मुर्त स्वरूप मिळून त्याला घटनात्मक अधिष्ठान मिळण्यासाठी भारतीय जनतेला सन २००५ पर्यंत वाट पहावी लागली. सन २००५ पुर्वी भारतीय जनता माहिती अधिकार कायदा अस्तित्वात येण्याची वाट पाहत होती. हे वाट पाहणे म्हणजे स्वस्थ बसणे नव्हते. तर शासन प्रशासनाशी, राजकीय व्यवस्थेशी संघर्ष करून माहिती अधिकार कायद्याची वाट प्रशस्त करणे होते. मुलभुत हक्क म्हणून अभिव्यक्ती स्वातंत्र्याची घटनादत्त ढाल असल्यामुळे शासन प्रशासनाशी संघर्ष करण्याचे धैर्य भारतीय नागरिकाला लाभत होते. या संघर्षात झालेला अन्याय दुर करण्यासाठी न्यायालयात गेलेल्या भारतीय नागरिकांना न्याय देताना भारतीय न्यायलयाने अभिव्यक्ती स्वातंत्र्याची उकल केली होती. ती उकल म्हणजे न्यायालयाचे निर्णय..! न्यायालयाचे निर्णयप्रक्रिया माहिती अधिकार चळवळीला बळ देणारी ठरली. असे घडत असतानाच इकडे जागतिक पातळीवर जागतिक बँकेने कर्ज देताना पारदर्शकतेचा मुद्दा उपस्थित केला. हाच मुद्दा कळीचा ठरणार होता. ज्या कारणासाठी कर्ज घेत असाल त्याच कारणासाठी निधि वापरला जावा, असे जागतिक बँकेची, आंतरराष्ट्रीय नाणे निधीचीअट संबंधित राष्ट्रांना होती. विकसनशील राष्ट्रांनी कर्जाच्या पैशाचा वापर करताना केलेली अनागोंदी, पैशाचा गैरवापर याला चाप लावण्याचा हा जागतिक बँकेचा प्रयत्न होता.

महाराष्ट्रात अनेक सामाजिक कार्यकर्ते व संघटना यांनी माहिती अधिकार कायदा अस्तित्वात यावा यासाठी योगदान दिलेले आहे. घटनेतील कलम ९१ अ नुसार माहिती अधिकार हा भारतीय नागरिकांचा मूलभूत अधिकारआहे व त्यामुळेच भ्रष्ट राजकीय व प्रशासन व्यवस्थेवर अंकुश ठेवता येणे शक्य आहे.परंतुमाहिती अधिकाराचा वापरावर काही निर्बंध लावण्याचा प्रयत्न होत आहे. त्याविषयी सर्व नागरिकांनीसजगराहुन संघटितरित्या लोकशाहीने दिलेल्या हक्कांचे जतन केले पाहिजे. हि जाणीव गेली १३ वर्ष सातत्याने सजग नागरिक मंच ने जोपासली आहे. माहिती अधिकार कायद्याबाबतनागरिकांचे प्रबोधनकरणारी संघटना म्हणजे सजग नागरिक मंच होय.जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या पासून तेअनेक दिग्गज राजकीय व्यक्तिमत्व, सामाजिक कार्यकर्ते यांनीसजग नागरिक मंचया व्यासपीठावर आपली उपस्थिती दिली आहे.

**सजग नागरिक मंचाचे योगदान**

*** १३ वर्षांपासून न चुकता मासिक चर्चा सत्र**

श्री विवेक वेलणकर आणि श्रीजुगल राठी यांनी ६नोव्हेंबर २००७ रोजी माहिती अधिकाराच्या प्रचार प्रसार हे कार्य सुरू केले.राष्ट्रहितासाठीकार्य करणे हेच उद्दीष्ट समोर ठेवून सजग नागरिक मंच आज कार्यरत आहे. कुठलेही औपचारिकता नाही, सामाजिक कार्यासाठी निधीसंकलन नाही, कुठला प्रचार प्रसार अथवा कार्यकर्ते यांचा ताफा नाही.नाममात्र खर्च परंतु शेकडो नागरिकांच्या प्रश्नांवर न्याय देणारा, १३वर्षांपासून न चुकता मासिक चर्चा सत्र आयोजन करणारं व शेकडोयुवकांना समाज कार्याची प्रेरणा देणारं व्यासपीठ म्हणजेसजग नागरिक मंच.. !! ऑक्टोबर २००५ मध्ये दस-याच्या मुहूर्तावर संपूर्ण देशात माहिती अधिकार कायदा २००५ लागू झाला. ख-या अर्थाने प्रजासत्ताक अस्तित्वात आले. प्रशासनात पारदर्शकता आणणे व प्रशासनाला नागरिकांच्या प्रति उत्तरदायी बनविणे ही ह्या कायद्याची मूळ उद्दिष्टे होती. हा कायदा अस्तित्वात आला तर खरा पण तो जनतेपर्यंत पोचून त्याचा सुयोग्य वापर होणे हे मोठे आव्हान होते आणि ते पेलण्याचा निश्चय करूनश्री विवेक वेलणकर आणि श्रीजुगल राठी यांनी नोव्हेंबर २००६ मध्ये सजग नागरिक मंच ची स्थापना केली.या कायद्याला१३ वर्षे पूर्ण होत आहे.

पुणे महानगरपालीकेमध्ये माहिती अधिकार कक्ष स्थापन करण्यात यावा यासाठी सजग नागरिक मंच पुण्यातील अन्य काही संघटना मिळून प्रयत्नशील होत्या. तश्या स्वरूपाचा माहिती अधिकार कक्ष पुणे महानगरपालीकेमध्ये स्थापन झाला. हा कक्ष महाराष्ट्रातील महानगरपालीकेमध्ये असणारा प्रथम माहिती अधिकार कक्ष ठरला.

त्या माहिती अधिकार कक्षाचे काम पब्लिक कन्सर्न फॉर गव्हर्नन्स ट्रस्ट पाहत आहे. दर शुक्रवारी संबंधिताना विशेष मार्गदर्शन या ठिकाणी केले जाते. ह्या माहिती अधिकार कक्षाला नाव सजग नागरिक मंच स्थापन करण्यास ज्यांची प्रेरणा मिळाली. त्या कै. प्रकाश कर्दळे यांचे नाव देण्यात आलेले आहे.

सुशासनासाठी नागरिकांचा दबावगटतयार करताना माहिती अधिकार कायदा व त्याचा समाज कार्यासाठी उपयोग, यातील तांत्रिक बाबींची माहिती तसेच या विषयी शंका निरसनासाठी अनेकचर्चा सत्र आजवर आयोजित करण्यात आले आहे.

माहिती अधिकाराबरोबरच जनसामान्यांच्या रोजच्या जिवनातील प्रश्न म्हणजेच रस्ते,पाणी, वीज, आधार, टोल, वैद्यकीय सेवा, वाहतूक, पर्यावरण, विकास आराखडा, मेट्रो अशा विविध विषयांवर तज्ञांची चर्चासत्रे घडवून नागरिकांचे प्रबोधन करण्यासाठी गेली १३ वर्षे दर महिन्याच्या पहिल्या रविवारी सायंकाळी ५ वाजता मासिक सभेचे आयोजन संस्थेमार्फत केले जाते.या सभेत नागरिक आपले माहिती अधिकार कायद्या विषयाचे अनुभव मुक्तपणे मांडू शकतात. त्यावर चर्चा देखिल होत असते. तसेच नागरिकांना प्रशिक्षीत करण्यासाठी गेल्या १२ वर्षात महाराष्ट्रभरात विविध व्यासपीठांवरून सातशे हून अधिक व्याख्यानांद्वारे प्रबोधन करून साठ हजारांहून अधिक नागरिकांना सजग केले आहे.

| क्र. | दिनांक | सजग नागरिक मंचने पाठपुरावाकेलेला विषय |
|---|---|---|
| १) | ४/२/२०१८ | स्वच्छ सर्वेक्षणाकरिता टेंडर न काढताच सल्लागाराची नेमणूक करण्याचा प्रस्ताव फेटाळावा. |
| २) | २९/११/२०१८ | ४ वर्षांपूर्वी मनपा मुख्य इमारतीमध्ये २३ लाख रुपये खर्च करून बसवलेली सौर उर्जेवर चालणारी यंत्रणा पडून असलेली बाब उघड केली |
| ३) | १२/१०/२०१८ | नियम धाब्यावर बसवून जल संपदा (यांत्रिकी) विभागाची टेंडर प्रक्रिया |
| ४) | ०१/११/२०१८ | पाणी टंचाई च्या पार्श्वभूमीवर गल्ली बोळ कॉंक्रीटीकरणची कामे तात्काळ थांबवा |
| ५) | ३०/१०/२०१८ | स्वतःचे कालवा दुरुस्तीचे अपयश लपविण्याकरता जल संपदा विभाग करतोय दिशाभूल |
| ६) | २८/१०/२०१८ | बेबी कालव्याच्या दुरावस्थेमुळे पुण्यात पाण्याचे कृत्रिम संकट. |
| ७) | २२/१०/२०१८ | पुणेकरांच्या माथी नवीन ''कचरा कर'' नको. |
| ८) | ०३/१०/२०१८ | केंद्र सरकारला सेवाकर वेळेत न भरल्यामुळे, पुणे मनपाला ३. ८० कोटी व्याज भरावे लागल्या घटनेची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करणे बाबत. |

| | | |
|---|---|---|
| ९) | ०३/१०/२०१८ | पुणे मनपा हद्दींतील मिळकतीचे GIS मॅपिंग रद्द कंत्राटदाराची बिले अदा न करण्यासंदर्भात. |
| १०) | २८/०९/२०१८ | कालवा फुटी मुळे बाधित नागरिकांना देण्याची नुकसान भरपाई जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांकडून वसूल करावी. |
| ११) | २७/०९/२०१८ | कालवा फुटी संदर्भात |
| १२) | | केंद्र सरकारने DGSD मार्फत Rate Contract केलेल्या "Tata Motors" कंपनीचे स्वस्त Road Sweeper Truck न घेता महागडे चिनी Road Sweeper Truck इंजिन घेणाऱ्या पुणे महानगरपालिकेची चौकशी करणे बाबत. |
| १३) | १४/०९/२०१८ | पुणे महानगरपालिकेच्या लोकशाही दिनात जिल्हाधिकारी कार्यालय तसेच पोलीस वाहतूक पोलीस यांचे प्रतिनिधी उपस्थित राहात नसल्याबद्दल तक्रार. |
| १४) | ०४/०९/२०१८ | CCTV भाड्याने घेण्याच्या प्रक्रियेत मनपाचे मोठे नुकसान व गैरप्रकार. |
| १५) | ०३/०९/२०१८ | जलसंपदा विभाग (यांत्रिकी) यांचे तिल्लारी प्रकल्पासाठी चे tender क्र. ०७/०१ For २०१८ - २०१९, अनावश्यक ; अनाठायी आणि फुगवलेले |
| १६) | २७/०८/२०१८ | ३ प्रभागांमध्ये यांत्रिकीकरणाने रस्ते साफसफाई टेंडरमध्ये मनपाचे (पर्यायाने नागरिकांच्या करांच्या पैशांचे) १५ कोटी रुपयांचे नुकसान. |
| १७) | २३/०८/२०१८ | पुण्याच्या पाण्यावरून पुणेकरांना घाबरविण्यापेक्षा योग्य नियोजन करा |
| १८) | २३/०८/२०१८ | पुण्याच्या पाण्यावरून पुणेकरांना घाबरविण्यापेक्षा योग्य नियोजन करा |

| | | |
|---|---|---|
| १९) | २१/०८/२०१८ | पुणे महापालिका हद्दीतील घरांना स्मार्ट digital door numbering करण्याचा अनावश्यकप्रकल्प रद्द केल्याबद्दल पुणेकरांचे करांचे १० कोटी रुपये वाचवल्याबद्दल महापालिका आयुक्त आणि अतिरिक्त महापालिका आयुक्तांचे मनपूर्वक अभिनंदन– |
| २०) | ०३/१८/२०१८ | विविध शहरातील प्रवासी केंद्रीत बससेवा व पीएमपीएमएल, यावर प्रवासी मेळाव्यात चर्चापीएमपी प्रवासी मंचतर्फे आयोजन |
| २१) | ०३/१८/२०१८ | कचराप्रकल्पांमध्ये नागरिकांच्या करांच्या पैश्याचा कचरा |
| २२) | ०३/१८/२०१८ | जलसंपदा खात्यातील उधळपट्टी रोखण्याबाबत |
| २३) | २३/०७/२०१८ | खात्याची मशीनरी पडून असताना कंत्राटदाराकडून भाड्याने घेण्याच्या उद्योगांना आळा घालण्या बाबत. |
| २४) | १२/०७/२०१८ | भूमिगत HT केबल देखभाल दुरुस्तीचे अनावश्यक टेंडर क्रमांक १०४२ – २०१७ रद्द करण्या संदर्भात. |
| २५) | ०९/०७/२०१८ | राज्यशासना कडून पुणे मनपास अद्याप न मिळालेल्या ३९२ कोटी रुपयांच्या अनुदाना संबंधात. |
| २६) | २८/०६/२०१८ | इलेक्ट्रिकल विभागाची क्रमांक १२ – २०१८ ची जास्त दराची फुगवलेली निविदा आमच्या विनंतीनुसार रद्द करून पुणेकरांचे २० लाख रुपये वाचविल्याबद्दल धन्यवाद. |
| २७) | २५/०६/२०१८ | LBT विभागातील अनागोंदी कारभार आणि मनपाचे आर्थिक नुकसान.– |
| २८) | ०४/०६/२०१८ | औषध खरेदीत पुणे महानगरपालिकेचे यंदाही वाचणार ५ कोटी रुपये |
| २९) | १९/०५/२०१८ | निधीतून सार्वजनिक ठिकाणी बसविलेल्या बाकांच्या किमती |
| ३०) | ०६/०५/२०१८ | जल संपदा विभागाचे ऑडिट आधी करा |
| ३१) | ०२/०५/२०१८ | पर्वती जलकेंद्र येथील टँकर पॉईंट वरील बंद मीटर्स संदर्भात. |

| | | |
|---|---|---|
| ३२) | ०१/०४/२०१८ | पिण्याच्या पाण्याचा अपव्यय करणाऱ्या जलसंपदाविभागाच्या नाठाळांच्या माथी काठी कधी मारणार ? |
| ३३) | १९/०३/२०१८ | १२ मीटर खालील रस्त्यांच्या कॉंक्रीटीकरण बाबत दिनांक १६/०३/१८ रोजी काढलेल्या शुध्दीपत्रका मागची कारणे व वस्तुस्थिती प्रदर्शित करणे बाबत. |
| ३४) | ०५/०३/२०१८ | Make In India ला राज्य सरकारच्या आरोग्य विभागाचा खो. |
| ३५) | २१/०२/२०१८ | GEMGOV च्या किमती ग्राहयभूत धरून DSR मध्ये सुधारणा करणेबाबत |
| ३६) | १२/०८/२०१८ | ''कचऱ्याची'' चोरी थांबविण्यासाठी बसवलेले CCTV कॅमेरे चोरीला, दुबार खरेदीचा घाट. |
| ३७) | ०८/०२/२०१८ | मिळकतींचे GIS Mapping कंत्राट रद्द करा. |
| ३८) | २९/०१/२०१८ | मा. आयुक्तांच्या budget मध्ये केलेली कोंढवा food testing laboratory च्या पांढरा हत्तीवरील दोन कोटी रुपयांची तरतूद स्थायी समिती र्लीवसशीं मधून वगळावी |
| ३९) | २४/०१/२०१८ | CCTV camera खरेदी मध्ये पुन्हा एकदा महापालिकेचे नुकसान होणार |
| ४०) | २४/०१/२०१८ | श्री संजय शिरोडकर यांना सजग नागरिक माहिती अधिकार पुरस्कार २०१७ प्रदान हस्ते मा. केंद्रीय माहिती आयुक्त व ज्येष्ठ कार्यकर्ते श्री शैलेश गांधी (मुंबई ), |
| ४१) | १८/१२/२०१७ | आरोग्य विभागाने केली कॅग (CAG) ची दिशाभूल. |
| ४२) | २२/१२/२०१७ | US FDA Approval ची अट रद्दबादल |
| ४३) | २७/११/२०१७ | सोनोग्राफी मशीन्सचा वापर अत्यल्पच; विधिमंडळाचीही जाणीवपूर्वक दिशाभूल |
| ४४) | २५/१०/२०१७ | E Learning साठी २१ कोटी रुपयांच्या योजनेसंबंधी. |
| ४५) | २४/१०/२०१७ | पुणे मनपाच्या मुख्य भवन येथे नव्याने विकसित होत असलेल्या इमारतीमधील मुख्य सभागृहासाठीची निविदा प्रक्रिया तातडीने रद्द |

| | | |
|---|---|---|
| | | करण्यात आली |
| ४६) | २४/०८/२०१७ | SNDT येथील जुनी MLR पाण्याची टाकी धोकादायक अवस्थेत तर नवी MLR टाकी वापराविना पडून. |
| ४७) | २१/०८/२०१७ | पुण्यात आधार केंद्राच्या कमतरतेमुळे नागरिकांचे अतोनात हाल. |
| ४८) | १०/०८/२०१७ | २०० कोटी रुपयांचे कर्ज रोखे काढण्यापेक्षा २९० कोटी रुपये राज्य सरकारकडून येणे असलेली रक्कम वसूल करण्यासाठी प्रयत्न का झाले नाही? |
| ४९) | २६/०७/२०१७ | चौगुले दांपत्याच्या लढ्याची बातमी |
| ५०) | २६/०५/२०१७ | बोर्डाच्या परीक्षेतील १० वी / १२ वी चे गुणवंत विद्यार्थी अजून ही शिष्यवृत्ती पासून वंचित. |
| ५१) | २५/०४/२०१७ | "शिक्षण मंडळाच्या प्रभारी प्रमुख निलंबित" |

**१) निविदा न काढताच स्वच्छ सर्वेक्षणाकरिता सल्लागाराची नेमणूक करण्याचा प्रस्ताव फेटाळावा.-**

पुणे मनपाच्या घन कचरा विभागाने स्वच्छ भारत मिशन अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षणासाठी KPMG -dvisory Pvt. Limited, या कंपनीला सल्लागार म्हणून नेमण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. केंद्र सरकारने सदरहू कंपनीचे नाव प्रस्तावित केले आहे, असे भासवून टेंडर न काढताच, हे काम देण्याचा प्रस्ताव आहे. दक्षता विभागाने, केंद्र सरकारने ज्या शहरांसाठी वरील सल्लागाराचे नाव प्रस्तावित केले आहे त्यात पुण्याचा समावेश नसल्याचे दाखवून दिले असतानाही ५(२)(२) खाली कोणतेही टेंडर न काढता सदरहू सल्लागारास काम देण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. ज्यामध्ये या सल्लागाराला ३ महिन्यांसाठी ३५ लाख रुपये देण्यात येणार आहेत. गेल्यावर्षी घन कचरा विभागाला धोरणात्मक नियोजनासाठी १ कोटी रुपये खर्च करून एरीपीीं र्ध्रीपस या संस्थेला सल्लागार म्हणून नेमण्यात आले आहे, पण त्यांच्या कामाच्या डलेशि मध्ये स्वच्छ भारत सर्वेक्षण हे काम नसल्याचे सांगून हा नवीन सल्लागार नेमण्याचा घाट घातला गेला आहे. मुळातच प्रत्येक कामासाठी सल्लागार नेमण्याची गरजच काय ? टेंडर न काढता सल्लागार नेमण्याची एव्हडी निकड

काय ? मनपा अधिकारी व कर्मचारी यांच्या क्षमतेवर हा अविश्वास नाही काय ? या सर्व गोष्टींचा खुलासा होण्याची आवश्यकता आहे.आपणास विनंती कि या ५(२)(२) चा ठराव स्थायी समितीत फेटाळून प्रशासनास टेंडर काढण्याचे निर्देश द्यावेत. सजग नागरिक मंचने ही मागणी केली

**२) ४ वर्षांपूर्वी मनपा मुख्य इमारतीमध्ये २३ लाख रुपये खर्च करून बसवलेली सौर उर्जेवर चालणारी यंत्रणा पडून असल्याची बाब उघड केली.-**

२०१४ साली पुणे मनपाच्या इलेक्ट्रिकल विभागामार्फत पुणे मनपाच्या मुख्य इमारतीमध्ये पाणी चढविण्यासाठी सौर उर्जेवर चालणारे पंप २३.४६ लाख रुपये खर्च करून बसविण्यात आले. यामुळे इमारतीमध्ये विना खर्च पाणी पुरवठा चालू राहणार असून वीज बिलात बचत होणार आहे, असे नमूद करून ही यंत्रणा विकत घेण्यात आली. मात्र आज सुद्धा ही यंत्रणा पडून आहे व पाण्याचे पंप महावितरणच्या वीज पुरवठ्यावर चालत आहे. मनपामध्ये असे अनेक पांढरे हत्ती विकत घेऊन नागरिकांच्या करांचे पैसे उधळण्यात येतात. मात्र त्याचे पुढे काय झाले याचा कोणताही लेखा जोखा ठेवण्याची यंत्रणा मनपात नाही.

**३) नियम धाब्यावर बसवून जल संपदा (यांत्रिकी) विभागाची टेंडर प्रक्रिया.-**

मुख्य अभियंता जल संपदा (यांत्रिकी) यांनी धरणांची दुरुस्तीची कामे बाह्य अभिकरणांमार्फत न करता दापोडी व इतर कर्मशाळेमार्फत करण्यासंबंधीचे परिपत्रक ०४-०७-२०१८ रोजी काढले. ज्यातील मुद्दा क्रमांक २ मध्ये असे स्पष्ट म्हंटले आहे कि बाह्य अभिकरणांमार्फत कामे करावयाची असतील तर निविदा कामांना मुख्य अभियंता (यांत्रिकी) जल संपदा विभाग यांची निविदा मागविण्यापूर्वी मान्यता घ्यावी. अधीक्षक अभियंता (यांत्रिकी मंडळ) जल संपदा यांनी २-०६-२०१८, २३-०७-२०१८ व १३-०८-२०१८ अश्या तीन पत्रांद्वारे ८ कामांची मंजुरी मुख्य अभियंता (यांत्रिकी) यांचेकडे मागितली. ज्यात ही कामे तातडीची असल्याचे व कर्मशाळेत होऊ न शकल्याचे नमूद केले. मुख्य अभियंता कार्यालयाने या सर्व कामांचे मंजुरी आदेश एकाच पत्राने १४-०८-२०१८ रोजी काढले. ०२-०६-२०१८ च्या तातडीच्या कामाला १४-०८-२०१८ रोजी मंजुरी देण्याचा विक्रम जसा या कार्यालयाने केला तसाच १३-०८-२०१८ रोजी पुण्यातून निघालेल्या पत्राला १४-०८-२०१८ रोजी सर्व छाननी प्रक्रिया करून मंजुरी देण्याचा विक्रम ही या कार्यालयाने केला. मात्र मंजुरी मिळण्याआधीच ०४-०७-२०१८ चा आदेश

धाब्यावर बसवून टेंडर प्रक्रिया राबविण्याचा प्रताप कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) जल संपदा विभाग यांनी केला. या मध्ये १४-०८-२०१८ रोजी दिलेल्या मंजुरी पत्रातील पहिल्या चार तसेच सातव्या, आठव्या कामाची टेंडर्स मंजुरी आधी प्रसिद्ध ही झाली व उघडण्यात आली . मुख्य अभियंता १४-०८-२०१८ रोजी दिलेल्या मंजुरी पत्रात या सर्व कामांची गुण नियंत्रण तपासणी करून घेण्यात यावी, असं म्हंटले आहे. मात्र ही कोणाकडून करून करून घ्यावी या संबंधी कोणतेच निर्देश दिलेले नाही. ही तपासणी त्रयस्थ संस्थेमार्फत करून घेतली जावी अशी सजग नागरिक मंचची आग्रहाची मागणी आहे.

एकूणच ही सर्व टेंडर प्रक्रिया संशयास्पद असून मुख्य अभियंता व कार्यकारी अभियंता या दोन्ही कार्यालयांच्या कारभाराची चौकशी करण्यात यावी व दोषींवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी सजग नागरिक मंचाने केली आहे.

**४) पाणी टंचाई च्या पार्श्वभूमीवर गल्ली बोळ काँक्रीटीकरणची कामे तात्काळ थांबवा.-**

जल संपदा विभागाने पुण्याच्या पाणी कोट्यात कपात केली असल्याने पुण्यात एक वेळ पाणी देण्याची वेळ मनपा वर आली आहे. त्यातही अनेक भागात दीड ते दोन तासच पाणी मिळत आहे. नागरिकांचे पिण्याच्या पाण्यासाठी हाल सुरु आहेत. या पार्श्वभूमीवर पुणे मनपाने पाण्याची काटकसर करण्याचे उपाय तातडीने हाती घेण्याची गरज आहे. गेल्या काही वर्षात नागरिकांची कोणतीही मागणी नसताना गल्ली बोळ काँक्रीटीकरणाचे पेव फुटले आहे. यंदाही गल्ली बोळ काँक्रीटीकरणाची असंख्य कामे प्रस्तावित आहेत. यासाठी प्रचंड पाणी लागणार आहे. एकीकडे पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना पाण्याचे टँकर विकत घेण्याची वेळ येत असताना, दुसरी कडे गल्ली बोळ काँक्रीटीकरण करण्यासाठी पाणी वापरणे हा पाण्याचा अपव्यय आहे. आम्ही आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो कि पुण्यात दोन वर्षांपूर्वी पाणी कपातीचे संकट आले असताना तत्कालीन मनपा आयुक्तांनी अश्या प्रकारची पावले उचलून गल्ली बोळ काँक्रीटीकरणाच्या कामांना स्थगिती दिली होती.

आपणास विनंती कि गल्ली बोळ काँक्रीटीकरणाच्या सर्व कामांना पाणी कपात रद्द होई पर्यंत स्थगिती द्यावी.

**५) स्वतःचे कालवा दुरुस्तीचे अपयश लपविण्याकरता जल संपदा विभाग करतोय दिशाभूल–**

मुंढवा जॅकवेल मधून सिंचनासाठी पुनर्वापर व्हावा म्हणून दररोज ५५० MLD सांडपाणी प्रक्रिया करून देण्याचा प्रकल्प पुणे मनपाने नागरिकांच्या करांचे १०० कोटी रुपये खर्च करून दोन वर्षांपूर्वी उभारला. मात्र ज्या बेबी कॅनॉल मधून हे पाणी दौंड पर्यंत जाणे अपेक्षित आहे त्याची दुरावस्था असल्याने जल संपदा विभाग जवळपास निम्मेच पाणी शेतीसाठी उचलतो, हे आम्ही दाखवून दिल्याने पितळ उघड पडलेल्या जल संपदा विभागाने हे पाणी शेतीसाठी योग्य नसल्याचे, वापरण्यास शेतकरी अनुत्सुक असल्याचे प्रसार माध्यमांना सांगून दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला . या संदर्भात वस्तुस्थिती खालील प्रमाणे आहे.

५.१ – दौंड भागातील शेतकऱ्यांनी तसेच काही ग्रामपंचायतींनी मुंढवा जॅकवेल मधील पाणी शेतीसाठी आवश्यक व उपयुक्त असल्याची पत्रे पुणे मनपाला पाठवली आहेत. असे असताना हे पाणी शेतीसाठी वापरण्यास शेतकरी अनुत्सुक आहेत हे म्हणणे चुकीचे व दिशाभूल करणारे आहे.

५.२– या पाण्याचे टेस्ट रिपोर्ट्स स्पष्टपणे दाखवितात कि या पाण्याचा BOD, PH Value व Suspended Particle या सर्व बाबी शेतीसाठी वापरण्या योग्य मानकात बसतात.

५.३ – हे पाणी शेतकरी शेतीसाठी वापरण्यास अनुत्सुक असतील तर गेल्या २ वर्षात मुंढवा जॅकवेल मधून जल संपदा विभागाने ७ TMC पाणी सोडले ते शेतीसाठी वापरले गेले नसेल तर मग कोठे वापरले ?

या सगळ्याचा अर्थ असा आहे कि बेबी कॅनॉल मधून पूर्ण क्षमतेने पाणी सोडण्यास अपयशी ठरलेला जल संपदा विभाग आपली अकार्यक्षमता झाकण्यासाठी, हे पाणी शेतकरी घेण्यास अनुत्सुक असून दिशाभूल करत आहे

**६) बेबी कालव्याच्या दुरावस्थेमुळे पुण्यात पाण्याचे कृत्रिम संकट.-**

जलसंपदा विभागाच्या आग्रहावरून पुणेकरांच्या करांचे १०० कोटी रुपये खर्च करून मुंढवा येथे पुण्याचे सांडपाणी शुद्ध करून पुढे शेतीसाठी पुनर्वापरा साठी बेबी कॅनाल मध्ये सोडण्याची योजना २ वर्षांपूर्वी कार्यान्वित झाली. त्यातून रोज ५५०MLD पाणी (वर्षाला ६.५०TMC) पाणी या प्रकल्पातून शेतीसाठी सोडता येऊ शकते. मात्र जल संपदा विभागाने २ वर्षात मिळून फक्त ६.५०TMC पाणी या प्रकल्पातून शेतीसाठी उचलले आहे. व त्यामुळे ६.५०TMC धरण्याचे पिण्याचे पाणी अकारण शेतीसाठी वापरले गेले. आता ऑक्टोबर महिन्यात मुठा उजवा कालवा फुटल्यामुळे त्यातून एक थेंबही पाणी शेतीसाठी सोडले गेले नसतानाही मुंढवा जॅकवेल मधून दिवसाला ५५०MLD ऐवजी सरासरी जेमतेम ३७०MLD पाणी जल संपदा विभागाने शेतीसाठी घेतले. या मागचे गौडबंगाल शोधण्यासाठी आमच्या कार्यकर्त्यांनी मुंढव्यापासून केडगाव पर्यंत या बेबी कालव्याची पाहणी केली असता, या कालव्याची दुरावस्था दिसून आली. गेल्या कित्येक वर्षात या कालव्याची देखभाल दुरुस्ती न झाल्याचे स्पष्ट दिसून आले. (सोबत फोटो सोडत आहोत). यवत पासून साधारणतः ५ किलोमीटर अंतरावर खुबगाव येथे दगड माती मुळे हा कालवा भरून जाऊन बुजला असल्याचे दिसून आले (सोबत फोटो सोडत आहोत). त्यामुळे येथून पाणी पुढे जाताच नाही. त्या पुढे तर केडगावच्या अलीकडे या कालव्यातून पाणीच वहात नसल्याने कालव्यातच पाईप टाकून भराव घालून कच्चा रस्ताही बांधला गेला आहे. (सोबत फोटो सोडत आहोत).

पाण्याच्या जादा वापरावरून आपण पुणेकरांवर नेहमीच ताशेरे झोडता. मात्र आपल्याच विभागाच्या पाया खाली काय जळत आहे, हे बघण्याची तसदी सुद्धा आपण घेत नाही. पुण्याचे पालक मंत्री आपलीच री ओढून पुण्यावर पाणी कपात लादतात, मात्र जल संपदा विभागाच्या निष्क्रियतेकडे डोळेझाक करतात. हे पुणेकरांचे दुर्दैव आहे.

सजग नागरिक मंचची आग्रहाची मागणी आहे कि बेबी कालव्यामधून राडा रोडा तात्काळ काढून या कालव्यातून पूर्ण क्षमतेने म्हणजे ५५०MLD प्रतिदिन एव्हडे पाणी शेतीसाठी सोडण्याचे जल संपदा विभागाला निर्देश द्यावेत जेणेकरून पुण्याच्या १३५०MLD पाण्यात कपात न करता ही शेतीला पुरेसे पाणी मिळेल.

**७) पुणेकरांच्या माथी नवीन ''कचरा कर'' नको.-**

पुणेकरांवर १२०० रुपये ते २००० रुपयांपर्यंत नव्याने ''कचरा कर'' लागू करण्याचा प्रस्ताव मनपा प्रशासनाने स्थायी समिती समोर ठेवला आहे. हा कर मिळकत करातून वसूल करण्याचा घाट घातला गेला आहे. यातून मनपास २००-२२५ कोटी रुपये मिळण्याचा अंदाज आहे. आज रोजी मनपाची मिळकर कर, पाणी पट्टी आणि मनपाच्या जागांच्या भाड्याची थकबाकी १५०० कोटी रुपयांच्या घरात आहे. ही वसुली करण्यात प्रशासन सातत्याने, वर्षानुवर्षे अपयशी ठरत आहे. त्यामुळे प्रामाणिकपणे कर भरणाऱ्या नागरिकांच्याच माथी नवीन कर लावून उत्पन्नवाढीचा सोपा मार्ग प्रशासन अनुसरत आहे.. हे प्रामाणिक करदात्यांवर अन्यायकारक आहे. मनपाच्या घन कचरा विभागाने ओल्या कचऱ्यापासून वीज निर्मितीचे अनेक प्रकल्प उभारले आहेत. मात्र त्यातून अत्यंत अल्प वीज निर्मिती होते. हे प्रकल्प पूर्ण क्षमतेने चालले तर वीज बिलापोटी ८०-९० कोटी रुपये वाचू शकतात. मात्र येथेही प्रशासनाची उदासीनता दिसत आहे. २०१३-१४ व २०१४-१५ या २ वर्षात LBT चे रजिस्ट्रेशन घेतल्यापैकी फक्त ३२% डीलर्स ने विवरणपत्रे भरली व त्यापैकीही ५% विवरण पत्रांची सुद्धा आजवर छाननी झाली नाही, हे आम्ही निदर्शनास आणून देऊन ही प्रशासन सुस्त आहे. अश्या परिस्थित नवीन कर मंजूर करणे म्हणजे प्रशासनाच्या अकार्यक्षमतेवर पांघरूण घालण्या सारखे आहे.

अश्या परिस्थितीत नवीन कर मंजूर करणे म्हणजे प्रामाणिक पुणेकर करदात्यांवर बोजा टाकणारा हा ''कचरा कराचा'' प्रस्ताव आपण फेटाळून लावावा.व थकबाकी वसुली करण्यापासून, कचऱ्यापासून वीज निर्मिती प्रकल्प पूर्ण क्षमतेने चालविण्या पर्यंतच्या विविध उपाय योजना करून महसूल वाढविण्याचे आदेश प्रशासनास द्यावे.

**८) केंद्र सरकारला सेवाकर वेळेत न भरल्यामुळे, पुणे मनपाला ३.८० कोटी व्याज भरावे लागल्या घटनेची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करणे बाबत.-**

पुणे मनपाच्या आकाश चिन्ह व परवाना विभागाने जाहिरात फलकांपोटी ०१-०४-२००७ ते ३१-०३-२०११ अखेर पर्यंतचा सेवाकर जाहिरातदारांकडून वसूल न केल्याने केंद्र सरकारच्या सेवाकर विभागाने २.०८ कोटी सेवाकर मनपाला भरायला सांगितला होता. याविरुद्ध पुणे मनपाने करसल्लागार मार्फत २०१२ मध्ये अपील दाखल केले. मात्र करसल्लागाराच्या फी ला मान्यता न

मिळाल्याने या अपिलाचा एकतर्फी निकाल पुणे मनपाच्या विरोधात दिला गेला. त्यानंतर पुढे या निकाला विरुद्ध Tribunal कडेही ३ वर्षात अपील दाखल करण्यात आले नाही. सेवाकर विभागाने मनपाला नोटीस पाठवून या २.०८ कोटी रकमेवर ३.८० कोटी व्याज व २.०८ कोटी रुपये दंड भरण्यास सांगितले. यावर मनपाने मूळ रक्कम २.०८कोटी रुपये व ३.८० कोटी रुपये व्याज दिनांक २५-०९-२०१८ रोजी भरले असून दंडाची रकम २.०८कोटी रुपये बाबत अपील करणार असल्याचे सेवाकर विभागाला कळविले आहे. हे अपील करण्यास खूप उशिर झाला असल्याने संबंधित अपिलात Delay Condone न होण्याची शक्यता असल्याचे कर सल्लागाराने मनपाला कळविले आहे. अश्या परिस्थितीत मनपाला २.०८ कोटी रुपये दंड ही भरावा लागेल. या सगळ्यात मुळातच जाहिरातदारांकडून हा सेवाकर का वसूल केला गेला नाही, अपिलाचा निकाल एकतर्फी लागून ही हा सेवाकर वेळेत का भरला नाही? Tribunal कडे अपील करायला उशीर का झाला ? या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळणे आवश्यक आहे.

आपणास विनंती कि मूळ सेवाकराची रक्कम जाहिरातदारांकडून वसूल करण्यात अपयश आल्याच्या तसेच दामदुप्पट व्याज व दंड भरायला लागल्याच्या घटनेची दक्षता विभागाकडून चौकशी करून नागरिकांच्या करांचे पैसे दंड व व्याजापोटी वाया घालविणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करून हे पैसे त्यांचेकडून वसूल करावे.

**९) पुणे मनपा हद्दींतील मिळकतीचे GIS मॅपिंग रद्द कंत्राटदाराची बिले अदा न करण्यासंदर्भात.-**

आधीची बिले मान्य करताना कामगार कल्याण विभागाने संबंधित कंत्राटदाराने २१६२ माणसे कामावर ठेवली होती. याचे कोणतेही पुरावे (ESI, PF) घेतलेले नाहीत; तसेच एकच मिळकत वेगळ्या वेगळ्या बिलात दोनदा दाखवलेली नाही (दुबार) याची कोणतीही शहानिशा संबंधित कर संकलन विभागाने केलेली नाही तरीही बिले अदा झाली आहेत. आत्ताचे प्रलंबित बिल मान्य करण्याआधी पहिल्यापासून आत्तापर्यंतच्या बिलातील २१६२ कामगार कामावर असल्याचे पूर्ण पुरावे तसेच त्याच मिळकतीचे सर्वे चे बिल दुबार दिले गेले नसल्याचे करसंकलन विभागाचे Affidavit घेणे बंधनकारक करावे व तो पर्यंत कोणतेही पेमेंट करून नये अशी सजग

नागरिक मंचची मागणी आहे.कळविण्यास आनंद होत आहे कि माननीय मनपा आयुक्तांनी ही मागणी मान्य करून सुमारे ४० टक्के कपात करून बिले अदा करण्याचे आदेश प्रसूत केले आहेत

**१०) कालवा फुटी मुळे बाधित नागरिकांना देण्याची नुकसान भरपाई जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांकडून वसूल करावी.-**

काल पुण्यात झालेल्या कालवा फुटी दुर्घटनेला संपूर्णपणे जलसंपदा विभागाचे अधिकारी जबाबदार आहेत. कालवा समितीची बैठक झाली नसताना, शेतकऱ्यांची कोणतीही मागणीपत्र गोळा न करता, कालव्यामधून १२००/१३०० क्युसेक ने पाणी शेतीसाठी सोडल्यानेच त्या प्रेशर ने कालवा फुटला. पुण्यातील कॅन्टोन्मेंट जलशुद्धीकरण केंद्रासाठी कालव्यातून फक्त ३०० क्युसेक पाणी सोडणे आवश्यक आहे आणि तेव्हडेच पाणी सोडले असते तर कालवा फुटलाच नसता. आणि अगदी दुर्घटना झालीच असती तरीही एव्हडी नुकसानी झालीच नसती.

जलसंपदा विभागाच्या आग्रहावरून पुणेकरांच्या करांचे १०० कोटी रुपये खर्च करून मुंढवा येथे पुण्याचे सांडपाणी शुद्ध करून पुढे शेतीसाठी पुनर्वापरा साठी बेबी कॅनाल मध्ये सोडण्याची योजना २ वर्षांपूर्वी कार्यान्वित झाली. त्यातून रोज ५५०MLD पाणी (वर्षाला ६.५० TMC) पाणी या प्रकल्पातून शेतीसाठी सोडता येऊ शकते. मात्र जल संपदा विभागाने २ वर्षात मिळून फक्त ६.५०TMC पाणी या प्रकल्पातून शेतीसाठी उचलले आहे. व त्यामुळे ६.५०TMC धरण्याचे पिण्याचे पाणी अकारण शेतीसाठी वापरले गेले. यंदा पाऊस थांबल्यानंतरही १ सप्टेंबर पासून जेंव्हा मुठा कालव्यातून १२०० क्युसेक ने धरणातून शेतीसाठी पाणी सोडले जात होते त्याच काळात २० सप्टेंबर पर्यंत मुंढवा प्रकल्पातून जलसंपदा विभागाने शेतीसाठी पाणी घेतले नाही.

या सर्व गोष्टीतून तात्पर्य एकच निघते कि जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांची बेपर्वाई व हम करे सो कायदा या वृत्तीमुळे कालवा फुटून शेकडो लोकांच्या मालमत्तेचे प्रचंड नुकसान झाले आहे. या सर्वांना महाराष्ट्र शासन / मनपा आता नुकसान भरपाई देईल. सजग नागरिक मंचची मागणी आहे कि सदरहू नुकसान भरपाई जनतेच्या करांच्या पैश्यातून न देता कालवा फुटीस जबाबदार जलसंपदा अधिकाऱ्यांकडून वसूल करावी.

**११) कालवा फुटी संदर्भात -**

कालव्यातून ह्या हंगामाचे पाणी सोडता येत नसल्याचा नियम असून कालव्यातून कोणी, कोणत्या अधिकारात कालव्यातून पाणी सोडले ? मुख्य अभियंता, पाटबंधारे व त्यांचे वरिष्ठ जिल्हाधिकारी यांचे उत्तर देणार का ? पुण्याचे पाणी कमी करण्याऱ्या पाठबंधारे खात्याच्या धमकीनंतर विसर्जनासाठीही पाणी न सोडणाऱ्या पाटबंधारे खात्याचे हे षडयंत्र नाही.

**१२) केंद्र सरकारने DGSD मार्फत Rate Contract केलेल्या "Tata Motors" कंपनीचे स्वस्त Road Sweeper Truck न घेता महागडे चिनी Road Sweeper Truck इंजिन घेणाऱ्या पुणे महानगरपालिकेची चौकशी करणे बाबत. -**

पुणे मनपाने ३ प्रभागांमध्ये यांत्रिक पद्धतीने रस्त्यांची साफसफाई करण्याचे काम ५ वर्षांसाठी देण्याचे टेंडर मंजूर केले आहे. यासाठी मनपा ५ वर्षात ४८ कोटी रुपये खर्च करणार आहे. यामध्ये टाटा मोटर्स कंपनीचे TATA LPT १६१३ BS IV **हे ९** Road Sweeper Truck कंत्राटदार घेणार असून त्यासाठी त्याने ७८ लाख रुपये प्रति ट्रक किंमत दाखवली असून त्यावर २८% GST लावण्यात आला आहे. केंद्र सरकारच्या GEMGOV साईट वर TATA Motors कंपनीच्या याच Road Sweeper truck ची किंमत ५९.२५ लाख दाखवली असून त्यावर २८% GST धरला तरीही किंमत ७८ लाख रुपयांच्या वर जात नाही. डिलरसाठी हीच किंमत ४७ लाख रुपये( २८% GST EXTRA) असल्याचे ही GEMGOV साईट नमूद करण्यात आले आहे. असे ९ स्वीपर ट्रक या कंत्राटामध्ये असल्याने GEMGOV मधील किमती पेक्षा २ कोटी रुपये मनपा जास्त मोजणार आहे. अशी आम्ही दिनांक २७-०९-२०१८ रोजी मनपा आयुक्तांकडे तक्रार दाखल केली होती. या आमच्या तक्रारीनंतरही Tata Motors कंपनीची Chassis आणि Dongfeng हे चिनी बनावटीचे Auxiliary Engine (किंमत ७० लाख रुपये) अशा नऊ Road Sweeper Trucks ची ऑर्डर पुणे मनपाने दिली आहे. ही ऑर्डर देताना Tata Motors, GEMGOV वरील मॉडेल Tata Motors कडे उपलब्ध नाही तसेच त्याचे Auxiliary Engine हे BS IV नसल्याचे सांगून सजग नागरिक मंचची Objections फेटाळून लावली. वस्तुतः केंद्र सरकारने DGS&D मार्फत ''स्वच्छ भारत'' साठी Tata Motors

कंपनीच्या मॉडेल चे Rate Contract केले आहे ; २०१६ मध्ये दिल्ली सरकारने Tata Motors कंपनीचे हेच १६ ट्रक विकत घेतले. दिल्लीमध्ये चालणारे, स्वच्छ भारत मध्ये देशभर चालणारे, Tata Motors चे हे मॉडेल पुण्यात चालत नाही हे आश्चर्यकारक आहे. गेल्या आठवड्यात मुंबईला झालेल्या औद्योगिक प्रदर्शनात Tata Motors च्या स्टॉलला आम्ही भेट दिली असता त्यांनी Tata Motors हे मॉडेल तयार करते व Auxiliary Engine सुद्धा BS IV असल्याचे सांगितले, एव्हडेच नाही तर त्यांचे माहितीपत्रकही दिले. या माहितीपत्रकात ''महानगरपालिकांसाठी हे मॉडेल Special Price मध्ये उपलब्ध असल्याचे नमूद आहे''.

आजमितीला केंद्र सरकारने DGS&D मार्फत "Rate Contract" केलेले Tata Motors कंपनीचे मॉडेल ६३.५६ लाखाला (GST धरून) उपलब्ध असताना मनपा चीनमधून Auxiliary Engine आयात करून ९९ लाखाचे मॉडेल विकत घेणार आहे. असे ९ ट्रक विकत घेणार असल्याने मगनगरपालिकेचे ३ कोटी रुपयांचे नुकसान होणार आहे. ज्या Dongfong कंपनीचे Auxiliary Engine मनपा घेणार आहे त्याची किंमत ७० लाख रुपये आहे. मनपाने आम्हास दिलेल्या इंजिनच्या प्रमाणपत्रात असे नमूद केले आहे कि सदर चे इंजिन युरोप येथे वापरता येणार नाही, असे इंजिन भारतात आपण कसे वापरणार आहोत ? हे अनाकलनीय आहे. आजरोजी Alibaba च्या संकेत स्थळावर याच कंपनीच्या dongfeng qsb5.9 engine,qsb5.9-c160 - 30 (160 HP) मॉडेलची किंमत फक्त USD ७,००० डॉलर (५.५० लाख रुपये ) दाखवत आहे. मनपाची Specifications १२० HP चीच आहे. म्हणजेच Import Duty वगैरे धरून हे इंजिन १० लाखांपर्यंत मिळू शकते तरीही मनपा १७० HP चे इंजिन ७० लाखाला घेत आहे, हे अनाकलनीय आहे.

या सगळ्याचा मतितार्थ पुणे मनपाने विशिष्ट कंपनी चे विशिष्ट मॉडेल डोळ्यासमोर ठेऊन टेंडर Specifications तयार केले आणि दिल्लीसह संपूर्ण भारतात चालणारे; केंद्र सरकारने DGS&D मार्फत Rate कॉन्ट्रॅक्ट केलेले व स्वस्त असणारे Tata Motors कंपनीचे मॉडेल जाणून बुजून नाकारण्यात आले आहे व पुणेकरांच्या करांचे ३ कोटी रुपये नाहक वाया जाणार

आहेत. आपणास विनंती कि केंद्र सरकारच्या "Make In India" धोरणाला खो घालून चिनी बनावटीची यंत्रे विकत घेण्याच्या प्रकारची आपण याची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी.

**१३) पुणे महानगरपालिकेच्या लोकशाही दिनात जिल्हाधिकारी कार्यालय तसेच पोलीस वाहतूक पोलीस यांचे प्रतिनिधी उपस्थित राहात नसल्याबद्दल तक्रार.**

सर्वसामान्य जनतेच्या तक्रारी / अडचणी यांच्या न्याय व तत्परतेने शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी एक प्रभावी उपाय योजना म्हणून लोकशाही दिन मनपा स्तरावर दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी राबविण्यात येतो. लोकशाही दिनाच्या कार्यवाही संधर्भात महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने २६ सप्टेंबर २०१२ रोजी एक परिपत्रक जारी केले आहे. त्यात मनपाच्या लोकशाही दिनात जिल्हाधिकारी यांच्या वतीने अप्पर जिल्हाधिकारी वा निवासी उपजिल्हाधिकारी आणि वाहतूक पोलीस शाखेतील वरिष्ठ अधिकारी यांनी उपस्थित राहावे, असे निर्देशित केले आहे. या संदर्भात पुणे मनपाकडून माहिती मागितली असता गेल्या तीन वर्षात जिल्हाधिकारी कार्यालय तसेच वाहतूक पोलीस यापैकी कोणाचाही प्रतिनिधी एकाही लोकशाही दिनात हजार नसल्याचे त्यांनी कळविले आहे. हा शासन आदेशाचा भंग आहे.

म्हणून सजग नागरिक मंचने विनंती केली आहे कि आपण संबंधित दोन्ही यंत्रणांना तातडीने समज देऊन शासकीय परिपत्रकाचे तंतोतंत पालन करून यापुढील पुणे मनपाच्या प्रत्येक लोकशाही दिनात पूर्ण वेळ हजर राहण्याचे आदेश काढावेत.

**१४) CCTV भाड्याने घेण्याच्या प्रक्रियेत मनपाचे मोठे नुकसान व गैरप्रकार.**

गेली अनेक वर्षे पुणे मनपा गणेशउत्सवा दरम्यान विविध घाटांवर CCTV कॅमेरे बसवते. यंदाही पुणे मनपाने शहरातील विविध घाटांवर अनेक ठिकाणी CCTV कॅमेरे बसवण्यासाठी एकूण सुमारे ५० लाख रुपयांच्या निविदा जारी केल्या. या निविदा स्थायी समिती किंवा अतिरिक्त आयुक्त यांचेकडे मंजुरीसाठी पाठवाव्या लागू नयेत म्हणून जाणून बुजून ५ वेगवेगळ्या निविदांमध्ये मिळून सुमारे ५० लाखांच्या कामांचे विभाजन करण्यात आले आहे. मागील वर्षी देखील हाच प्रकार करण्यात आला होता आणि तेंव्हा या निविदांना नाईलाजाने मान्यता देताना माननीय अतिरिक्त आयुक्त सौ. शीतल तेली उगले यांनी खालील आक्षेप घेतले होते.

१- समान कामांसाठी आर्थिक तरतुदींचे विभाजन करून स्थायी समितीची मान्यता टाळण्याचा सकृत दर्शनी उद्देश्य दिसून येतो.
२ - आर्थिक तरतूद मे २०१८ मध्ये उपलब्ध असून ही प्रत्यक्ष निविदा मान्यतेसाठी ऐनवेळी (गणेशउत्सवां दरम्यान) सादर करण्यात आली .

सदरहू निविदा पर्याय नसल्याने मान्य करत असल्याचे त्यांनी नमूद केले होते भविष्यात एकाच आर्थिक तरतुदीचे विभाजन करून निविदा मागविण्यास सक्त मनाई करण्यात येत आहे असे बजावले होते. त्यांच्या निर्देशांचा भंग करीत यंदा ही ५ वेगवेगळ्या निविदा काढण्यात आल्या आहेत. गेली ५ वर्षे पुणे मनपा दरवर्षी गणेश विसर्जन घाटांवर भाड्याने CCTV कॅमेरे घेण्यासाठी ५० लाख रुपये खर्च करते आहे. गेली ५ वर्षे आम्ही सातत्याने मागणी करत आहोत कि ही यंत्रणा ५० लाख रुपयांमध्ये कायमस्वरूपी विकत घेता येऊ शकते व वारी पासून गणेश उत्सवापर्यंत हव्या तेंव्हा फक्त Labour Charges Basis वर बसविण्यासाठी अत्यन्त कमी खर्चात निविदा काढता येऊ शकतात. मात्र याकडे जाणून बुजून दुर्लक्ष्य करून दरवर्षी कंत्राटदाराच्या फायद्यासाठी वारी आणि गणेश उत्सव या दोन्ही वेळी मिळून जवळपास ७० लाख रुपये CCTV यंत्रणा भाड्याने घेण्यावर खर्च केले जातात. मुळातच गणेश विसर्ज घाटांवर CCTV बसविणे हे शांतात, सुव्यवस्था व सुरक्षितता यासाठी आवश्यक असल्याने ते पोलिसांचे काम आहे, तरीही खर्च करायची संधी सोडायची नाही, या हेतू ने मनपा हे काम करत आहे.

सजग नागरिक मंचची मागणी आहे कि आपण ही टेंडर्स तातडीने रद्द करून ही यंत्रणा विकत घेण्याचे टेंडर काढावे. यंदाचा गणेश उत्सव पूर्ण होताच ही सर्व यंत्रणा पोलिसांकडे कायमस्वरूपी सुपूर्त करावी. जेणेकरून पुढील काळात त्यांना ही यंत्रणा, वारी व गणेश उत्सव व अन्य अनेक प्रसंगी वापरता येईल. याच बरोबर जाणून बुजून एकाच कामाचे विभाजन करून वेगवेगळी टेंडर्स काढून भाड्याची यंत्रणा घेऊन काम काढणाऱ्या अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करावी.

**१५) जलसंपदा विभाग (यांत्रिकी) यांचे तिल्लारी प्रकल्पासाठी चे tender क्र. ०७/०१ For २०१८ – २०१९, अनावश्यक ; अनाठायी आणि फुगवलेले–**

जलसंपदा विभाग ( यांत्रिकी ) ; पुणे यांनी सिंधुदुर्ग जिह्यातील तिल्लारी या जलविद्युत प्रकल्पासाठी काढलेली निविदा क्र. अनावश्यक ; अनाठायी आणि फुगवलेली असून त्यातील खालील गोष्टी धक्कादायक आहेत.

१. हा विद्युत निर्मिती प्रकल्प ३० वर्षांपूर्वीच महानिर्मिती कडे हस्तांतरित झाला असताना आता जलसंपदा विभाग (यांत्रिकी) यांना त्याच्या देखभाल दुरुस्तीची निविदा काढण्याचे कारणच काय ?

२. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील या प्रकल्पाच्या निविदा पुणे विभागातून काढण्याचे कारणच काय जेंव्हा कि हा प्रकल्प कोल्हापूर विभागाच्या अखत्यारीत येतो आणि तेथे अधीक्षक अभियंता दर्जाचा अधिकारी आहे.

३. ०७/०१ For २०१८ – २०१९, या निविदे मध्ये ४ air valves व ४ sluice valves घेण्यासाठी जवळपास ८० लाख रुपये खर्च करण्यात येणार आहेत आणि ते फक्त बसवण्यासाठी जवळपास ४५ लाख रुपये खर्च करण्यात येणार आहेत. या valves ची specifications जाणून बुजून अकारण अशी ठेवण्यात आली आहेत कि हे valves निर्धारित दर पत्रिकेत (DSR) बसू नयेत इतकेच नाही तर भारतातही मिळूच नयेत व import करावे लागावेत. एका वेळी ४–४ valves खराब झाले असतील तर हा प्रकल्प बंदच असायला हवा होता मात्र असे काहीही घडलेले नाही. या निविदा मंजूर करताना अधीक्षक अभियंता आणि मुख्य अभियंता यांनी हे बघणे आवश्यक असताना त्यांनी काय केले?

४. २०१५ साली अश्या प्रकारच्या कामांमध्ये पारदर्शकता रहावी व कामांची आवश्यकता आहे किंवा कसे याची शहानिशा व्हावी यासाठी मुख्य अभियंता जलसंपदा (यांत्रिकी) यांनी परिपत्रक क्रमांक ३२८/२०१५ (संलग्न) द्वारे एका समितीची स्थापना करून या समितीची मान्यता घेतल्याशिवाय टेंडर्स काढू नयेत असे निर्देशित केले होते, परंतु प्रत्यक्षात या प्रकरणामध्ये या तांत्रिक समितीकडे टेंडर्स न पाठवताच परस्पर टेंडर्स काढण्यात आली आहेत.

वरील गोष्टी बघता ही दीड कोटी रुपयांची निविदा म्हणजे नागरिकांच्या करांच्या पैशाची सरळसरळ उधळपट्टी असून सदरहू निविदा तातडीने रद्द करणे आवश्यक असून ते काढणाऱ्या आणि मंजुरी देणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी झाली पाहिजे अशी सजग नागरिक मंचची मागणी आहे.

**१६) ३ प्रभागांमध्ये यांत्रिकीकरणाने रस्ते साफसफाई टेंडरमध्ये मनपाचे (पर्यायाने नागरिकांच्या करांच्या पैशांचे) १५ कोटी रुपयांचे नुकसान.-**

पुणे मनपाने ३ प्रभागांमध्ये यांत्रिक पद्धतीने रस्त्यांची साफसफाई करण्याचे काम ५ वर्षांसाठी देण्याचे टेंडर मंजूर केले आहे. यासाठी मनपा ५ वर्षात ४८ कोटी रुपये खर्च करणार आहे. यामध्ये टाटा मोटर्स कंपनीचे TATA LPT १६१३ BS IV हे ९ Road Sweeper truck कंत्राटदार घेणार असून त्यासाठी त्याने ७८ लाख रुपये प्रति ट्रक किंमत दाखवली असून त्यावर २८% GST लावण्यात आला आहे. केंद्र सरकारच्या GEMGOV साईट वर TATA Motors कंपनीच्या याच Road Sweeper truck ची किंमत ५९.२५ लाख दाखवली असून त्यावर २८% GST धरला तरीही किंमत ७८ लाख रुपयांच्या वर जात नाही. डिलरसाठी हीच किंमत ४७ लाख रुपये (२८% GST EXTRA) असल्याचे ही GEMGOV साईट नमूद करण्यात आले आहे. असे ९ स्वीपर ट्रक या कंत्राटामध्ये असल्याने GEMGOV मधील किमती पेक्षा २ कोटी रुपये मनपा जास्त मोजणार आहे. हेच स्वीपर ट्रक मनपाने विकत घेतले तर मनपाला ते डिलर किमतीला TATA Motors कडून मिळू शकतात म्हणजे मनपाचे ९ ट्रक साठी फक्त ५. ५० कोटी रुपये खर्च होतील. आज रोजी या कामाचे Breakup पहिले तर मंजूर tender मध्ये मनपा प्रति किमी ३०० रुपये या स्वीपर truck च्या किमतीपोटी तर ४५० रुपये प्रति किमी Operating Expenses पोटी देणार आहे. (दर वर्षी तीन प्रभागात मिळून ५, ६१, ६००Kms. हे truck काम करणार आहेत) याचाच अर्थ कि पुणे मनपाने हे Road Sweeper truck विकत घेतले आणि कंत्राटदारास Operating Expenses Basis वर चालविण्यास देण्याचे टेंडर काढले तर मनपाचे ३ प्रभागात मिळून प्रतिवर्षी ३ कोटी म्हणजेच ५ वर्षात १५ कोटी रुपये वाचतील. याचाच अर्थ मनपा आज ५ वर्षांसाठी जे कंत्राट ४८ कोटी रुपयांना देणार आहे ते काम फक्त Operating Expenses Basis वर दिले तर मनपाला हे काम ३३ कोटी रुपयांमध्ये हे काम करून मिळेल.

अर्थात या करिता मनपाला ६ कोटी रुपयांची गुंतवणूक करून ९ ट्रक विकत घ्यावे लागतील ; ही रक्कम मनपासाठी फारच किरकोळ आहे.

सजग नागरिक मंचची मागणी आहे कि हे मंजूर केलेले टेंडर तातडीने रद्द करावे व फक्त Operating Expenses Basis पद्धतीचे टेंडर काढावे व मनपाने TATA Motors कंपनीकडून हे ९ Sweeper Truck विकत घ्यावे जेणेकरून नागरिकांच्या करांचे १५ कोटी रुपये वाचतील.

**१७) पुण्याच्या पाण्यावरून पुणेकरांना घाबरविण्यापेक्षा योग्य नियोजन करा-**

टेमघर धरणाच्या दुरुस्ती करिता टेमघर धरणात असलेले २. ३४ TMC पाणी डिसेंबर अखेर पर्यंत सोडून देऊन टेमघर रिकामे करावे लागणार असल्याने पुणेकरांनी आता पाणी काटकसरीने वापरण्याचा प्रस्ताव येऊ घातला आहे. पुण्याच्या पाण्याबाबत जलसंपदा विभागाने सातत्याने सावत्र भाव ठेवला आहे. टेमघर रिकामे करावे लागणार असल्याची धमकी देऊन पुन्हा एकदा पुणेकरांना घाबरविण्याची नौटंकी त्यांनी सुरु केली आहे. मुळातच ३० सप्टेंबरला पावसाळा संपेल तेंव्हा कदाचित ४ ही धरणे गच्च भरली असतील असे गृहीत धरले तरी ऑक्टोबर - डिसेंबर या तीन महिन्यात पुण्याला पिण्यासाठी १.४० TMC / प्रतिमाह या प्रमाणे ऑक्टोबर - डिसेंबर या ३ महिन्यात ४.२० TMC पाणी लागणार आहे. या शिवाय शेतीसाठीची रब्बी आवर्तन डिसेंबर मध्ये सुरु होते त्याकरिता डिसेंबर मध्ये १.५० TMC पाणी लागणार आहे. त्यामुळे खडकवासलातील १.९७ TMC आणि टेमघर मधील २.३४ TMC हे पाणी प्राधान्याने वापरल्यास टेमघर धरण १५ डिसेंबर पर्यंतच रिकामे होऊ शकते. त्यामुळे पाणी सोडून देण्याची वेळ येण्याचे कोणतेही कारण नाही. मुळातच धरण दुरुस्तीसाठी गेल्याही वर्षी अश्याच प्रकारे टेमघर धरण रिकामे केले गेले होते. तरीही दुरुस्ती पूर्ण होऊ शकली नाही. यंदातरी ही दुरुस्ती पूर्ण होणार का ? व पुढील वर्षी टेमघर धरणात पूर्ण क्षमतेने पाणी साठविता येणार का ? या प्रश्नांची उत्तरे जलसंपदा विभागाने पुणेकरांना देणे आवश्यक आहे.

**१८) पुण्याच्या पाण्यावरून पुणेकरांना घाबरविण्यापेक्षा योग्य नियोजन करा–**

टेमघर धरणाच्या दुरुस्ती करिता टेमघर धरणात असलेले २.३४ TMC पाणी डिसेंबर अखेर पर्यंत सोडून देऊन टेमघर रिकामे करावे लागणार असल्याने पुणेकरांनी आता पाणी काटकसरीने वापरण्याचा प्रस्ताव येऊ घातला आहे. पुण्याच्या पाण्याबाबत जलसंपदा विभागाने सातत्याने सावत्र भाव ठेवला आहे. टेमघर रिकामे करावे लागणार असल्याची धमकी देऊन पुन्हा एकदा पुणेकरांना घाबरविण्याची नौटंकी त्यांनी सुरु केली आहे. मुळातच ३० सप्टेंबरला पावसाळा संपेल तेंव्हा कदाचित ४ ही धरणे गच्च भरली असतील असे गृहीत धरले तरी ऑक्टोबर – डिसेंबर या तीन महिन्यात पुण्याला पिण्यासाठी १.४० TMC / प्रतिमाह या प्रमाणे ऑक्टोबर – डिसेंबर या ३ महिन्यात ४.२० TMC पाणी लागणार आहे. या शिवाय शेतीसाठीची रब्बी आवर्तन डिसेंबर मध्ये सुरु होते त्याकरिता डिसेंबर मध्ये १.५० TMC पाणी लागणार आहे. त्यामुळे खडकवासलातील १.९७ TMC आणि टेमघर मधील २.३४ TMC हे पाणी प्राधान्याने वापरल्यास टेमघर धरण १५ डिसेंबर पर्यंतच रिकामे होऊ शकते. त्यामुळे पाणी सोडून देण्याची वेळ येण्याचे कोणतेही कारण नाही. मुळातच धरण दुरुस्तीसाठी गेल्याही वर्षी अश्याच प्रकारे टेमघर धरण रिकामे केले गेले होते. तरीही दुरुस्ती पूर्ण होऊ शकली नाही. यंदातरी ही दुरुस्ती पूर्ण होणार का ? व पुढील वर्षी टेमघर धरणात पूर्ण क्षमतेने पाणी साठविता येणार का ? या प्रश्नांची उत्तरे जलसंपदा विभागाने पुणेकरांना देणे आवश्यक आहे.

**१९) पुणे महापालिका हद्दीतील घरांना स्मार्ट digital door numbering करण्याचा अनावश्यकप्रकल्प रद्द केल्याबद्दल पुणेकरांचे करांचे १० कोटी रुपये वाचवल्याबद्दल महापालिका आयुक्त आणि अतिरिक्त महापालिका आयुक्तांचे मनपूर्वक अभिनंदन–**

पुणे महापालिका हद्दीतील घरांना स्मार्ट digital door numbering करण्याचा अनावश्यक आणि पुणेकरांचे करांचे पैसे पाण्यात घालणारा प्रकल्प रद्द केल्याबाबत आणि पुणेकरांचे करांचे १० कोटी रुपये वाचवल्याबद्दल महापालिका आयुक्त आणि अतिरिक्त महापालिका आयुक्तांचे मनपूर्वक अभिनंदन . कालच्या सोमवारच्या माहिती अधिकार दिनात या बहुचर्चित प्रकल्पाची कागदपत्रे आम्ही पहिली असता हे tender रद्द करण्याचा निर्णय महापालिका

आयुक्त आणि अतिरिक्त महापालिका आयुक्तांनि घेतल्याचे दिसून आले. सदरहू निर्णय घेताना या दोघांनीही जी मीमांसा केली आहे ती अत्यंत महत्वाची असून तांत्रिक क्षमता नसताना ही अशा प्रकारची tenders काढण्याच्या प्रवृत्तींवर कोरडे ओढण्याचे काम या उभयतानी केले हे निश्चितच अभिनंदनीय आहे ; महापालिकेचे सर्वच विभाग यातून बोध घेतील अशी आशा आहे .

**२०) विविध शहरातील प्रवासी केंद्रीत बससेवा व पीएमपीएमएल, यावर प्रवासी मेळाव्यात चर्चा पीएमपी प्रवासी मंचतर्फे आयोजन–**

वाहतूक तज्ज्ञ प्रसन्न पटवर्धन हे या महिन्यातील प्रवासी मेळाव्यात मार्गदर्शन करणार आहेत.

शनिवार, दिनांक १८/०८/२०१८ रोजी सायंकाळी ५ वाजता म्हात्रे पूलाजवळील इंद्रधनुष्य सभागृहात मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.यावेळी जुगल राठी ,विवेक वेलणकर, मंचाचे सदस्य आणि पीएमपी बस प्रवासी उपस्थित राहणार आहेत.प्रसन्न पटवर्धन हे इतर शहरातील बससेवा, सुविधा आणि पीएमपीएमएलची सद्यस्थिती व उपाययोजना याविषयी यावेळी मार्गदर्शन करणार आहेत.

मेळाव्यात सजग व सक्रिय बस प्रवाशांचा गौरव करुन मोफत बस पास वाटप देखील करण्यात येणार आहे.तसेच तुषार सास्ते या पीएमपीच्या वाहकाचा प्रवाशांना सहकार्य व सौजन्यशील सेवा दिल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात येणार आहे.दुचाकीपेक्षा स्वस्त पीएमपी म्हणजे ५ रुपयात ५कि.मीटर,प्रभावी हेल्पलाईन, डिजीटल स्थलदर्शक फलक,प्रमुख थांब्यावर सुरक्षित बसबे, संपूर्ण दरवाढ रद्द करणे या मागण्यांसाठी आमचा लढा सुरुच राहणार आहे.

**२१) कचराप्रकल्पांमध्ये नागरिकांच्या करांच्या पैश्याचा कचरा.–**

पुणे मनपाने गेल्या काही वर्षात कचऱ्यापासून वीजनिर्मिती करणारे २५ प्रकल्प शहरातील अनेक भागांमध्ये उभारले आहेत. या निमित्याने शहरातील सुमारे १२५ टन ओल्या कचऱ्याची विल्हेवाट लागून त्यातून मनपाचा फायदा व्हावा हा उद्धेश्य होता. या प्रकल्पांवर सुमारे १६ कोटी रुपये खर्च झाले आहेत. देखभाल दुरुस्तीवर २. ५० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च झाला आहे . या प्रकल्पांसंबंधी १–०१–२०१८ ते ३०–०६–१८ या कालावधीची माहिती, माहिती अधिकारात घेतली असता खालील धक्कादायक गोष्टी समोर आल्या आहेत.

१ – बाणेर, हडपसर १, हडपसर २, पेशवे पार्क १ व कात्रज रेल्वे म्युजियम हे ४ प्रकल्प पूर्ण बंद होते त्यामुळे या ठिकाणी १ टन ही कचरा पाठवला गेला नाही तसेच गॅस व वीज निर्मिती झाली नाही. या सगळ्यात धक्कादायक गोष्ट म्हणजे ऑक्टोबर २०१५ पासून हडपसर १, हडपसर २, पेशवे पार्क व कात्रज रेल्वे म्युजियम हे ४ प्रकल्प बंद आहेत. तर बाणेर प्रकल्प जून २०१७ पासून बंद आहे.

२ – येरवडा, वडगाव १, वडगाव २, घोले रोड, वानवडी या ५ प्रकल्पात १ ही युनिट वीज निर्मिती झाली नाही.

३ – पेशवे पार्क २, फुलेनगर, वडगाव १, वडगाव २ या प्रकल्पांमध्ये ३८ % पेक्षा कमी कचरा जिरवला गेला. एकूणातच दररोज १२५ टन कचरा जिरविण्याची क्षमता असणाऱ्या या २५ प्रकल्पात मिळून सरासरी ६५ % कचरा पाठवला गेला.

गेल्या ३ वर्षात आम्ही मनपाच्या कचऱ्यापासून वीजनिर्मिती प्रकल्पांची ही दुरावस्था ४ वेळा आपल्या नजरेला आणून देऊनही आपल्याकडून कोणतीच कारवाई न झाल्याने नागरिकांच्या करांच्या पैश्यांचा कचरा होतो आहे हे पुणेकरांचे दुर्दैव आहे.

याहून धक्कादायक बाब म्हणजे फुलेनगर येथील बायोगॅस प्रकल्प चालविण्याचे कामाच्या टेंडरला नुकतीच स्थायी समितीची मान्यता मिळाली आहे (टेंडर क्रमांक ६९-२०१७). तान्त्रिक छाननी समितीने या टेंडरच्या पूर्वगणना पत्रकात ७४५ रुपये प्रतिटन एव्हडा दर देण्याचे मंजूर केले होते; ज्याप्रमाणे ५ वर्षा साठी ६७ लाख रुपये खर्च होणार होता मात्र अचानकपणे टेंडर अटी /शर्ती मध्ये बदल करून कंत्राटदारास process केलेल्या कचरयाच्या प्रमाणात ७४५ रुपये प्रतिटन एव्हडा दर देण्याची अट काढून एकवट ७३.७७ लाख रुपये (१०% Above) रुपये देण्याचे ठरवले गेले.म्हणजे प्रकल्पात एक टनही कचरा पाठवला गेला नाही तरी ठेकेदारास पूर्ण पैसे मिळणार आहेत. फुलेनगर मध्ये प्रतिमाह १५० टन कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची सोय असताना गेल्या वर्षभरात तेथे प्रतिमाह ८१ टन कचरा फक्त पाठवला जातो. ही वस्तुस्थिती बघता पुढील काळात ही या प्रकल्पात प्रतिमाह १५० टन ऐवजी निम्माच कचरा पाठवला गेला तरी

कंत्राटदारास पूर्ण पैसे मिळणार आहेत आणि हा आतबट्ट्याचा व्यवहार होणार आहे. धानोरी येथेही (टेंडर क्रमांक ७०-२०१७) अशाच प्रकारचे टेंडर मंजूर झाले आहे.

महानगरपालिकेचा आजवरचा इतिहास बघता या दोन्ही प्रकल्पात पूर्ण क्षमतेने दरमहा १५० टन कचरा जाण्याची फारशी शक्यता नसताना कंत्राटदाराला प्रति टन पैसे देण्याऐवजी एकवट पैसे देण्याचे टेंडर मान्य केल्याने कंत्राटदाराचा फायदा व महानगरपालिकेचा तोटाच होणार आहे. सजग नागरिक मंचची विनंति आहे कि दोन्ही टेंडर्स रद्द करून परत एकदा प्रतिटन बेसिसवरच कंत्राटदारास पैसे देण्याचे टेंडर काढावे आणि विनाकारण मनपाचे आर्थिक नुकसान करणारे टेंडर काढणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांचेवर कारवाई करावी.

**२२) जलसंपदा खात्यातील उधळपट्टी रोखण्याबाबत.**

जल संपदा विभाग (यांत्रिकी), पुणे यांनी टेंडर क्रमांक २०१८ _WRDMN_ ३०११६ मध्ये ७ वेगवेगळी टेंडर्स काढून धरणांच्या दारांची दुरुस्ती व त्यांना रंग देणे ही २ कोटी रुपयां पेक्षा अधिकची कामे भर पावसाळ्यात करण्याचा घाट घेतला आहे. २०१५ साली अश्या प्रकारच्या कामांमध्ये पारदर्शकता रहावी व कामांची आवश्यकता आहे किंवा कसे याची शहानिशा व्हावी यासाठी मुख्य अभियंता जलसंपदा (यांत्रिकी) यांनी परिपत्रक क्रमांक ३२८ / २०१५ (संलग्न) द्वारे एका समितीची स्थापना करून या समितीची मान्यता घेतल्याशिवाय टेंडर्स काढू नयेत असे निर्देशित केले होते, परंतु प्रत्यक्षात वरील प्रकरणामध्ये या तांत्रिक समितीकडे टेंडर्स न पाठवताच परस्पर टेंडर्स काढण्यात आली आहेत. वस्तुतः आज रोजी दापोडी येथे खात्याच्या कार्यशाळेत यंत्रणा व कामगार विनावापर असताना व त्यांना पुरेसे काम उपलब्ध नसताना ही टेंडर्स काढून नागरिकांच्या करांच्या पैश्याची उधळपट्टी करण्याचा घाट घातला आहे.आपणास विनंती कि तात्काळ ही टेंडर्स रद्द करून ही सर्व कामे खात्याच्या अंतर्गत विनावापर पडून असलेल्या यंत्रणेचा वापर करून, करण्याचे आदेश संबंधितांना द्यावेत, व तसेच मुख्य अभियंत्यांनी गठित केलेल्या समितीच्या सल्ला न घेता परस्पर टेंडर्स काढण्याच्या उद्योगांची चौकशी करून यासाठी जबाबदार अधिकाऱ्यावर कारवाई करावी.

**२३) खात्याची मशीनरी पडून असताना कंत्राटदाराकडून भाड्याने घेण्याच्या उद्योगांना आळा घालण्या बाबत.–**

कार्यकारी अभियंता (मॅकेनिकल Division) जलसंपदा पुणे यांनी १०-०७-१८ रोजी २ टेंडर्स काढली आहेत. यातील टेंडर क्रमांक २०१८_WRDMN_328024_4 या टेंडर मध्ये सांगोला येथील Canal मध्ये गाळ काढण्यासाठी २ Excavators व ४ डंपर्स भाड्याने घेण्यासाठी २६. ९६ लाख रुपयांचे टेंडर काढले आहे. तसेच टेंडर क्रमांक २०१८_WRDMN_328024_1 मध्ये, नीरा उजव्या कालव्यामध्ये गाळ काढण्यासाठी ५ लोडर्स भाड्याने घेण्यासाठी १४. ९५ लाख रुपयाचे टेंडर काढण्यात आले आहे. सातारा, सांगली, कोल्हापूर व सोलापूर तसेच उर्वरित महाराष्ट्रातील जलसंपदा कार्यालय मधील डझनावारी अशी मशिनरी वापराविना पडून आहे. याशिवाय बहुतांशी ठिकाणी आता जलयुक्त शिवाराची कामे बंद असल्याने तीही मशिनरी शासकीय कार्यालयात वापराविना पडून आहे. वरील टेंडर्स मधील कामांसाठी शासनाकडू वापराविना पडून असणारी मशिनरी वापरायचे सोडून, विनाकारण भाड्याची मशिनरी आणण्याचा उद्योग करून जनतेच्या करांचे ४२ लाख रुपये ''पाण्यात'' घालण्यात येत आहेत.

आपणास विनंती कि आपण तातडीने ही टेंडर्स रद्द करून या कामांसाठी आपल्या खात्यासह विविध शासकीय कार्यालयांमध्ये वापराविना पडून असलेली मशिनरी वापरण्याचे आदेश द्यावेत. तसेच शासनाची मशिनरी उपलब्ध असताना भाड्याने मशिनरी आणण्याच्या उद्योगांची चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी सजग नागरिक मंचची आग्रहाची मागणी आहे.

**२४) भूमिगत HT केबल देखभाल दुरुस्तीचे अनावश्यक टेंडर क्रमांक १०४२ – २०१७ रद्द करण्या संदर्भात.–**

वारजे येथे ३०० MLD जलकेंद्रासाठी, वीजपुरवठा करण्यासाठी, पुणे मनपाने ६.५० कोटी रुपये खर्च करून २२ KV च्या २० किमी. लांबीच्या भूमिगत HT केबल लाईन्स नांदेड सिटी Sub Station ते वारजे जलकेंद्र या दरम्यान २०१६ साली टाकल्या. हे काम New Solar Electrical व Electronic या कंपनी ला देण्यात आले होते व कामाच्या scope मध्ये सदर

यंत्रणेची ५ वर्षे देखभाल दुरुस्ती (२०१६ ते २०२१) करणे समाविष्ट होते. तरी ही नुकतेच पुणे मनपा पाणी पुरवठा विभागाने या केबलच्या देखभाल दुरुस्तीचे काम पुढील ३ वर्षे करण्यासाठी (२०१८ - २०२१) Divya Electric Corporation या कंपनीला देण्यासाठी ८६ लाख रुपयांचे टेंडर स्थायी समितीत मंजूर करून घेतले आहे. मूळच्या ५ वर्षांच्या New Solar Electrical व Electronic कंपनीसोबत केलेल्या देखभाल दुरुस्ती करारात देखभालीचे काम करताना नादुरुस्तीची जागा शोधणे, खोदाई करणे, केबलला जोड देणे, केबल चाचणी वाहन लावून केबल तपासणे, चाचणी अहवाल महावितरण कडे देणे इत्यादी कामांचा समावेश केला नसल्याने हे नवीन देखभाल दुरुस्तीचे कंत्राट देत असल्याचे ठरावात म्हंटले आहे. या संदर्भात अनेक प्रश्न उपस्थित होतात.

१ - मूळ HT केबल टाकताना ती नांदेड सिटी Sub Station पासून २० किमी. लांबीवरून का आणण्यात आली? वारजे, कोथरूड परिसरात महावितरणचे Sub Station नव्हते काय?

२ - मूळ कंत्राटात, कंत्राटदाराने देखभाल दुरुस्तीचे काम करावयाचे नमूद केले आहे, पण त्यांनी नक्की काय काम करावयाचे आहे, याचा उल्लेख का केला गेला नाही? आणि ज्या कामांसाठी नवीन वर्कऑर्डर दिली जाणार आहे. ती कामे सोडून देखभाल दुरुस्ती मध्ये आणखी काय असते?

३ - मुळातच सर्व काळज्या घेऊन रस्त्याच्या १ मीटर खोलवर टाकलेल्या केबल देखभाल दुरुस्तीची गरज पहिल्या ५ वर्षात पडण्याचे कारणच काय? आणि त्यासाठी एव्हडा खर्च का येतो?

४ - रस्त्यांची कामे चालू असल्याने या दरम्यान केबल तुटतात हे कारण दाखवून हा नवीन देखभाल दुरुस्तीचा करार करण्यात येत आहे.. परंतु रस्ते बांधणी कंत्राटदाराच्या हलगर्जीपणामुळे केबल तुटली तर त्याच्याकडूनच केबल दुरुस्तीचे काम करून घेणे आवश्यक असताना हा करार करण्याचे प्रयोजन काय आहे?

५ - पुणे मनपाने ६. ५० कोटी रुपये खर्च करून अखंडित वीज पुरवठा मिळविण्यासाठी Express Feeder या Scheme मध्ये केबल टाकण्याचे काम केले असताना त्याच्या देखभाल दुरुस्तीची संपूर्ण जबाबदारी कायद्याने महावितरणची आहे. असे असताना देखील हा देखभाल

दुरुस्तीचा करार करण्याचे प्रयोजन काय? अखंडित वीज पुरवठा व्हावा या करिता पुणे मनपा महावितरणला जादा दर देत आहे, हे येथे नमूद करणे आवश्यक आहे.

वरील वस्तुस्थिती लक्षात घेता टेण्डर क्रमांक १०४२ – २०१७ हे स्थायी समितीने मंजूर केलेले टेंडर असले तरी हा खर्च पूर्णपणे अनावश्यक, अनाठायी असून नागरिकांच्या करांचा अपव्यय आहे. तरीही सदर टेंडर तात्काळ रद्द करण्यात यावे, अशी सजग नागरिक मंचची आग्रहाची मागणी आहे.

**२४) भूमिगत HT केबल देखभाल दुरुस्तीचे अनावश्यक टेंडर क्रमांक १०४२ – २०१७ रद्द करण्या संदर्भात.** – वारजे येथे ३०० MLD जलकेंद्रासाठी, वीजपुरवठा करण्यासाठी, पुणे मनपाने ६. ५० कोटी रुपये खर्च करून २२घत च्या २० किमी. लांबीच्या भूमिगत HT केबल लाईन्स नांदेड सिटी Sub Station ते वारजे जलकेंद्र या दरम्यान २०१६ साली टाकल्या. हे काम New Solar Electrical व Electronic या कंपनी ला देण्यात आले होते व कामाच्या scope मध्ये सदर यंत्रणेची ५ वर्षे देखभाल दुरुस्ती (२०१६ ते २०२१) करणे समाविष्ट होते. तरी ही नुकतेच पुणे मनपा पाणी पुरवठा विभागाने या केबलच्या देखभाल दुरुस्तीचे काम पुढील ३ वर्षे करण्यासाठी (२०१८ – २०२१) Divya Electric Corporation या कंपनीला देण्यासाठी ८६ लाख रुपयांचे टेंडर स्थायी समितीत मंजूर करून घेतले आहे. मूळच्या ५ वर्षांच्या New Solar Electrical व Electronic कंपनीसोबत केलेल्या देखभाल दुरुस्ती करारात देखभालीचे काम करताना नादुरुस्तीची जागा शोधणे, खोदाई करणे, केबलला जोड देणे, केबल चाचणी वाहन लावून केबल तपासणे, चाचणी अहवाल महावितरण कडे देणे इत्यादी कामांचा समावेश केला नसल्याने हे नवीन देखभाल दुरुस्तीचे कंत्राट देत असल्याचे ठरावात म्हंटले आहे. या संदर्भात अनेक प्रश्न उपस्थित होतात.

१ – मूळ HT केबल टाकताना ती नांदेड सिटी Sub Station पासून २० किमी. लांबीवरून का आणण्यात आली? वारजे, कोथरूड परिसरात महावितरणचे Sub Station नव्हते काय?

२ – मूळ कंत्राटात, कंत्राटदाराने देखभाल दुरुस्तीचे काम करावयाचे नमूद केले आहे, पण त्यांनी नक्की काय काम करावयाचे आहे, याचा उल्लेख का केला गेला नाही? आणि ज्या कामांसाठी नवीन वर्कऑर्डर दिली जाणार आहे. ती कामे सोडून देखभाल दुरुस्ती मध्ये आणखी काय असते?

३ – मुळातच सर्व काळज्या घेऊन रस्त्याच्या १ मीटर खोलवर टाकलेल्या केबल देखभाल दुरुस्तीची गरज पहिल्या ५ वर्षात पडण्याचे कारणच काय? आणि त्यासाठी एव्हडा खर्च का येतो?

४ – रस्त्यांची कामे चालू असल्याने या दरम्यान केबल तुटतात हे कारण दाखवून हा नवीन देखभाल दुरुस्तीचा करार करण्यात येत आहे.. परंतु रस्ते बांधणी कंत्राटदाराच्या हलगर्जीपणामुळे केबल तुटली तर त्याच्याकडूनच केबल दुरुस्तीचे काम करून घेणे आवश्यक असताना हा करार करण्याचे प्रयोजन काय आहे?

५ – पुणे मनपाने ६.५० कोटी रुपये खर्च करून अखंडित वीज पुरवठा मिळविण्यासाठी Express Feeder या Scheme मध्ये केबल टाकण्याचे काम केले असताना त्याच्या देखभाल दुरुस्तीची संपूर्ण जबाबदारी कायद्याने महावितरणची आहे. असे असताना देखील हा देखभाल दुरुस्तीचा करार करण्याचे प्रयोजन काय? अखंडित वीज पुरवठा व्हावा या करिता पुणे मनपा महावितरणला जादा दर देत आहे, हे येथे नमूद करणे आवश्यक आहे.

वरील वस्तुस्थिती लक्षात घेता टेण्डर क्रमांक १०४२–२०१७ हे स्थायी समितीने मंजूर केलेले टेंडर असले तरी हा खर्च पूर्णपणे अनावश्यक, अनाठायी असून नागरिकांच्या करांचा अपव्यय आहे. तरीही सदर टेंडर तात्काळ रद्द करण्यात यावे, अशी सजग नागरिक मंचची आग्रहाची मागणी आहे.

**२५) राज्यशासना कडून पुणे मनपास अद्याप न मिळालेल्या ३९२ कोटी रुपयांच्या अनुदाना संबंधात.**

राज्य शासन १५ विविध गोष्टींकरता पुणे मनपास अनुदान देत असते. हे अनुदान वेळच्या वेळी मिळाले तर मनपाची विकास कामे मार्गी लागू शकतात. सोबत दिनांक ३१–०३–१८ रोजी राज्य शासनाकडून पुणे मनपाला विविध गोष्टीं करता येणे असलेल्या अनुदानाचा तपशील जोडत आहोत. ही रक्कम ३९४ कोटींची असून ह्यापैकी गेल्या ३. ५ महिन्यात जेमतेम २ कोटी रुपये मनपास मिळाले आहेत. आज रोजी ३९२ कोटी रुपयांची थकबाकी राज्य शासनाकडे प्रलंबित

आहे. यातील काही अनुदान रकमा अनेक वर्षे प्रलंबित आहेत. ही सर्व माहिती आम्हाला पुणे मनपाकडून माहिती अधिकारात प्राप्त झाली आहे.

सध्या विधिमंडळाचे अधिवेशन नागपूर येथे सुरु असून या अधिवेशनात आपण सर्वांनी आवाज उठवून राज्य शासनास पुणे मनपास देय रक्कम तातडीने देण्यास भाग पडावे, ही विनंती.

**२६) इलेक्ट्रिकल विभागाची क्रमांक १२ – २०१८ ची जास्त दराची फुगवलेली निविदा आमच्या विनंतीनुसार रद्द करून पुणेकरांचे २० लाख रुपये वाचविल्याबद्दल धन्यवाद.**

पुणे मनपा इलेक्ट्रिकल विभागाची १२ – २०१८ क्रमांकाची निविदा GEMGOV या शासकीय संकेत स्थळावरील दरसूची लक्षात न घेता सुमारे २० लाख रुपयांनी फुगवल्याचे आम्ही आपणास दिनांक ११-०६-१८ रोजी निदर्शनास आणून दिले होते. आपण यावर तातडीने कार्यवाही करून संबंधितास ही निविदा रद्द करण्यास भाग पाडले, याबद्दल धन्यवाद.आम्ही आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो कि आपण जो पर्यंत मुळापासून हा विषय संपवत नाही तो पर्यंत अश्या घटना वारंवार घडत राहणार आणि आम्ही प्रत्येक वेळेस सातत्याने नजर ठेऊन असे गैरप्रकार उघडकीस आणू शकू असे नाही. त्यामुळ सजग नागरिक मंचची विनंती आहे कि आपण इलेक्ट्रिकल DSR चे दर हे GEMGOV च्या दरांशी सुसंगत राहण्यासाठी तातडीने पावले उचलावी. आपल्या सक्रिय सहकार्याच्या प्रतीक्षेत.

**२७) LBT विभागातील अनागोंदी कारभार आणि मनपाचे आर्थिक नुकसान.**

२०१३ साली जकातीच्या ऐवजी LBT लागू करण्यात आला, या वर्षी , या संदर्भाने आमचे कार्यकर्ते श्री अमोल कुलकर्णी यांनी माहिती अधिकारात मिळवलेली माहिती सोबत जोडत आहे, ती अत्यंत धक्कादायक आहे. वर्ष २०१३ – १४ साली ७१५८३ डीलर्स ने LBT रजिस्ट्रेशन घेतले मात्र त्यातील फक्त २९३१७ डीलर्स ने विवरणपत्र दाखल केले त्यातील आजतागायत फक्त ४१४४ विवरण पत्रांची तपासणी पूर्ण झाली आहे. २०१४ – १५ मध्ये ७४०५२ डीलर्स चे रजिस्ट्रेशन होते. त्यातील फक्त २३२०९ डीलर्स ने विवरण पत्रे भरली व त्यापैकी त्यातील फक्त ५०१ विवरण पत्रांची छाननी पूर्ण झाली आहे. २०१५ – १६ मध्ये फक्त ५० कोटी पेक्षा जास्त वार्षिक उलाढाल असणाऱ्या डिलर्सलाच LBT लागू करण्यात आला. अश्या नोंदणीकृत डीलर्स

ची संख्या १८३ होती. त्यापैकी फक्त १३३ लोकांनी २०१५ – १६ चे विवरणपत्र भरले तर फक्त ७८ लोकांनी २०१६ – १७ चे विवरण पत्र भरले. हा सर्वच कारभार अत्यंत गलथान असल्याचे यावरून स्पष्ट होते. यातील सर्वात गंभीर बाब म्हणजे २०१३ – १४ व २०१४ – १५ या वर्षांमध्ये नोंदणी केलेल्या परंतु विवरण पत्रच न भरलेल्या जवळपास ८०००० केसेस मध्ये आजतागायत नोटिसा ही पाठविल्यागेल्या नाहीत. या सर्व केसेस थोड्याच कालावधीत Time bar होणार आहेत आणि नंतर काहीही करता येणार नाही. हे सर्व अत्यंत गंभीर असून यामध्ये शेकडो कोटी रुपयांचे नुकसान झाले असण्याची शक्यता आहे.

आपणास विनंती कि आपण याची तातडीने गंभीर दाखल घेऊन एका स्वतंत्र ऑडिटर करवी यासर्व गोष्टींची छाननी करून योग्य ती कार्यवाही करावी.

**२८) औषध खरेदीत पुणे महानगरपालिकेचे यंदाही वाचणार ५ कोटी रुपये–**

पुणे मनपा दरवर्षी कोट्यवधी रुपयांची औषधे खरेदी करते. यामध्ये जो कंत्राटदार जास्तीतजास्त डिस्काउंट देईल त्याला वर्क ऑर्डर दिली जाते. गेल्यावर्षीपर्यंत १९% डिस्काउंट देणाऱ्या कंत्राटदाराला वर्क ऑर्डर दिली जात होती. मनपा ८०% औषधे जेनेरिक प्रकारची खरेदी करते आणि जेनेरिक औषधांवर ६० ते ७०% डिस्काउंट मिळू शकतो हे आम्ही गेल्यावर्षी मनपा आयुक्तांना सप्रमाण दाखवून देऊन विनंती केली होती की टेंडर काढताना जेनेरिक व ब्रँडेड या दोन प्रकारच्या औषधांसाठी स्वतंत्र डिस्काउंट कोट करण्यास भाग पाडावे; जेणेकरून मनपाचे पैसे वाचू शकतील. मनपा आयुक्तांनी सजग नागरिक मंचची सूचना मान्य करून गेल्या वर्षी जेनेरिक आणि ब्रँडेड औषधांसाठी स्वतंत्र डिस्काउंट कोट करण्यास सांगणारे टेंडर काढायला भाग पाडले आणि त्यातून गेल्या वर्षी जेनेरिक औषधांसाठी ५०% तर ब्रँडेड औषधांसाठी २२% डिस्काउंट मिळाला व मनपाचे ४ कोटी रुपये वाचले. यंदा ही प्रथा कायम करत मनपाने ५ कोटी रुपयांची दोन टेंडर्स काढली आणि यावर्षी तर जेनेरिक औषधांवर ५१% तर ब्रँडेड औषधांवर २३% डिस्काउंट देणारा

कंत्राटदार निघाला त्यामुळ मनपाचे ५ कोटी रुपये वाचणार आहेत किंवा तेव्हड्या किमतीची जास्ती औषधे मनपास मिळणार आहेत.

सजग नागरिक मंचची सूचना सलग दुसऱ्या वर्षी मान्य करून पुणेकरांचे ५ कोटी रुपये वाचविल्याबद्दल पुणे मनपा आरोग्य विभाग व पुणे मनपा आयुक्तांचे मनःपूर्वक अभिनंदन व आभार.

**२९) सार्वजनिक ठिकाणी बसविलेल्या बाकांच्या किमती–**

नगर सेवकांच्या निधीतून सार्वजनिक ठिकाणी बसविलेल्या बाकांच्या किमती १०,०००/ रुपये ते १३,०००/ रुपये असल्याचे वाचनात आले. या संबंधी आम्ही सोबत जोडलेल्या मेल (सप्टेंबर २०१३) द्वारे आपले लक्ष वेधू इच्छितो कि आम्ही बाकांच्या किमती व डिझाईन याचे STANDARDIZATION करून रेट कॉन्ट्रॅक्ट करावा अशी मागणी केली होती. सुदैवाने आज केंद्र सरकारची GEMGOV या वेबसाईट वर https://org.gem.gov.in/ca/cart_global/describe _items/५६८७१२ या लिंक वर बाक ४४००/ रुपयांना एक नग उपलब्ध आहे. अनेक नगांच्या खरेदीसाठी ही किंमत कमी होऊ शकते. आपणास विनंती कि आपण आता तरी आदेश काढून GEMGOV या वेबसाईट वरून बाकांची खरेदी अनिवार्य करावी.

**३०) जल संपदा विभागाचे ऑडिट आधी करा –**

कालच्या पुण्यातील एक कार्यक्रमात जल संपदा मंत्री श्री गिरीश महाजन यांनी पुणेकरांच्या पाणीवापराबाबत तारे तोडण्याची परंपरा चालूच ठेवली आहे. १९९९ साली झालेल्या ११.५० TMC पाणी वापराचा करार, २० वर्षात पुण्याची लोकसंख्या दुपटीने वाढली तरी नव्याने करार करण्यात असमर्थ असलेल्या जल संपदा विभागाचे अपयश झाकण्यासाठी परत एकदा पुणेकरांच्या पाणीवापराचे वाभाडे काढले गेले. पुणेकरांनी अधिकाधिक सांडपाणी शुद्धीकरण करून शेतीसाठी सोडावे असा अनाहूत सल्ला देताना पुणेकरांनी १०० कोटी रुपये खर्च करून गेल्या २ वर्षांपासून मुंढवा जॅकवेल येथून प्रतिवर्षी ६.५० TMC पाणी शेतीला सोडण्याची व्यवस्था केली असतानाही बेबी कालव्याच्या दुरावस्थेमुळे जल संपदा खाते त्यातले निम्मे पाणी ही उचलू शकत नाही हे वास्तव बहुदा जल संपदा मंत्र्यांना माहित नसावे. खडकवासला पासून पुण्यापर्यंत पाणी आणताना

गळती होऊ नये म्हणून काही कोटी रुपये खर्च करून पुणेकरांनी बंद पाण्याची पाईपलाईन स्वखर्चाने विकसित केली. मात्र खडकवासला ते इंदापूर ह्या मुठा उजव्या कालव्यामधून होणाऱ्या ४० % पाणी गळती थांबविण्यात जल संपदा खाते पूर्णपणे अपयशी ठरले आहे. पुणेकरांच्या पाण्याचे ऑडिट व्हावे असा सल्ला देताना जल संपदाच्या पायाखाली काय जळत आहे याची माहितीही घेण्याची तसदी जल संपदा मंत्र्यांनी घेतली नाही.

पुणेकरांवर वारंवार तोंडसुख घेणाऱ्या जल संपदा मंत्र्यांपुढे पुण्याचे प्रतिनिधित्व करणारे आमदार, खासदार व नगरसेवक तोंडाला कुलूप लावून का बसतात याची उत्तरे त्यांच्याकडून मिळ्वण्यासासाठी पुणेकरांनीच आता आग्रही राहिले पाहिजे.

**३१) पर्वती जलकेंद्र येथील टँकर पॉईंट वरील बंद मीटर्स संदर्भात.–**

आम्ही १५ दिवसांपूर्वी आपल्या असे निदर्शनास आणून दिले होते कि पर्वती येथील टँकर पॉईंट वर पोस्ट ३ चा मीटर गेल्या ६ महिन्यांपासून बंद आहे, व तेथून अविरत टँकर भरण्याचे काम सुरु आहे. सजग नागरिक मंचची अशी अपेक्षा होती कि तो मीटर तातडीने दुरुस्त होईल व तो दुरुस्त होईपर्यंत त्या टँकर पॉईंट वर टँकर भरण्याचे काम थांबविले जाईल. परंतु आज सकाळी आम्ही परत एकदा पर्वती येथील पर्वती जलकेंद्र येथील टँकर पॉईंट्स ला भेट दिली असता असे दिसून आले कि तो मीटर अद्याप ही बंदच आहे. एवढेच नाही तर तेथून टँकर भरण्याचे काम सातत्याने सुरूच आहे.

याहून ही अत्यंत धक्कादायक गोष्ट आमच्या निदर्शनास आली कि टँकर पॉईंट १, २, व ३ वरील मीटर हवे तेंव्हा चालू व बंद करता येतात व त्यातील पोस्ट २ वरील मीटर आज सकाळी आम्ही भेट दिली तेंव्हा बंद होता व आम्ही त्याबद्दल विचारणा केल्या बरोबर बटन दाबून तो मीटर सुरु करण्यात आला. याचाच अर्थ असा कि हे मीटर फक्त शोभेचे असून हवे तेंव्हा चालू व बंद करण्याची सोय असल्यामुळे अनाधिकृतपणे टँकर भरले जात असताना हे मीटर्स बंद ठेवणे सहज शक्य आहे.

पुण्यातील ५ लाख प्रॉपर्टी मध्ये मीटर बसविणे व ते २४ तास चालू असतील तसेच ते चालू, बंद करण्याची कोणतीही व्यवस्था संबंधित वापरकर्ताच्या हातात असणार नाही अशी खात्री पटलेल्या मनपाला टँकर पॉईंट्स वरील १० मीटर्स चे सुद्धा नियोजन करणे का शक्य होत नाही ?

अश्या प्रकारे जाणून बुजून मीटर्स बंद ठेवून अनाधिकृत टँकर्सचा भरणा करून पाण्याचा काळाबाजार करणे शक्य व्हावे अशाच प्रकारे यंत्रणा राबविली जात आहे का ? याचा खुलासा होण्याची गरज आहे.

आतातरी आपण तातडीने या विषयी लक्ष घालून सर्व टँकर पॉईंट्स वरील सर्व मीटर्स तातडीने सुरु होतील व चालू, बंद करण्याची कोणतीही यंत्रणा अस्तित्वात असणार नाही या साठी प्रयत्न कराल अशी आशा आहे

**३२) पिण्याच्या पाण्याचा अपव्यय करणाऱ्या जलसंपदाविभागाच्या नाठाळांच्या माथी काठी कधी मारणार ?**

परवा झालेल्या कालवा समितीच्या बैठकीत पुणे मनपा दररोज १३५० MLD ऐवजी १६५० MLD पाणी दररोज वापरते असा आरोप जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी केला आणि आपण नेहमीप्रमाणे पुणेकरांवर दोषारोप करून मोकळे झालात. आम्ही काल माहिती अधिकारात पुणे मनपाकडून मिळवलेली माहिती असे दाखविते कि ऑक्टोबर २०१७ ते मार्च २०१८ दरम्यान पुणे मनपाने सरासरी प्रतिदिन १३४३ MLD पाणी धरणातून घेतले आहे, यावरून जलसंपदा विभागाचे अधिकारी कशी दिशाभूल करतात ते स्पष्ट होते. एकीकडे पुणेकरांच्या डोळ्यातले कुसळं शोधण्यात गुंतलेल्या जल संपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना स्वतःच्या डोळ्यातले मुसळ दिसत नाही. पुणे मनपाने पुणेकरांचे करांचे १०० कोटी रुपये खर्च करून ६.५ TMC पाणी शेतीसाठी पुनर्वापर करता यावे म्हणून मुंढवा येथे प्रकल्प उभा केला ज्यातून दररोज ५१५ MLD पाणी सिंचनासाठी पुरवले जाऊ शकते. मात्र जल संपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी ऑक्टोबर २०१७ ते मार्च २०१८ या ६ महिन्यात सरासरी प्रतिदिन फक्त १४० MLD पाणी या प्रकल्पातून सिंचनासाठी उचलले. ज्यामध्ये ऑक्टोबर मध्ये शून्य , नोव्हेंबर मध्ये १०, तर डिसेंबर मध्ये ६४ MLD पाणी प्रतिदिन उचलले गेले. सगळ्यात संतापजनक गोष्ट म्हणजे १० डिसेंबर २०१७ ते ४ जानेवारी २०१८ या काळात खडकवासला धरणातून सिंचनासाठी पिण्याचे पाणी जल संपदा विभागाने सोडले, त्याच काळात मुंढवा जॅकवेल प्रकल्पातून मात्र ५१५ MLD प्रतिदिन ऐवजी फक्त ७० MLD प्रतिदिन एव्हड्याच प्रमाणात सांडपाणी सिंचनासाठी उचलण्यात आले. तसेच

२५ जानेवारी २०१८ ते २८ फेब्रुवारी २०१८ या काळात खडकवासला धरणातून सिंचनासाठी पिण्याचे पाणी जल संपदा विभागाने सोडले, त्याच काळात मुंढवा जॅकवेल प्रकल्पातून मात्र ५१५ MLD प्रतिदिन ऐवजी फक्त ३०० MLD प्रतिदिन एव्हढ्याच प्रमाणात सांडपाणी सिंचनासाठी उचलण्यात आले. हा फक्त पिण्याच्या पाण्याचा अपव्यय नसून तो सामाजिक गुन्हा ही आहे. मात्र तरीही हे जल संपदा विभागाचे अधिकारी पुणेकरांनी जास्त पाणी वापरून पिण्याच्या पाण्याचा अपव्यय केल्याची हाकाटी करून पुणेकरांचे पाणी तोडण्याची भाषा करतात आणि आपण ही त्यांचीच री ओढता या सारखे पुणेकरांचे दुर्दैव नाही.

स्वतः पिण्याच्या पाण्याचा सिंचनासाठी अपव्यय करून पुणेकरांच्या नावांनी ''बिले'' फाडणाऱ्या नाठाळ जल संपदा अधिकारांच्या माथी आपण पालक मंत्री म्हणून काठी होण्याचे धाडस दाखवणार का हाच खरा प्रश्न आहे.

**३३) १२ मीटर खालील रस्त्यांच्या कॉंक्रीटीकरण बाबत दिनांक १६/०३/१८ रोजी काढलेल्या शुध्दीपत्रका मागची कारणे व वस्तुस्थिती प्रदर्शित करणे बाबत.–**

आपण दिनांक ०५/०३/१८ शहरात नियोजित समान पाणी पुरवठा योजने अंतर्गत कामे सुरु होणार असल्याने १२ मीटर खालील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करण्यात येऊ नये, असे परिपत्रक काढले होते. २४x७ योजनेतील पाईप लाईन टाकतेवेळी हे कॉंक्रीटीकरण केलेले गल्लीबोळ परत खणावे लागू नयेत व नागरिकांच्या करांचे पैसे वाया जाऊ नयेत या अत्यंत सुयोग्य उद्देश्याने हे परिपत्रक काढले गेले होते. मात्र दिनांक १६/०३/१८ रोजी आपण या परिपत्रकाचे शुध्दीपत्रक काढून १२ मीटर खालील रस्त्यांच्या कॉंक्रीटीकरण करण्याची थांबविण्याची अंमलबजावणी दिनांक ०१/०४/१८ पासून करण्याचा निर्णय घोषित केला आहे. त्यामुळे १२ मीटर खालील गल्लीबोळांच्या कॉंक्रीटीकरण करण्याचे काम धडाक्याने ३१ / ०३ पर्यंत सुरु होऊन ०५/०३/१८ च्या परिपत्रकाचा मूळ उद्देश्य नष्ट होणार आहे. तसेच ०१/०४/१८ नंतरही १२ मीटर खालील रस्ते पाणी पुरवठा व मलनिःसारण विभाग यांची परवानगी घेऊन करण्याची अनुमतीही या परिपत्रकामध्ये देण्यात आली आहे. या सर्वांमुळे नागरिकांचे करांचे पैसे वाया जाणार असल्यामुळे या आपल्या शुध्दीपत्रकाच्या निर्णयामुळे जनतेला बाधा पोचणार आहे. त्यामुळे माहिती अधिकार

कायद्याच्या कलम ४ (१C) व ४ (१D) प्रमाणे आपण या शुध्दीपत्रकाच्या मागची कारणे व वस्तुस्थिती स्वतःहून प्रसिद्ध करणे बंधनकारक आहे. सदरची कलमे खालील प्रमाणे

4 (1C) publish all relevant facts while formulating important policies or announcing the decisions which affect public; (d) provide reasons for its administrative or quasi-judicial decisions to affected persons.

4 (1D) provide reasons for its administrative or quasi-judicial decisions to affected persons.

आपण १६/०३/१८ शुध्दीपत्रका मागील करणे व वस्तुस्थिती तात्काळ प्रसिद्ध करावी अशी सजग नागरिक मंचची मागणी आहे अन्यथा आम्हास राज्य माहिती आयुक्त यांचेकडे तक्रार दाखल करावी लागेल याची कृपया नोंद घ्यावी

**३४) Make In India ला राज्य सरकारच्या आरोग्य विभागाचा खो.–**

राज्य सरकारच्या hospitals च्या अतिदक्षता विभागात वैद्यकीय उपकरण खरेदी साठी राज्य सरकारच्या आरोग्य विभागाने tenders काढली आहेत. यामध्ये tender क्र. E–१२९ मध्ये १९ लाख रुपयांचे baby warmers तर tender क्र. E–१६७ मध्ये ३१ लाख रुपयांचे bubble CAPP (एक प्रकारचे baby ventilator) खरेदी केले जाणार आहेत. यामध्ये warmer ची किंमत प्रत्येकी ६१००० रुपये गृहीत धरली असून असे ३१ warmers खरेदी केले जाणार आहेत; तर bubble CAPP किंमत प्रत्येकी ४,३९,२८५ गृपये गृहीत धरली आहे. या दोन्ही टेंडर मधील उपकरणांसाठी US FDA Approval / EC Certification (अमेरिकन किंवा युरोपिअन आरोग्य विभागाचे प्रमाणपत्र) असणे सक्तीचे केले आहे. यामुळे एकाही भारतीय कंपनीला टेंडर भरणे शक्य होणार नाही. अनेक भारतीय कंपन्यांनीं बनवलेली हि वैद्यकीय उपकरणे आज अनेक सरकारी आणि खाजगी रुग्णालयांमध्ये उत्तम काम देत आहेत. इतकेच नव्हे तर भारतीय कंपन्यांनीं बनवलेली हि वैद्यकीय उपकरणे अनेक देशांमध्ये निर्यात ही होत असून ती परदेशी कंपन्यांपेक्षा ४०–५०% ने स्वस्त ही आहेत. असे असतानाही राज्य सरकारच्या आरोग्य विभागाने US FDA Approval / EC Certification ची अनाकलनीय व अनावश्यक अट

टाकून स्पर्धा तर कमी केलीच आहे शिवाय ही यंत्रणा महागडीही मिळणार आहे, आणि सर्वात महत्वाचे केंद्र व राज्य सरकारच्या Make In India या महत्वाकांक्षी योजनेला यामुळे तिलांजली ही मिळणार आहे.

सजग नागरिक मंचची विनंती आहे कि आपण तातडीने यात लक्ष घालून टेंडरमधील ही अट काढून टाकण्यास सांगावे व ही अट जाणूनबुजून घालणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करावी.

**३५) GEMGOV च्या किमती ग्राहयभूत धरून DSR मध्ये सुधारणा करणेबाबत.–**

पुणे मनपामध्ये टेंडरप्रक्रियेत आधारभूत किंमत ठरवण्यासाठी DSR ग्राह्य धरला जातो. केंद्र सरकारने GEMGOV या पोर्टलवर हजारों वस्तूंच्या आधारभूत किंमती जाहीर केल्या आहेत. मनपाच्या DSR मधील आधारभूत किंमती GEMGOV पेक्षा जास्त असता कामा नयेत. आम्ही मनपाच्या Electrical Department च्या DSR चा अभ्यास केला असता DSR मधील अनेक वस्तूंच्या किंमती GEMGOV पेक्षा जास्त आहेत असे दिसून आले. वानगी दाखल काही वस्तूंची यादी देत आहोत.

Description of Item GEMGOV Price in Rs. DSR Item No. DSR Price in Rs.

LCD Projector Rs. 33,000.00 12387 - 0 Rs. 98500

LCD Projector Rs. 33,759.00 12387 - 0 Rs. 98500

LCD TV 32" Rs. 18, 750.0 12348 - 0 Rs. 24871

LCD TV 50" Rs. 42, 999.0 12348 - 1 Rs. 51000.0

Ceiling Fan Rs. 1285.0 12348 - 2 Rs. 1500 / 1875

4 Megapixal CCTV Dome Camera Rs. 11, 000.0 12354 - 9 Rs. 31, 000.0

2 Megapixal CCTV Dome Camera Rs. 47, 000.0 12355 - 2 Rs. 70, 000.0

CCTV Camera Recorder Rs. 3, 861.0 12355 -4 Rs. 11, 000.0

CCTV Camara Recorder Rs. 12, 150.0 12355 - 5 Rs. 14, 000.0

CCTV Camera Recorder Rs. 33, 150.0 12355 - 6 Rs. 41, 000.0

सजग नागरिक मंचची विनंती आहे कि आपण एक विशेष समिती गठीत करून पुणे मनपाचे सर्व DSR मधील वस्तूंच्या किंमतीची GEMGOV शी तुलना करून GEMGOV च्या किंमतींप्रमाणे DSR मध्ये सुधारणा करण्यात यावी जेणेकरून मनपाचे दरवर्षी कोट्यवधी रुपये वाचू शकतील.

**३६) ''कचऱ्याची'' चोरी थांबविण्यासाठी बसवलेले CCTV कॅमेरे चोरीला, दुबार खरेदीचा घाट.**

उरुळी देवाची फुरसुंगी कचरा डेपो येथे तसेच बाणेर कचरा डेपो येथे बसविण्यासाठी पुणे मनपाने टेंडर क्रमांक ९४ / २०१६ अन्वये जानेवारी २०१७ मध्ये २० CCTV कॅमेरे व दोन ३२'' TV सेट खरेदी केले. बाणेर कचरा डेपोचा प्रकल्प बारगळल्याने हे सर्व कॅमेरे व TV सेट फुरसुंगी कचरा डेपो येथे बसविण्यात आले. वर्षभरानंतर आज रोजी त्यातील फक्त ८ कॅमेरे व १ TV सेट जागेवर शिल्लक आहेत. या ८ कॅमेऱ्यांपैकी ३ बंद अवस्थेत आहेत. उरलेले १२ कॅमेरे व १ TV सेट चोरीला गेले असावेत, अशी शक्यता आहे. मुळातच कचरा चोरीला जाईल अशी सुपीक कल्पना ज्यांच्या डोक्यातून आली त्यांना विशेष बक्षीस जाहीर केले पाहिजे कारण माहिती अधिकारात आम्ही या CCTV चा उपयोग करून किती चोऱ्या पकडल्या याची माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता अशी एकही चोरी पकडली गेली नसल्याचे आम्हाला सांगण्यात आले. यावर कळस म्हणजे परत एकदा टेंडर क्रमांक ५२ / २०१७ अन्वये फुरसुंगी कचरा डेपोमध्ये पुन्हा एकदा १८ CCTV कॅमेरे व ३२'' दोन TV सेट खरेदीचा घाट घातला गेला आहे.

जे TV सेट केंद्र सरकारच्या GEMGOV वेबसाईट वर १८,७५० रुपयांना उपलब्ध आहेत ते गेल्यावर्षी ३३, १६१ रुपये तर यंदा २४,८७१ रुपयांना घेतले जाणार आहेत. तसेच जे कॅमेरे केंद्र सरकारच्या GEMGOV वेबसाइट वर दहा हजार रुपयांना उपलब्ध आहेत ते ३०, ००० रुपये किमतीने घेण्याचा घाट घातला आहे. ही सर्व जनतेच्या करांच्या पैश्याची लूट असून ती तातडीने थांबवणे आवश्यक आहे.

सजग नागरिक मंचची विनंती आहे की फुरसुंगी कचरा डेपो येथे CCTV बसवण्याचे आताचे टेंडर ५२ / २०१७ तातडीने रद्द करावे तसेच आधीचे CCTV

तसेच TV सेट चोरीला गेल्याच्या प्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर गुन्हे दाखल करावेत.

**३७) मिळकतींचे GIS Mapping कंत्राट रद्द करा.**

पुणे मनपाने २ कंपन्यांना पुणे मनपा हद्दीतील सर्व मिळकतींचे GIS Mapping करण्याचे करार केले होते. यात ८ लाख ज्ञात व सुमारे २ लाख अज्ञात मिळकतींचे सर्वेक्षण करून मिळकतकरात सुमारे ५०० कोटींची वाढ अपेक्षित होती. सदरचे काम नोव्हेंबर २०१६ मध्ये सुरु झाले व यासाठी ९ महिन्याचा अवधी निश्चित करण्यात आला. आमच्या माहितीनुसार महाराष्ट्रात अन्य मनपाच्या तुलनेत पुणे मनपाने सदर कंपनीस दुप्पट दर अर्थात ३४० रुपये प्रति मिळकत देण्याचे मान्य केले. सदरच्या कंत्राटदाराने याकामासाठी कंत्राटात नमूद केल्याप्रमाणे सुमारे २००० लोकांचे मनुष्यबळाने हे काम ९ महिन्यात पूर्ण करावे असे कंत्राटाचे Essence अर्थात सार, वेळेत काम पूर्ण करण्याचे होते. जेणेकरून मनपाला अतिरिक्त वाढीव उत्पन्न लवकरात लवकर मिळेल. आमच्या माहितीनुसार आजमितीस फक्त ४५ % काम पूर्ण झाले आहे व यास १५ महिन्याचा अवधी लागला. कामाची गती पाहता कंत्राटदाराने आवश्यक मनुष्यबळ न लावल्याने १५ महिन्यानंतरही काम अपूर्ण आहे. कंत्राटदाराने या मोहिमेचा प्रचार, प्रसार जनतेत करावा यासाठी कंत्राटामध्ये सुमारे ३ कोटी रुपयांची तरदूत होती. आमच्या माहितीनुसार कंत्राटदाराने या अटी व शर्थींचे पालन पूर्णपणे केले नाही.

वरील कारणे पाहता सजग नागरिक मंचची आग्रहाची विनंती आहे कि सदरचे कंत्राट तात्काळ रद्द करावे, कंत्राटदाराचे एक देयक जे आमच्या माहितीनुसार मनपात अदा करण्यासाठी प्रलंबीत आहे, अदा करू नये. तसेच कंत्राटदाराने दिलेली बँक Guarantee व अनामत रक्कम जप्त करावी. अन्यथा हे कंत्राट अजून एक ''पांढरा हत्ती'' ठरण्याची शक्यता आहे.

**३८) मा. आयुक्तांच्या budget मध्ये केलेली कोंढवा food testing laboratory च्या पांढरा हत्तीवरील दोन कोटी रुपयांची तरतूद स्थायी समिती budget मधून वगळावी**

पुणे मनपाने २०११ मध्ये कोंढवा येथे एक प्रयोगशाळा उभारली असून ; मनपाच्या मूलभूत कर्तव्यात अंतर्भूत नसणाऱ्या या कामासाठी गेल्या ५ वर्षात १२ कोटी रुपये खर्च करूनसुद्धा मनापा ला फक्त १२ लाख रुपये उत्पन्न मिळाल्याचे आम्ही काही दिवसांपूर्वी निदर्शनास आणून सुद्धा नुकत्याच मनापा आयुक्तांनी सदर केलेल्या २०१८-१९ च्या budget मध्ये या पांढरा हत्तीवर तब्बल २ कोटी ८ लाख रुपयांची तरतूद केली आहे; ज्यामध्ये या प्रयोगशाळेसाठी २ माजले वाढवण्यासाठी ५० लाखाची; या प्रयोगशाळेत नवीन उपकरणे घेण्यासाठी ५० लाख रुपये तर प्रयोगशाळा चालवण्यासाठी १ कोटी ८ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. एकीकडे विकास कामांसाठी पैसे नसल्याने budget चा आकार कमी करण्यात आला असताना हि दोन कोटी रुपयांची उधळपट्टी अक्षम्य आहे.

सजग नागरिक मंचची आपणास विनंती आहे कि या पांढरा हत्तीवरील दोन कोटी रुपयांची तरतूद स्थायी समिती budget मधून वगळावी.

**३९) CCTV camera खरेदी मध्ये पुन्हा एकदा महापालिकेचे नुकसान होणार–**

पुणे मनपाने नुकतेच एक महापालिकेच्या विविध इमारती मध्ये CCTV कॅमेरे बसवण्यासाठी tender काढले आहे ( tender no. १८७/२०१७ ) ; या tender मध्ये कॅमेरे ची base price एकतीस हजार रुपये धरली असून ते १% below ने कोट झाले आहे ; आम्ही याच specifications चे कॅमेरे GEMGOV वर काय किमतीला मिळतात याचा अभ्यास केला असता असे दिसले कि अगदी panasonic सारख्या ख्यातनाम कंपनी चे याच specifications चे कॅमेरे दहा हजार रुपयाला उपलब्ध आहेत.(https://gem.gov.in/cart/cart.global/ describe /items/६१५३२५); असे असताना महापालिकेच्या electrical department ने base price

एकतीस हजार रुपये कोठून आणली हे समजत नाही. या प्रक्रीये मध्ये महापालिकेचे सुमारे ६० लाख रुपयाचे नुकसान होणार आहे ; महापालिकेची सध्याची आर्थिक स्थिती लक्षात घेता हे अत्यंत गंभीर आहे.

GEMGOV च्या किमती पेक्षा जास्त किमतीला कोणतीही वस्तू विकत घेणे बेकायदेशीर असताना सातत्याने CCTV कॅमेरे खूप जास्त भावाने घेतले जात असल्याचे आम्ही आपल्या निदर्शनास आणत असताना आपण काहीच ठोस कारवाई करत नसल्याने अशा प्रकारच्या घटना घडत आहेत ; यावर कडी म्हणजे आणखी एक CCTV कॅमेरा खरेदी साठी चे tender (तळजाई टेकडी वर बसवण्यासाठी) काढले आहे; त्यात २० कॅमेरे ३१००० रुपये भावाने घेतले जाणार आहेत. (tender no.२११/२०१७)

सजग नागरिक मंचची विनंती आहे कि आपण हि दोन्ही tenders तातडीने रद्द करून आता तरी GEMGOV पेक्षा जास्त दराने किमान या पुढे तरी खरेदी होणार नाही याची काळजी घ्यावी आणि जे अधिकारी GEMGOV पेक्षा जास्त दराने खरेदी करण्यास धजावतात त्यांची चौकशी करून त्यांचेवर कडक कारवाई करावी

**४०) श्री संजय शिरोडकर यांना सजग नागरिक माहिती अधिकार पुरस्कार २०१७**

**प्रदान हस्ते मा. केंद्रीय माहिती आयुक्त व ज्येष्ठ कार्यकर्ते श्री शैलेश गांधी (मुंबई ),**

**४१) आरोग्य विभागाने केली कॅग (CAG) ची दिशाभूल.-**

कॅग (CAG) मार्फत १-४-१३ ते ३१-३-१५ पर्यंत मनपाच्या विविध विभागांचे लेखा परीक्षण केले गेले. ज्यामध्ये कॅग (CAG) ने मनपाच्या आरोग्य विभागाकडून गाडीखाना येथील सेंट्रल मेडिकल स्टोअर्स च्या सर्जिकल व नॉन सर्जिकल आयटेम्स चे Physical Verification होत नसल्याबद्दल आक्षेप नोंदवला आहे. यावर उत्तर देताना आरोग्य विभागाने मनपाचे Internal Audit Department अशा प्रकारचे Physical Verification करत असल्याने लिहून दिले

आहे. यावर आम्ही मनपाच्या Internal Audit Department ला अशा प्रकारे Physical Verification केले असल्यास त्या अहवालांच्या प्रतींची माहिती, माहिती अधिकारात मागवली असता Internal Audit Department ने Physical Stock Verification केले नसल्याचे आम्हाला लेखी कळवले आहे.

आरोग्य विभागाने आपली अकार्यक्षमता झाकण्या करीता कॅग (CAG) ची सुद्धा दिशाभूल करण्याचे धारिष्ट्य दाखवावे हे अत्यंत गंभीर असून आपण याची तातडीने दाखल घेऊन संबंधितांवर योग्य ती कारवाई करावी अशी विनंती आहे.

**४२) US FDA Approval ची अट रद्दबादल–**

सजग नागरिक मंच यांनी पुणे मनपाचे राजीव गांधी रुग्णालय व सोनावणे प्रसूतीगृह येथे नवजात अर्भक अतिदक्षता विभाग साठी उपकरणांना US FDA Approval ची अट सक्तीची केल्यामुळे उपकरणे महाग मिळून सरकारच्या Make In India महत्वाकांक्षी योजनेला यामुळे तिलांजली मिळणार म्हणून ही अट रद्द करावी असा आग्रह केला होता. कळविण्यास आनंद होत आहे कि मनपा प्रशासनाने ही अट रद्दबादल केली आहे त्याबद्दल प्रशासनाचे अभिनंदन व सर्व माध्यमे व पुणेकरांचे पाठिंब्यासाठी आभार

मनपाच्या राजीव गांधी रुग्णालय व सोनावणे प्रसूतीगृह येथे नवजात अर्भक अतिदक्षता विभाग सुरु करण्यासाठी वैद्यकीय उपकरण खरेदी साठी पुणे मनपा आरोग्य विभागाने पावणे दोन कोटी (१,७५,००,०००.० रुपये) चे टेंडर काढले आहे. टेंडर क्रमांक ५७ / २०१७. या टेंडर मधील सर्व महत्वाच्या उपकरणांसाठी US FA Approval असणे सक्तीचे केले आहे. यामुळे एकाही भारतीय कंपनीला टेंडर भरणे शक्य होणार नाही. आज मनपाच्या काही रुग्णालयांमध्ये ही यंत्रणा अस्तित्वात आहे जेथे संपूर्ण भारतीय बनावटीची यंत्रणा उत्तम काम देत आहे. इतकेच नव्हे तर भारतीय कंपन्यांनीं बनवलेली वैद्यकीय उपकरणे अनेक देशांमध्ये निर्यात ही होत असून ती अमेरिकन कंपन्यांपेक्षा ३० – ४० % ने स्वस्तही आहेत. असे असतानाही पुणे मनपाच्या आरोग्य विभागाने US FDA Approval ची अनाकलनीय व अनावश्यक अट टाकून स्पर्धा तर कमी

केलीच आहे शिवाय ही यंत्रणा महागडीही मिळणार आहे, आणि सर्वात महत्वाचे केंद्र व राज्य सरकारच्या Make In India या महत्वाकांक्षी योजनेला यामुळे तिलांजली ही मिळणार आहे.

**४३) सोनोग्राफी मशीन्सचा वापर अत्यल्पच; विधिमंडळाचीही जाणीवपूर्वक दिशाभूल.–**

पुणे मनपाच्या १६ इस्पितळांमध्ये/दवाखान्यांमध्ये जी सोनोग्राफी मशीन्स बसवण्यात आली आहेत त्याचा अत्यल्प वापर होत असल्याचे आम्ही मे २०१५ मध्ये आपल्या निदर्शनास पुराव्यानिशी आणले होते. या मशीन्सची खरेदी दीडपट भावाने झाल्याचेही आम्ही आपल्या निदर्शनास आणले होते. त्यानंतर आपण अतिरिक्त आयुक्त सौ. शीतल तेली उगले यांना या प्रकारची चौकशी करण्यास सांगितले होते, मात्र आजतागायत याचा चौकशी अहवाल गुलदस्त्यातच आहे. दरम्यानचा काळात या विषयावर विधानसभेत चर्चा झाली; LAQ ही दाखल झाला होता त्याला उत्तर देताना आपण दरमहा ५०० रुग्ण या सेवेचा लाभ घेतात असे उत्तर दिले (यात सर्व मशीन्स वर मिळून दरमहा ५०० की एका मशीन वर दरमहा ५०० ही आकडेवारी जाणीवपूर्वक संदिग्ध ठेवण्यात आली). आम्ही नुकतीच या मशिन्सच्या वापरासंधर्भातील जून २०१७ ते सप्टेंबर २०१७ या ४ महिन्यातील माहिती मागितली जी सोबत सोडत आहोत. या आकडेवारीवरून स्पष्ट होते की सरासरी प्रत्येक महिन्यात १६ मशिन्स वर मिळून फक्त ३०८ रुग्ण तपासले गेले याचाच अर्थ विधानसभेचीही दिशाभूल करण्यात आली, जे अत्यंत गंभीर आहे.

किमान आता तरी आपण या विषयाची गाम्भीर्याने दाखल घेऊन चौकशी अहवाल जाहीर करावा तसेच विधानसभेची जाणीवपूर्वक दिशाभूल करणाऱ्यांवर कारवाई करावी अशी आग्रहाची मागणी आहे.

**४४) E Learning साठी २१ कोटी रुपयांच्या योजनेसंबंधी. –**

पुणे मनपाच्या २८७ प्राथमिक शाळांमधून Virtual Class Room / E Learning प्रणाली तसेच Digital Class Room करण्याच्या २१ कोटी रुपयांच्या प्रशासनाच्या योजनेस स्थायी समितीने नुकतीच मान्यता दिली आहे. या सर्व शाळांमध्ये ही यंत्रणा उभारण्यात येणार

असून या आधी या योजनेसाठी २४ कोटी रुपयांचा प्रस्ताव मनपा प्रशासनाने ठेवला होता तो स्थायी समितीने फेटाळल्यानंतर आता हा सुधारित २१ कोटी रुपयांचा प्रस्ताव मान्य करण्यात आला आहे. काही महिन्यांपूर्वी हीच योजना फक्त ३.५० कोटी रुपयांमध्ये करणे शक्य असल्याचे Presentation आपल्यासह मनपाच्या अधिकारी व पदाधिकारी यांना देण्यात आले होते. २१ कोटींची योजना मान्य करताना या ३. ५० कोटी रुपयांच्या प्रस्तावाचे काय झाले याचा कोणताही खुलासा करण्यात आला नाही.

आज रोजी पुणे मनपाच्या २८७ शाळांमध्ये ८६१ LED / LCD तसेच २८१ संगणक व २८७ Projectors उपलब्ध आहेत. हे लक्षात घेता ह्या प्रकल्पासाठी या वस्तू नव्याने घेण्याची आवश्यकता नसून उराशीरी, Interactive IR Sensors व इतर साधन सामुग्री विकत घेण्यासाठी फक्त ३.५० कोटी खर्च येण्याचे Presentation केंद्रीय मंत्री श्री प्रकाश जावडेकर, पुणे मनपा आयुक्त, महापौर, स्थायी समिती अध्यक्ष तसेच इतर अधिकारी, पदाधिकारी यांना दाखविण्यात आले होते व त्याचे त्यावेळी सर्वांनी कौतुक ही केले होते. मात्र आता ही ३.५० कोटींमध्ये शक्य होत असलेली योजना २१ कोटी रुपये खर्च करून करण्याचा घाट का, कोणी व कशासाठी घातला आहे? याची उत्तरे ज्या पुणेकरांच्या करांच्या पैश्यातून हा खर्च केला जाणार आहे त्यांना मिळणे गरजेचे आहे.

३. ५० कोटीची योजना न स्वीकारता २१ कोटी रुपये खर्चाला का मान्यता देण्यात आली, आधीच्या योजनेत काय त्रुटी होत्या या सर्व बाबींचा सविस्तर खुलासा तातडीने करावा अशी सजग नागरिक मंचची आग्रहाची मागणी आहे.

**४५) पुणे मनपाच्या मुख्य भवन येथे नव्याने विकसित होत असलेल्या इमारतीमधील मुख्य सभागृहासाठीची निविदा प्रक्रिया तातडीने रद्द करण्यात आली –**

पुणे मनपाच्या मुख्य भवन येथे नव्याने विकसित होत असलेल्या इमारतीमधील मुख्य सभागृहासाठी H.D. Camera Control, LCD Monitor व Digital Podium System पुरविणे व अनुषंगिक विद्युत विषयक कामे करणे अशी ही ७४,७७,२२६ रुपयांची निविदा काढण्यात आली. या दुपटीने फुगविण्यात आलेल्या निविदेमुळे मनपाचे किमान ३५ लाख रुपयाचे नुकसान होणार असल्याने ही निविदा प्रक्रिया तातडीने रद्द करण्यात यावी. अशी मागणी सजग नागरिक मंचाने मनपा आयुक्त व अतिरिक्त आयुक्तांकडे केली.

कळविण्यास आनंद होत आहे कि दोन्ही अधिकाऱ्यांनी तात्काळ प्रतिसाद देत निविदा रद्द करून संबंधितांची चौकशी चे आदेश दिले.

विद्युत विभागाकडून मागविण्यात आलेल्या निविदा क्रमांक ७९ / २०१७ चे दर दुपटीपेक्षा जास्त दराने फुगवलेले दिसून येत आहे. पुणे मनपाच्या मुख्य भवन येथे नव्याने विकसित होत असलेल्या इमारतीमधील मुख्य सभागृहासाठी H.D. Camera Control, LCD Monitor व Digital Podium System पुरविणे व अनुषंगिक विद्युत विषयक कामे करणे अशी ही ७४,७७,२२६ रुपयांची निविदा काढण्यात आली.

वरील निविदेतील Item क्रमांक १ चा दर ५, २४, ५७५. ० रुपये एव्हडा नमूद करण्यात आला असून याच Item चा DSR दर (पुणे मनपा विद्युत विभाग DSR क्रमांक १२३५५२) फक्त ७०,०००/- रुपये एव्हढा आहे. निविदेतील दर साधारण ८ पट जास्त आहे. ज्या Bosch कंपनीच्या NEZ -४१२१२-PPCW ४ या मॉडेलवरून संबंधित स्पेसिफिकेशन्स घेतली आहेत ते मॉडेल ८१,८९९/ रुपयांना उपलब्ध आहे. तसेच Item क्रमांक ११ चा दर १२, ६९, ०००/- रुपये एव्हडा नमूद करण्यात आला असून याच PN-Q८०१ मॉडेल च्या शासकीय खरेदीच्या GEM eMarket place वेबसाईट येथे Product Id २१९१६२ नुसार दर फक्त ७,२०,०००/- रुपये एव्हडा आहे. वरील निविदेच्या संधर्भात आलेल्या कोटेशन्स नंतर ५.४० % कमी ने निविदा मंजूर झाली. आता ही निविदा ऑडिट / दक्षता कडे जाणार आहे. या दुपटीने

फुगविण्यात आलेल्या निविदेमुळे मनपाचे किमान ३५ लाख रुपयाचे नुकसान होणार असल्याने ही निविदा प्रक्रिया तातडीने रद्द करण्यात यावी.

तसेच या सर्व अनियमिततेला जबाबदार असलेले अधिकाऱ्यांवर त्वरित निलंबनाची कार्यवाही करण्यात यावी तसेच सार्वजनिक पैश्यांचा अपव्यय व अपहार उद्धेश्य कारणी फौजदारी गुन्हा ही दाखल करण्यात यावा, अशी सजग नागरिक मंचची मागणी आहे.

**४६) SNDT येथील जुनी MLR पाण्याची टाकी धोकादायक अवस्थेत तर नवी MLR टाकी वापराविना पडून.–**

SNDT येथील टेकडीवर एरंडवणा, भांडारकर रोड, प्रभात रोड वगैरे भागात पाणीपुरवठा करण्यासाठी सुमारे ४५ वर्षांपूर्वी MLR टाकी बांधण्यात आली. त्यानंतर १० वर्षांपूर्वी या टाकीला पर्यायी म्हणून नवीन MLR टाकी बांधण्यात आली. मात्र आजही नवीन MLR टाकी; त्याकरिता घेण्यात आलेले पम्प व पंपहाऊस वापराविना पडून आहे. ४५ वर्षांपूर्वी बांधण्यात आलेल्या जुन्या टाकीच्या स्लॅब ला अनेक ठिकाणी भोके पडली असून तो स्लॅब धोकादायक झालेला आहे. त्या टाकीवर बांधलेल्या दोन चिमण्यांचीही पडझड झालेली आहे. स्लॅबच्या भोकांमधून घाण पाणी, कचरा अश्या अनेक गोष्टी या टाकीत पडत असून ते पाणी तसेच पुढे पिण्यासाठी पुरवले जात आहे. या जुन्या टाकीची दुरुस्ती करणे आवश्यक असून नवीन टाकी आता तरी किमान १० वर्षांनी तरी वापरात आणणे आवश्यक आहे.

आपले प्रशासन २४x७ योजनेच्या पाण्याच्या टाक्यांच्या भूमिपूजनात व्यस्त असल्याने अस्तित्वात असलेल्या टाक्यांच्या दुरावस्थेकडे लक्ष देण्यास वेळ मिळत नसणे शक्य आहे. परंतु एखादी दुर्घटना घडल्यावर चौकशी समिती नेमण्याऐवजी वेळीच जुन्या टाकीची दुरुस्ती करून नवीन टाकीचा वापर सुरु करावा, अशी सजग नागरिक मंचची विनंती आहे.

**४७) पुण्यात आधार केंद्राच्या कमतरतेमुळे नागरिकांचे अतोनात हाल.–**

केंद्र व राज्य सरकारने गेल्या काही महिन्यांपासून विविध सरकारी योजना तसेच अनेक अन्य गोष्टींसाठी आधार कार्ड जोडणे बंधनकारक केले आहे. मात्र अनेक नागरिकांना आधार कार्ड नोंदणीची किंवा त्यातील दुरुस्तीची पुरेशी सोयच उपलब्ध होत नसल्याने त्यांची ससेहोलपट होत आहे. पुण्यासारख्या मोठ्या शहरात किमान २५०/३०० केंद्रे सुरु करण्याची आवश्यकता आहे तिथे २५/३० ठिकाणीसुद्धा ही केंद्रे सुरु नाहीत आणि यामुळे नागरिकांना २/३ महिन्या पुढील Appointments दिल्या जात आहेत. पोस्ट ऑफिस, BSNL अश्या अनेक ठिकाणी आधार केंद्रे सुरु करण्याच्या अनेक घोषणा गेल्या महिन्यात झाल्या परंतु त्या आजही कागदावरच राहिल्या आहेत. पुण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी सरकारी कार्यालयांच्या आवारात आधार नोंदणी व दुरुस्ती चे काम करण्याची तयारी एजन्सी ची पडताळणी करून १८० जणांची यादी आपल्या मुंबई स्थित कार्यालयाकडे पाठविण्याच्या घटनेला एक महिना होऊन गेला असल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सांगण्यात येत आहे.

सजग नागरिक मंचची विनंती आहे कि केंद्र सरकारची लालफीतशाही विरोधी धोरण तसेच आधार केंद्रांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होण्याची गरज लक्षात घेता आपण कोणताही कालापव्यय ना करता पुणे जिल्हाधिकाऱ्यांनी पाठविलेल्या १८० आधार नोंदणी केंद्राच्या यादीला विना विलंब संमती द्यावी.

२०० कोटी रुपयांचे कर्ज रोखे काढण्यापेक्षा २९० कोटी रुपये राज्य सरकारकडून येणे असलेली रक्कम वसूल करण्यासाठी प्रयत्न का झाले नाही?

**४८) २०० कोटी रुपयांचे कर्ज रोखे काढण्यापेक्षा २९० कोटी रुपये राज्य सरकारकडून येणे असलेली रक्कम वसूल करण्यासाठी प्रयत्न का झाले नाही?-**

२४x७ पाणी पुरवठ्यासाठी २०० कोटी रुपयांचे कर्जरोखे काढण्यासाठी आपण अपार कष्ट केलेत. मात्र दुसरीकडे पुणे मनपाच्या वेगवेगळ्या विभागांना महाराष्ट्र राज्य सरकारकडून ३१ मार्च २०१७ रोजी देय असलेले २९० कोटी रुपये अनुदान मिळविण्यासाठी मात्र आपणाकडून प्रयत्न होताना दिसत नाही. यावर कळस म्हणजे यापूर्वी झालेल्या पाणी पुरवठा योजनांच्या खर्चातील

महाराष्ट्र शासनाच्या अनुदानाचा वर्षानुवर्षे थकीत असलेला ९३ कोटी रुपयांचा वाटा अजूनही मनपाला मिळाला नाही. जेव्हढी मेहनत आपण मनपाला कर्जरोखे मिळावे म्हणून घेतली त्यापेक्षा निम्मी मेहनत ही मनपाच्या हक्काचे २९० कोटी रुपये, शासनाकडून मिळविण्यासाठी घेतली असती तर आज हे कर्जरोखे काढण्याची वेळ ही आली नसती आणि त्यावर व्याज ही भरण्याची.

आपणास विनंती कि आतातरी राज्यसरकार कडून २९० कोटी रुपये तात्काळ मिळावेत यासाठी आपण प्रयत्न करावेत.

**४९) चौगुले दांपत्याच्या लढ्याची बातमी पुणे महापालिका प्रशासनाच्या उदासीन व बेमुर्वतखोर कारभाराचा नमुना आहें;-**

१२-१२ वर्षे लढा देऊन उच्च न्यायालयापर्यंत दारे ठोठावूनही आणि न्यायालयाचा निकाल त्यांच्या बाजूने होऊनही आपले अधिकारी ढिम्म राहतात हा फक्त न्यायालयाचा अवमानच नाही तर अधिकार्यांना कोणाचाच वचक नसल्याचे चिन्ह आहे. निदान आता तरी आपण तातडीने या विषयात लक्श घालून न्यायालयाच्या निर्णयाचा मान ठेऊन अनधिक्रूत बांधकाम पाडून टाकण्यास संबंधित अधिकार्यांना भाग पाडावे आणि ज्या अधिकार्यांनी न्यायालयाचे आदेश ही न मानण्याचा बेगुमानपणा दाखवला त्या सर्व अधिकार्यांना निलंबित करावे अशी सजग नागरिक मंचची मागणी आहें -

**५०) गेल्या वर्षीच्या बोर्डाच्या परीक्षेतील १० वी/१२ वी चे गुणवंत विद्यार्थी अजून ही शिष्यवृत्ती पासून वंचित.-**

गेली काही वर्षे मनपा, पुणे शहरातील ८० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवून बोर्डाची परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्याला , प्रत्येकी १५००० रुपये वार्षिक शिष्यवृत्ती देत आहे. तसेच १२ वी बोर्डाची परीक्षा ७५ टक्के गुण मिळवून उत्तीर्ण होणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला २५००० रुपये इतकी शिष्यवृत्ती देत आहे. मनपाच्या गतिमान प्रशासनामुळे गेल्या वर्षीपर्यंत ही शिष्यवृत्ती किमान मार्च अखेर पर्यंत मिळत होती. यंदा मात्र या वर्षीचा १० वी/१२ वी चा निकाल घोषित होण्याची वेळ आली तरी ''स्मार्ट'' प्रशासन अजूनही गेल्यावर्षीची शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थी यांना देऊ शकली

नाही. मनपाचा कारभार E Governance च्या माध्यमातून गतिमान करण्यात येणार असल्यामुळे ही रक्कम प्रत्येक विद्यार्थी याच्या खात्यात थेट जमा करण्याची घोषणा करण्यात आली होती. परंतु आज अखेरपर्यंत या घोषणेची अंमलबजावणी झाली नाही.

सजग नागरिक मंचची विनंती आहे कि मनपाचा कारभार "स्मार्ट" आणि "गतिमान" झाला आहे याचा अनुभव किमान या शहरातील गुणवंत विद्यार्थी यांना तरी मिळावा म्हणून तरी शिष्यवृत्तीची रक्कम तातडीने विद्यार्थी यांच्या खात्यात जमा करावी.

**५१) "शिक्षण मंडळाच्या प्रभारी प्रमुख निलंबित" –**

२०१६-१७ शैक्षणिक वर्षातील मंडप/स्पीकर बाबींसंदर्भात पुणे मनपा शिक्षण मंडळाने अदा केलेल्या ४६, ३९, ३९० रुपये बिलातील अनियमिततांची चौकशी करावी. २०१६-१७ शैक्षणिक वर्षात पुणे मनपा शिक्षण मंडळाने मंडप/खुर्च्या/स्पीकर/जनरेटर इत्यादी गोष्टींसाठी ४६, ३९, ३९० रुपये खर्चाचे बिल अदा केले आहे. या संदभातील कागदपत्रे सोबत जोडत आहोत. या प्रकरणामध्ये खालील अनियमितता दिसून येतात.

१ – बिल क्रमांक ४०२, ४०३, ४०४ आणि ४०६ मध्ये शिक्षक प्रशिक्षण शिबिरांमध्ये प्रत्येक दिवशी ४ जनरेटर तासाला ३००० रुपये भाड्याने आणण्यात आल्याचे दाखवले गेले आहे. फक्त ५० शिक्षकांसाठी हे शिबिर घेतले गेले . पुण्यात वीज जाण्याचे नगण्य प्रमाण आणि थंडीचे दिवस लक्षात घेता एका हॉल मधील ट्रैनिंग साठी ४ जनरेटर सेट आणणे अशक्य व अतार्किक वाटते, ज्यावर १५ लाख ३६ हजार रुपये खर्च दाखवला गेला आहे. एवढ्या पैश्यात दोन जनरेटर कायमस्वरूपी विकत आणता आले असते.

पुण्यातील राज्यपाल / राष्ट्रपती निवासस्थानी राजभवन मध्ये फक्त २ जनरेटर्स आहेत याची येथे नोंद घेणे आवश्यक आहे.

२ – बिल क्रमांक ४०७ मध्ये ५ जनरेटर एका दिवसासाठी वापरले गेल्याचे दाखवून ९०, ००० रुपयांचे बिल अदा केले आहे.

३ – अंदाजपत्रकीय तरतूद शिल्लक नसताना माननीय आयुक्त पुणे मनपा यांची प्रशासकीय मान्यता न घेताच बिल अदा करण्यात आले आहे असून ''मनपा आयुक्तांची पश्चात मान्यता घ्यावी'' असा शेरा मारून प्रभारी शिक्षण प्रमुख यांनी आयुक्तांना गृहीत धरण्याचा पराक्रम करून दाखवला आहे.

४ – प्रभारी शिक्षण प्रमुख यांना काल माहिती अधिकार दिनी संपर्क केला असता त्यांनी शिक्षक प्रशिक्षण शिबिरे कोठे झाली व प्रत्येक शिबिरात किती शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले या संबधीची माहिती व कागद पत्रांचा शोध घेतो असे सांगितले. गेल्या ३ महिन्यात झालेल्या या प्रशिक्षण शिबिराची कागदपत्रे तात्काळ उपलब्ध नसावी हे ही संशयास्पद आहे.

हे सर्वच प्रकरण गंभीर व संशयास्पद असून त्याची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी अशी सजग नागरिक मंचची मागणी आहे.महापालिका शिक्षण मंडळाच्या वतीने घेतलेल्या कार्यक्रमांचे तब्बल ४६ लाख रुपयांचे बिल महापालिका आयुक्तांची मंजुरी न घेता दिल्याच्या आरोपावरून मंडळाच्या प्रभारी प्रमुख शुभांगी चव्हाण यांना निलंबित करण्यात आले आहे. या संधर्भात अतिरिक्त आयुक्त राजेंद्र जगताप यांनी आदेश काढला. शिक्षण मंडळ प्रशासनाने परस्पर बिले दिल्याचे सजग नागरिक मंचाने मागविलेल्या माहितीतून उघड झाले होते.

महापालिका शिक्षण मंडळाच्या वतीने घेतलेल्या कार्यक्रमांचे तब्बल ४६ लाख रुपयांचे बिल महापालिका आयुक्तांची मंजुरी न घेता दिल्याच्या आरोपावरून मंडळाच्या प्रभारी प्रमुख शुभांगी चव्हाण यांना निलंबित करण्यात आले आहे. या संधर्भात अतिरिक्त आयुक्त राजेंद्र जगताप यांनी आदेश काढला.

शिक्षण मंडळ प्रशासनाने परस्पर बिले दिल्याचे सजग नागरिक मंचाने मागविलेल्या माहितीतून उघड झाले होते.

**५२) ऑटोरिक्षाच्या आतील बाजूस प्रवाश्यांना दिसेल अशा ठिकाणी रिक्षाचा क्रमांक प्रदर्शित करण्याबाबत.**

सुमारे दोन वर्षांपूर्वी आम्ही आपणास वरील विषयांकित मागणी केली होती. आपण त्या मागणीला प्रतिसाद देत सोबत जोडलेले कार्यालयीन आदेश देखील सर्व मोटार वाहन निरीक्षकांना प्रसूत केले होते. परंतु आजही बहुसंख्य रिक्षांमध्ये ऑटोरिक्षाच्या आतील बाजूस प्रवाश्यांना दिसेल अशा ठिकाणी रिक्षाचा क्रमांक प्रदर्शित केलेला दिसत नाही तसेच प्रादेशिक परिवहन विभागाकडून व संबंधित पोलीस खात्याकडून ही कधी कारवाई होताना दिसत नाही.

सजग नागरिक मंचची आपणास विनंती कि सर्व मोटार वाहन निरीक्षक यांना या तरतुदीचे तंतोतंत पालन करण्याचे निर्देश द्यावे. तसेच आपल्या फिरत्या पथकास देखील यासंबंधी निर्देश देऊन दोषींवर कारवाई करावी.

याच पत्राद्वारे आम्ही माननीय DCP (Traffic) यांना देखील यासंबंधी निर्देश देऊन दोषींवर कारवाई करावी अशी विनंती करत आहोत.

**⁕ सजग नागरिक मंच या संस्थेच्या कार्याची वैशिष्ट्ये**

१) **पारदर्शकता –** माहिती अधिकार वापरा आणि जीवन सुखी करा या उक्ती प्रमाणे कार्यकरणारी संस्थाम्हणजे सजग नागरिक मंच होय. सजग नागरिक मंचने आजवर अनेक नागरी प्रश्नांवर लक्ष केंद्रीत केले आहे. पारदर्शकपणे माहिती अधिकाराचा वापर करून सरकारी निमसरकारी कार्यालयात गेल्यावर नागरीकाला ज्या छळवणुकीला, दप्तरदिरंगाईला, अरेरावीला, लाचखोरीला तोंडद्यावे लागते त्या सर्व अनागोंदी कारभाराला चाप लावताना कोणताही आणि कोणाविषयीही पुर्वग्रह न ठेवता वस्तुनिष्ट माहिती मिळवून त्यावर आधारीत भूमिका वेळोवेळी सजग नागरिक मंचने घेतली आहे.

२) **मतदार जागृती –** लोकशाही बळकट करण्यासाठी सजग नागरिक मंचने मतदारांना मतदान करण्यासाठी सदैव प्रोत्साहीत केले आहे. चारित्र्य संपत्ती विश्वासार्हता पाहून मतदान करावे यासाठी आग्रही भूमिका सजग नागरिक मंचने घेतली आहे. भारतीय मतदारांची उदासीन मानसीकता झटकून देवून त्यातल्या–त्यात चांगला उमेदवार निवडावा, मतदान टक्केवारी वाढावी यासाठी प्रयत्नशील राहण्याचा प्रयत्न केला आहे. वृत्तपत्र, चर्चासत्र, मासीक सभा यामधून

त्याचा वांरवार पुर्नउच्चार केला जातो. लोकांनी विचारपुर्वक मतदान करावे. आपण ज्याला मत देतो तो उमेदवार कसा आहे, हे जाणून घेवून उमेदवारांना प्रश्न विचारा आणि अपेक्षित उत्तर आले तरच त्याला मतदान करा.

३) **ग्राहक चळवळ –** राष्ट्रीयकृत बँका, एलआयसी, बीएसएनएल, महावितरण, एसटी महामंडळ, रस्ते विकासमहामंडळ, म्हाडा यासांरख्या शासनाच्या सेवा देणा–या संस्थांनी ग्राहकहीतासाठी काम करावे यासाठी प्रयत्नशील राहणारी संस्था म्हणजे सजग नागरिक मंच होय.

४) **भ्रष्टाचार निर्मुलन –** जनतेला भ्रष्टाचारापासून मुक्तता हवी आहे. त्यासाठी नागरिकांनी सजग राहण्याची गरज आहे. भ्रष्टाचा–यांवर तातडीने कारवाई, भ्रष्टाचारास संरक्षण देणा–यांवरही कारवाई आणि या कारवाईमध्ये आडथळा ठरणा–या कायद्यामध्ये बदल अशी तिहेरी भूमिका बजावावी म्हणून शासनास वेळोवेळी मार्गदर्शन सजग नागरिक मंचने केलेले आहे.

शासन, प्रशासन, लोकप्रतिनिधी यांचे कार्य योग्य प्रकारे चालले आहे का याची पाहणी करून वेळोवेळी माहिती अधिकार कायद्याद्वारे भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडकीस आणली आहेत. राजकारणी, कंत्राटदार, व अधिकारी यांची अभद्र युतीमुळे सर्वसामान्य माणूस लुटला जावू नये यासाठी सजग नागरिकमंचने कार्य केले आहे. उदा. टोलप्रश्न

५) **लोकशाहीवर निष्ठा –** लोकशाहीमध्ये देशाचा कारभार लोकांच्या हाती असला पाहीजे. शासन प्रशासन लोकाभिमुख हवे, पायाभूत सुविधा विकसीत करताना लोकहिताला समोर ठेवले पाहिजे. लोकशाही मुल्यांवर निष्ठा ठेवून सजग नागरिक मंचने कार्य केले आहे. कुठल्याही स्वरूपाच्या भ्रष्टाचाराचा, कुठल्याही स्वरूपाच्या गुन्हाचा ठपका सजग नागरिक मंचावर नाही. तथाकथित लोकांच्या न्याय हक्कासाठी लढणा–या संघटनांचा हिंसाचार दहशतबाजी न करता देखील कायद्याच्या ज्ञानाने धाक निर्माण करणारी संस्था असा सजग नागरिक मंचचा चेहरा आजवर राहीला आहे.

६) **नागरिकामध्ये जागृती –** स्वातंत्र्यानंतर भारतीय समाज हा आत्मकेंद्रीत होत गेला. कुटुंबात रममाण होवून मी, माझे करीअर, माझी व्यक्तीगत प्रगती यामुळे देशातील कर्त्याधर्त्यांनी समाजला स्वप्नवत समजले स्वप्नवत समाजाला गृहीत धरता येते हे कळल्यानंतर

लोकशाहीच्या नावाखाली घराणेशाही रूजवली गेली. या सगळ्याचा परिणाम म्हणून स्वराज्य स्वप्न अधुरे राहीले अशी मांडणी  सजग नागरिक मंचचे विवेक वेलणकर यांनी केली आहे. त्यामुळे राजकारण्यांवर,प्रशासनावर अंकुश ठेवण्यासाठी नागरिकांनी जागे राहणे गरजेचे आहे.

७) **बिगर राजकिय संघटन –** सजग नागरिक मंच ही बिगर राजकिय संघटना आहे. कोणत्याही पक्षाशी थेट बांधिलकी न ठेवता कार्यकरणारी संस्था असे सजग नागरिक मंचाचे स्वरूप आहे. सजग नागरिक मंचवर आजवर कोणत्याही पक्षाचे लांगुनचालन केले असा आरोप नाही.तरीही सर्वच राजकिय पक्षांना सजग नागरिक मंचा बद्दल आदर असल्याचे जाणवते.

८) **नागरी प्रश्नांची सोडवणूक –** सजग नागरिक मंचने नागरी प्रश्नांना प्राधान्य दिले आहे. सुरवातीला एसएससी– एचएससी विद्यार्थी यांच्यासाठी तथाकथीत मॉडल अन्सर्स उपलब्ध व्हावेत याच्यासाठी प्रयत्न केले होते. उपरोक्त २०१७ ते २०१८ या वर्षाच्या कार्याचा आढावा घेतला तर सगज नागरिक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी माहिती अधिकाराचा केलेला वापर याचा पडताळा होतो.

९) **न चुकता होणाऱ्या मासीक सभा –** तेरा वर्षे इतका काळ एखादी संघटना चालवणे आणि तिचे नित्यनियमाने मासिक सभा होणे हे देखील सजग नागरिक मंचचे वैशिष्ट्य आहे. या मासिक सभेमध्ये अनेक तत्त्कालीन मुद्दे सामाविष्ट असतात त्यात्या वेळी सजग नागरिक मंचने हाताळलेल्या प्रश्नावर मासीक सभेमध्ये चर्चा होते.

१०) **पायाभूत सुविधांच्या दर्जाचा पाठपुरावा –** पायाभूत सुविधांचा विकास होत असताना त्याचा दर्जा योग्य आहे किंवा नाही याची अभ्यासपूर्ण मांडणी सजग नागरिक मंचचे अध्यक्ष विवेक वेलणकर यांनी वृत्तपत्रामधून केली आहे. रस्ते विकास करताना बांधण्यात येणा–या रस्त्यांचा दर्जा मानकांप्रमाणे आहे का? स्पीडकटर शास्त्रशुद्ध आहेत की अशास्त्रीय याची मांडणी वेळोवेळी सजग नागरिक मंचाने केलेली आहे. तसेच मानकांप्रमाणे दर्जा आणि शासनाने ठरवल्याप्रमाणे दर यांचा अभ्यास करून वेळोवेळी निघणा–या निविदा आणि देण्यात येणारी कंत्राटे यावर सजग नागरिक मंचने बारकाईने लक्ष दिलेले आहे.

११) **माहिती अधिकाराचा साधन म्हणून वापर –** माहिती अधिकार कायद्याची प्रभावी वापर करून माहिती अधिकाराद्वारे प्रशासन गतीमान कार्यक्षम करण्याचा आग्रह सजग नागरिक मंचने केला आहे. त्यांच्या कार्यात देखील तेच सुत्र असल्याचे समोर येते आहे. लोकसहभाग, उत्तरदायीत्व, पारर्दशकता, आणि सामजिक माहिती यांच्या केंद्रस्थानी माहिती अधिकार आहे. माहिती अधिकारात लोकांचा लोकसहभाग असावा यासाठी माहिती अधिकार हे साधन कसे वापरावे यासाठी सजग नागरिक मंचच्या वतीने आजवर अनेक कार्यशाळा व्याख्याने आयोजीत करण्यात आली आहेत. अनेक गरजूना मार्गदर्शन करण्यात आले आहे.

१२) **माहिती अधिकार कार्यकर्त्यांचा सत्कार –** विधायक कार्यासाठी माहिती अधिकाराचा वापर केल्याबद्दल समाजातील माहिती अधिकार कार्यकर्त्यांचा सत्कार दरवर्षी आयोजीत करणे हे संस्थेचे महत्त्वपुर्ण वैशिष्ट्य आहे. कायद्याच्या वापरातील संधी आणि धोके लक्षात घेवून कार्यकर्त्यांनी कार्य करावे. तारतम्य दाखवून माहिती मागवावी आणि ती जनतेसमोर उघड करावी. यासाठी सजने नवोदित माहिती अधिकार कार्यकर्त्यांना प्रोत्साहन दिले आहे.

१३) **कार्यक्षम अधिका–यांच्या पाठिशी ठामपणे –** तुकाराम मुंडे, ओमप्रकाश बकोरीया यांसारख्या पारदर्शक कारभार करणा–या अधिका–यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणारी संस्था असा सजग नागरिक मंचचा लौकीक आहे. त्यासंदर्भातील एक उदाहरण म्हणजे पुणे महानगर पालीकेचे अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश बकोरीया यांची बदली काही राजकीय दबावाखाली केली गेली. त्यांचा कार्यकाळ पुर्ण होण्याआधीच त्यांची बदली करण्यात आली. त्यावेळी महाराष्ट्राचे माहिती आयुक्त रत्नाकर गायकवाड याच्याकडे सजग नागरिक मंचने तक्रार दाखल केली. माहिती अधिकार कलम चार प्रमाणे बदलीचे कारण शासनाने जाहीर करावे अशी मागणी केली त्याच वेळी इतर अतिरिक्त आयुक्त यांना कालावधी वाढवून मिळाला त्यावरही खुलासा मागीतला.

१४) **माहिती अधिकार कायद्याबाबत जनजागृती –** माहितीचा अधिकार कायदा कसा वापरावा याचे मार्गदर्शन मागेल त्याला सजग नागरिक मंच करत आला आहे. सजग नागरिक मंचने माहिती अधिकाराच्या प्रसारासाठी अनेक कार्यशाळा,प्रशिक्षणे, व्याख्याने आयोजीत केली

आहेत. तसेच अनेक शाळा महाविद्यालयांमध्ये माहिती अधिकाराच्या प्रसारासाठी घेतलेल्या कार्यशाळेत सजग नागरिक मंचचे विवेक वेलणकर यांनी आपल्या व्याख्यानाने दिली आहेत. माहिती अधिकार कायद्याच्या कार्यशाळेत रंजक पणे माहिती अधिकाराचे पैलू विवेक वेलणकर यांनी विद्यार्थ्यांना नागरिकांना समजावून सांगितले आहे.

१५) **शाखानसूनही महाराष्ट्रात सर्वदूर पोहचलेली संघटना –** सजग नागरिक मंचने आपल्या कार्याने जनतेच्याच नव्हे तर त्यांच्या विरोधात असणा–यांच्या मनात देखील आदराचे स्थान मिळविले आहे. शाखानसूनही सदर संस्था अनेकांच्या घराघरामध्ये पोहचली आहे. पण शाखा विस्तार करणे हे या संस्थेचे उद्दीष्टच नाही. माहिती अधिकार ही कोणत्याही एका संस्थेची मक्तेदारी नाही. माहिती अधिकार हा नागरिकांसाठी आहे नागरिकांनी तो कसा वापरावा याचे ज्ञान संस्था मागेल त्याला देत असते. मार्गदर्शन घेवून कोणीही संस्था स्थापन करावी किंवा वैयक्तीक स्वरूपात माहिती अधिकार क्षेत्रात कार्य करावे.मात्र राजकारणापासून दूर असलेल्या संस्थेचा कोणीही राजकीय स्वार्थासाठी वापर करू नये असे संस्थेला वाटते.

१६) **माहिती मिळाल्याक्षणी वृत्तपत्रांना आणि जनतेसाठी खुली –** माहिती अधिकार क्षेत्रात कार्यकरणारी सजग नागरिक मंच ही अशी संस्था आहे. की जी माहिती मिळाल्याक्षणी सार्वजनिक करून टाकते. त्यामुळे माहिती अधिकार वापरताना पार्दशकता कशी ठेवावी याचा हा आदर्श वस्तुपाठ आहे.

१७) **माहिती अधिकार कायद्याच्या तपशीलवार अंमलबजावणीसाठी प्रयत्नशील –** माहिती अधिकारातील कलम चार प्रमाणे शासनाने स्वत:हून जास्तित जास्त माहिती जनतेस देणे आवश्यक आहे. मात्र अनेक शासनाच्या अनेक वेबसाईटस् या अनेक काळापासून अपडेट झालेल्या नसल्यामुळे माहिती आयुक्तांकडे सजग नागरिक मंचने त्यासंदर्भात तक्रार केली. त्यांच्या तक्रारीची दखल घेवून सामान्य प्रशासन विभागाचे उपसचिव राजेंद्र जाधव यांनी परिपत्रक काढले त्यानुसार त्यांनी १ जानेवारी आणि १ जुलै अशी वर्षातून दोनवेळा शासनाच्या वेबसाईटस् अद्यायावत करण्या बाबत आदेश दिला.

**नागरिकांना माहिती अधिकारात अभिलेख खुले करून देण्याबाबात परिपत्रक –** माहितीचा अधिकार अधिनियम २००५ द्वारे प्राप्त होणा–या माहिती अर्जांची संख्या कमीकरण्यासाठी आणि कामकाजामध्ये पारदर्शकता येण्यासाठी पुणे महानगरपालिकेने नागरिकांना माहिती अधिकारात अभिलेख उपलब्ध करून देण्याचा प्रयोग केला होता. त्याच धर्ती वर जिल्हास्तरीय कार्यालयापासून ते निम्नस्तरीय सर्व कार्यालयात नागरिकांना अवलोकनासाठी अभिलेख उपलब्ध करून देण्याचे परिपत्रक सामान्य प्रशासन विभागाने दिनांक २६ नोव्हेंबर, २०१८ काढले. त्यामागे सजग नागरिक मंचने केलाला पाठपुरावा प्रेरक ठरला आहे.

## प्रकरण चार भाग ब

## माहितीचे सादरीकरण व विश्लेषण

| अनुक्रम | प्रश्नावली |
|---|---|
| १. | तुम्हाला माहिती अधिकार कायद्याबद्दल माहिती आहे का? |
| २. | भ्रष्टाचार आणि गैरव्यवहार निर्मूलनासाठी माहिती अअधिकाराचा उपयोग होत आहे असे आपणास वाटते का? |
| ३. | विजय कुंभार यांचा माहिती अधिकार कायद्याची माहिती देणारा व्हीडीओ युट्युबवर आपण पाहिला आहे का? |
| ४. | तुम्हाला सजग नागरिक मंचाबद्दल माहिती आहे का? |
| ५. | यशदा या शासकीय संस्थेची तुम्हाला माहिती आहे का, जिथे माहिती अधिकार कायद्याचे अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग व सामान्य जणास माहिती अधिकाराचे प्रशिक्षण दिले जाते? |
| ६. | भारतात माहीती अधिकार कायदा कधी अस्तित्वात आला हे आपणास माहिती आहे का? |
| ७. | माहिती अधिकार कायद्याबद्दल प्रसार प्रचार व्हावा असे आपणास वाटते का? |
| ८. | माहिती अधिकार कायद्याची संबंधीत माहिती देणारी कार्यशाळा मोफत असावी का? |
| ९. | दारिद्र्यरेषेखालील व्यक्तीला माहिती अधिकार कायद्यांतर्गत माहिती मोफत मिळते का? |

| | |
|---|---|
| १०. | लोकशाही व्यवस्थेत माहिती अधिकार कायद्यामुळे लोकांच्या अधिकारात वाढ झाली असे तुम्हाला वाटते का? |
| ११. | तुम्हाला माहिती अधिकार कायद्यामुळे भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडीस आली आहे असे वाटते का? |
| १२. | माहिती अधिकारामुळे जबाबदारी प्रशासन निर्माण होत आहे असे आपणास वाटते का? |
| १३. | तुम्हाला माहिती अधिकाराच्या कलम ४ विषयी माहिती आहे का? |
| १४. | आपल्याला माहिती अधिकाराविषयी माहिती कोणत्या कार्यकत्यांनी संस्थानी यापूर्वी दिलेली आहे का? |
| १५. | आपण स्वतः माहिती अधिकाराचा वापर किंवा अर्ज केला होता का? |
| १६. | माहिती अधिकार कायद्यामुळे प्रशासनावर ताण वाढतो आहे असे आपणास वाढते का? |
| १७. | तुम्ही शासकीय कार्यालयामध्ये माहिती अधिकार कक्ष अथवा माहिती अधिकार फलक पाहिला आहे का? |
| १८. | माहिती अधिकार दिन कधी असतो? |
| १९. | माहिती अधिकार कायद्यांतर्गत शासकीय अभिलेख पाहता येतात हे आपणास माहित आहे का? |
| २०. | राज्य माहिती आयोगाचे मुख्य कार्यालय महाराष्ट्रात कोठे आहे हे आपणास माहित आहे का? |
| २१. | माहिती अधिकार कायद्याविषयी आपल्याला सोशल मिडीयाद्वारे माहिती मिळाली होती का? |

| | |
|---|---|
| २२. | अभिव्यक्ती स्वातंत्र्याविषयी आपणास माहिती आहे का? |
| २३. | अण्णा हजारे यांच्या कार्याविषयी आपणास माहिती आहे का? |
| २४. | भारतामध्ये फक्त भारतीय माहिती अधिकारात अर्ज करू शकतात असे आपणास वाटते काय? |
| २५. | शासकीय संकेतस्थळावर माहिती अधिकार कायद्यांतर्गत कलम ४ प्रमाणे आपणास अपेक्षित माहिती मिळते आहे का? |
| २६. | कोणतीही माहिती अधिकार कायद्याची माहिती देणारी प्रबोधन करणारी शासकीय संस्था आपणास माहित आहे का? |
| २७. | माहिती अधिकार कायदा जाणून घेण्यासाठी इंटरनेटचा वापर आपण करता का? |
| २८. | तुम्हाला शासनाकडून माहिती अधिकार कायद्याची अंमलबजावणी पूर्णपणे होत आहे असे वाटते का? |
| २९. | शालेय अभ्यासक्रमात माहिती अधिकार कायद्याचा समावेश अभ्यास केला जावा काय? |
| ३०. | प्रशासकीय कर्मचाऱ्यावर माहिती अधिकार कायद्यामुळे उत्तरदायीत्व निर्माण होते असे आपणास वाटते का? |

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कायदा अस्तित्वात येवून तेरा वर्षे झाली आहेत. माहिती अधिकार चळवळीचा सध्या दुस–या टप्पा सुरू आहे. त्यातील पहिल्या टप्प्यात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अस्तित्वात आणण्यासाठी लढा दिल्यानंतर दुस–या टप्प्या मध्ये माहिती अधिकार अधिनियमाच्या प्रभावी अमंलबजावणी साठी माहिती अधिकार चळवळ प्रयत्न करत आहे. माहिती अधिकाराचे सामाजिकरण करण्यासाठी माहिती अधिकार चळवळींचे कार्य प्रेरक ठरले आहे. लोकशाहीच्या सबलीकरणासाठी आणि भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी माहिती अधिकाराची जनतेला माहिती होणे गरजेचे असते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अस्तित्वात येण्यापुर्वी प्रशासनाच्या कार्याला पारदर्शकता, लोकाभिमुखता यावी म्हणून माहिती अधिकाराची कायद्याची आवश्यकता वेगवेगळ्या पातळ्यांवर चर्चिली जात होती. माहिती अधिकार कायदा अस्तित्वात आल्यावर लोकशाहीमध्ये जनता सार्वभौम आहे. माहिती अधिकाराला तेरा वर्षे पुर्ण होत असताना सामान्य लोकांना माहिती अधिकाराच्यामुळे प्रशासनामध्ये काही बदल झालेला जाणवतो का? माहितीच्या अधिकार विषयावर लोकजागृती झाली आहेका? जनतेला माहिती अधिकाराच्या कायद्याबाबात काय वाटते? यासह प्रश्नावलीतील प्रश्नाबाबत लोकांच्या मुलाखती घेतल्या आहेत. त्याआधारे तथ्य्य संकलन करून परिक्षण निरक्षणे नोंदवली आहेत तक्ता विश्लेषण केले आहे.

**तक्ता क्रमांक १** – तुम्हाला माहिती अधिकार कायद्याबद्दल माहिती आहे का?

| अनु | पर्याय | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १० | १०% |
| २ | नाही | ८५ | ८५% |
| ३ | काही प्रमाणात | ५ | ५% |
| एकुण | | १०० | १००% |

नमुना पाहणीत विचारण्यात आलेल्या प्रश्नावली प्रमाणे उत्तरदात्यांची मते जाणून घेतली आहेत. अनुसुची द्वारे विचारण्यात आलेल्या प्रश्नाप्रमाणे माहिती अधिकारासंदर्भात नागरिकांचे सामान्य ज्ञान आहे का हे तपासण्यात आले. तक्ता क्रमांक १ प्रमाणे माहिती अधिकार कायद्याबद्दल माहिती असणारे

व्यक्तींचे प्रमाण १० टक्के आहे. माहिती अधिकार कायद्याचा अर्थ माहित नसणा-या व्यक्तींचे प्रमाण ८५ टक्के आहे. यावरून स्पष्ट होते की माहिती अधिकार कायद्याचा अर्थ माहिती नसणारे नागरिक यांचे प्रमाण पुणे जिह्यामध्ये ५% आहे.

**तक्ता क्रमांक २ –** भ्रष्टाचार आणि गैरव्यवहार निर्मुलनासाठी माहिती अधिकाराचा उपयोग होतो आहे असे आपणास वाटते का?

| अनु | पर्याय | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | २० | २०% |
| २ | नाही | ७० | ७०% |
| ३ | काही प्रमाणात | १० | १०% |
| एकुण | | १०० | १००% |

भ्रष्टाचार निर्मुलनासाठी माहिती अधिकार प्रभावी आहे असे २० टक्के लोकांना वाटते मात्र ७० टक्के लोकांना भ्रष्टाचार निर्मुलनासाठी माहिती अधिकार प्रभावी आहे असे वाटत नाही. माहिती अधिकारामुळे अनेक भ्रष्टाचार उघडकीस आले पण त्यावर कारवाई होवून भ्रष्टाचार रोखण्यास आपल्या यंत्रणांना अपयश आले. अथवा संबंधितांना शिक्षा देण्यास झालेला विलंब भ्रष्टाचार निर्मुलन विषयावर आश्वासक रूप धारण करण्यास काही प्रमाणात अपयशी ठरला आहे.

**तक्ता क्रमांक ३ –** विजय कुंभार यांचां माहिती अधिकार कायद्याची माहिती देणारा व्हीडीओ युट्युबवर आपण पाहिला आहे का?

| अनु | पर्याय | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १९ | १९% |
| २ | नाही | ७१ | ७१% |
| ३ | काही प्रमाणात | १० | १०% |
| एकुण | | १०० | १००% |

जेष्ठ अण्णा हजारे यांच्या भ्रष्टाचाराविरोधातील अंदोलनाची प्रेरणा घेवून विजय कुंभार यांनी सुराज्य संघर्ष समितीची स्थापना केली. माहिती अधिकाराचा प्रसार प्रभावीपणे करण्यासाठी विजय कुंभार यांनी युट्युब चॅनल चालविले आहे. त्यांना ५८९ सबस्काईबर लाभले आहेत वेळोवेळी केलेल्या प्रत्येक पोस्टवर त्यांना १००० पेक्षा अधिक व्ह्युव मिळाले आहेत. माहिती अधिकाराच्या प्रसारासाठी संघटनांनी सोशल मिडिया माध्यमाचा वापर केल्यास माहिती अधिकाराच्या प्रसाराला चालना मिळेल. परिणामी माहिती अधिकार कायदा जन सामान्यांपर्यंत पोहचेल आणि लोकशाही सुदृढ होण्यास मदत होईल.

**तक्ता क्रमांक ४ –** तुम्हाला माहिती सजग नागरिक मंचबद्दल माहिती आहे का?

| अनु | पर्याय | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ६४ | ६४% |
| २ | नाही | ३६ | ३६% |
| ३ | काही प्रमाणात | ० | ०% |
| एकुण | | १०० | १००% |

सजग नागरिक मंच या संस्थेच्या कार्याबद्दल माहिती असणा–या व्यक्तींचे प्रमाण ६४ टक्के आहे. तर सजग नागरिक मंचसंस्थेच्याकार्याबद्दलमाहिती नाही असे सांगणा–या व्यक्तींचे प्रमाण ३६ टक्के आहे. पुणे करांच्या दैनंदिन जीवनात भेडसावणा–या समस्येची सोडवणूक करणा–या संस्थेची माहिती ३६ टक्के पुणे शहरातील लोकांना नाही. संस्थेच्या प्रसार प्रचार कार्यात कमतरता आहे असे दिसते. सजगने नागरिकांचा दबावगट म्हणून लोकांची सहभाग वाढवण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**तक्ता क्रमांक ५ –** यशदा या संस्थेची आपणास माहिती आहे का?

| अनु | पर्याय | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | २० | २०% |
| २ | नाही | ६४ | ६४% |
| ३ | काही प्रमाणात | १६ | १६% |
| एकुण | | १०० | १००% |

यशदा या संस्थेतर्फे माहिती अधिकारावर आधारीत अभ्यासक्रम घेतले जातात. मात्र माहिती अधिकार कायद्याच्या संदर्भात माहिती देणा-या यशदा या संस्थेची माहिती २० टक्के लोकांना आहे. ६४ टक्के लोकांना यशदा या संस्थेची माहिती नाही.

**तक्ता क्रमांक ६ –** भारतात माहिती अधिकार कायदा कधी अस्तित्वात आला हे आपणास माहिती आहे का?

| अनु | पर्याय | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ३० | ३२% |
| २ | नाही | ४० | ६८% |
| ३ | काही प्रमाणात | ३० | ३०% |
| एकुण | | १०० | १००% |

इतर राज्यांच्या पुर्वलक्षी कायद्यांना रद्द करून भारतात माहिती अधिकार कायदा २००५ मध्ये अस्तित्वात आला त्याबद्दल सर्वेक्षण केले असता योग्य उत्तर माहित असलेल्यांची संख्या १०० पैकी ३० टक्के इतकेच असल्याचे स्पष्ट झाले त्याएवजी माहीत नसणा-यांची संख्या ४० टक्के असल्याचे स्पष्ट झाले आणि काहीच प्रमाणात माहीती आहे असे ३० टक्के आहेत असे स्पष्ट झाले.

**तक्ता क्रमांक ७ –**

माहिती अधिकार कायद्याबद्दलप्रसार प्रचार व्हावा असे आपणास वाटते का?

| अनु | पर्याय | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ७६ | ७६% |
| २ | नाही | २४ | २४% |
| ३ | काही प्रमाणात | ० | ०% |
| एकुण | | १०० | १००% |

माहिती अधिकार कायद्याबद्दलप्रसार प्रचार व्हावा अशी लोकांची अपेक्षा आहे. ७६ टक्के लोकांना उत्स्फुर्तपणे असा प्रचार व्हावा असे वाटते तर २४ टक्के लोकांना माहिती अधिकाराच्या प्रसार प्रचाराची आवश्यकता वाटत नाही  माहितीचा अधिकार कायदा सर्वत्र पोहचला असे पुण्यातील लोकांना असे वाटते.

**तक्ता क्रमांक ८ –** माहिती अधिकार कायद्याची कार्यशाळा मोफत असावी का?

| अनु | पर्याय | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ५६ | ५६% |
| २ | नाही | ३४ | ३४% |
| ३ | काही प्रमाणात | १४ | १४% |
| एकुण | | २५ | १००% |

माहिती अधिकार कायद्याची कार्यशाळा मोफत असावी का याचे उत्तर ४४ टक्के लोकांनी नाही असे दिले. त्याउलट होय असे ५६ टक्के लोकांना मोफत असावी असे वाटते.माहिती अधिकाराची कार्यशाळेची माहिती उपलब्ध होत नसल्याचेही अनेकांनी सांगितले आहे १४ टक्के लोकांना वाटते की मोफत कार्यशाळा नसावी.

**तक्ता क्रमांक ९ –** दारिद्र्यरेषेखालील व्यक्तीला माहिती अधिकारातंर्गत माहिती मोफत मिळविता येते हे आपणास माहित आहे का?

| अनु | पर्याय | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ३८ | ३८% |
| २ | नाही | ४२ | ४२% |
| ३ | काही प्रमाणात | २० | २०% |
| एकुण | | १०० | १००% |

दारिद्र्यरेषेखालील व्यक्तीला माहिती अधिकारातंर्गत माहिती मोफत मिळविता येते ही गोष्ट ३८ टक्के लोकांना माहित आहे मात्र ४२ टक्के लोक त्याबाबत अनभिज्ञ आहेत. दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींनाच सदरचा प्रश्न विचारण्यात आला आहे. दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींसाठी शासकिय स्तरावरून माहिती अधिकाराच्या कार्यशाळा वाड्यावस्त्या झोपडपट्टी येथे आयोजित केल्या जाव्यात. विविध महिला बचत गटांचा त्यात सामावेश करण्यात यावा. २०% लोकांना यावरील थोडी फार प्रमाणात माहिती आहे.

**तक्ता क्रमांक ११ –**

तुम्हाला माहिती अधिकार कायद्यामुळे भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडकीस आली आहे असे वाटते का ?

| अनु | पर्याय | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ५० | ५०% |
| २ | नाही | ३६ | ३६% |
| ३ | काही प्रमाणात | १४ | १४% |
| एकुण | | १०० | १००% |

माहिती अधिकार कायद्यामुळे भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडकीस आली असे जनतेला ५० टक्के जनतेला वाटते  ३६ टक्के लोकांना माहीतचा अधिकार कायद्यामुळे भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडकीस आली असे वाटत नाही. भ्रष्टाचाराविरुद्ध माहितीचा अधिकार कायदा कसा उपयोगी पडतो हे ३६ टक्के लोकांना समजावून सांगण्याची आवश्यकता आहे. १४% लोकांना अशंतः माहिती आहे.

**तक्ता क्रमांक १२ –**

माहिती अधिकारामुळे जबाबदार प्रशासन निर्माण होत आहे  असे आपणास वाटते का?

| अनु | पर्याय | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ६० | ६० % |
| २ | नाही | २८ | २८% |
| ३ | काही प्रमाणात | १२ | १२% |
| एकुण | | १०० | १००% |

माहिती अधिकारामुळे जबाबदार प्रशासन निर्माण होत आहे असे आपणास वाटते का? या प्रश्नावर उत्तर देताना ६० टक्के लोकांना माहिती अधिकारामुळे जबाबदार प्रशासन निर्माण होते आहे असे वाटते. तर माहिती अधिकारामुळे प्रशासनात जबाबदारीची जाणीव होताना दिसत नाही असे २८ टक्के लोकांना वाटते. माहिती अधिकारामुळे लोकसहभाग वाढतो. लोकांना माहिती अधिकारामुळे लोकसहभागापेक्षा प्रशासन जबाबदार होत आहे. असे वाटते. १२% लोकांना अशंतः माहिती आहे.

**तक्ता क्रमांक १३ –** तुम्हाला माहिती अधिकाराच्या कलम चार विषयी माहिती आहे का?

| अनु | पर्याय | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ४ | ४% |
| २ | नाही | ९६ | ९६% |
| ३ | काही प्रमाणात | ० | ०% |
| एकुण | | १०० | १००% |

माहिती अधिकारात कलम चार प्रमाणे जर अमलबजावणी झाली तर माहिती अधिकाराचे अर्ज करण्याची गरजच भारतीय नागरिकांना उरणार नाही त्यासंदर्भात शासनाने लोकांना आवश्यक असणारी माहिती इतक्या प्रमाणात देणे आवश्यक आहे की माहिती अधिकारात अर्ज करण्याची लोकांना गरज भासणार नाही मात्र हे कलम फार लोकांना माहित नाही असे दिसते. कारण १०० पैकी केवळ ४ व्यक्तीला या प्रश्नाचे उत्तर देता आले. केवळ ४ टक्के प्रमाणात लोकांना हे कलम माहित असणे. आणि त्याबाबात ९६ टक्के लोक अनभिज्ञ असणे यावरून माहिती अधिकार कायदा तपशीलवार प्रमाणात लोकांना माहिती नाही असे अधोरेखित होते.

**तक्ता क्रमांक १४ –** आपल्याला माहिती अधिकार वापराविषयी माहिती कोणत्या कार्यकर्त्यांनी, संस्थानी यापुर्वी दिलेली आहे का?

| अनु | पर्याय | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | २६ | २६% |
| २ | नाही | ५५ | ५५% |
| ३ | काही प्रमाणात | १९ | १९% |
| एकुण | | १०० | १००% |

माहिती अधिकार कायद्यासंबंधी माहिती कोणत्याही कार्यकर्त्यांनी अथवा संस्थानी दिलेली नसणा–या लोकांचे प्रमाण ५५ टक्के इतके आहे. तर माहिती अधिकार कायद्यासंबंधी माहिती कोणत्याही कार्यकर्त्यांनी अथवा संस्थानी दिलेली असणा–या व्यक्तींचे प्रमाण २६ टक्के इतके आहे. संस्थांनी माहिती अधिकार कायदा जनतेत रूजविण्यासाठी चालवलेली चळवळ काही अंशीच यशस्वी होते आहे माहिती अधिकार चळवळ अधिक विस्तार मोठ्याप्रमाणावर झालेला नाही. असे यातून स्पष्ट होते माहिती अधिकार अधिनियम पारीत करून घेण्यास माहिती अधिकार चळवळीला आलेले यश निर्विवाद असूनही दुस–या टप्प्यामध्ये माहिती अधिकार चळवळ लोकांपर्यत पोहविण्यासाठी संस्थांवर मर्यादा पडत आहेत ही बाब अधोरेखीत होते. १९% लोकांना अशंतः माहिती आहे.

**तक्ता क्रमांक १५ –** आपण स्वत: माहिती अधिकाराचा वापर केला आहे का?

| अनु | पर्याय | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ८ | ८% |
| २ | नाही | ९२ | ९२% |
| ३ | काही प्रमाणात | ० | ०% |
| एकुण | | १०० | १००% |

माहितीचा अधिकार कायदा अस्तित्वात येवून तेरा वर्षे झाल्यानंतरही केवळ ८ टक्के लोकांनी महितीचा अर्ज केला आहे तेही पुणे येथील हा नमुना आहे. ९२ टक्के लोकांनी माहितीचा अधिकार कायदा वापरलेला नाही. पुणे शहराच्या मध्यवर्ती भागात घेतले गेलेले हे सॅम्पल आहे. १०० पैकी ९२ लोकांनी माहितीचा अधिकार वापरलेला नाही. त्याउपर माहितीचा अधिकार १०० पैकी ८ लोकांनी वापरल्याचे आढळले आहे. माहितीचा अधिकार कलम चारची अमलबजावणी काटेकोरपणे होत नसताना हे प्रमाण आहे त्यामुळे माहितीचा अधिकार कायदा लोकांनी वापरावा या साठी मार्गदर्शन होणे आवश्यक आहे.

**तक्ता क्रमांक १६ –** माहिती अधिकार कायद्यामुळे प्रशासनावर ताण वाढतो आहे असे आपणास वाटते का?

| अनु | पर्याय | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १६ | १६% |
| २ | नाही | ६८ | ६८% |
| ३ | काही प्रमाणात | १६ | १६% |
| एकुण | | १०० | १००% |

माहिती अधिकारामुळे प्रशानावरचा ताण वाढतो का या प्रश्नाचे उतर ६८ टक्के लोक नाही असे देतात तर ३२ टक्के लोकांना ताण वाढला आहे हे मान्य आहे. अधिक प्रमाणात माहितीच्या अधिकारात अर्ज केल्यामुळे शासकिय संस्थांवर ताण पडतो आहे. अशी ओरड कायम प्रशासकिय विभागाकडून केली जाते. त्याबाबत लोकांना काय वाटते असा प्रश्न उपस्थित केला असता माहिती अधिकार कायद्यामुळे प्रशासनावर ताण वाढतो असे वाटणा–यांची संख्या १०० पैकी १६ टक्के इतकी आहे याउलट ताण पडत नाही असे मानणा–यांची संख्या १०० पैकी ६८ टक्के आहे. यावरून लोकांना माहिती अधिकार कायद्यामुळे प्रशासनावर ताण वाढतो आहे असे वाटत नाही हे स्पष्ट होते. १६% लोकांना अशंतः माहिती आहे.

**तक्ता क्रमांक १७ –** तुम्ही शासकीय कार्यालयामध्ये माहिती अधिकार कक्ष अथवा माहिती अधिकार फलक पाहिला आहे का?

| अनु | पर्याय | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ४४ | ४४% |
| २ | नाही | ५६ | ५६% |
| ३ | काही प्रमाणात | ० | ०% |
| एकुण | | १०० | १००% |

माहिती अधिकार  कायदा कलम चार प्रमाणे शासकिय कार्यालयामध्ये माहिती अधिकार कक्ष किंवा माहिती अधिकार फलक असावा. तुम्ही शासकीय कार्यालयामध्ये माहिती अधिकार कक्ष अथवा माहिती अधिकार फलक पाहिला आहे का? या प्रश्नाचे उत्तर ५६ टक्के लोकांनी नाही असे दिले आहे. तर कक्ष अथवा फलक पाहिल्याचे ४४ टक्के लोकांनी सांगितले आहे. माहिती अधिकार कक्ष अथवा माहिती अधिकार फलक जनतेला दिसेल असा लावला जावा जेणे करून माहिती अधिकाराचा प्रसार होण्यास मदत होईल.

**तक्ता क्रमांक १८ –** माहिती अधिकार दिन कधी असतो.

| अनु | पर्याय | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ८ | ८% |
| २ | नाही | ९० | ९०% |
| ३ | काही प्रमाणात | २ | २% |
| एकुण | | १०० | १००% |

२८ सप्टेंबर हा दिवस माहिती अधिकार दिन म्हणून पाळला जातो.  हे केवळ ८ टक्के लोकांना माहित आहे. १०० पैकी ८ लोकांना त्याचे योग्य उत्तर देता आले त्याएवजी ९० टक्के लोकांना माहिती अधिकार दिन कधी साजरा करतात हे माहित नाही. २% अशंत माहिती आहे.

**तक्ता क्रमांक १९ –**

माहिती अधिकार कायद्यांतर्गत  शासकिय अभिलेख पाहता येतात हे आपणास माहित आहे का?

| अनु | पर्याय | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १६ | १६% |
| २ | नाही | ८४ | ८४% |
| ३ | काही प्रमाणात | ० | ०% |
| एकुण | | १०० | १००% |

माहिती अधिकार कायद्यांतर्गत शासकिय अभिलेख पाहता येण्यासाठी शासनाने परिपत्रक२६ नोव्हेंबर २०१८ रोजी काढला पण त्याच्या पुर्वी देखील जनतेला माहिती अधिकार कायद्यांतर्गत शासकिय अभिलेख पाहता येत होते केवळ जनतेला याचे ज्ञान नव्हते पुणे मनपाचे कै. प्रकाश कर्दळे यांच्या नावाने असलेल्या माहिती अधिकार ग्रंथालयात शासकिय अभिलेख पाहण्याची सशुल्क सोय पुणे महानगरपालीकेने केली आहे. पण त्याचे ज्ञान लोकांना किती प्रमाणात आहे हे तपासले असता २५ पैकी ८४ लोकांना हे माहितीच नाही तर केवळ १०० पैकी १६ लोकांना हे माहित आहे म्हणजे अवघ्या १६ टक्के लोकांना ही बाब माहिती आहे. तर ८४ टक्के लोक हे त्यापासून अनभिज्ञ आहेत. शासनाच्या परिपत्रक क्रमांक संकिर्ण २०१८/प्र.क्र. ४५/कार्या–६ ची काटेकोर प्रमाणे अमंलबजावणी व्हावी.

**तक्ता क्रमांक २०** – राज्य माहिती आयोगाचे मुख्य कार्यालय महाराष्ट्रात कोठे आहे हे आपणास माहित आहे का?

| अनु | पर्याय | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | २० | २०% |
| २ | नाही | ६० | ६०% |
| ३ | काही प्रमाणात | २० | २०% |
| एकुण | | २५ | १००% |

राज्य माहिती आयोगाचे मुख्यालय सामान्य व्यक्तींनी मुंबई येथे असल्याचे सांगिलते आहे. मुंबई मंत्रालयसमोरील नवीन प्रशासन भवन येथे आहे. याबाबत नागरिक अनभिज्ञ आहेत. मात्र मंत्रालया जवळ राज्य माहिती आयोगाचे मुख्य कार्यालय आहे याची माहिती ६० टक्के नागरिकांना आहे असे या सर्वेक्षणावरून दिसते.

**तक्ता क्रमांक २१ –** माहिती अधिकार कायद्याविषयी आपल्याला सोशल मिडीया द्वारे माहिती मिळाली होती का?

| अनु | पर्याय | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ३० | ३०% |
| २ | नाही | ३५ | ३५% |
| ३ | काही प्रमाणात | ३५ | ३५% |
| एकुण | | १०० | १००% |

माहिती अधिकार कायद्याविषयी सोशल मिडियाद्वारे माहिती मिळाली आहे का या प्रश्नाचे उत्तर ३० टक्के लोक होय असे देतात तर नाही असे म्हणणा–यांची संख्या ३५ टक्के इतकी आहे. १०० पैकी ३० लोकांना माहिती अधिकार कायद्याची माहिती सोशल मिडिया द्वारे मिळाली असल्याचे त्यांनी मान्य केले तर ३५ टक्के लोकांना माहिती मिळाली नाही असे या सर्वेक्षणात दिसते.

**तक्ता क्रमांक २२ –** अभिव्यक्ती स्वातंत्र्याविषयी आपणास माहिती आहे का?

| अनु | पर्याय | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ७२ | ७२% |
| २ | नाही | २८ | २८% |
| ३ | काही प्रमाणात | ० | ०% |
| एकुण | | १०० | १००% |

अभिव्यक्ती स्वातंत्र्याविषयी माहिती असणा–या व्यक्तींचे ज्ञान तपासले असता १०० पैकी ७२ लोकांना त्याचे उत्तर योग्य देता आले याउलट अभिव्यक्ती स्वातंत्र्याविषयी माहिती नसणारे व्यक्तींचे प्रमाण १०० पैकी २८ लोक असे आहे. म्हणजेच अभिव्यक्ती स्वातंत्र्याची जाणीव अथवा ज्ञान आहे असे ७२ टक्के लोकांना बाबत म्हणता येईल मात्र २८ टक्के लोकांना अभिव्यक्ती स्वातंत्र्याबाबत जाणीव अथवा ज्ञान आहे असे दिसत नाही. सुदृढ लोकशाही साठी अभिव्यक्ती स्वातंत्र्याविषयी नागरिकांनी जागृत राहणे आवश्यक असते.

**तक्ता क्रमांक २३ –** अण्णा हजारें यांच्या कार्याविषयी आपणास माहिती आहे का?

| अनु | पर्याय | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
| --- | --- | --- | --- |
| १ | होय | १०० | १००% |
| २ | नाही | ० | ०% |
| ३ | काही प्रमाणात | ० | ०% |
| एकुण | | १०० | १००% |

अण्णा हजारें यांच्या कार्याविषयी आपणास माहिती आहे पुणे जिल्ह्यामध्ये माहिती नाही असा माणुस सापडला नाही त्यांचेमाहिती अधिकार कायद्याच्या चळवळीचे त्यांचे योगदान बहुमुल्य आहे. १०० पैकी १०० जणांनी अण्णा हजारे यांच्या भ्रष्टाचाराविरोधातील अंदोलनाचे आणि त्यांच्या ग्रामविकास कार्याविषयी माहिती असल्याचे सांगितले आहे.

**तक्ता क्रमांक २४ –**

भारतामध्ये फक्त भारतीय नागरिक माहितीच्या अधिकारात अर्ज करू शकतात असे आपणास वाटते का?

| अनु | पर्याय | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
| --- | --- | --- | --- |
| १ | होय | ६८ | ६८% |
| २ | नाही | ३२ | ३२% |
| ३ | काही प्रमाणात | ० | ०% |
| एकुण | | १०० | १००% |

फक्त भारतीय नागरिक माहितीच्या अधिकारात अर्ज करू शकतात ही बाब ६८ टक्के लोकांना माहिती आहे. मात्र ३२ टक्के लोकांना भारतात माहिती अधिकारांतर्गत माहिती मिळविण्यासाठी इतर राष्ट्रातील नागरिक अर्ज करू शकतात असे वाटते. माहिती अधिकार हा भारतीय नागरिकांचा अधिकार

लोकशाहीच्या रक्षणासाठी साधन आहे. याचे प्रबोधन होणे आवश्यक आहे. माहिती अधिकार कलम ३ प्रमाणे हा कायदा केवळ भारतीय नागरिकांसाठी लागू होतो.

**तक्ता क्रमांक २५ –**

शासकिय संकेतस्थळावरमाहिती अधिकार कायद्यातंर्गत कलम चार प्रमाणे आपणास अपेक्षित माहिती मिळते आहे का?

| अनु | पर्याय | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ८ | ८% |
| २ | नाही | ९२ | ९२% |
| ३ | काही प्रमाणात | ० | ०% |
| एकुण | | १०० | १००% |

शासकिय संकेतस्थळावर माहिती अधिकार कायद्यातंर्गत ऑनलाईन माहिती मिळविण्याचा प्रयत्न अनेक जण करत असतात. माहिती अधिकाराकायद्यांतर्गत कलम चार प्रमाणे स्वत:हून कामकाजाविषयी माहिती जाहीर करणे अपेक्षित असताना माहिती संकेतस्थळांवर उपलब्ध नसते. अश्यावेळी माहिती अधिकाराचा वापर करणे हा एक पर्याय समोर येतो. माहिती अधिकार कायद्याचे व्यवस्थित विश्लेषण केल्यास माहिती मागण्याचा अर्ज करण्याची गरजच नागरिकांना पडू नये असा त्याचा अर्थ समोर येतो. मात्र ज्यावेळी विकसनशील राष्ट्रांमध्ये भ्रष्टाचाराचे प्रमाण जास्त असते. त्यावेळी शासन यंत्रणेचा कल माहिती लपविण्याचा असतो. त्यामुळे वरील तक्ता क्रमांक ६१ मध्ये नमुद केल्याप्रमाणे शासकीय संकेत स्थळं ही जनतेच्या उपयोगी पडत आहेत असे दिसत नाही केवळ ८ टक्के लोकांना माहिती मिळते असे वाटते. तर शासकीय संकेतस्थळांवर माहिती मिळत नाही असे ९२ टक्के लोकांना वाटते. काळानुसार बदल करून दरवर्षी किमान दोनवेळा संकेतस्थळं अपडेट करावी असे परिपत्रक शासनाने काढले आहे. संबंधित खात्यांनी विभागांनी त्याची काटेकोरपणे अमलबजावणी करणे गरजेचे आहे.

**तक्ता क्रमांक २६ –** कोणतीही माहिती अधिकार कायद्याची माहिती देणारी प्रबोधन करणारी शासकिय संस्था आपणास माहित आहे का?

| अनु | पर्याय | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १६ | १६% |
| २ | नाही | ८४ | ८४% |
| ३ | काही प्रमाणात | ० | ०% |
| एकुण | | १०० | १००% |

माहिती अधिकार कायद्याची माहिती देणारी प्रबोधन करणारी शासकिय संस्था आपणास माहिती आहे का असा प्रश्न उपस्थित केला असता केवळ १६ टक्के लोकांनी यशदा सारख्या संस्था माहिती आहेत असे सांगितले मात्र ८४ टक्के लोकपर्यंत शासनाच्या माहिती अधिकार कायद्यांतर्गत होणाऱ्या कार्यशाळा पोहचल्या नाहीत.

**तक्ता क्रमांक २७ –** माहिती अधिकार कायदा जाणून घेण्यासाठी इन्टरनेटचा वापर आपण करता का?

| अनु | पर्याय | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ३५ | ३५% |
| २ | नाही | ६५ | ६५% |
| ३ | काही प्रमाणात | ० | ०% |
| एकुण | | १०० | १००% |

माहिती अधिकार कायदा जाणून घेण्यासाठी इटरनेटचा वापर आपण करता काय या प्रश्नाला १०० पैकी ३५ लोकांनी होय असे उत्तर दिलेले आहे. म्हणजेच ३५ टक्के लोक माहिती अधिकार कायदा जाणून घेण्यासाठी इंटरनेटचा उपयोग करतात हे सिद्ध होते. तर ६५ टक्के लोकांना इन्टरनेटच्या माध्यमातून माहिती मिळवित नसल्याचे सिद्ध होते.

**तक्ता क्रमांक २८ –**

तुम्हाला शासन माहिती अधिकाराची अमंलबजावणी करते आहे असे वाटते का?

| अनु | पर्याय | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ३५ | ३५% |
| २ | नाही | ५५ | ५५% |
| ३ | काही प्रमाणात | ५ | ५% |
| एकुण | | १०० | १००% |

शासन माहिती अधिकाराची अमंलबजावणी करते आहे असे वाटणा–या व्यक्तींची संख्या १०० पैकी ३५ आहे तर माहिती अधिकाराची अमलबजावणी करण्यात शासन अपयशी ठरले आहे असे वाटणा–या व्यक्तींची संख्या १०० पैकी ५५ टक्के लोक शासनाच्या माहिती अधिकार कायदा राबविण्याच्या पद्धतीवर समाधानी नाहीत असे दिसते. १०% अशंतः करत असतील.

**तक्ता क्रमांक २९ –** शालेय अभ्यासक्रमात माहिती अधिकार कायद्याचा समावेश केला जावा का?

| अनु | पर्याय | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ६० | ६०% |
| २ | नाही | २० | २०% |
| ३ | काही प्रमाणात | २० | २०% |
| एकुण | | १०० | १००% |

माहिती अधिकार कायद्याचा शालेय अभ्यासक्रमात समावेश व्हावा यासाठी विचारलेल्या प्रश्नाला १०० पैकी ६० लोकांनी होकारार्थी उत्तर दिले तर माहिती अधिकाराचा सामावेश शालेय अभ्यासक्रमात होवू नये असे २० लोकांना वाटते. याचा अर्थ माहिती अधिकार कायद्याचे शिक्षण शालेय स्तरावर देण्यात येवू नये असे २० टक्के लोकांना वाटते तर माहिती अधिकार कायद्याचे शिक्षण शालेय स्तरावर देण्यात आल्यास त्याचा भविष्यात उपयोग होवू शकतो. सजग नागरिक बनविण्यासाठी माहिती अधिकार

कायद्याचे शिक्षण शालेय स्तरावर देण्यात यावे असे ६० टक्के लोकांना वाटते. २०% अशंत केले असे वाटते.

**तक्ता क्रमांक ३० –** प्रशासकिय कर्मचा–यांमध्ये माहिती अधिकार कायद्यामुळे उत्तरदायीत्व निर्माण होते असे आपणास वाटते का?

| अनु | पर्याय | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ५२ | ५२% |
| २ | नाही | ४८ | ४८% |
| ३ | काही प्रमाणात | ० | ०% |
| एकुण | | १०० | १००% |

प्रशासकिय कर्मचा–यांमध्ये माहिती अधिकार कायद्यामुळे उत्तरदायीत्व निर्माण होते असे आपणास वाटते का या प्रश्नाला उत्तर देताना ५२ टक्के लोक होय असे उत्तर देतात. तर ४८ टक्के लोकांना तसे वाटत नाही तसा त्यांचा अनुभव नाही. याचा अर्थ प्रशासकीय कर्मचा–यांमध्ये उत्तरदायीत्व निर्माण होणे गरजेचे आहे.

| **अनुक्रम** | **तज्ज्ञ मुलाखत प्रश्नावली** |
|---|---|
| १) | माहिती अधिकार चळवळी मागे कोणत्या प्रेरणा आहेत? |
| २) | लोकशाहीच्या सुदृढीकरणासाठी माहिती अधिकार राबविण्याची शासन प्रशासनाची निती योग्य आहे का? |
| ३) | महाराष्ट्राच्या माहिती अधिकार चळवळीचे देशाच्या माहिती अधिकार कायदा क्षेत्रातील योगदान कोणते? |
| ४) | माहिती अधिकार ग्रामीण पातळीवर पोहचविण्यासाठी काय केले पाहिजे असे आपणास वाटते ? |
| ५) | माहिती आयुक्तांकडून आपल्या अपेक्षा काय आहेत ? |

वरिल प्रमाणे प्रश्नावलीची निर्मिती करून तज्ज्ञ व्यक्तींच्या मुलाखती घेतल्या आहेत त्या मुलाखती सारांश रूपाने पुढील प्रमाणे–

## तज्ज्ञांच्या मुलाखती

**सुराज्य संघर्ष समितीचे विजय कुंभार–** माहिति अधिकार कायद्याचा वापर अत्यंत प्रभावीपणे वापर करणारे  माहिति अधिकार कार्यकर्ते असा लौकिक असलेले विजय कुंभार यांची मुलाखतीचा सारांश – पुणे इंडियन एक्सप्रेसचे संपादक कै प्रकाश कर्दळे हे त्यावेळी माहिती अधिकार चळवळीत कार्यरत होते. त्यावेळी त्यांच्या कार्यातून माहिती अधिकार क्षेत्रात कार्य करण्याची प्रेरणा विजय कुंभार यांना मिळाली. त्यांनी पुढे सुराज्य संघर्ष समितीची स्थापना केली. विजय कुंभार यांनी अनेक विषय माहिती अधिकार कायद्याच्या माध्यमातून मार्गी लावले आहेत.  माहिती अधिकार चळवळीबाबत त्यांची सुक्ष्म निरिक्षणे आहेत. ते माहिती अधिकार कट्टा चालवतात. पुण्यातील चित्तरंजन वाटीका येथेदर रविवारी सकाळी माहिती अधिकार चळवळ विजय कुंभार चालवतात. नुकताच त्याचा २५० वा टप्पा पार करण्यात माहिती अधिकार कट्टयाला यश आले आहे. अनेक व्यक्ती विजय कुंभार यांचे मार्गदर्शन माहिती अधिकार कट्टयावर घेत असतात.

ठाणे येथे  माहिती अधिकाराचा गैरवापर करून खंडणी मागीतल्या प्रकरणी अधिवेशनात प्रताप सरनाईक यांनी लक्षवेधी प्रश्न उपस्थित केला होता या प्रकरणावर बोलताना विजय कुंभार म्हणाले, माहिती अधिकार हे शस्त्र आहे ते वापरणा–या व्यक्तीच्या हेतूने प्रभावीत होवू शकते. माहिती अधिकार कायद्याचा वापर हा पुर्वाश्रमीचे राजकिय इच्छाशक्ती असणारे कार्यकर्ते, विविध पक्षांशीसंबंधित वकिल मंडळी आणि प्रशासनामधून आपला स्वार्थ साध्य न झालेले काही प्रशासनातील बाबू मंडळी यांच्यामुळे बदनाम होतो आहे. पारदर्शकता हा या कायद्याचा गाभा आहे. पारदर्शकपणे कार्य करणा–या कोणत्याही व्यक्तीला हा कायदा बदनाम करू शकत नाही. खंडणीखोरीला प्रोत्साहन देवू शकत नाही. याउलट माहिती अधिकार क्षेत्रात कार्य करताना ज्यांची हत्या झाली ते सतीश शेट्टी यांचे मारेकरी आजही मोकाट आहेत. जर सतीश शेट्टी दोशी असतील तर त्यांची माहिती तपास यंत्रणांनी समोर आणावी. आज अनेक माहिती अधिकार कार्यकर्ते खंडणी मागत असतील तर सरकार अथवा संबंधीत विभागाने त्यांनी दिलेली माहिती सार्वजनिक का करू नये. माहिती अधिकार क्षेत्रात कार्य करणारे सच्चे कार्यकर्ते माहिती मिळाल्याक्षणी ती सोशल मिडीया,

सर्वच्या सर्व वृत्तपत्रांना पाठवून देतात.  त्यामुळे ब्लॅकमेलींगच्या एक्का दुक्का उदाहरणामुळे चळवळ बदनाम करू शकत नाही. माहिती अधिकार कायद्याच बदल करण्याची आवश्यकता नाही असेही मत विजय कुंभार यांनी व्यक्त केले. ब्लॅकमेलींग करणारा दोषी असतोच मात्र ब्लॅकमेलींग करून घेणारी व्यक्तीचे वर्तन चुकीचे असल्याशिवाय कोणी खंडणी मागणार नाही. कोणी खंडणी देणारही नाही. त्या खंडणीखोरीचे कोणीच समर्थन करू शकणार नाही. माहिती अधिकाराचा जर प्रसार प्रचार व्हायचा असेल तर सर्वात आधी माहिती अधिकाराची राबविल्या जाणा-या पंचतारांकित कार्यशाळा सार्वजनिक ठिकाणी आयोजित करण्यात याव्यात.

माहिती अधिकार कायद्याचा वापर करून कोणी ब्लॅकमेलींग करत असेल तर त्याव्यक्तींनी पुण्यातील सर्वच संस्थाना एका वेळी पत्र पाठवून द्यावे. आपली भूमिका संबंधितांनी मांडावी असे आवाहन विजय कुंभांर करतात. माहिती अधिकाराच्या वाढत्या अर्जसंख्येकडे लक्ष वेधले असता, विजय कुंभार यांच्या मते अपिलीय प्रक्रिया त्यासाठी आहे. जी प्रशासकिय अधिका-यांनी जी माहिती वेबसाईट्सवर उपलब्ध असूनही विचारण्यात येईल त्याला उत्तर देवू नये माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी आवश्यक ते तारतम्य न दाखवल्यास त्याचा अर्ज बाद होवू शकतो.

**सजग नागरिक मंचचे संस्थापक अध्यक्ष जुगल राठी –** सजग नागरिक मंचने आजवर अनेक प्रश्नांवर संशोधन करून अभ्यासपुर्वक आपली भूमिका मांडली आहे. माहिती अधिकाराचा वापर प्रभावीपणे करून अनेक वेळा भ्रष्टाचार उघडकीस आणला आहे. ब-याचदा प्रशासन काही बाबतीत संवेदनशीलता दाखवत नाही असे त्यांच्या निदर्शनास आले आहे. कारण सजग नागरिक मंचने एखादी माहिती उघड केली. तर त्याची बातमी होते वृत्तपत्र त्याची दखल घेतात. काही नागरिक पुढाकार घेवून हिरीरीने आपले मत मांडत असतात. मात्र त्यातून प्रशासन त्याची दखल घेईलच असे सांगता येत नाही. तरीही जनतेच्या, प्रशासनाच्या निदर्शनास अश्या बाबी सजग नागरिक मंच आणून देण्याचे काम करतच राहिल. कै प्रकाश कर्दळे यांच्याकडून मार्गदर्शन सुरवातीच्या काळात सजग नागरिक मंच ला झाले होते त्यांच्या आठवणी संदर्भात बोलताना जुलग राठी म्हणतात की, प्रकाश कर्दळे हे एक वरिष्ठ पत्रकार होते पण त्यांनी नागरिक चळवळींना बळ देवून मार्गदर्शन करणारे कृतीशील पत्रकार असल्याचे जुलग राठी नमुद करतात. नागरिक चळवळींना बळ देण्यासाठी एक्सप्रेस सिटीजन फोरम कर्दळे यांनी सुरू केली होती. अण्णांच्या अंदोलन काळात आळंदी येथे प्रकाश कर्दळे यांचा सहभाग

होता त्यांनी माहिती अधिकार कायदा बोथट होवू नये यासाठी मोलाचे योगदान दिले. त्यावेळच्या अण्णांच्या आंदोलनामध्ये त्यांचा सक्रिय सहभाग होता.

सजग नागरिक मंच कोणत्याही पक्ष अथवा विचारसरणी याच्याशी थेट बांधिलकी मानणारी ही संस्था नाही. नागरिक आणि सुशासन हे माहिती अधिकार कायद्याचे मुळ आहे. पार्दशकता, लोकसहभाग, उत्तरदायीत्व या त्रिसुत्रीतून  सुशासन निर्माण करणे हा  सजग नागरिक मंचचा उद्देश आहे. त्यासाठी सजग नागरिक मंचने गेली तेरा वर्षे सातत्याने मासीक सभांचे आयोजन केले आहे. वेगवेगळ्यात तात्कालीक मुद्यांसह सजग नागरिक मंचने माहिती अधिकाराच्या जागृतीचे कार्य केले आहे. ग्रामीण भागात जनजागृती करणा–या कार्यकत्यांना प्रोत्साहन देण्यासाठी माहिती अधिकाराचा प्रसार ग्रामीण भागात करणा–या कार्यकर्त्यांचा सन्मान गेली १२ वर्षे सजग नागरिक मच सातत्याने करत आला आहे. सेक्शन चार प्रमाणे माहिती मोठ्या प्रमाणावर उघड केली जावी यासाठी शासनाने प्रयत्नशील राहणे गरजेचे आहे. सजग नागरिक मंच हा त्याच्या कामामुळे प्रशासनास धाक निर्माण करण्यात यशस्वी झाला आहे त्यामुळे अनेक कार्यकर्त्यांना असे वाटते की सजगची शाखा आपल्या गावी स्थापन व्हावी पण तसे होताना दिसत नाही या प्रश्ना वर उत्तर देताना जुगल राठी म्हणाले की, माहिती अधिकार हा कोणत्याही एका संस्थेची मक्तेदारी नाही प्रत्येक नागरिक माहिती अधिकार वापरू शकतो. त्यासाठी कार्य करणा–या व्यक्तीला माहिती देण्यास सजग नागरिक मंच नेहमीच पुढाकार घेतो. मात्र सजग नागरिक मंच हि बिगरराजकिय संस्था आहे. संस्थेने आपल्या कामाच्या बळावर जनतेचा विश्वास संपादन केला आहे. ह्या विश्वासाला तडा जावू न देता कार्य करणे गरजेचे आहे. त्यासाठी सच्ची निष्ठा ठेवून कार्य करावे लागेल.  कोणी त्याचा राजकिय फायदा उठवू नये असे वाटल्यामुळे सजग नागरिक संस्थेची दुसरी शाखा कुठेही नाही मात्र सजगचे सभासद महाराष्ट्रभर आहे. अनेकांचा असा अनुभव आहे. की सजग नागरिक मंचचे सभासद असल्याचे सांगितल्यावर संबंधित व्यक्तींच्या प्रशासनातील काम लगेच होतात असा अनुभव अनेकांना आला. माहिती अधिकार कायद्यान्वये नागरिकांना अभिलेख खुले करून देण्याचा अध्यादेश आता आला आहे. मात्र त्याचा पाठपुरावा सजग नागरिक मंच आणि इतर संघटनांनी २००७ सालापासून केला आहे. लोकसहभागाची सबल संस्कृती निर्माण करणे गरजेचे आहे. ही संस्कृती निर्माण होण्यासाठी वेळ लागला तरी चालेल पण लोकांना सशक्त बनविताना त्यांना त्यांच्याच नावे अर्ज करण्यापासून त्याचा पाठपुरावा कसा

करावा याचे ज्ञान सजग नागरिक मंच देत असते. सजग नागरिक मंच कोणत्याही कार्यांची परिसिमा ठऱवून काम करत नाही, नागरी हितासाठी, लोकांच्या हक्कांसाठी लढा देणे असे सजग नागरिक मंचचे काम कायम सुरू ठेवेल अशी ग्वाही जुगल राठी देतात.

**माहिती अधिरकार कार्यकर्ते तसेच टोलचा झोल या पुस्तकाचे लेखक- संजय शिरोडकर** -कररूपाने जनतेचा पैसा जनतेच्या तिजोरीत जात असतो त्यावर जनतेचा हक्क असणे अपेक्षित आहे. त्याच्या खर्चाचा हिशोब जनतेला मिळणे जनतेचा हक्क असतो. या प्रेरणेने संजय शिरोडकर कार्यरत असतात. माहिती अधिकाराचा प्रसार करण्यासाठी ज्या ज्या साधनांचा वापर करता येईल त्या सर्व साधनांद्वारे माहिती अधिकाराचा प्रसार प्रचार करण्याचे कार्य करत राहणे आवश्यक आहे. असे संजय शिरोडकर यांना वाटते. प्रत्येक विभागाच्या बजेट मध्ये २ टक्के रक्कम माहिती अधिकारावर खर्च केली पाहिजे, असा नियम आहे. असे शासननिर्णयही घेण्यात आलेले आहेत. असे असूनही माहिती अधिकार राबविला जात नाही कारण शासन-प्रशासनास आपला भ्रष्टाचार उघडकिस येवू नये म्हणून भिती वाटते हे उघड सत्य आहे. खरं म्हणजे जनतेला माहिती अधिकारात अर्ज करावा लागू नये असा या कायद्याचा उद्देश आहे. त्यासाठी सेक्शन चारची अमलबजावणी काटेकोर आणि सर्व पातळ्यांवर केली तर माहिती अधिकार ख-या अर्थाने सक्षम होईल.

संपुर्ण महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करेल अशी संघटना महाराष्ट्रात दिसत नाही. पुणे, मुंबई, नागपूर, नाशिक औरंगाबाद, या परिसरामध्ये उल्लेखनीय कार्य करणा-या संस्था आहेत पण त्यांना अनुसरून माहिती अधिकार चळवळीत ग्रामीण क्षेत्रातील कार्यकर्ते यायला हवेत. महाराष्ट्राच्या पातळीवर काम करताना माहिती अधिकार अंतर्गत कार्यकरणा-या अनेक संस्था आहेत त्या एकमेकांविषयी आदर ठेवून वागतात. त्यांना परस्परकार्याविषयी आदर असतो. ज्याचे त्याचे कार्यक्षेत्र वेगवेगळ्या समस्यांशी संबंधित असते. पण एखाद्यामुद्द्यावर एकापेक्षा जास्त संस्था एकत्र येवून कार्य करत असल्याची अनेक उदाहरणे आहेत.

**सामाजिक कार्यकर्ते मानव कांबळे –** माहिती अधिकार कार्यकर्ते मानव कांबळे यांच्या मुलाखतीचा सारांश पुढील प्रमाणे, माहिती अधिकार कायद्याची अमलबजावणी प्रत्येक शासकिय कार्यालयावर बंधनकारक असताना अधिकार कायद्याची अमलबजावणी सर्व ठिकाणी होतेच असे नाही. माहिती

अधिकार कायद्याचा प्रसार प्रचार व्हायचा असेल तर माहिती अधिकार कायदा हा शालेय शिक्षणात अंतर्भुत करून कायद्याचे ज्ञान शालेय विद्यार्थ्यांना व्हावे त्यामुळे भविष्यात कायद्याविषयी सजग नागरिक तयार होण्यास मदत होईल. अण्णांच्या अंदोलनात आम्ही त्यांच्या सोबत होतो त्यातून कायदा समत झाल्यावर त्या कायद्याचा वापर समाजासाठी करण्याची प्रेरणा मिळत गेली असे मानव कांबळे नमुद करतात. माहिती अधिकार कायद्याचा वापर आणि प्रसार करणा–या कार्यकर्त्यांचे वैयक्तीक पातळीवरचे योगदान माहिती अधिकार चळवळी साठी बहुमुल्य आहे. संस्थांच्या कार्यासोबत कार्यकर्त्यांचे वैयक्तीक पातळीवरचे कार्यही अनेक समस्या सोडविण्यासाठी उपयोगी पडत आहे. माहिती अधिकाराचे श्रेय हे वैयक्तीक पातळीवर कार्यकर्त्यांचे आणि स्वयंसेवी संस्थांचे आहे. त्यात शासन प्रशासना विरुद्ध केलेल्या संघर्षाचे फलस्वरूप हा कायदा महाराष्ट्रात काही प्रमाणात रूजला आहे. आजही सरकारीपातळीवर माहिती अधिकाराचा प्रसार होवू नये यासाठी प्रयत्न केले जात असतात.

**प्रा. धनंजय भिसे –** माहिती अधिकार कायद्यासंदर्भातील सामाजिक संशोधनकर्ते डॉ. धनंजय भिसे यांची मुलाखत त्याचा सारांशपुढील प्रमाणे, माहिती अधिकार कार्यकर्त्यांचे खून होणे ही चिंतेची बाब आहे. माहिती मागण्याच्या पद्धतीत सुलभता असावी. माहिती अधिकार चळवळ ही अत्यंत अल्प प्रमाणात आहे. चळवळ हा व्यापक अर्थाचा शब्द आहे. चळवळीतून क्रांती होत असते. चळवळीतून परिवर्तन होत असते. लोकशाहीमध्ये माहिती अधिकार कायदा महत्त्वाचा आहे पण कायदा जनतेत रूजला जाणे आवश्यक आहे. जनतेत कायदा रूजविण्यासाठी व्यापक जनजागृती केली जाणे अपेक्षित असते. लोकांच्या भूमिकेसोबतच शासन प्रशासनाची लोकशाही रूजविण्याची भूमिका ख–या अर्थाने असायला हवी. शासन प्रशासन प्रांजळपणे आणि स्वच्छपणे माहिती अधिकार कायद्याची चळवळ रुजविण्यासाठी प्रयत्न करत नाही तोवर भारतीय लोकशाही यशस्वी होणार नाही. शासन प्रशासना च्या चुकीच्या बाबी त्यांच्याच लक्षात आणू देणे हे सजग नागरिकाचे कर्तव्यच आहे. ते कर्तव्य नागरिकांनी बजावणे गरजेचे आहे. लोकशाही साक्षरता भारतात कमी आहे. लोकशाहीची साक्षरता वाढविणे गरजेचे आहे. कायद्याचे ज्ञान वाढविणे गरजेचे आहे. आपल्या देशातील महापुरुषांची देशाच्या स्वातंत्र्यानंतर देश कसा चालावा याबाबत निश्चित अशी स्वप्न होती. त्या स्वप्नांना सत्यात आणणे ह्या एवजी केवळ प्रतिमापुजन आपण करतो आहोत का याचा विचार प्रत्येक नागरिकांनी खर म्हणजे

करायला हवा आहे. माहिती अधिकार कायद्याची अपिलीय प्रक्रिया जलद गती ने व्हावी असे मत डॉ. धनंजय भिसे यांनी प्रतिपादन केलेले आहे.

**प्रा. अभिजीत राठोड –** परिवर्तन अकॅडमी चे अभिजीत राठोड सरांच्या मुलाखतीचा सारांश पुढीलप्रमाणे  माहितीतीचा अधिकार कायदा शालेय पाठ्यपुस्तकांमध्ये शिकविण्यात यावा. परिवर्तन कॉम्पीटिटिव्ह फोरम मध्ये माहितीचा अधिकार कायदा या विषयावर तपशीलाने मार्गदर्शन केले जाते. तसे कोर्सेस परिवर्तन कॉम्पीटिटिव्ह फोरम आयोजित करते. सामान्य नागरिक, स्पर्धा परिक्षांची तयारी करणारे विद्यार्थी यांचे मार्गदर्शन अभिजीत राठोड करत असतात. माहितीचा अधिकार कायदा हा भारतीय राज्यघटनेच्या मसुद्याचाच भाग होता. घटनेच्या कलम १९ प्रमाणे प्रत्येक व्यक्तीला जाणून घेण्याचा अधिकार आहे. माहितीचा अधिकार कायदा हा कलम १९ ची व्याप्ती वाढविणारा आहे. विस्तृत विवेचन करणारा आहे. माहिती अधिकार कायद्याला शब्द मर्यादा १५० शब्दांची नसावी. त्याएवजी माहितीचा अधिकार अर्ज उद्देश माहिती देण्यात यावी. शालेय स्तरावर माहिती अधिकार कायद्याची ओळख झाल्यास सक्षम नागरिक निर्माण होतील माहितीचा अधिकार कायदा हा सामाजीक चळवळीचा परिणाम आहे.

**निवृत्त अपर जिल्हाधिकारी (निवड श्रेणी) प्रल्हाद कचरे** – महाराष्ट्रात पद्मभूषण अण्णा हजारे यांनी माहिती अधिकार चळवळीचे नेतृत्व केले आहे. आता राज्यात सर्वत्र ही चळवळ पुढे नेणारे कार्यकर्ते संस्था तयार झाल्या आहेत. त्यातून कृतीशील आणि जाणत्या नागरिकांचे गट आज माहिती अधिकार चळवळीत सक्रिय आहेत. महाराष्ट्र हे देशाच्या पारदर्शकतेला आणि धोरणाला दिशा देणारे राज्य बनले आहे.

माहिती अधिकाराच्या चळवळीसाठी आपण सातत्याने लेखन, वाचन, प्रशिक्षण आणि कार्यशाळा यावर भर देत असतो. माहिती अधिकाराची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी माहिती अधिकारातील कलम चारची काटेकोर अंमलबजावणी केली गेल्यास माहिती अधिकारातील अर्जांचे प्रमाण कमी होईल माहिती अधिकार अधिक प्रभावी होईल. नागरिकांनी माहिती मागण्यापुर्वी शासनाने स्वयंप्रेरणेने माहिती प्रकट केल्यास माहिती अधिकाराचे अधिकाधीक सामाजीकरण होईल.

## संदर्भ ग्रंथ सूची


१. कचरे प्रल्हाद/गायकवाड शेखर, कायदा माहितीचा अन् अभव्यक्तिस्वातंत्र्याचा, यशदा प्रकाशन पुणे,

२०१०, पृष्ठ क्र. ११ ते १७

२. बाचल.वि.मा, भारतीय राज्यघटना आणि राजकिय व्यवहार (अनुवादीत), के,सागर प्रकाशन पुणे,

२०१०, पृष्ठ क्रं. ३४ ते ५४

३. सक्सेना.एस.एन, अराजकाच्या वाटेवर भारत, अनुवाद- दांडेकर कुसुदिनी, श्रीविद्या प्रकाशन, १९९५,

पृष्ठ क्रं. १२

४. वेलणकर विवेक, ग्राहक राजा, सजग हो!, राजहंस प्रकाशन, १९९५, पृष्ठ क्रं. १ ते ३०

५. वराडकर.र.घ., राज्यशास्त्र, निराली प्रकाशन, १९९५, पृष्ठ क्रं. १७

६. चौधरी राजेश, केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५, चौधरी लॉ पब्लिशर्स, २०१३,

पृष्ठ क्रं. ०५

७. नाईकवाडे फारूख, स्टील फ्रेम, राष्ट्रचेतना प्रकाशन, मुंबई, २०१३, पृष्ठ क्र. १५

८. पवार जयसिंगराव, हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, निराली प्रकाशन, पुणे, २००९,

पृष्ठ क्र. ७० ते ९५

९. डोळे. ना.य., राजकिय विचारांचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९६९, पृष्ठ क्र. ८१५ ते ८६५

१०. भोळे भाष्कर लक्ष्मण, भारतीय गणराज्यांचे शासन आणि राजकारण, पिंपळपुरे एण्ड कं पब्लिशर्स,

२००३, पृष्ठ क्र. ११५

११. साठे सत्यरंजन, भारतीय राज्यघटनेची पन्नास वर्षे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, २००२, पृष्ठ क्र. १२५

१२. जोशी ललिता, लोकाभिमुख कारभाराच्या दिशेने...., वॉटरशेड आर्गनायझेशन ट्रस्ट प्रकाशन, २००९,

पृष्ठ क्र. १२०

१३. वेलणकर, लोकरंग लेख सजग, दैनिक लोकसत्ता, दि. १२/०८/२०१३

१४. हजारे अण्णा, लढाई अजुनही अपुर्ण, दैनिक लोकसत्ता, दि. ११/१०/२०१५

१५. वेलणकर विवेक, माहितीचा अधिकार धोक्यात, दैनिक लोकसत्ता, २८०/०७/२०१८

१६. वेलणकर विवेक, माहितीचा अधिकार कायदा शस्त्र नव्हे, साधन, दैनिक लोकसत्ता, ११/१०/२०१५

१७. बातमी, माहितीचा अधिकार कायद्यातील बदलाला अण्णा हजारे यांचा विरोध, दैनिक लोकसत्ता,

२१/०४/२०१७

१८. बातमी, शहरबातः माहिति अधिकाराचा बागुलबुवा, दैनिक लोकसत्ता, पुरवणी- मुंबई, दि. ३०/०१/२०१८

१९. आसावा श्याम, कायदा केला जातोय बोथट, दैनिक महाराष्ट्र टाईम्स, १०/१०/२०१५

२०. झगडे महेश, माहिती अधिकार आता अधिक पारदर्शी, दैनिक लोकमत, दि. १५/१२/२०१८

२१. शिरोडकर संजय, माहिती अधिकार व चळवळीची तेरा वर्षे, दैनिक स्वतंत्र नागरिक,दि. २०/१०/२०१८

२२. थत्ते मिलिंद, १५० वर्षांची मिळालं जंगलावरचं स्वराज्य! दैनिक लोकमत-मंथन, दि. २७/०६/२०१५

23. http://mahitiadhikarmanch.ngo/

24. http://yashada.org

25. https://www.worldbank.org/
26. https://rtionline.org.in/
27. https://rti.gov.in/
28. http://foundation.moveylife.in/

✻ ✻ ✻

## **प्रकरण पाचवे – उपसंहार, निष्कर्ष, उपाययोजना**

१) प्रस्तावना

२) संशोधनासंबंधी सारांश

३) संशोधनाचे निष्कर्ष

४) शिफारशी

५) उद्दीष्टांची पुर्तता

६) गृहितकांची पडताळणी

७) भविष्यवेध

८) समारोप

## प्रकरण पाच

### ✲ प्रस्तावना :–

**महाराष्ट्रातील माहिती अधिकार चळवळ – सजग नागरिक मंच– एक चिकित्सक अभ्यास** या अभ्यास विषयावर संशोधन निवड केल्यापासून या संशोधन कार्याला सुरूवात करण्यात आली. त्यात पहिले प्रकरणात प्रस्तावना मांडण्यात आली. तसेच माहिती अधिकार चळवळीचा इतिहास आणि त्याचा प्रवास जाणून घेण्यात आलेला आहे. दुसरे प्रकरण हे संशोधनाचा पुर्वेतिहास आहे. यात संशोधनाचा पुर्वाभ्यास दिलेला आहे. तिस–या प्रकरणात संशोधन पद्धतीबद्दल विवेचन करण्यात आले आहे. चौथ्या प्रकरणात माहिती अधिकार कायद्याच्या अनुषंगाने माहिती अधिकार चळवळ आणि सजग नागरिक मंच यांचा अभ्यास केला आहे. सजग नागरिक मंचाने माहिती अधिकार चळवळीस दिलेल्या योगदानाबद्दल केलेल्या कार्याचा आढावा घेण्यात आलेला आहे. सजग नागरिक मंचाने माहिती अधिकाराद्वारे जनतेच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी केलेला प्रयत्न असे त्याचे स्वरूप आहे. तसेच वरील सर्व प्रकरणांचा सारांश या ठिकाणी मांडण्यात आला आहे. याच प्रकरणात सारांश, निष्कर्ष शिफारशी मांडण्यात आल्या आहेत. संशोधनातील उद्दीष्टांना अनुसरून तयार केलेली प्रश्नावली, मुलाखती अनुसुची या सारखीसाधने वापरून तसेच निरिक्षण तंत्राचा अवलंब करून प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा अवलंब करून माहितीचे शोधन संकलन, विश्लेषण केले आहे. शास्त्रीय पद्धतीने मांडणी करून या संशोधनाच्या संदर्भातील हाती आलेले निष्कर्ष या प्रकरणात मांडले आहेत. माहिती अधिकाराचा प्रवास, त्याला लाभलेला चळवळीचा इतिहास आणि सजग नागरिक मंचाचे सदर चळवळीचे योगदान त्याच्या विविध कांगो–यांचा अभ्यास करून या संबंधी शिफारशी मांडल्या आहेत. तसेच भविष्याचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. संशोधन करतेवेळी अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. याबाबत सारांशरूपातील वर्णन सारांश प्रकरणांतर्गत केले आहे. त्याची संदर्भ सुची वर्णानुक्रमे शेवटी दिली आहे.

१) **सारांश–** प्रस्तुत शोधप्रबंधासाठी ''महाराष्ट्रातील माहिती अधिकार चळवळ – सजग नागरिक मंच– एक चिकित्सक अभ्यास'' या विषयावर संशोधन करण्यात आलेले आहे. त्या संशोधनाचा प्रकरण निहाय सारांश पुढील प्रमाणे :–

**२.१) प्रकरणे पहिले : प्रस्तावना–** या प्रकरणाच्या सुरूवातीस प्रस्तावना दिली आहे. संशोधन विषयाचे विवेचन केले आहे. माहिती अधिकार कायदा म्हणजे काय? त्याचा प्रभाव कसा आहे? राष्ट्रीय, आंतराष्ट्रीय संदर्भात माहिती अधिकार कायद्याचा प्रवास मांडण्यात आला आहे. महाराष्ट्रातील माहिती अधिकार कायद्याच्या चळवळी साठी कार्यकरणारे कार्यकर्ते यांच्या कार्याचा संक्षिप्त परिचय संक्षिप्त स्वरूपात देण्यात आला आहे.

**२.२) प्रकरण दुसरे –** संशोधनाचा पुर्वाभ्यास –संशोधनाला सुरूवात करण्याआधीया संशोधनाच्या संदर्भात कोणते कोणते संशोधन झाले आहे. त्यात संबंधीताना कोणकोणत्या समस्या आल्या आहेत. त्या समस्येच्या संदर्भात कोणत्या संशोधन पद्धतीच्या वापराने समस्या निवारण करण्यात आले. संदर्भ साहित्य काय वापरले गेले यांचा अभ्यास केला गेला. सदर अभ्यास करते वेळी जे लेख संदर्भ साहित्याचे वाचन करण्यात आले त्यातून एक नवी दृष्टी मिळाली या विषयी सविस्तर माहिती सदर प्रकरणात मांडण्यात आली आहे.

**२.३) प्रकरण तिसरे –** संशोधन पद्धती या मध्ये संशोधन प्रक्रिये संबंधी नियोजन केले आहे. अन्वेक्षणात्मक किंवा परिचयात्मक संशोधन आराखड्यानुसार माहिती अधिकार कायद्या संदर्भात अध्ययन करण्यासाठी आराखडा निश्चित करण्यात आला. गृहितकृत्यांची मांडणी करण्यात आली. गृहितकृत्यांच्या पडताळणी साठी येणा–या समस्यांचे सुत्रण करण्यात आले. गृहितकृत्यांची निश्चिती संशोधनाच्या निष्कर्षाप्रत जाण्यासाठी केली आहे. संशोधन विषयाची व्याप्ती, मर्यादा, संशोधन पद्धती यांची चर्चात्मक माहिती विषद केली आहे.

**२.४) प्रकरण चौथे-** या प्रकरणामध्ये सजग नागरिक मंचाने २०१७ ते २०१८ या वर्षात केलेल्या कार्यापैकी निवडक गोष्टींचा समावेश केलेला आहे. त्यात त्यांनी साध्य केलेल्या अनेक यशस्वी लढ्यांचा समावेश आहे. अनेक पातळ्यावर सजग नागरिक मंच लढत असतो. सजग नागरिक मंचच्या कार्याचा प्रभाव अभ्यासण्यासाठी निवडक कार्याचा आढावा घेतलेला आहे.

त्यानूसार सजग नागरिक मंचच्या कार्यपद्धतीमधील जाणवलेले टप्पे पुढील प्रमाणे- पुर्वाभ्यास, माहितीची मांडणी, शासकिय कामकाजावर लक्ष, नमुने तपासणी, माहिति अधिकाराचा वापर, निवेदन, पाठपुरावा असा अनेक प्रश्नांचा प्रवास सजग नागरिक मंचच्या माध्यमातून झालेला दिसतो. तसेच मिळविलेल्या माहितीचे टेबलच्या मदतीने सादरीकरण केले असून त्याचे विश्लेषण मांडले आहे.

**२.५) प्रकरण पाचवे** - संशोधनाचे सारांश निष्कर्ष व शिफारशी - विविध साधने व तंत्रांच्या सहाय्याने संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण आणि अर्थ निर्वाचन यातून सदर संशोधकाने निष्कर्ष काढले आहेत. हे निष्कर्ष वस्तुनिष्ठपणे मांडले आहेत. तसेच माहिती अधिकार आणि महाराष्ट्रतील चळवळ यांच्या साठी काही शिफारशी केल्या आहेत. कोणत्याही संशोधकास काही मर्यादा असतात. निवडलेल्या संशोधन विषयाचा अभ्यास करत असताना त्याच्या अनुषंगाने अनेक विषय, उपविषय, व समस्या संशोधकासमोर आल्या. परंतु संशोधन विषयाच्या संदर्भात निश्चित धेय्य गाठता यावे, यासाठी त्याचा पाठपुरावा करून ज्या समस्येच्या संदर्भात उत्तरे शोधता आली नाहीत त्यात संशोधन सुरू ठेवले जावे यासाठी भविष्यवेध घेण्यात आलेला आहे. तसेच गृहितकाची पडताळणी मांडली आहे.

**संदर्भ सुची-** सदर संशोधन कार्यासाठी अनेक साधनांचा तात्विक आणि सैद्धांतिक आधार घेण्यात आलेला आहे. सैद्धांतिक आधार मिळाला असा आधार ठरलेले संदर्भग्रंथ, नियतकालीके, संशोधनप्रबंध, वेबसाईटस् यांचा उल्लेख संदर्भसुचीत केलेला आहे.

**परिशिष्टे** – परिशिष्टांमध्ये पुरक व उपयुक्त ठरलेली माहिती जोडली आहे. त्यात परिशिष्ट अ मध्ये पुरक माहितीआणि परिपत्रके, जोडलेले आहेत. तसेच माहिती संकलनासाठी वापरलेली प्रश्नावली व मुलाखत अनुसूची जोडली आहे.

*** संशोधनाचे निष्कर्ष :–**

१) देशाच्या महाराष्ट्राच्यी माहिती अधिकार लढ्यामध्ये तसेच पुणे शहरातील चळवळींना महत्त्वाचे स्थान आहे. देशातील इतर शहरासांठी माहिती अधिकाराच्या संदर्भात पुणे शहर माहिती अधिकार चळवळ प्रेरणादायी ठरते आहे. भारतात माहिती अधिकार कायदा अस्तित्वात आल्यानंतर अनेक चळवळी निर्माण झाल्या परस्पर प्रेरणा हा त्यांचा स्त्रोत होता. त्यात पुणे शहर हे माहितीचा अधिकार कायदा प्रभावीपणे वापर करणा–या कार्यकर्त्यांची भूमि आहे. पुणे येथिल कार्यकर्ते माहिती अधिकाराचा वापर ताकदीने करत आहेत. देशातील नागरिकांना मत मांडण्याचा आणि मत बनविण्याचा हक्क आहे. संविधानाने दिलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यातील तो गर्भित अर्थ आहे. त्यामुळे देशातील प्रत्येक नागरिकाने देशाच्या प्रगतीत आपला वाटा उचलायला हवा. आपले मत मांडण्यापुर्वी त्याची पडताळणी करण्यासाठी माहितीचा अधिकार अत्यंत महत्त्वाचा ठरतो. जनतेच्या अधिकारासाठी हा कायदा अधिक सक्षमपणे वापरला जाणे गरजेचे आहे. सध्याची माहिती अधिकार चळवळ ही देशातील सर्वात ताकदवान बनली आहे. अनेक कार्यकर्ते भ्रष्टाचाराच्या विरूद्ध लढून भ्रष्टाचाराने होरपळलेल्या जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी माहिती अधिकाराचा प्रभावीपणे वापर करताना दिसत आहेत.

२) लोकशाही व्यवस्थेत जनतेचा पैसा खर्च होत असतो. त्यांचा पैसा कुठे खर्च होतो? याचा जाब जनतेनेच विचारणे गरजेचे आहे. काही वेळेला लोकशाहीतील सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष हे दोघेही पक्षांच्या सत्तासमीकरणात, राजकीय समीकरणात परस्पर लागेबांधे जपत असतात. आजचे विरोधक हे उद्याचे सत्ताधारी बनू शकतात. त्यामुळे भारतातील राजकीय व्यवस्थेच्या पटलावर ब–याच गोष्टी सत्ताधारी आणि विरोधक यांच्या संगनमताने

होत असतात. त्यावेळी विरोधी पक्ष  सत्ताधारी पक्षावर अंकुश ठेवू शकेल अशी शक्यता नसते. त्यावेळी नागरिकांनी नागरी कर्तव्य बजावणे गरजेचे असते. नागरिकांना जर आपले नागरिक असण्याचे कर्तव्य बजावायचे असेल तर त्यांना देशातील कायद्याचे ज्ञान असावे. वैश्विक स्तरावर अनेक क्रांतीकारक घटना झाल्या त्याला कारक आणि प्रेरक ठरलेली शक्ती म्हणजे तेथिल नागरिकांना त्यांच्या हक्कांची झालेली जाणिव होय. नागरिकत्वाच्या जाणिवेने एकत्र आलेल्या नागरिकांनी आधुनिक लोकशाहीचा पाया घातला आहे. त्यांनी काहीअंशी आपले हक्क मर्यादित करून घेतले, काही हक्क सोडले,  आणि काही हक्क लोकप्रतिनिधींना दिलेले आहेत. त्यातून प्रातिनिधीक लोकशाही अस्तित्वात आली आहे. प्रातिनिधिक लोकशाहीमध्ये देखील लोकप्रतिनिधींनी आत्मकेंद्रित बनुन स्वत:चा विचार करणे अपेक्षित नाही. त्यांच्या अश्या वागण्यामुळे लोकशाहीतील लोकाभिमुखता लोप पावते. ही बाब केवळ लोकप्रतिनिधीपुरतीच मर्यादीत नाही.

३) प्रशासनाला देखील ही बाब लागू पडते.  लोकप्रतिनिधींनी आणि प्रशासकीय अधिका-यांनी आपले कर्तव्य नीट बजावले नाही तर आपण कोणती भूमिका घ्यावी याचे ज्ञान सर्वच नागरिकांना असत नाही. त्यातून भ्रष्टाचार आणि अनागोंदी कारभार निर्माण होत असतो. ज्याच्या हाती अधिकार तो स्वत:ला राजा असल्यासारखा समजु लागतो. ह्या परिस्थितीचे परिवर्तन करावयाचे असेल तर नागरिकांनी प्रथम देशातील नागरिकांनी आपल्या देशाचे कायदे समजुन घेतले पाहिजे. सुरूवातीला कायद्याची जनतेने पुर्ण माहिती घ्यावी. त्यानंतर कारवाई, सुनवाई मध्ये भाग घ्यावा. राजस्थानातील जबाबदेही यात्रेमध्ये सामाजिक कार्यकर्ते निखिल डे यांनी जबाबदेही हा कायदा असावा असे मत व्यक्त केले. त्यासाठी ते संघर्ष करत आहेत.

४) लोकशाही राज्यव्यवस्थेमध्ये लोककल्याणकारी राज्याच्या भुमिकेत शासन व्यवस्था असते. त्यासाठी लोककल्याणाच्या अनेक योजना शासनव्यवस्थे कडून राबविल्या जातात. लोककल्याणाच्या या योजना कागदावरच राहता कामा नये. अपेक्षित लाभ लाभार्थी पर्यंत पोहचला का? याची माहिती नागरिक म्हणून व्यक्ती करून घेवू शकते. काही वेळेस कोणत्याही स्वार्थाशिवाय काही माहिती अधिकार कार्यकर्ते अशी माहिती मागवत असतात.

हि एक सदभावना कृती असते. त्याद्वारे धक्कादायक प्रकार उघड होत आले. त्यामुळे भारतीय नागरिकांनी आपल्या शासन यंत्रणे प्रति डोळसपणे कार्यरत राहणे गरजेचे आहे.

५) माहिती अधिकार कार्यकर्ते हे स्वत:च्या नव्हे तर देशाच्या अस्तित्वासाठी लढत असतात. माहिती अधिकार कार्यकर्ते हे सत्ता आणि पैश्याच्या जोरावर उन्माद करणा-या बड्या लोकांना धडा शिकविण्यासाठी कार्यरत असतात. असे करताना त्यांना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. त्यांना अनेक आरोपांचा सामना करावा लागतो. सरकारवर अंकुश ठेवला म्हणून विरोधीपक्षातील लोक राष्ट्रभक्त म्हणून माहिती अधिकार कार्यकर्त्याचा गौरव करतात आणि तेच सत्तेत आल्यावर त्यांच्या विरोधात माहिती अधिकाराचा अंकुश ठेवल्यास माहिती अधिकार कार्यकर्त्यास लगेचच राष्ट्रविरोधी घोषित करतात. कधी कधी सत्ताधा-यांना माहिती अधिकार कायद्याचा वापर लोकप्रियतेसाठी केलेला फार्स आहे असे वाटते. काही प्रंसगात माहिती अधिकार कार्यकर्त्यांच्या वैयक्तीक जीवनातील गोष्टींचा उपयोग करून त्यांना बदनाम करण्याचा प्रयत्न होत असतो. सोशल मिडीयावर अश्या पद्धतीने ट्रोल होण्याचा अनुभव माहिती अधिकारा कार्यकर्त्यांना येत असतो. या संदर्भात मुबंईस्थित अनिल गलगली हे माहिती अधिकार कार्यकर्ते यांना हा अनुभव सातत्याने आला आहे. एखाद्या व्यक्तीने ब्लॅकमेलींग केले की संपुर्ण माहिती अधिकार चळवळीस दोषी धरणे योग्य नसते.

❋ उद्दिष्टांची पुर्तता :-

**१) महाराष्ट्र माहीतीचा अधिकार कायद्याची अमलबजावणी करण्यात सजग नागरीक मंच अग्रेसर आहे.**

- माहिती अधिकाराची चळवळ आज सर्वात सशक्तपणे पुढे येत आहे. असे असले तरी माहिती अधिकाराची तपशीलवार माहिती जनतेस नाही हे समोर आले आहे. उदा. कलम ४

**२) पुणे शहरातील आणि महाराष्ट्राच्या समस्यावर उपाय योजना आणि न्याय मिळवून देण्यात सजग नागरीक मंचाचा कार्यभार हा खुप व्यापक स्वरूपाचा आहे.**

- माहिती अधिकार सामान्य जनते पर्यंत पोहचला आहे असे म्हणता येणार नाही कारण सामान्य जनतेला त्याची तोंडओळख आहे. पण तपशीलवार माहिती नाही हे संशोधनातून समोर आले आहे.

**३) लोकशाहीची मजबूती वाढविण्यासाठी माहीती अधिकार खुप उपयोगी आहे.**

- सर्वसामान्य जनतेला माहिती अधिकाराबाबत योग्य स्वरूपात मार्गदर्शन होणे गरजेचे आहे. माहिती अधिकार कायदा लोकभाषेतून लोककलेतून जास्त प्रसार पावू शकतो असे संशोधनकर्त्यास वाटते.

**४) माहीती अधिकार कायद्याच्या निर्मितीपासून त्याची अमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्रातील अनेक संस्था आणि संघटना कार्यरत आहेत.**

- सजग नागरिक मंच या संस्थेने वेगवेगळ्या पातळ्यांवर माहिती अधिकाराचा वापर करून जनतेचे प्रश्न मार्गी लावले आहे. प्रशासनाच्या अनागोंदी कारभारावर आसुड ओढले आहे. योग्य प्रशासकिय अधिका-यांची पाठराखण केली आहे. शासकीय कामकाजाची कागदपत्रे जनतेच्या परिक्षणासाठी खुली ठेवण्याचा निर्णय शासनाने सजग नागरिक मंच या संस्थेच्या पाठपुराव्यामुळे केला. कलम ४ ची अमंलबजावणी योग्य त-हेने होत नाही हे सर्वात प्रथम जनता आणि शासन यांच्या समोर सजग नागरिक मंचने आणले. त्यामुळे सजग नागरिक मंचचे माहिती अधिकार कायद्याच्या संदर्भातील कार्य योगदान भरीव स्वरूपाचे आहे. इतर संस्थांनी त्यातून बोध घेणे गरजेचे आहे.

**५) या माहीती अधिकार कायद्याची कार्य या सजग मंचाने किती योग्य पद्धतीने केलेले आहे त्या त्या कार्याला अन्वायार्थ लावणे.**

- जनतेच्या मनात माहिती अधिकार कायदा रूजविण्याचा प्रयत्न महाराष्ट्रातील माहिती अधिकार चळवळीने केला आहे. त्याची परिणीती आज महाराष्ट्रात गावोगावी अनेक माहिती

अधिकार कार्यकर्ते कार्यरत आहेत. जनतेच्या मनात माहिती अधिकार कायद्याबाबत जनजागृतीचे श्रेय महाराष्ट्रातील माहिती अधिकार चळवळीला जाते.

**६) या विषयांवरील संशोधनामुळे माहिती अधिकाराच्या वापराबाबतचे महत्त्व नागरिकांना समजेल तसेच संघटीत प्रयत्नाचे फलस्वरूप माहिती अधिकाराची यशस्विता ही निदर्शनास येईल. व या कायद्याची अमलबजावणी योग्य प्रकारे करण्यास नागरिक सुरूवात करू शकतील असा विश्वास वाटतो.**

- नागरिकांनी संघटीत स्वरूपात प्रयत्न करण्याची गरज प्रस्तुत संशोधनाने अधोरेखीत होते आहे. कारण सजग नागरिक मंच, स्वराज्य संघर्ष समिती , नागरिक चेतना मंच, माहिती अधिकार मंच, मनी लाईफ फाउंडेशन, या सारख्या संघटनांनी महाराष्ट्रातील शहरी भागात जनजागृतीसाठी भरीव कार्य केले आहे. त्याच प्रमाणे ग्रामीण पातळीवर वयम् सारखी संस्था कार्यरत आहे. संघटीत प्रयत्न, प्रशिक्षण, कार्यशाळा, लोकजागर, लोकसुनवाई असा माहिती अधिकाराचा वेगवेगळ्या पातळीवरचा प्रवास या स्वयंसेवी संघटनांच्या माध्यमातून होताना दिसत आहे.

**७) माहितीच्या अधिकाराचा कायदा सामान्य माणसांच्या दृष्टीकोनातून अत्यंत क्रांतीकारी स्वरूपाचा वाटतो या कायद्यामुळे प्रशासनात खुप मोठी पारदर्शकता येणार आहे. तथापि हा कायदासामान्य माणसा पर्यंत पोहचावा हा मुख्य हेतू या संशोधना मागे आहे.**

- काही अंशी माहिती अधिकाराचा प्रसार प्रचार करण्यात सदर संशोधनाचा हेतू साध्य झाला आहे. संशोधनाने सुचविलेले उपाय माहिती अधिकार चळवळीसाठी उपयोगात आणल्यास त्याचा प्रसार होण्यास मदत होईल.

**८) माहिती अधिकार कायदा हा सर्व शासकिय कार्यालय व इतर सर्व सहकारी संस्था, शिक्षण संस्था, ग्रंथालय , निमशासकिय कार्यालयात वापरला जातो.**

- कायद्यामागील उद्देश चांगला आहे, ही जाणीव होण्यासाठी लोकजागृती होणे गरजेचे आहे. लोकांना कायदा आपलासा वाटावा या साठी लोकभाषेतून लोकांना तो समजून सांगणे गरजेचे आहे. सामान्य व्यक्तीस संकोच वाटेल अश्या ठिकाणी बंद दरवाजा आड कायद्याबद्दल माहिती दिली जाते त्या एवजी मोकळेपणाने सार्वजनिक ठिकाणी माहिती दिली जावी.

**९) सनदी अधिकारी व कर्मचारी हे जनतेचे सेवक असतात. तरी सुद्धा नागरिकांना आपल्या कामकाजा संबंधी कार्यालयीन स्थितीची माहिती मिळविण्यासाठी कितीतरी अडचणींना सामोरे जावे लागते त्यामुळे माहिती अधिकार कायद्याच्या तरतुदींच्या आधारे अन्यायग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी सर्वच लोकांना आपल्या हक्कासाठी झगडण्याचे नैतिक धैर्य वाढविण्यास या अधिकाराची निश्चित मदत होईल असे जनतेस पटवून देणे**

- माहिती अधिकार चळवळीचा इतिहास दृक–श्राव्य माध्यमातून रंजकपणे जनतेच्या समोर यायला हवा. त्यासाठी माहिती अधिकार चळवळीतून साध्य झालेल्या यशोगाथा लोकासमोर यायला हव्यात जेणेकरून आपल्या हक्कासाठी झगडण्याचे नैतिक धैर्य म्हणून या अधिकाराची निश्चित मदत होईल असे जनतेस पटवून देणे शक्य होईल.

*** गृहितकांची पडताळणी :–**

**१) लोकशाहीच्या सुदृढ व निकोप वाढीसाठी माहिती अधिकार कायदा साहाय्यभूत ठरतो–**

लोकशाहीच्या सुदृढ व निकोप वाढीसाठी माहिती अधिकार कायदा साहाय्यभूत ठरतो. असे लोकांना वाटते. लोकांनी माहिती अधिकार कायद्याविषयी तपशीलवार माहिती नाही मात्र लोकशाही साठी माहिती अधिकार महत्त्वाचा आहे हे या संशोधनाने सिद्ध झाले आहे.

**२) माहिती अधिकार कायद्याच्या अंमलबजावणीसाठी विभिन्न संस्था, संघटनांच्या माध्यमातून अनेकांना प्रदिर्घ संघर्ष करावा लागत आहे–**

माहिती अधिकार निर्मिती साठी आणि अंमलबजावणीसाठी चाललेला संघर्ष विभिन्न संस्था संघटंनाच्या माध्यमातून सुरूच आहे. मात्र आजवर सजग नागरिक मंच, नागरिक चेतना मंच, स्वराज्य संघर्ष समिती, माहिती अधिकार मंच यासारख्या संस्थानी भरीव कार्य केले आहे ते ग्रामीण पातळीवर विस्तारीत करण्यात विविध संस्थांना यश आलेले नाही.

**३) माहिती अधिकार कायद्याच्या अंमलबजावणीबाबात शासन प्रशासनाचा कल नेहमीच प्रतिकुल राहिलेला आहे–**

माहिती अधिकार कायद्याबाबत अंमलबजावणीत शासन प्रशासनाचा कल नेहमीच प्रतिकुल राहिलेला आहे. काही अपवाद वगळता माहिती देण्या एवजी माहिती लपविण्याकडे अथवा न सांगण्याकडे शासन प्रशासनाचा कल आहे हे झाले आहे.

**४) माहिती अधिकार कायद्याच्या अमलबजावणी बाबात पुणे शहरात ' सजग नागरिक मंच ' या संस्थेचे महत्त्वपुर्ण योगदान राहिले आहे–**

माहिती अधिकाराबाबत सजग नागरिक मंचाने पुणे शहरात उल्लेखनीय कार्य केले आहे. माहिती अधिकार जनतेत प्रसार करण्यासाठी सजग नागरिक मंच यशस्वी झाले आहे. सजग नागरिक मंच या संस्थेने माहिती अधिकार अधिनियम २००५ या कायद्याचा तपशीलवार अभ्यास करून त्यातील सर्वच कलमांच्या काटेकोर अंमलबजावणीसाठी पाठपुरावा केलेला आहे. त्यामुळे आज शासकीय संकेतस्थळे दरवर्षी किमान दोन वेळा अघ्ययावत करण्याचा अध्यादेश शासनाने काढला आहे. पुणे महानगरपालीकेच्यामध्ये असलेले माहिती अधिकार ग्रंथालयात जावून कोणतीही व्यक्ती कामकाजाची माहिती घेवू शकते. हे सजग नागरिक मंचच्या पाठपुराव्या मुळे साध्य झाले.

५) **भविष्यवेध –** माहिती अधिकार चळवळीचा वेग लक्षात घेता लवकरच माहिती अधिकार चळवळ जनसुनवाईच्या दिशेने जात असलेली दिसेल. जनसुनवाई टाळण्यासाठी काही प्रयत्न

होताना पहावयास मिळतील. नागरिकांनी सजग राहून जनसुनवाईसाठी प्रयत्नशील राहणे गरजेचे आहे. सोशल आडिट संकल्पना राबवणे जनसुनवाईतून शक्य होईल. ग्रामीण पातळीवर कायदा रूजल्यास ग्रामपंचायत सक्षम होतील. माहिती अधिकार कायद्याचा योग्य प्रसार झाल्यास लोकशाहीतील लोकसहभाग वाढेल. माहिती अधिकार चळवळींवर येत्या काळात संशोधकांनी अधिक लक्ष देणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रातील माहिती अधिकार चळवळ - सजग नागरिक मंच- एक चिकित्सक अभ्यास या विषयावर संशोधन करताना अनेक व्यक्ती आणि संस्थांच्या सहकार्यामुळे आणि प्रोत्साहनमुळे संशोधन पुर्ण करता आले. सदर संशोधनातील निष्कर्ष, शिफारशी आणि भविष्यवेध या बाबी काळजीपूर्वक आणि शास्त्रीय पद्धतीने मांडण्यात आलेल्या आहेत.

*** शिफारशी-**

**१) माहिती अधिकार कार्यकर्त्यांचा सत्कार व्हावा -**

माहिती अधिकाराच्या क्षेत्रात अनेक कार्यकर्ते निस्पृहपणे काम करत आहेत. कोणत्याही लाभाशिवाय ते काम करत असतात. इतर राष्ट्रांमध्ये एखाद्या माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी उघडकीस आणलेल्या माहितीद्वारे शासनाचे पैसे खर्च होण्यापासून वाचले असल्यास संबंधित माहिती अधिकार कार्यकर्त्यासबक्षिस मिळत असते. ह्या बक्षिसाची रक्कम एकुण रकमेच्या काही टक्के असते. हि रक्कम शासनाचे पैसे खर्च होण्यापासून वाचवल्याबद्द्ल संबंधित माहिती अधिकार कार्यकर्त्यास दिली जाते.

**२) माहिती अधिकार कार्यकर्त्यांची बदनामी करण्याचा प्रयत्न झाल्यास त्यावर कडक उपाययोजना केली जावी. त्याची गंभीर दखल घेतली जावी-**

फेसबुक, ट्विटर आणि इतर सोशल मिडीया द्वारे माहिती अधिकारा कार्यकर्यांना हैराण करणा-या संबंधित नेतेमंडळींच्या कार्यकर्त्यांवर कारवाई केली जावी. माहिती अधिकार कार्यकर्त्याच्या वैयक्तिक माहितीच्या आधारे बदनामी करणा-यांविरूद्ध कडक कारवाई केली जावी.

**३) सामान्य माणसाला संकोच वाटेल अश्या ठिकाणी माहिती अधिकाराची शासनाची शिबिरे आयोजित केली जावू नये–**

बऱ्याचदा पंचतारांकित हॉटेल्स, किंवा बंद दरवाजा आड शिबिरे आयोजित केल्यामुळे त्यांचा अपेक्षित परिणाम साध्य होत नाही. कारण अश्या शिबिरांमध्ये सामान्य नागरिकांना सहभागी होणे संकोचाचे वाटू शकते. माहिती अधिकाराची शासना कडून राबविलेली शिबिरे सार्वजनिक ठिकाणी आयोजित केली जावी. सामान्य माणसाला संकोच वाटेल अश्या ठिकाणी माहिती अधिकाराची शासनाची शिबिरे आयोजित केली जावू नये.

**४) माहिती अधिकाराची अपीलीय प्रक्रिया विलंबाची नसावी–**

बऱ्याच वेळा माहिती न मिळाल्यामुळे अनेक कार्यकर्ते अपिल करत असतात. त्यांना वेळीच न्याय मिळणे अपेक्षित असते. साधारणपणे एक अपिल पुर्ण करण्यासाठी एक वर्षांचा कालखंड लागतो. ह्या काळानंतर मिळालेली माहिती उपयुक्त असेलच किंवा एखाद्या मुद्यासंबंधी माहितीची उपयुक्तता तशीच राहत नाही. त्यामुळे माहिती अधिकार कार्यकर्त्यांचे नितीधैर्य खचणार नाही. याची दक्षता माहिती अधिकार अपिलाच्या प्रक्रियेत घेतली जाणे गरजेचे आहे.

**५) माहिती अधिकार कायद्याच्या कलम चारची काटेकोरपणे अमलबजावणी करावी–**

सार्वजनिकप्राधिकरणांनी कामकाजाविषयी एवढी जास्त माहिती जनतेला उपलब्ध करून द्यावी की जेणे करून जनतेला माहिती अधिकारात अर्ज करण्याची जरूरत पडूच नये असे सांगणारे हे कलम आहे, त्याची काटेकोर अमल बजावणी व्हावी. शासनाने नुकताच तश्यास्वरूपाचा अध्यादेश (जीआर) काढला आहे.

**६) माहिती अधिकारात मिळालेली सर्वप्रथम सार्वजनिक करून टाकावी–**

माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी ब्लॅकमेलींगच्या आरोपापासून स्वत:स वाचविण्यासाठी माहिती अधिकारात मिळालेली सर्वप्रथम सार्वजनिक करून टाकावी. माहिती अधिकाराचा अर्ज जर

सार्वजिक व्यवस्थेशी निगडीत असेल तर आपण अर्ज का करत आहोत हेही सार्वजनिक करावे, जेणे करून माहिति अधिकार चळवळ पारदर्शक राहण्यास मदत होईल.

**७) माहिती अधिकारात माहिती मागण्यासाठी तारतम्य कार्यकर्त्याच्या अंगी असावे–**

काही माहिती अधिकार कार्यकर्ते प्रश्नार्थक माहिती मागवितात त्यामुळे त्यांचे अर्ज वाद होतात. माहिती अधिकार कायद्याच्या वापराने यंत्रणेवर ताण येवू शकतो त्यामुळे आपल्या मागणीची आवश्यकता प्रत्येक माहिती अधिकार वापरकर्त्यांनी विचारात घ्यायला हवी.

**८) माहिती अधिकारात माहितीची देवाण– घेवाण इमेल स्वरूपात व्हावी–**

माहितीची देवाण – घेवाण इमेल स्वरूपात व्हावी.माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी माहिती इमेल द्वारे माहितीमागवावी. त्यामुळे पेपरची बचत होईल. माहिती मिळण्याचा वेग वाढेल.

**९) पायाभूत सुविधांच्या दर्जाकडे देखील माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी लक्ष घालावे –**

पायाभूत सुविधांच्यासाठी काही मानकं राष्ट्रीय स्तरावर निश्चित केलेली आहेत. माहिती अधिकारात जनतेला सॅम्पल मागण्याचा अधिकार आहे. पायाभूत सुविधा विकसीत होत असताना निश्चित केलेल्या मानकांवर काम होते आहे का याची पडताळणी देखील माहिती अधिकारात होणे गरजेचे आहे.

**१०) लोकजागृतीसाठी लोककलेच्या माध्यमातून लोकजागृती व्हावी–**

उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे सामान्य माणसाला संकोच वाटेल अश्या ठिकाणी माहिती अधिकाराची शासनाची शिबिरे आयोजित केली जावू नये. याउलट माहिती अधिकार कायदा लोकभाषेत लोककलेच्या माध्यमातून जनतेसमोर मांडण्याचा प्रयत्न होवू शकतो. अनेक लोककला पथकांना

शासन अनुदान देत असते. अनुदान देताना शासनाने माहिती अधिकाराच्या प्रसाराची अट लोककला पथकांसमोर ठेवण्यास हरकत  नाही.

**११) प्रसार माध्यामांवर प्राईम टाईम मध्ये एक तरी जाहिरात माहिती अधिकारासाठी बंधनकारक हवी–**

शासन अनेक योजनांची जाहिरात करत असते. स्वच्छ भारत, मनरेगा, स्किल इंडिया, मेक इन इंडिया या जाहिराती स्तुत्य आहेतच पण त्यांच्या धर्तीवर शासनाच्या पुढाकाराने माहिती अधिकाराच्या प्रसाराचे कार्य व्हावे. स्वच्छ भारत, मनरेगा, स्किल इंडिया, मेक इन इंडिया यांच्या इतकेच माहिती अधिकाराचे महत्त्व आहे.

**१२) सध्याचे सशक्त प्रसार माध्यम टिव्ही आहे–**

गाजलेल्या टिव्ही सिरिअल मध्ये माहिती अधिकाराच्या वापराने झालेली एखादी यशोगाथा दाखवली जावी. टिव्ही सिरिअलचे कलाकार लोकांना अनुकरणीय वाटतात. त्यामुळे हि यशोगाथा टिव्ही सिरिअल मध्ये ज्यावेळी एखादे गाजलेले पात्र करेल त्यावेळी लोकांचे आपसूक प्रबोधन होईल. अर्थात ह्या मुद्याला व्यावसायिक बाजू आहे. पण सध्या चाललेल्या टिव्ही सिरिअलमध्ये निवडणुका, राजकारण, दाखवलेच जाते. त्याला ह्या मुद्यांची जोड दिल्यास माहिती अधिकाराचा प्रवास सर्वदूर होण्यास मदत होईल.

**१३) जनसुनवाईचे प्रयत्न कार्यकर्त्यांनी करावे–**

राजस्थान केरळ च्या धर्तीवर महाराष्ट्रातील माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी जनसुनवाईसाठी प्रयत्न करायाला हवे. माहिती अधिकाराचा पुढचा टप्पा तोच आहे. जनसुनवाई झाल्यामुळे अनेक भ्रष्ट अधिका–यांना घरी पाठविण्यात आल्याचे समोर आले आहे. महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांनी जनसुनवाईसाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**१४) शालेय शिक्षणामध्ये माहिती अधिकार कायद्याचा अभ्यासक्रम अंतर्भुत केला जावा–**

विद्यार्थी हे देशाचे भवितव्य आहेत. त्यांना शालेय स्तरावर जर या कायद्याचे ज्ञान प्राप्त झाले तर सक्षम नागरिक निर्माण होतील.

**❋ संदर्भ सुची**


१. वेलणकर, सजग, दैनिक लोकसत्ता, दि. १२/०८/२०१३

२. हजारे अण्णा, लढाई अजुनही अपुर्ण....., दैनिक लोकसत्ता, पुरवणी– लोकरंग, दि. ११/१०/२०१५

३. वेलणकर विवेक, माहितीचा अधिकार धोक्यात, दैनिक लोकसत्ता, दि. २८/०७/२०१८

४. वेलणकर विवेक, माहितीचा अधिकार कायदा शस्त्र नव्हे, साधन!, दैनिक लोकसत्ता, दि. ११/१०/२०१५

५. बातमी, माहितीचा अधिकार कायद्यातील बदलाला अण्णा हजारे यांचा विरोध, दैनिक लोकसत्ता, दि. २१ एप्रिल २०१७

६. बातमी, शहरबातः माहिती अधिकाराचा बागुलबुवा, दैनिक लोकसत्ता, पुरवणी– मुंबई दि. ३०/०१/२०१८

७. आसावा श्याम, कायदा केला जातोय बोथट, दैनिक महाराष्ट्र टाईम्स, दि. १०/१०/२०१५

८. झगडे महेश, माहिती अधिकार आता अधिक पारदर्शी, दैनिक लोकसत्ता, दि. १५/१२/२०१८

९. शिरोडकर संजय, माहिती अधिकार व चळवळीची तेरा वर्षे, संपादकीय विशेष लेख, दि. २०/१०/२०१८

१०. थत्ते मिलिंद, १५० वर्षांनी मिळालं जंगलावरचं स्वराज्य!, दैनिक लोकसत्ता, दि. २७/०६/२०१५

१. कचरे प्रल्हाद/गायकवाड शेखर, कायदा माहितीचा अन् अभव्यक्तिस्वातंत्र्याचा, यशदा प्रकाशन पुणे,– २०१०, पृष्ठ क्र. ११ ते १७

२. बाचल.वि.मा, भारतीय राज्यघटना आणि राजकिय व्यवहार (अनुवादीत), के,सागर प्रकाशन पुणे, २०१०, पृष्ठ क्रं. ३४ ते ५४

३. सक्सेना.एस.एन, अराजकाच्या वाटेवर भारत, अनुवाद- दांडेकर कुसुदिनी, श्रीविद्या प्रकाशन, १९९५, पृष्ठ क्रं. १२
४. वेलणकर विवेक, ग्राहक राजा, सजग हो!, राजहंस प्रकाशन, १९९५, पृष्ठ क्रं. १ ते ३०
५. वराडकर.र.घ., राज्यशास्त्र, निराली प्रकाशन, १९९५, पृष्ठ क्रं. १७
६. चौधरी राजेश, केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५, चौधरी लॉ पब्लिशर्स, २०१३, पृष्ठ क्रं. ०५
७. नाईकवाडे फारूख, स्टील फ्रेम, राष्ट्रचेतना प्रकाशन, मुंबई, २०१३, पृष्ठ क्र. १५
८. पवार जयसिंगराव, हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, निराली प्रकाशन, पुणे, २००९, पृष्ठ क्र. ७० ते ९५
९. डोळे. ना.य., राजकिय विचारांचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९६९, पृष्ठ क्र. ८१५ ते ८६५
१०. भोळे भाष्कर लक्ष्मण, भारतीय गणराज्यांचे शासन आणि राजकारण, पिंपळपुरे एण्ड कं पब्लिशर्स, २००३, पृष्ठ क्र. ११५
११. साठे सत्यरंजन, भारतीय राज्यघटनेची पन्नास वर्षे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, २००२, पृष्ठ क्र. १२५
१२. जोशी ललिता, लोकाभिमुख कारभाराच्या दिशेने...., वॉटरशेड आर्गनायझेशन ट्रस्ट प्रकाशन, २००९, पृष्ठ क्र. १२०

**वेब सुची –**

1) http://mahitiadhikarmanch.ngo/
2) http://yashada.org/
3) https://www.worldbank.org/
4) https://rtionline.gov.in/
5) https://rti.gov.in/
6) http://foundation.moneylife.in/
7) https://maharashtratimes.indiatimes.com/maharashtra/ahmednagar-news/governance-order-department-to-apdate-websites/articleshow/50762426.cms

## परिशिष्ट १

| अनुक्रम | प्रश्नावली |
|---|---|
| १. | तुम्हाला माहिती अधिकार कायद्याबद्दल माहिती आहे का? |
| २. | भ्रष्टाचार आणि गैरव्यवहार निर्मूलनासाठी माहिती अअधिकाराचा उपयोग होत आहे असे आपणास वाटते का? |
| ३. | विजय कुंभार यांचा माहिती अधिकार कायद्याची माहिती देणारा व्हीडीओ युट्युबवर आपण पाहिला आहे का? |
| ४. | तुम्हाला सजग नागरिक मंचाबद्दल माहिती आहे का? |
| ५. | यशदा या शासकीय संस्थेची तुम्हाला माहिती आहे का, जिथे माहिती अधिकार कायद्याचे अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग व सामान्य जणास माहिती अधिकाराचे प्रशिक्षण दिले जाते? |
| ६. | भारतात माहीती अधिकार कायदा कधी अस्तित्वात आला हे आपणास माहिती आहे का? |
| ७. | माहिती अधिकार कायद्याबद्दल प्रसार प्रचार व्हावा असे आपणास वाटते का? |
| ८. | माहिती अधिकार कायद्याची संबंधीत माहिती देणारी कार्यशाळा मोफत असावी का? |
| ९. | दारिद्र्यरेषेखालील व्यक्तीला माहिती अधिकार कायद्यांतर्गत माहिती मोफत मिळते का? |
| १०. | लोकशाही व्यवस्थेत माहिती अधिकार कायद्यामुळे लोकांच्या अधिकारात वाढ झाली असे तुम्हाला वाटते का? |
| ११. | तुम्हाला माहिती अधिकार कायद्यामुळे भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडीस आली आहे असे |

| | |
|---|---|
| | वाटते का? |
| १२. | माहिती अधिकारामुळे जबाबदारी प्रशासन निर्माण होत आहे असे आपणास वाटते का? |
| १३. | तुम्हाला माहिती अधिकाराच्या कलम ४ विषयी माहिती आहे का? |
| १४. | आपल्याला माहिती अधिकाराविषयी माहिती कोणत्या कार्यकर्त्यांनी संस्थानी यापूर्वी दिलेली आहे का? |
| १५. | आपण स्वतः माहिती अधिकाराचा वापर किंवा अर्ज केला होता का? |
| १६. | माहिती अधिकार कायद्यामुळे प्रशासनावर ताण वाढतो आहे असे आपणास वाढते का? |
| १७. | तुम्ही शासकीय कार्यालयामध्ये माहिती अधिकार कक्ष अथवा माहिती अधिकार फलक पाहिला आहे का? |
| १८. | माहिती अधिकार दिन कधी असतो? |
| १९. | माहिती अधिकार कायद्यांतर्गत शासकीय अभिलेख पाहता येतात हे आपणास माहित आहे का? |
| २०. | राज्य माहिती आयोगाचे मुख्य कार्यालय महाराष्ट्रात कोठे आहे हे आपणास माहित आहे का? |
| २१. | माहिती अधिकार कायद्याविषयी आपल्याला सोशल मिडीयाद्वारे माहिती मिळाली होती का? |
| २२. | अभिव्यक्ती स्वातंत्र्याविषयी आपणास माहिती आहे का? |
| २३. | अण्णा हजारे यांच्या कार्याविषयी आपणास माहिती आहे का? |

| | |
|---|---|
| २४. | भारतामध्ये फक्त भारतीय माहिती अधिकारात अर्ज करू शकतात असे आपणास वाटते काय? |
| २५. | शासकीय संकेतस्थळावर माहिती अधिकार कायद्यांतर्गत कलम ४ प्रमाणे आपणास अपेक्षित माहिती मिळते आहे का? |
| २६. | कोणतीही माहिती अधिकार कायद्याची माहिती देणारी प्रबोधन करणारी शासकीय संस्था आपणास माहित आहे का? |
| २७. | माहिती अधिकार कायदा जाणून घेण्यासाठी इंटरनेटचा वापर आपण करता का? |
| २८. | तुम्हाला शासनाकडून माहिती अधिकार कायद्याची अंमलबजावणी पूर्णपणे होत आहे असे वाटते का? |
| २९. | शालेय अभ्यासक्रमात माहिती अधिकार कायद्याचा समावेश अभ्यास केला जावा काय? |
| ३०. | प्रशासकीय कर्मचाऱ्यावर माहिती अधिकार कायद्यामुळे उत्तरदायीत्व निर्माण होते असे आपणास वाटते का? |

# परिशिष्ट २

# सजग नागरिक मंच

(माहिती अधिकार वापरा, भ्रष्टाचार कमी करा, जीवन आनंदी करा)

द्वारा : श्री. विवेक वेलणकर, १२०० सदाशिव पेठ, लिमयेवाडी, सोहमश्री अपार्टमेंट, पुणे- ४११ ०३०

सार्वजनिक न्यास नोंदणी क्र. : E5620 Pune. • PAN No.: AAKTS 4136P

अध्यक्ष : विवेक वेलणकर ( ९८५००६३४८० ) कार्यकारी विश्वस्त : जुगल श्री. राठी ( ९३७००६६९३७ )

<u>प्रेस नोट</u>

दि. : ३० / १२ / २०१७

**श्री. संजय शिरोडकर यांना**
**'सजग नागरीक माहिती अधिकार पुरस्कार २०१७' जाहीर**

मा. संपादक,

स.न.वि.वि.

माहिती अधिकार कायद्याला नुकतीच बारा वर्षे पूर्ण झाली आहेत. या कायद्याचा प्रचार व प्रसार करण्याच्या उद्देशाने आम्ही पुण्यात सजग नागरिक मंचाची स्थापना केली. या मंचाच्या माध्यमांतून आम्ही माहिती अधिकार जागृति प्रबोधन, मार्गदर्शन, प्रशिक्षण असे विविध उपक्रम, ज्येष्ठ नागरिक संघ, रोटरी , लायन्स क्लब, महाविद्यालये इ. यांच्या सहकार्याने राबवित आहोत.

गेली अकरा वर्षे या क्षेत्रात काम करीत असतांना अनेक नागरिक व कार्यकर्ते या क्षेत्रांत तळमळीने काम करत असल्याचे जाणवले. समाजातर्फे त्यांच्या मौलिक कार्याची नोंद घेतली जावी, त्यांचे कौतुक व्हावे व इतरांना त्यापासून स्फूर्ती मिळावी या उद्देशाने आम्ही **'सजग नागरीक माहिती अधिकार पुरस्कार'** देण्याचे ठरवले. याकरिता अशा प्रकारचे कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यासंबंधी माहिती पाठविण्याचे आम्ही आवाहन केले होते. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. श्री प्रल्हाद कचरे, माहिती अधिकार कायद्याचे ज्येष्ठ अभ्यासक व तज्ञ आणि जितेंद्र अष्टेकर, ज्येष्ठ पत्रकार या तज्ञांच्या समितीने अर्जांचे परीक्षण करुन **श्री.संजय शिरोडकर** यांची निवड पुरस्कारा करिता केली आहे. पुरस्काराचे स्वरुप सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ व ₹ ११,०००/- रोख असे आहे.

यापूर्वीचे **सजग नागरीक माहिती अधिकार पुरस्कार** (कै.) डॉ. श्रीराम पांडे, श्री. विजय कुंभार, (कै.) सतीश शेट्टी, श्री.यशवंत नातू व श्री.दत्तात्रय सायकर (पिंपरी-चिंचवड), प्रा.विठ्ठल बुलबुले (अहमदनगर), श्री.विनायक थाळकर (जव्हार), श्री.गणेश बोऱ्हाडे (संगमनेर), श्रीमती क्रीज सुखरानी ,श्री. अनिल गलगली (मुंबई) व श्री. अविनाश प्रभुणे (नागपूर) यांना प्रदान करण्यात आले आहेत.

**श्री संजय शिरोडकर,** यांनी माहिती अधिकाराचा प्रभावी वापर करून समाजाचे अनेक प्रश्न धसास लावले. 'टोल एक झोल', एअरपोर्ट अॅथॉरिटी, पंतप्रधान कार्यालय, मुख्यमंत्री कार्यालय, पोलीस, आर टी ओ, धर्मदाय आयुक्त, तसेच TRAI, CBDT, BSNL, IOC, NHAI, RBI, Min Fin, ROC, Air Force, NSDL, CAG इ. यांच्या कार्यातील त्रुटी, तसेच गैरव्यवहार उघडकीस आणण्यासाठी ५००० पेक्षा अधिक वेळा सातत्याने माहिती अधिकाराचा वापर केला.

सदरहु **'सजग नागरीक माहिती अधिकार पुरस्कार २०१७'** चे वितरण **मा.शैलेश गांधी,** ज्येष्ठ माहिती अधिकार कार्यकर्ते व माजी केंद्रीय माहिती आयुक्त, यांच्या हस्ते रविवार दि. ०७ जानेवारी २०१८ रोजी सायं. ५.०० वा. आय एम डी आर सभागृह, (बी.एम्.सी.सी. कॉलेज मार्ग) पुणे-४११ ००४ येथे संपन्न होणार आहे.

हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे.

सदरहू पुरस्कार घोषणेस आपल्या लोकप्रिय वृत्तपत्राच्या सर्व आवृत्त्यांमधून प्रसिद्धी द्यावी ही विनंती.

विवेक वेलणकर
अध्यक्ष

जुगल श्री राठी
कार्यकारी विश्वस्त

फाइल सं. एबीएफ/20/02/2018-आरटीआई

सूचना और प्रसारण मंत्रालय

# ब्यूरो ऑफ आउटरीच एंड कम्युनिकेशन

कमरा - 4, सूचना भवन, सीजीओ परिसर, लोधी रोड, नई दिल्ली -110003.

दिनांक: 01.05.2018

सेवा में,

श्री अनिल वेदव्यास गलगली,
2, जुना खारवाला चाल, काजूपाड़ा,
साकीनाका, मुंबई - 400072

विषय: आरटीआई अधिनियम 2005 के तहत सूचना मांग।

महोदय,

कृपया केन्द्रीय लोक सूचना अधिकारी, प्रधान मंत्री कार्यालय, को अपने आरटीआई अनुरोध 27.01.2018 के आवेदन का सन्दर्भ लें, जो इस ब्यूरो (पूर्ववर्ती डीएवीपी) के लेखा स्कंध में अवर सचिव (एमयूसी) / सीपीआईओ, सूचना और प्रसारण मंत्रालय के माध्यम से आपको इस मामले में अपेक्षित जानकारी प्रदान करने के लिए प्राप्त हुआ है।

2. यह पाया गया कि आपके दो प्रश्नों में से एक प्रश्न इस ब्यूरो के लेखा स्कंध से संबंधित है। इस संबंध में, इस निदेशालय के लेखा विंग के साथ उपलब्ध जानकारी निम्नानुसार है:

| प्रश्न | उपलब्ध जानकारी | | | (करोड़ रुपये में) |
|---|---|---|---|---|
| | वित्त-वर्ष | प्रिंट मीडिया * | इलेक्ट्रॉनिक मीडिया ** | बाह्य प्रचार *** |
| वर्तमान केंद्र सरकार गठित होने की तारीख देते हुए आज तक जारी किये गए विभिन्न विज्ञापनों की जानकारी देते हुए विज्ञापन का प्रकार और कुल की गयी खर्च का ब्यौरा दें। | 2014-15 (01.06.2014- 31.03.2015 तक) | 424.85 | 448.97 | 79.72 |
| | 2015-16 | 510.69 | 541.99 | 118.43 |
| | 2016-17 | 463.38 | 613.78 | 185.99 |
| | 2017-18 | 333.23 (07.12.2017 तक) | 475.13 (31.03.2018 तक) | 147.10 (31.01.2018 तक) |

* प्रिंट मीडिया - (अखबार, पत्रिका आदि सहित)

** इलेक्ट्रॉनिक मीडिया - (टीवी, इंटरनेट, रेडियो, एसएमएस, डिजिटल सिनेमा, सीआरएस आदि सहित)

*** बाह्य मीडिया - (पोस्टर, बैनर, होर्डिंग, डिजिटल पैनल, रेलवे टिकट इत्यादि सहित)

3. आपके द्वारा मांगी गई जानकारी और लेखा स्कंध में विशेष रूप से वित्तीय वर्ष 2017-18 की अंतिम तिमाही के दौरान मौजूदा काम के अत्यधिक दबाव से निपटने के लिए बहुत कम कर्मचारियों की संख्याबल के कारण, सूचना की आपूर्ति में देरी हुई, जिसका खेद है।

4. इस सूचना के प्राप्ति के 30 दिनों के भीतर उपर्युक्त जानकारी के विरुद्ध यदि कोई सूचना, इस निदेशालय के अपीलीय प्राधिकारी के लिए हो, तो निदेशालय के अपीलीय प्राधिकरण के विवरण निम्नानुसार है:

अमित कुमार, उप. निदेशक (लेखा) / अपीलीय प्राधिकारी, डीएवीपी, कमरा सं. 158, प्रथम तल, सूचना भवन, सीजीओ कॉम्प्लेक्स, लोदी रोड, नई दिल्ली -110003.

भवदीय,

तपन सूत्रधर

(तपन सूत्रधर)
वित्तीय सलाहकार और मुख्य लेखा अधिकारी
/ केन्द्रीय लोक सूचना अधिकारी (A.L.O.)

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५
नागरिकांना अवलोकनासाठी अभिलेख
उपलब्ध करुन देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्र. संकीर्ण२०१८/प्र.क्र.४५/कार्या-६**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई ४००० ०३२**
**दिनांक : २६ नोव्हेंबर, २०१८**

**प्रस्तावना:-**

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत प्राप्त होणा-या माहिती अर्जांची संख्या कमी होण्याच्या दृष्टीने व कामकाजात पारदर्शकता येण्यासाठी पुणे महानगरपालिकेने जावक क्र. मआ/से/१०६२, दिनांक ३१.७.२००९च्या आदेशान्वये, नागरिकांना अवलोकनासाठी अभिलेख उपलब्ध करुन देण्याचा प्रयोग केला होता. त्याच धर्तीवर जिल्हास्तरीय कार्यालयापासून ते निम्नस्तरीय सर्व कार्यालयात नागरिकांना अवलोकनासाठी अभिलेख उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक:-**

शासकीय कामकाजात अधिक पारदर्शकता येण्यासाठी व माहिती अधिकार अधिनियमांतर्गत प्राप्त माहिती अर्जांची, प्रथम व द्वितीय अपीलांची संख्या कमी होण्याच्या दृष्टीने राज्यातील जिल्हा स्तरीय कार्यालयांपासून ते निम्नस्तरीय सर्व कार्यालयात तसेच महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद इत्यादी सर्व कार्यालयात प्रत्येक सोमवारी किंवा सदर दिवशी सार्वजनिक सुट्टी असल्यास त्यानंतरच्या कार्यालयीन दिवशी दुपारी ३.०० ते ५.०० या वेळेत नागरिकांना, माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत विहित प्रक्रियेनुसार, त्यांच्या मागणीनुसार अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करुन द्यावेत.

२. प्रत्येक कार्यालय प्रमुखांनी स्थानिक परिस्थितीच्या अनुषंगाने आवश्यक दुरुस्तीसह नागरिकांना अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करुन देण्याच्या प्रयोगाची आपापल्या कार्यालयात अंमलबजावणी करावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१८११२६१५२८३५३७०७ असा आहे. हे परिपत्रक डीजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

BIPIN MALLICK

Digitally signed by BIPIN MALLICK
DN: c=IN, o=Personal, postalCode=110021, st=Delhi, 2.5.4.20=851b304bef2c7712cf25db5dfc449b43f1be8ed974621443183905 8754ee9d6c, serialNumber=5c1e5899a9e90706d681aa81bf2b35173a431909d439a2c63e7c0e76d6d83e30, cn=BIPIN MALLICK
Date: 2018.11.26 15:40:55 +05'30'

**(बिपिन मल्लिक)**
**अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

३. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
४. राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५. सर्व राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. प्रबंधक (मूळ शाखा/ अपील शाखा), उच्च न्यायालय, मुंबई
७. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
८. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
९. प्रबंधक, लोकआयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१०.अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव(सर्व), मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
११.महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
१२.सर्व मंत्रालयीन विभाग
१३.सर्व विभागीय आयुक्त / सर्व जिल्हाधिकारी
१४.महासंचालक, यशदा, पुणे